26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
AJIT/ MMP/ AKN/ 12:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**राज्यात अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन लागू करण्याबाबत**

(1) * **३२७३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार, डॉ.अपूर्व हिरे: तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२४ ला दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भातः** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक १ जूलै, १९७२ रोजी अथवा त्यानंतर सेवेत आलेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू केली जात नाही, हे खरे आहे काय,
(2) जुलै, २०१२ च्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नास उत्तर देतांना मा.सभापती यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सेवानिवृत्त झालेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(2) होय.
(3) प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. विधानसभेत सोमवारी शालेय शिक्षणाचा विषय असतो आणि गुरुवारी विधानपरिषदेत असतो. दोन्ही सभागृहात मला असा फरक जाणवतो की, विधानसभेत शिक्षणाच्या गुणवत्तेवर अधिक प्रश्न असतात आणि या सभागृहात शिक्षकांची वेतनश्रेणी, रिक्त पदे, वेतन यावर जास्त भर असतो. शिक्षकांच्या वेतनश्रेणी संबंधी किंवा वेतनासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यास हरकत नाही. मला हा मुद्दा स्पष्ट करावयाचा आहे की, शिक्षक प्रतिनिधी हे फक्त शिक्षकांचे प्रतिनिधी नाहीत तर शिक्षकांमधून समाजाचे प्रतिनिधी आहेत. पण ते ही भूमिका कधी कधी विसरतात आणि फक्त वेतनश्रेणी, वेतन यावर प्रश्न विचारतात. आपल्यासमोर कामगारांच्या वेतनासंबंधी प्रश्न आहेत, वकिलांच्या वेतनासंबंधी प्रश्न आहे आणि त्या प्रश्नांना उत्तरे देणे सरकारचे काम आहे. ते प्रश्न प्रलंबित राहिले म्हणून चर्चेला येत आहेत. शिक्षक प्रतिनिधी फक्त शिक्षकांचे प्रश्न मांडतात असा संदेश

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3273....

श्री.विनोद तावडे...

बाहेर जाऊ नये असे मला वाटते आणि माझ्या या मताशी आपण सहमत असाल. घटनेमध्ये जो अंतर्भाव झाला होता (अडथळा ) मी कोणावर टीका करीत नाही. या सभागृहात वकिलांचे प्रतिनिधी नाहीत, कामगार वर्गाचे प्रतिनिधी नाहीत, डॉक्टरांचे प्रतिनिधी नाहीत. फक्त शिक्षकांचे प्रतिनिधी आहेत याचे कारण शिक्षक हा समजाचा सर्वांगीण दृष्टीने विचार करु शकतात. परंतु त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कामात दिसत नाही, ते दिसले पाहिजे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी घटनेतील तरतूद सांगितली त्याच्याशी मी सहमत आहे. हे सभागृह सहमत आहे. मात्र मंत्री महोदय आरोप करतात की, शिक्षकांचे प्रतिनिधी केवळ वेतनश्रेणीवर बोलतात. त्यांच्या या वाक्याला माझी हरकत आहे. आपण यापूर्वीचे प्रोसिडींग्ज काढून पहावे. आम्ही गुणवत्तेच्या संदर्भात देखील चर्चा केलेली आहे. मंत्री महोदयांना असा हेत्वारोप करता येणार नाही.

**सभापती** : आपण प्रश्नोत्तराच्या तासातील वेळ घेत आहात याची नोंद शिक्षक प्रतिनिधी म्हणून आपणही घ्यावी. मंत्री महोदयांनी हेत्वारोप केलेला आहे असे मला वाटत नाही. प्रश्नोत्तराच्या तासातील तीन मिनिटे खर्च झालेली आहेत. ज्यांनी प्रश्न विचारलेला आहे ते ऑन लेग आहेत. मंत्री महोदयांनी त्यांचे मत व्यक्त केलेले आहे. आपणास मेरीटवर काही विचारावयाचे असेल तर विचारावे, आपण ही चर्चा जास्त वाढवू नये. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी प्रश्न विचारावा.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी एक मुद्दा उपस्थित केला. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास हा फक्त प्रश्नोत्तरासाठी असला पाहिजे त्यातील एक मिनिट देखील वाया जाता कामा नये. त्यांचा विषय महत्वाचा आहे, आपण त्यांना बोलण्यासाठी परवानगी द्यावी. परंत दुसरा कोणताही विषय असेल तर तो प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चेला घ्यावा, ही प्रथा आपण पाळली पाहिजे. अन्यथा प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अशा प्रकारे पाच-दहा मिनिटे खर्च होतात. विषय महत्वाचा असल्यामुळे त्यांना तो मांडू द्यावा.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3273....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच बोलण्यासाठी हात वर केला होता. मी या सभागृहात हा विषय अनेकवेळा मांडलेला आहे. मंत्री महोदयांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. आपण एका रुपयातील 71 पैसे वेतनावर खर्च करतो. वेतनासंबंधी किती चर्चा करावी याची गंभीर दखल सभागृहाला घ्यावी लागेल. आपण त्यांच्या मागण्या मान्य करीत राहिलो तर हा खर्च 81 पैशावर जाईल आणि विकासासाठी पैसे शिल्लक राहणार नाहीत. राज्याने घेतलेल्या कर्जावरील व्याज भरण्यासाठीसद्धा शासनाकडे पैसे शिल्लक राहणार नाहीत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील अप्रशिक्षित शिक्षकांची शासनाने 25-30 वर्षे सेवा घेतलेली आहे. यातील काही शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत तर काही सेवानिवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत. हा प्रश्न पुन्हा विचारावा किंवा नाही असा प्रश्न आपल्यासमोर निर्माण होणार आहे. हा प्रश्न आपल्या पुढाकाराने निकाली लागावा अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, लेखी उत्तरात स्पष्ट नमूद केलेले आहे की, "प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आलेला आहे." या प्रश्नावर या सभागृहात दिनांक 8.8.2011 रोजी चर्चा झाली होती त्यावेळी तत्कालीन माननीय सभापतींनी शासनाला निर्देश दिले होते की, "हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्या शिक्षकांनी 25-28 वर्षे सेवा केलेली आहे. त्यातील काही शिक्षक सेवा निवृत्त झाले आहेत, परंतु त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नसेल तर ती गंभ्ीर बाब आहे. त्यांना निवृत्तवेतन देण्याच्या बाबतीत शासनाने कार्यवाही करावी."

सभापती महोदय, माझ्याकडे मंत्री महोदयांचे दिनांक 10 मार्च, 2014 रोजीचे पत्र आहे. त्यामध्ये नमूद केलेले आहे की, "शासन स्तरावर फेर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे." दिनांक 24.2.2014 रोजी हा प्रश्न पुन्हा सभागृहात चर्चेला आला असताना तत्कालीन माननीय सभापतींनी निर्देश दिले होते. त्यावर देखील कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शासनाचे म्हणणे आहे की, आमच्याकडे पैसे नाहीत.या शिक्षकांच्या निवृत्तीवेतनासाठी फार खर्च आहे का, तर त्यासाठी अजिबात खर्च नाही असे माझे म्हणणे आहे. राज्यात एकूण अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या 1628 आहे. त्यातील 416 शिक्षक निवृत्त झालेले आहेत तर काही शिक्षक निवृत्त होणार आहेत.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3273....

श्री.रामनाथ मोते......

त्यांच्या निवृत्तीवेतनासाठी 12 कोटी पेक्षा जास्त खर्च येणार नाही. ज्या शिक्षकांनी आमदार, खासदार, मंत्री घडविले, सभापती घडविले अशा शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे, त्यांना रोजगार हमीच्या कामावर जायला लावणे बरोबर नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे वित्त मंत्री महोदयांचे दिनांक 7.2.2015 रोजीचे पत्र आहे. त्यांनी पत्रात "शिक्षण मंत्र्यांना पत्र लिहून हा विषय अत्यंत महत्वाचा आहे, आपण त्याचा गांभीर्याने विचार करावा" असे म्हटलेले आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, वित्त विभाग आणि शालेय शिक्षण विभागाने एकत्र चर्चा करुन जे शिक्षक 30 जून, 1972 नंतर सेवेत रुजू झालेले आहेत, ज्यांच्या सेवा शासनाने घेतलेल्या आहेत, त्या शिक्षकांच्या बाबतीत तांत्रिक अटी रद्द करुन या शिक्षकांना निवृत्ती वेतन देण्याचा सकारात्मक विचार आणि मानवतेच्या दृष्टीने न्याय देण्याची भूमिका शाासन घेणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेला प्रश्न मानवतेच्या दृष्टीने योग्य आहे. आपण मानवता आणि सकारात्मक गोष्टींचा विचार केला तरी तो विषय नियमात बसावावा लागतो. जवळपास 1622 अप्रशिक्षित शिक्षक आहेत. या शिक्षकांना ठराविक वेळेत प्रशिक्षित होण्यास सांगितले होते. परंतु ते प्रशिक्षित झाले नाहीत. प्रशिक्षित न होण्याचे कारण विचारले असताना त्यांनी सांगितले की, परीक्षेचा पॅटर्न बदलला आहे. मूळ ज्ञान घेतले असेल तर पॅटर्न बदलल्यानंतर त्यावर कसा परिणाम होतो हे मला माहीत नाही. तरी देखील आम्ही ते मान्य करतो. या प्रश्नाच्या संदर्भात तत्कालीन माननीय सभापतींनी तत्कालीन राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांना निदेश दिले होते की, आपण मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार करुन मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव आणावा. शिक्षण विभागाने तसा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला होता. 1622 शिक्षकांना निवृत्तीवेतन द्यावयाचे झाले तर शासनाच्या तिजोरीवर 45.21 कोटी रुपयांचा भार पडतो.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3273....

श्री.विनोद तावडे....

एमएसईबी, विद्यापीठ आणि इतरही अनेक विभागात अप्रशिक्षित कर्मचारी असल्यामुळे त्यांनाही सेवानिवृत्ती वेतन लागू करावे लागेल म्हणून तत्कालीन अर्थमंत्र्यांनी अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबतचा प्रस्ताव नाकारला होता. विद्यमान माननीय अर्थमंत्री यांनी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना पत्र लिहिलेले आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित ठेवल्याबाबतचे स्वयंस्पष्ट निवेदन सोबत जोडले आहे. ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या दिनांक 30/06/1972 पर्यंत झालेल्या होत्या त्या अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना सेवानिवृत्ती वेतन देण्यात आले आहे." महोदय, हे मी यासाठी सांगतो की, आम्ही या बाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविल्यानंतर वित्त विभागाचे सचिव आम्हाला 'धीर' देतील. कारण वित्त विभागात दोन 'सुधीर' आहेत. माननीय अर्थमंत्र्यांनी पत्रामध्ये काय नमूद केले हे मी सांगत आहे. जर त्या विभागाने सकारात्मक निर्णय घेतला तर आमची हरकत नाही. परंतु शिक्षण विभाग म्हणून या विषयी आमची माणुसकीच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका आहे. महोदय, दरम्यानच्या काळात हे शिक्षक प्रशिक्षित का झाले नाही, या बाबत माझा आक्षेप आहे. आजच्या स्थितीमध्ये त्यांना सेवानिवृत्तीची नक्कीच गरज आहे. या निमित्ताने एवढेच सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना माननीय अर्थमंत्र्यांनी जे पत्र लिहिलेले आहे त्या आधारे आम्ही पुन्हा सकारात्मक प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवून व त्यांच्यासोबत चर्चा करुन याबाबत निर्णय घेऊ.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत**

**(२) * २८८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागात पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदे निर्माण होत असतात, या पदांना त्याच वर्षात मान्यता देण्याविषयी शासन निर्णय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा पदांना शासन तातडीने मान्यता देत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यापुढील काळात त्याच वर्षात मान्यता व अनुदान देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागात पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२.३.२०१३ अन्वये कार्यवाही करण्यात येते.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यामध्ये 2001 सालापासून मूळ पदांपेक्षा वाढीव पदांना मंत्रालयातून परवानगी दिली जाते. परंतु राज्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव गेल्या चार-पाच वर्षांपासून मंजूर होत नाही. त्यामुळे त्या पदांवर काम करणाऱ्यांना चार-पाच वर्षे विनावेतन काम करावे लागत आहे. उच्चाधिकार समितीने वाढीव पदे मंजूर केल्यानंतर सुध्दा या पदांच्या वेतनासाठी निधीची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे हे विरोधी पक्षात असताना आमच्या म्हणजेच शिक्षकांच्या बाजूने बोलायचे. परंतु आता सत्ताधारी बाजूला गेल्यामुळे ते आमच्या विरोधात का बोलत आहेत हे समजत नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या वाढीव पदांच्या वेतनासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येईल काय, तसेच प्रलंबित पदे त्याच वर्षात वेतनासह मंजूर करण्यासंदर्भात विभागाच्या वतीने सक्त परिपत्रक काढण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ती त्यांची खंत योग्य आहे. हे खरे आहे की, वाढीव पदांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव चार-

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2886...

श्री.विनोद तावडे....

पाच वर्षे प्रलंबित राहतो. आमच्या विभागाचा आग्रह आहे की, त्या त्या वर्षात वाढीव पदांबाबतचे प्रस्ताव निकाली काढले पाहिजे. आम्ही तीन-चार वर्षांतील प्रस्ताव क्लिअर केल्याचे आपल्याला माहीत असेल. उर्वरित शेवटच्या तीन वर्षांचे प्रस्ताव सुध्दा विहित कालावधीत क्लिअर करण्यात येतील.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारलेले आहे की, या वाढीव पदांच्या वेतनासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येईल काय ? कारण उच्चाधिकार समितीने 924 वाढीव पदांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे त्या पदांच्या वेतनासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या संदर्भात अगोदर प्रस्ताव पाठविण्यात आला होता. परंतु वित्त विभागाने त्यामध्ये काही त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर हे करता येईल. किंबहुना हे वित्त विभागाकडून करुन घ्यावे लागते. या बाबत राज्यभरातून माहिती येत असते. त्यामुळे त्रुटींची पूर्तता करणे गरजेचे आहे.

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होण्यापूर्वी माननीय मंत्र्यांनी आम्हाला जो उपदेश केला, त्यास अनुसरुन मी सांगू इच्छितो की, शिक्षकांची पदे मंजूर केली जात नाही, त्यांना मान्यता दिली जात नाही एवढेच नव्हे तर त्यांचा पगार सुध्दा दिला जात नाही. तरी सुध्दा देशात सर्वात जास्त गुणवत्ता असलेले विद्यार्थी महाराष्ट्रात आहेत. देशात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त इंजिनियर्स आणि डॉक्टर्स महाराष्ट्रातून होतात. राज्यातील शिक्षकांना वेतन न देता सुध्दा गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचे काम आमचे शिक्षक करीत आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, इयत्ता 5 वी ते 10 च्या वर्गामध्ये जी पदे वाढली आहेत त्या वाढीव पदांना कधी मान्यता देणार आहात ? कनिष्ठ महाविद्यालयातील 996 वाढीव पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु त्यांच्या वेतनाची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली नाही. या बाबतचा निषेध आम्ही काल अर्थसंकल्पावरील भाषणाच्या वेळी केला आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, वित्त विभागाकडून विशेष परवानगी घेऊन उक्त 996 पदांच्या वेतनासाठी आर्थिक तरतूद करणार काय ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2886....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे मागच्या सरकारमधील माननीय वित्त मंत्र्यांचे लाडके होते. परंतु तरी सुध्दा त्यांना हे काम का करुन घेता आले नाही, हे माहीत नाही. परंतु 996 पदांच्या बाबतीत स्पेसिफिक उत्तर देऊ इच्छितो की, अर्थसंकल्पात तरतूद केली नाही तर विभागाच्या सचिवांना प्राधिकृत करुन आमच्या विभागाकडे जो पैसा आहे त्यातून या पदांच्या वेतनासाठी अतिरिक्त निधी देता येईल.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(३) * ३७५३ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण विभागातील एमसीव्हिसी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शालेय शिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(२) असल्यास, त्याबाबत शासन आदेश निर्गमित केला आहे काय,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदरहू प्रस्ताव वित्त विभागाने नामंजूर केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक 1/1/1996 पासून पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी द्यावी यासाठी आम्हाला 14 वर्षे संघर्ष करावा लागला. आता तो प्रश्न सुटलेला आहे. त्या शिक्षकांना आपण न्याय दिलेला आहे. राज्यभरात 45 हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आहेत. आम्ही शासनाच्या सूचनेनुसार मागच्या फरकाचे 100 कोटी रुपये मागणार नाही असे लिहून दिले होते. एकप्रकारे या शिक्षकांनी 100 कोटी रुपयांच्या फरकाच्या रकमेवर पाणी सोडले आहे. त्यामुळे या प्रकरणी सुध्दा मागच्या फरकाची रक्कम न देता, चालू शैक्षणिक वर्षापासून वेतनवाढ गृहीत धरुन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दिनांक 1/1/1996 पासून जशी वेतनश्रेणी दिली आहे तशीच वेतनश्रेणी एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयातील निदेशकांना दिली पाहिजे. कारण त्यांची शाळा संहिता आपण स्वीकारलेली आहे. त्यांना जो निर्णय लागू होतो तोच आपल्याला सुध्दा लागू होतो. त्यामुळे वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवून पाचव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी त्यांना दिनांक 1/1/1996 पासून लागू करण्यात येईल काय ?

श्री.रवींद्र वायकर : महोदय, गेल्या वर्षी सुध्दा मी या बाबतचे उत्तर दिले होते. या संदर्भात वित्त विभागाकडे जो प्रस्ताव पाठविण्यात आला होता तो नामंजूर करण्यात आलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार या विषयी सहानुभूतीपूर्वक विचार करुन, पुन्हा या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3753...

श्री.रवींद्र वायकर....

संदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल. शिवाय आम्ही या संदर्भात वैयक्तिकरित्या पाठपुरावा करु

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**यवतमाळ जिल्ह्यातील शाळांमध्ये निकृष्ट प्रतीचा आहार दिला जात असल्याबाबत**

**(४) * ३४५२ श्री.संदीप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील कोरटा केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये निकृष्ट प्रतीचा आहार दिला जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचा आहार देणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा स्वरुपाची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली होती.
(२) व (३) सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता शाळांमध्ये शालेय पोषण आहार शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात येत असून आहाराचा दर्जा चांगला असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "शाळांमध्ये शालेय पोषण आहार शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात येत असून आहाराचा दर्जा चांगला असल्याचे आढळून आले आहे." या बाबतीत मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, सदरहू शालेय पोषण आहाराच्या दर्जाची चौकशी कोणी केली आहे ? तसेच सदरहू शालेय पोषण आहाराची देयके अदा करण्यासाठी वरिष्ठांना टक्केवारी द्यावी लागते, हा आरोप असताना त्या बाबतचा खुलासा लेखी उत्तरात करण्यात आलेला नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3452....

ॲड. निरंजन डावखरे ....

सदर बाब निदर्शनास आली होती. प्रश्नाच्या उत्तरात लिहिले आहे की, सदर बातमी वृत्तपत्रात आली आहे. मग असे असताना प्रशासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत या संदर्भात चौकशी का केली नाही ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असतो असा आरोप वारंवार होत असतो आणि त्यामध्ये अनेक वेळा तथ्यही आढळत असते. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गतच केंद्र पध्दतीने मॉनिटरिंगची व्यवस्था करायची असते. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात येणाऱ्या बातम्यांमध्ये साधारणपणे तथ्य असते आणि कधी कधी काही अंतर्गत विषयही असतात. आलेली बातमी तपासून पाहणे हे विभागाचे धोरण आहे.

सभापती महोदय, इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यामार्फत या संदर्भात चौकशी केली, बातमीत सत्यता आहे का ते पाहिले, निकृष्ट दर्जाचा आहार आहे का ते पाहिले, पिवळा भात आहे का या संदर्भातील माहिती घेतली, तेव्हा बातमीत तथ्य नाही असे आढळले. शालेय पोषण आहार कोणत्या पध्दतीचा आहे, त्यामध्ये पौष्टिकता किती आहे, कॅलरिज किती आहे हे त्याची गुणवत्ता तपासण्याचे प्रकार आहेत. आपल्याला सविस्तर रेकॉर्ड पाहिजे असेल तर मी देतो. शालेय पोषण आहाराच्या संदर्भातील अंमलबजावणी त्या त्या भागातील महिला बचत गट, संस्था यांच्या माध्यमातून केली जाते. योजनेमध्ये संबंधित शिक्षक, मुख्याध्यापक यांची भूमिका गृहीत धरली आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, बातमीतील सर्व मुद्यांची चौकशी केली असता त्यामध्ये काहीही तथ्य आढळले नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शालेय पोषण आहार हा पॅकिंगमध्ये दिला पाहिजे असा उच्च न्यायालयाचा निर्णय होता आणि तसा शासनानेही निर्णय घेतला होता. शालेय पोषण आहार पॅकिंगमध्ये देण्याचे काम सुरू झाले का ? सभापती महोदय, बचत गटांच्या माध्यमातून पोषण आहार दिला जातो. पण 6 महिने त्यांना त्याचे पैसे मिळत नाही. त्यामुळे बचत गट कर्ज व त्याचे व्याज यामध्ये फसतो. शालेय पोषण आहाराचे म्हणजे खिचडी वगैरे शिजविण्याचे पैसे दर महिन्याला बचत गटाला देणार का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3452....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे पॅकेट मधून शालेय पोषण आहार देण्याचा कोणताही निर्देश किंवा निर्णय झालेला नाही. नवनवीन पध्दती येत असतात. आपल्याला याचा विचार करण्यास हरकत नाही. पॅकेटमधून जाण्यापेक्षा, उकळत्या पाण्यात तयार केलेले वेगवेगळे पदार्थ त्यांना मिळतील.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना प्रि-कूक म्हणायचे आहे, शाळेच्या ठिकाणी शिजविण्यापेक्षा डिहायड्रेटेड प्रि-कूक आहार देणे असे म्हणायचे आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तसे करता येईल का याची आम्ही माहिती घेतो. आता तसे होत नाही. कार्बोहायड्रेट् व कॅलरीचा अंतर्भाव होऊन शालेय पोषण आहार जावा असा विचार आम्ही नक्की करीत आहोत. सेंट्रल किचनच्या संदर्भातील प्रश्न पुढे आहे असे मला वाटते. सेंट्रल किचन करून 10-12 तालुक्यांचा पोषण आहार एकत्रितपणे देता येईल का या संदर्भात न्यायालयात काही लिटिगेशन्स सुरू आहेत. मुलांना शालेय पोषण आहार देण्याच्या आधी चव घेण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत असेही सांगण्यात आले आहे. आपण असे केल्यास 1 लाख 10 हजार कर्मचारी आणखी वाढतील आणि मग सन्माननीय सदस्यांचे प्रश्न सुरू होतील. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात सुनावणी आहे, त्यानंतर त्यामध्ये करता येईल. डिहायड्रेट संदर्भात म्हटले आहे. सदर बाबतीत विचार करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यात पोषण आहाराचे टेंडर कोणाला दिले आहे, बचत गटाला अग्रक्रमाने दिले आहे का, जिल्ह्यात किती बचत गट काम करतात, खाजगी ठेकेदार काम करत असतील तर ते किती आहेत ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बचत गटाला डाळ, तांदूळ यांचा प्रत्यक्ष पुरवठा होतो. महिला बचत गट ते शिजवून मुलांना देतात. पुरवठा करणारे सेंट्रली असतात. महिला बचत गट तेथे फक्त अन्न बनवून देत असतात. 2 पध्दतीने विभागून काम होते.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री चांगले उत्तर देत आहेत. परंतु शालेय पोषण आहाराच्या संदर्भात वारंवार तक्रारी येतात. शासन या संदर्भातील कार्यवाही दोन पध्दतीने



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3452....

श्री. विक्रम काळे ....

करीत असल्याने घोळ होत आहे. शासन शहरातील शाळांना तांदूळ पुरविते. परंतु त्यासाठी लागणारे मीठ, मिर्ची, मसाला बचत गटांना घेण्याची मुभा दिलेली आहे. बचत गट ते विकत घेऊन तयार करून शिजवून देतात. परंतु ग्रामीण भागात मात्र बचत गटांना मीठ, मिर्ची शासनाकडून पुरविली जाते. ते सर्व अत्यंत निकृष्ट दर्जाचे असते. त्यामुळे वारंवार असे प्रकार घडतात. शहरातील पध्दतीप्रमाणे ग्रामीण भागात बदल करणार का, जेणेकरून सर्व व्यवस्थित होईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अभ्यासू सन्माननीय सदस्यांचे सजेशन फॉर ॲक्शन.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, मिड मील संदर्भातील ही बाब नवीन नाही. 4 दिवसांपूर्वी सुध्दा मुंबईत अशी घटना घडली होती. माननीय शिक्षण मंत्र्यांनी या विषयी स्टेटमेंट केले होते. शासनाने मिड मीलचा दर्जा योग्य आहे का याची पाहणी करण्याच्या संदर्भात फूड इन्स्पेक्टर नेमले आहेत का आणि जर नेमले असतील फूड इन्स्पेक्टर्सनी किती केसेस पकडल्या आहेत ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण शाळेतील मुले अन्न खात असतात, त्यां्ची काळजी घेण्याची व्यवस्था सिस्टिममध्ये आहे. मी सांगू इच्छितो की, अन्नाच्या दर्जाची तपासणी ठराविक काळानंतर प्रयोगशाळेत केली जाते. सर्व निकष तपासले जातात. शालेय पोषण आहारामध्ये किती प्रोटिन्स असावेत, किती कॅलरिज असावेत असे निकष ठरले आहे, तसा पुरवठा करावा लागतो. प्रयोगशाळेत चाचणी केली जाते आणि नंतरच ते अन्न मुलांना दिले जाते. बचत गटांनी अन्न शिजविल्यानंतर मुलांना अन्न खायला दिले जाते. त्यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या माध्यमातून अन्नाची चाचणी होत असते.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. महिला बचत गटांच्या विरोधात मी नाही. मुलांना सकस व चांगला आहार हायजेनिक पध्दतीने मिळावा हा योजनेचा उद्देश आहे. बचत गटांना 80 पैसे, 1.30 पैसे, 4 रूपये यामध्ये सकस आहार देणे शक्य होत नाही. महिलांची मजुरी वगैरे देऊन ते सर्व काही परवडत नाही. धान्यामध्ये अळ्या पडलेल्या

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3452....

श्रीमती विद्या चव्हाण ....

असतात. धान्य निकृष्ट दर्जाचे असते. मागच्या वेळी काही एनजीओंनी माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात सादरीकरण केले होते. मुंबईत अत्यंत हायजेनिक पध्दतीने व्यवस्थित पॅकिंग करुन इस्कॉनकडून आहार दिला जातो. आपण तसे करावे. कारण मुलांना सकस आहार द्यायचा आहे. रोजगार मिळत असेल तर चांगले आहे. परंतु तेथे स्वच्छता पाळली जात नसेल तर योग्य नाही. त्यामुळे मुले आजारी पडतात. मुंबईत अनेक ठिकाणी सुगंधी दुधामुळे विषबाधा झाली आहे. विषबाधा होत असल्यामुळे मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. चांगले एनजीओ हायजेनिक पध्दतीने आहार देत आहेत. शासनाच्या 4 रुपयांमध्ये स्वत:चे 4 रुपये घालून आहार देत आहेत. आपण अशांना प्राध्यान्याने या संदर्भातील काम दिले तरच योजनेचे उद्दिष्ट साध्य होईल. आपण त्या दृष्टीने काही विचार करणार का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काही विषयाच्या बाबतीत हाच प्रश्न असतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3452

श्री.विनोद तावडे...

एका बाजूला महिलांना रोजगार मिळाला पाहिजे, महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, या संकल्पनेतून आपण महिला बचत गटांकडे हे काम दिलेले आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या आहारामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येते. काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, महिला बचत गट आहार पुरविण्याचे काम करीत नाहीत. पुरवठा स्वत: न करता नावाला बचत गट आणि पुरवठा करणारा कोणी तरी ठेकेदार असतो. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींमधून मार्ग काढण्याचा प्रयत्न आपण करीत असतो. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी इस्कॉनचे सेंट्रल किचनच्या माध्यमातून अतिशय दर्जेदार आहार पुरविण्याचे काम केले जात आहे, त्यांच्यामार्फत किंवा त्यांच्या सारख्या संस्थांमार्फत आहार पुरवठा करावा, अशी सूचना केली आहे. त्याच पध्दतीने शासनाने विचार केला होता. परंतु, राज्यातील महिला बचत गट संस्था न्यायालयात गेल्या आहेत. महिला बचत गटांच्या नावाने कंत्राटदार न्यायालयात गेले असावेत, अशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची माहिती आहे. तसेही असू शकेल. उच्च न्यायालयाने अशी सूचना केली आहे की, प्रत्येक शाळेत चव घेण्यासाठी एका कर्मचाऱ्याची नियुक्ती शासनाने करावी. परंतु, पुन्हा त्या कर्मचाऱ्याचे वेतन, पेन्शन वगैरे बाबी पुढे येऊ शकतील. त्यामुळे राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. लवकरच न्यायालयाचा निर्णय अपेक्षित आहे. परंतु, एक तर सेंट्रल किंचन किंवा डिहॅड्रिटेड पॅक पुरविण्याचा शासन नक्की विचार करील.

-----------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**केंद्र शासनाद्वारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना JEE/AIPMTया परीक्षेच्या पूर्वतयारी करीता निःशुल्क व्यवस्था करणाऱ्या संस्थांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती किंवा अनुदानाबाबत**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(५) *२६७४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाद्वारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या Free Coaching & Allied Scheme for JEE/AIPMT या स्कीम अंतर्गत परीक्षेच्या पूर्वतयारी करीता निःशुल्क व्यवस्था करणाऱ्या संस्थांना शिष्यवृत्ती किंवा अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनविकास बहु. शिक्षण संस्था कृषी व ग्रामीण विकास संस्था, अमरावती या संस्थेद्वारा नागपूर येथील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वरील योजनेअंतर्गत परीक्षेच्या पूर्वतयारीकरीता निःशुल्क व्यवस्था करण्यात आली होती व त्यासाठी या संस्थेला सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाद्वारे अनुदानाचा हप्ता देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) परंतू सन २०१३-१४ सत्रातील विद्यार्थ्यांसाठी अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयामार्फत संस्थेचा तपासणी अहवाल केंद्र शासनाकडे सादर करण्याची अट घालण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत नागपूर येथील तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत सदरहू संस्थेची तपासणी करुन व त्रुटींची पूर्तता करुन तंत्रशिक्षण विभागाने सदरहू अहवाल राज्य शासनाच्या मंत्रालय विभागात माहे मे, २०१३ मध्ये सादर केला होता व सदरहू अहवाल आजपावेतो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, मुंबई यांना दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी पत्र पाठवून सदरहू अहवाल तात्काळ केंद्र शासनाच्या मंत्रालयीन विभागाकडे सादर करण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता :** (१) अंशतः खरे आहे.
सदर योजना केंद्र शासनाची असून केंद्र शासनाकडून जाहिरात देऊन या योजनांतर्गत येणारे कोर्सेस चालविणा-या संस्थांकडून प्राप्त प्रस्ताव, केंद्र शासनाकडून मंजूर झाल्यानंतर, मंजूर अनुदान दोन हप्त्यांमध्ये संबंधित संस्थेस देण्यात येते.
(२) अंशतः खरे आहे.
जनविकास बहु.शिक्षण संस्था कृषि व ग्रामीण विकास या संस्थेचा सन २०१२-१३ साठी उपरोक्त योजनेंतर्गत प्राप्त नवीन प्रस्ताव तपासणी करुन तपासणी अहवालांसह राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. केंद्र शासनाकडून ४० विद्यार्थ्यांना PMT/AIEEE अभ्यासक्रमांसाठी मोफत प्रशिक्षण देण्यासाठी अनुदानाचा पहिला हप्ता केंद्रशासनाचे दिनांक ११.०३.२०१३ आदेशान्वये संस्थेस थेट मंजूर केला आहे.

ता.प्र.क्र. २६७४..........

(३) नाही.
केंद्र शासनाच्या उपरोक्त योजनेंतर्गत संस्थेस एकूण मंजूर अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतर, उर्वरित दुस-या हप्त्यासाठी प्राप्त प्रस्ताव तपासणी अहवाल (Part III) व सुस्पष्ट शिफारस (Part IV) यांसह केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याची विहित कार्यपद्धती केंद्रशासनाने ठरवून दिली आहे.
(४), (५) व (६) नाही.
केंद्रशासनाच्या या योजनेबाबत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येते.सदर संस्थेस अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतर दुस-या हप्त्यासाठी संस्थेने सादर केलेला प्रस्ताव, तपासणी अहवाल (Part III) व त्यानुषंगाने सुस्पष्ट शिफारस (part IV) दिनांक २४.२.२०१५ च्या शासन पत्रान्वये विहित पद्धतीने केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

श्री.अनिल सोले : सभापती महोदय, केंद्र शासनाव्दारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या जेईई/अेआयपीएमटी या स्कीम अंतर्गत परीक्षेच्या पूर्वतयारी करिता नि:शुल्क व्यवस्था करणाऱ्या संस्थांना शिष्यवृत्ती किंवा अनुदान दिले जाते. या माध्यमातून केंद्र सरकारकडून 12 लाख रुपयांचा हप्ता प्राप्त झाला होता. त्यानंतर राज्य शासनाकडून तपासणीसह सुस्पष्ट शिफारशी केंद्र शासनाकडे न पोहोचल्यामुळे केंद्र शासनाकडून दुसरा हप्ता मिळालेला नाही.

सभापती महोदय, त्यांनी माझ्या तारांकित प्रश्नाला उत्तर देत असताना दिनांक 24/2/2015 रोजी पत्राव्दारे केंद्र शासनाला राज्य शासनाच्या शिफारशी पाठविल्याबाबतची माहिती दिली आहे. या संदर्भातील मार्ग मोकळा केल्याबद्दल मी शिक्षण मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाला राज्य शासनामार्फत विहित मुदतीत शिफारशी पाठविल्या गेल्या तर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल आणि या विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या संस्थांची देखील गैरसोय होणार नाही. त्यामुळे भविष्यात राज्य शासनाकडून केंद्र शासनाला विहित मुदतीत शिफारशी पाठविण्याबाबतची योजना मंत्री महोदय तयार करतील का ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून ही योजना राबविली जात असते. सदरचा निधी थेट संबंधित संस्थांना मिळत असतो. त्यावर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. एकूण 10 लाख

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. २६७४..........

श्री.रवींद्र वायकर........

70 हजार रूपयांचे दोन हप्ते होते. पहिला हप्ता 5 लाख 35 हजार रूपये मिळाल्यानंतर दुसऱ्या हप्त्यासाठी तपासणी अहवाल आणि शिफारशी करावयाच्या असतात, त्यामध्ये अनेक त्रुटी होत्या व या त्रुटींचे निराकरण करण्याला वेळ लागला, ही वस्तुस्थिती आहे. आता हा अहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. भविष्यात त्रुटी नसलेला अहवाल आला तर तत्काळ तो केंद्र शासनाला पाठविण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नवीन सरकार सत्तारूढ झाल्यानंतर अल्पसंख्याकांच्या शिक्षणाबद्दलचे प्रश्न प्रकर्षाने पुढे येणार आहेत. तारांकित प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "दुसऱ्या हप्त्यासाठी संस्थेने सादर केलेला प्रस्ताव, तपासणी अहवाल व त्यानुषंगाने सुस्पष्ट शिफारस दिनांक 24/2/2015 च्या शासन पत्रान्वये विहित पध्दतीने केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे." ही केंद्र सरकारची योजना आहे. त्यासाठी संस्थांच्या संख्येवर मर्यादा आहेत का, मिळणाऱ्या एकूण निधींवर मर्यादा आहेत का ? कारण, राज्य शासनाचा या योजनेत एक पैसा देखील नाही. ही स्किम अशा प्रकारच्या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांपर्यंत शासनाने पोहोचवली आहे का, राज्यात या योजनेअंतर्गत आजपर्यंत किती संस्थांना अनुदान मिळाले आहे, किती संस्थांनी यासाठी विनंती केली आहे आणि भविष्यात अधिकचे योगदान राज्य शासनाच्या पाठपुराव्याने केंद्र शासनाकडून मिळवून घेणार आहात का ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, होय.

--------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील**
**अधिव्याख्यात्यांची रिक्त असलेली पदे**

**(६) * ४०५८ श्री.पांडुरंग फुंडकर:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे अधिव्याख्यात्यांची बरीच पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता रिक्त असलेल्या अधिव्याख्यात्यांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. कारण पर्यायी व्यवस्था केली आहे.
शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेतील रिक्त २५ पदांपैकी १० पदांची कंत्राटी अधिव्याखात्यांची नेमणूक केलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करुन अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात येतो.
(३) शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ही पदे राज्यस्तरीय असल्याने सर्व शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त असलेल्या अधिव्याख्याता या पदाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.
(४) महाराष्ट्रातील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगांव येथील शासकीय तंत्रनिकेतन हे विदर्भातील एक जुने तंत्रनिकेतन आहे. या तंत्रनिकेतनामध्ये अधिव्याख्यात्यांची 25 पदे रिक्त आहेत. शासनाने हे मान्य केले आहे की, या जागा रिक्त असून पर्यायी व्यवस्था केलेली आहे. एकूण 25 पदांपैकी 10 पदे कंत्राटी पध्दतीने भरलेली आहेत. उर्वरित 15 पदे शासन कधी भरणार आहे ?

सभापती महोदय, आज त्या ठिकाणी तासिका पध्दतीने अधिव्याख्यात्यांकडून अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्यात येतो. या तंत्रनिकेतनामध्ये गेल्या 1 वर्षापासून ही पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत शासनाची काय योजना आहे ?

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4058.......

श्री.पांडुरंग फुंडकर.......

सभापती महोदय, प्रश्न भाग 3 च्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ही पदे राज्यस्तरीय असल्याने सर्व शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त असलेल्या अधिव्याख्याता या पदाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो." माझा प्रश्न असा आहे की, संपूर्ण राज्यात अधिव्याख्यात्यांची एकूण किती पदे रिक्त आहेत आणि ती पदे न भरण्याबाबतची कारणे काय आहेत ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, अधिव्याख्यात्यांची एकूण 45 पदे मंजूर असून 22 पदे भरलेली आहेत. न्यायालयीन निर्णय दिनांक 14/1/2015 आणि दिनांक 13/2/2014 च्या अनुषंगाने 10 पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. अशा पध्दतीने एकूण 32 पदे कार्यरत आहेत. उर्वरित 13 पदांपैकी 6 पदांवरील कार्यरत अधिव्याख्यांत्यांची 3 वर्षाची सेवा पूर्ण न झाल्यामुळे त्यांना कायम करता येऊ शकत नाही. तथापि, उर्वरित 7 पदांबाबत तासिका पध्दतीने शिक्षणक्रम पूर्ण करुन घेण्यात येत आहे. सदरची पदे सन 2000 ते 2013 या काळात रिक्त झालेली आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख राज्यमंत्री महोदयांनी लक्षात घेतलेला नाही. सदरची पदे भरण्याबाबत कोणत्या अडचणी आहेत आणि ती पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासनाकडे कोणती योजना आहे, असा त्यांचा प्रश्न होता. कंत्राटी पध्दतीने पदे भरलेली आहेत, तासिका पध्दतीने शिक्षणक्रम पूर्ण करुन घेण्यात येत आहे, याची माहिती सन्माननीय सदस्यांनाही आहे. सदरची पदे भरण्यास आणखी किती कालावधी लागणार आहे, सदरची पदे भरण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत, याबाबत राज्यमंत्री महोदयांनी खुलासा करावा. म्हणजे, सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सदरची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात. लोकसेवा आयोगाकडे पदांची मागणी करण्यात आली आहे. आयोगाकडून परीक्षा होऊन निवड केलेल्या उमेदवारांची नावे आल्यानंतर त्यांची नियुक्ती तत्काळ केली जाईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी उत्तर देत असताना शासनाच्या

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4058.......

श्री.सुनील तटकरे.......

तंत्रशिक्षण धोरणावर प्रकाश टाकला आहे. सध्या त्या ठिकाणी 45 पैकी 25 पदे रिक्त आहेत. 25 पदांपैकी 10 पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत आणि उर्वरित पदांबाबत तासिका पध्दतीने शिक्षणक्रम पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. पदे भरण्यामध्ये नेमकी अडचण काय आहे ? राज्यमंत्री महोदयांचे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून यादी प्राप्त झालेली नाही. ही सर्व पदे लोकसेवा आयोगाकडून भरली जातात का ? दीर्घकाळ पदे रिक्त ठेवून आपले उद्दिष्ट साध्य होणार नाही. सभापती महोदय, हा प्रश्न बुलढाणा जिल्ह्यातील एका तंत्रनिकेतनाबाबतचा आहे. परंतु, राज्यभरामध्ये 50 टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त असू शकतात. आता आपण 'मेक इन महाराष्ट्र' या योजनेची घोषणा केली आहे, उद्योग वाढविण्याची घोषणा केली आहे. असे असताना तंत्रशिक्षणामधील नवीन पिढी निर्माण करण्याबाबत जी काही अनास्था दाखविली जात आहे, त्याबाबतीतील हा मूलभूत प्रश्न आहे. ही सर्व स्थिती लक्षात घेता तासिका पध्दत रद्द करुन सर्व पदे कंत्राटी पध्दतीवर आणणार का ? केवळ खामगाव येथेच नाही तर राज्यभरामध्ये लवकरात लवकर ही पदे भरण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम सरकार जाहीर करणार आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, चांगले विद्यार्थी घडले पाहिजेत, या दृष्टीने शिक्षक असलेच पाहिजे. त्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, एमपीएससीकडून कोणकोणती पदे भरली जातात आणि कोणती पदे शासनामार्फत भरली जातात, याचा खुलासा राज्यमंत्री महोदयांनी केलेला नाही.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, प्राचार्यांची पदे एमपीएससीकडून भरली जातात. विभाग प्रमुख, अधिव्याख्याता ही पदेही एमपीएससीकडून भरली जातात.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग 4 ला दिलेल्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्रातील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4058...

श्रीमती शोभा फडणवीस...

अशा किती अधिव्याख्यात्यांची आपण मागणी केली आहे व राज्यात अशी किती पदे रिक्त आहेत.

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, राज्यात एकूण 240 पदे रिक्त आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पदे भरण्यास विलंब होत असेल तर शासन विशेष आदेश काढून ही पदे भरण्याची कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अत्यंत चिंताजनक आहे. या विभागाचा कारभार मी हाती घेतल्यानंतर यामध्ये कोणकोणती पदे रिक्त आहेत, त्यामध्ये विशेषतः लेक्चरर्स, प्राचार्य या सर्व पदांचा आढावा घेतला आहे. आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, या विभागात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. याची दोन कारणे आहेत, इंजिनिअर झालेल्या व्यक्तीचा कल नोकरी किंवा व्यवसाय करण्याकडे जास्त असतो. डॉक्टरांबाबत जशी अडचण आहे तशीच अडचण या प्राचार्यांबाबत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरती करण्याचे प्रयत्न मागील काळात झाले नाहीत. 240 पदांची भरती करण्याचा विचार शासन करीत आहे. दरम्यानच्या काळात कोर्टाचा निकाल प्राचार्यांच्या बाजूने लागल्यामुळे त्या जागा भरण्यात आल्या आहेत. रिक्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले आहे व कोर्टाच्या निर्णयानुसार ज्या लोकांना नेमणुका दिल्या आहेत त्यांचा विचार केला तर थोडी फार जास्त पदे निर्माण होतील. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जी सूचना केली आहे, त्याबाबत मेडिकल एज्युकेशनमधील पदे भरण्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विलंब होत असल्यामुळे या पदांची भरती विभागाकडून करण्यात आली आहे. त्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागात करता येईल काय याचा विचार करण्यात येईल. परंतु असे करताना गुणवत्ता दर्जात कमतरता येणार नाही याकडे लक्ष द्यावे लागेल. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कारभार पाहता सर्व विभाग त्यांच्याकडून भरतीचे काम काढून घेत असतील तर लोकसेवा आयोगाकडून भरण्यात येणाऱ्या पदांच्या संदर्भात सरकार म्हणून काय भूमिका घ्यावी, यासाठी सामान्य प्रशासन विभाग व इतर विभागाशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4058...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, शासनाकडून असे काही करता येईल काय याबाबत विचार करण्यात येईल. महाराष्ट्रातील खाजगी तंत्रनिकेतन किंवा इंजिनिअर कॉलेजमधील पदे महाराष्ट्र लोकसेवा अयोगाकडून भरण्यात येत नाहीत. ती कॉलेजेस चालू आहेत, तेथील शिक्षण व्यवस्थित चालू आहे. खाजगी तंत्रनिकेतन व इंजिनिअर कॉलेजमध्ये जागा डायरेक्ट भरल्या जात आहेत. शासकीय तंत्रनिकेतन व इंजिनिअर कॉलेजमध्ये खाजगीरित्या जाहिरात देऊन तातडीने जागा भरण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केलेली सूचना योग्य आहे, शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. ही पदे बाहेरुन भरण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर त्या पदांची भरती करणे सोपे आहे. याबाबत शासन नक्की विचार करणार आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा नेहमी गुणवत्तेवर जोर असतो, तंत्रनिकेतनची ही कॉलेजेस आहेत, जनरल महाविद्यालयातील शाळांमध्ये मराठी शिकविणारा शिक्षक इतिहास किंवा भूगोल हा विषय शिकवू शकेल. ग्रामीण भागात माण येथे देखील तंत्रनिकेतन कॉलेज आहे, खामगांव येथे तंत्रनिकेतन कॉलेज आहे, गरीब विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण मिळावे म्हणून प्रत्येक तालुक्यात तंत्रनिकेतन कॉलेजेस शासनाने काढली आहेत. गरीब मुलगा स्वतःच्या पायावर उभा रहावा, म्हणून ही कॉलेजेस काढण्यात आली आहेत. शासकीय तंत्रनिकेतन मधील 50 टक्के पदे सन 2000 पासून रिक्त आहेत. परंतु आघाडी सरकारने विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडले नाही. ही रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली होती.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला माझी हरकत आहे. सभागृहात प्रश्नांना न्याय मिळत नाही, तीन किंवा चार प्रश्नांच्या वरती प्रश्न सभागृहात चर्चेला येत नाहीत. सन्माननीय सदस्यांना प्रश्न डेव्हलप करण्यासाठी व कॉमेंट करण्यासाठी परवानगी देत असला तर हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य प्रत्येक प्रश्नांवर असे कॉमेंट करतात. त्यामुळे या प्रश्नाला काही अर्थ राहत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-3

VVK/ MMP/ AKN/ प्रथम श्री.रोझेकर... 12:40

ता.प्र.क्र.4058...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली होती. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत पाटील सभागृहात किती वेळा बोलत असतात. मला बोलण्यास किती वेळा संधी मिळते. सभापती महोदय, आम्हाला या जागा भरण्याबात न्यायालयात जावे लागले होते. कंत्राटी अधिव्याख्याता यांना कोर्टाच्या निर्णयानुसार नियमित करण्यात आले आहे. अजून काही कंत्राटी अधिव्याख्यात्यांना नियमित करण्यात आले नाही. आजपर्यंत सेवेत असलेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नाशिक येथे नवीन स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(७) * २८२३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४९१५२ ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभाग व प्रशासकीय व्यवस्थेवरील कामाचा ताण कमी होण्यासाठी पुणे विद्यापीठाचे नाशिक व अहमदनगर येथे उपकेंद्र स्थापन करण्याच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसला मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीनुसार विविध विभागाची मान्यता घेऊन मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला आहे काय व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली व उक्त उपकेंद्र कार्यान्वित होण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नाशिक येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याऐवजी पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नवीन स्वतंत्र नाशिक विद्यापीठ करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची झालेली मोठी संख्या विचारात घेता नाशिक परिसरातील शैक्षणिक विस्तार पाहता नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबाबत शासन कोणता विचार करीत आहे वा करणार आहे ?

**श्री.रवींद्र वायकर,श्री. विनोद तावडे, यांच्याकरिता :** (१) नाही.
(२) व (३) वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या पुनर्विचारार्थ सादर करण्यात येत आहे.
(४) व (५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नाशिक येथे नवीन स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव नाही.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, पुणे शहर आणि पुणे जिल्ह्यात शिक्षणाचा विस्तार खूप आहे. पुणे विद्यापीठावर पुणे शहराचा भरपूर ताण आहे, त्यामुळे नाशिक येथील महाविद्यालयांना न्याय मिळत नाही. पुणे विद्यापीठाला 300 कॉलेज संलग्न आहेत, 200 इन्स्टिट्यूटस संलग्न आहेत. त्यामुळे नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ करण्यात येणार आहे काय ? यासाठी आर्थिक तरतूद नाही असे लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे. मंत्री महोदयांना भेटून मी विनंती केली होती

की, पुणे विद्यापीठाकडे 200 कोटी रूपयांच्या एफडीआर पडून आहेत. विद्यापीठ एफडीआर करुन ठेवण्यासाठी नाही. त्यातील अर्धे पैसे नाशिक येथे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी दिले पाहिजेत.

...5....



ता.प्र.क्र.2823..

डॉ.अपूर्व हिरे...

नाशिक येथे विद्यापीठासाठी 65 एकर जागा पडून आहे. त्यामुळे तेथे विद्यापीठ तातडीने सुरु करता येईल. या दृष्टीकोनातून शासन सकारात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाबतीत विभाजनाचा कोणताही प्रस्ताव नाही. पुणे विद्यापीठाचे उप केंद्र नाशिक आणि अहमदनगर येथे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत मंत्रिमंडळात निर्णय घेऊन ती उप केंद्रे लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पुणे विद्यापीठा अंतर्गत नाशिक आणि अहमदनगर हे दोन महत्वाचे जिल्हे येतात. पुणे विद्यापीठाची विद्यार्थी संख्या, त्यांच्या फॅकल्टीज आणि आवश्यकता पाहिल्यानंतर अहमदनगर व नाशिक येथे उप केंद्र सुरु करावयाची आहते. एकेका जिल्ह्याचा विचार केला तर जेवढी महाविद्यालयांची संख्या आवश्यक आहे तेवढी महाविद्यालये या दोन जिल्ह्यात आहेत. आवश्यक तेवढ्या विद्यार्थ्यांची संख्या तेथे आहे. फॅकल्टीज देखील या दोन्ही जिल्ह्यात आहेत. तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळी विद्यापीठे करायची नसतील हे मी समजू शकतो. पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत ही उपकेंद्र येणार त्यामुळे ही उपकेंद्रे सक्षम पध्दतीने चालली पाहिजेत त्यासाठी लागणारा निधी दोन्ही उपकेंद्रांना त्या प्रमाणात मिळाला पाहिजे. महाविद्यालयांच्या संख्येप्रमाणे व विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात आर्थिक नियोजन करण्यात येणार आहे काय ? दुसरा महत्वाचा भाग असा आहे की, कोणत्याही विद्यापीठाच्या निर्मितीनंतर त्यामध्ये संशोधनाचा भाग महत्वाचा असतो. ही उपकेंद्रे सुरु करताना काही संशोधन विभाग नाशिक आणि अहमदनगर येथे देण्याचा विचार करण्यात येईल काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला आहे. यासाठी एक समिती गठीत करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून उपकेंद्र कशा पध्दतीने चालविली पाहिजेत त्यांना निधी किती लागेल, चांगले शिक्षक कसे मिळतील या सर्व गोष्टी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

समितीमार्फत तपासून घेण्यात येतील व ही दोन्ही उपकेंद्रे चांगल्या पध्दतीने कशी चालतील ते पाहण्यात येईल.

...6...



ता.प्र.क्र.2823...

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, यामध्ये असे नमूद केले आहे की, वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या पुनर्विचारार्थ सादर करण्यात येत आहे. मंत्रालयातील नियोजन आणि वित्त विभागाकडून नेहमी विलंब होत असतो. माझा प्रश्न असा आहे की, उपकेंद्राबाबत ताकवले समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन समिती नियुक्त करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. ताकवले समितीने ज्या सूचना केल्या आहेत त्याबाबत शासनाचे काय धोरण आहे ?

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2823..........

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जे सांगितले ते खरे आहे की, मध्यंतरीच्या काळात विद्यापीठाच्या संदर्भात वेगवेगळ्या तीन समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. डॉ.अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिली समिती नियुक्त करण्यात आली होती आणि ही समिती राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता या विषयावर विचार करण्यासाठी नियुक्त करण्यात आली होती. दुसरी समिती डॉ.अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली होती आणि ही समिती विद्यापीठ कायद्याच्या ॲक्ट संदर्भात नियुक्त करण्यात आली होती. तसेच, श्री.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली तिसरी समिती नियुक्त करण्यात आली होती आणि ही समिती विद्यापीठांच्या विभाजनाच्या संदर्भात नियुक्त करण्यात आली होती. ताकवले समितीने ज्या शिफारशी केल्या त्यामध्ये विद्यापीठांच्या शिक्षणात सामाजिक विकासाचा संबंध जोडण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर कसा केला पाहिजे, क्रियाशीलता आणि नाविन्यतेच्या आधारावर शिक्षण व्यवस्था कशी निर्माण केली पाहिजे, विद्यापीठ संलग्न महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांना स्वायत्तता कशी देता येईल, अशा अनेक गोष्टी त्या समितीने सुचविल्या होत्या आणि प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उप विद्यापीठ निर्मिती असे सुचविले होते. उप विद्यापीठ निर्मिती हा भाग खर्चाशी संबंधित आहे. मघाशी माननीय राज्यमंत्री श्री.रवींद्र वायकर यांनी सांगितल्याप्रमाणे नाशिकमध्ये 103 शिक्षकीय पदे आणि 179 शिक्षकेतर पदे निर्माण केलेली आहेत. नगरमध्ये सुद्धा याच पद्धतीने 90 शिक्षकीय आणि 179 शिक्षकेतर पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जी सूचना केली त्या संदर्भात समिती नियुक्त करण्याबाबत विचार करु असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. या उप केंद्राच्या माध्यमातून संशोधनाचा अधिकार दिला, त्यासाठी थोडी आर्थिक मदत दिली तर खरे म्हणजे वेगळे विद्यापीठ होणे याचा अर्थ संशोधनाचे काम अधिक चालणे, त्या ठिकाणी अधिक पदव्युत्तर वर्ग चालणे असा होतो. परंतु प्रशासकीय खर्चाचा जो बोजा आहे तो आपल्याला सांभाळता येणार नाही. त्या ठिकाणी अधिक संशोधनाचे काम करता आले पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे तारांकित

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2823..........

श्री.विनोद तावडे........

प्रश्नातील मूळ गाभा असा आहे की, विद्यापीठ आल्यामुळे त्या ठिकाणी पदव्युत्तर अभ्यासक्रम, संशोधनाचे अधिक काम होऊ शकते. माननीय राज्यमंत्र्यांनी एक समिती नियुक्त करण्याबाबत सांगितले. त्या प्रमाणे आम्ही तसा विचार करु.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, यासाठी येणारा जो वित्तीय भार आहे तो संपूर्ण भार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उचलणार आहे, असा माझा समज आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जर वित्तीय भार उचलणार असेल आणि शासनावर कोणताही वित्तीय भार पडणार नसेल तर मग यासाठी परवानगी देण्यास विलंब का होत आहे ?शासनाकडून नगर आणि नाशिक येथे विद्यापीठाला जागा देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये विनाकारण विलंब होत आहे, असे मला वाटते. म्हणून विनाविलंब हे होणार आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, मागील वेळी देखील हा प्रश्न चर्चेला आला होता. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यामध्ये आणखी काही फेरफार करावयाचा असेल तर पुन्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या संदर्भात तत्काळ निर्णय घेण्यात येईल. वित्तीय भार पडणार नाही. परंतु, संपूर्ण आयोजन करुन या संदर्भात निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही विद्यापीठाचे विभाजन करावयाचे असेल तर कायद्यामध्ये तशी तरतूद आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 नुसार विद्यापीठाच्या अंतर्गत जास्त महाविद्यालये येत असतील तर आपण त्या विद्यापीठाचे विभाजन करु शकतो. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पुणे विद्यापीठातून नाशिक विद्यापीठ वेगळे करीत असताना सर्व निकष पूर्ण होतात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 मध्ये महाविद्यालयाच्या संख्येची कोणतीही अट नाही. राज्य शासनाने या विषयामध्ये....

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2823..........

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 मध्ये या संदर्भात तरतूद आहे. मंत्री महोदयांनी त्या बाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी. विद्यापीठाच्या अंतर्गत 250 महाविद्यालये येत असतील तर त्या विद्यापीठाचे विभाजन करता येते, अशी कायद्यात तरतूद आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये. मंत्री महोदयांनी कायद्यातील तरतूद बघावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे म्हणतात ते बरोबर आहे. विभाजन केले पाहिजे आणि विभाजन करता येते. परंतु, यामध्ये फरक आहे. ज्यावेळी आपण विभाजनाचा विचार करतो त्यासाठी वित्तीय गोष्टी जमल्या तर आपण ते करु शकतो. परंतु, ते केलेच पाहिजे, असे नाही. मी हाच फरक सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच, युजीसीच्या विद्यार्थी संख्येच्या गाईड लाईन्स देखील आहेत. त्याचा देखील विचार करावा लागतो. आज महाविद्यालयांची वाढलेली संख्या विचारात घेता आपल्याला कोणत्याही विद्यापीठाचे विभाजन करता येईल एवढी महाविद्यालयांची संख्या वाढलेली आहे. परंतु, ते केलेच पाहिजे, असे कायद्याने बंधनकारक नाही.

------------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नेमण्याबाबत**

**(8) * ३३७५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) शाळा तिथे प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नेमण्याबाबत शासनाकडे वांरवार होणाऱ्या मागणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याचे स्वरुप काय व अंमलबजावणीबाबत कार्यवाही झाली आहे काय,
(3) पाचशेहून पटसंख्या असलेल्या शाळांना बी.एससी. (B.SC.) पात्रताधारक प्रयोगशाळा सहाय्यक (उपशिक्षक) आणि बारावी सायन्स उत्तीर्ण प्रयोगशाळा परिचर तर ग्रंथालयांसाठी बी.लीप पदवीधारक ग्रंथपाल (उपशिक्षक) नेमण्याबाबत शासनाने विचार केला आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्नातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रश्न गुणवत्ता वाढीच्या संदर्भातील आहे. बी.एससी. पात्रताधारक प्रयोगशाळा सहायक आणि बारावी सायन्स उत्तीर्ण प्रयोगशाळा परिचर आणि ग्रंथालयांसाठी बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स पदवी प्राप्त ग्रंथपाल नेमण्याबाबत लेखी प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, याबाबत शासन यापुढे विचार करणार आहे काय ? कारण, या तीन गोष्टींशिवाय माध्यमिक शिक्षण गुणवत्तापूर्ण होऊ शकत नाही. विशेष करुन सायन्स आणि लायब्ररी ही प्रत्येक शाळेसाठी आवश्यक बाब आहे. ती प्रत्येक शाळेत करण्यात येणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील वेळी देखील या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. आपण चिपळूणकर समिती नियुक्त केली. मी मागे देखील स्पष्ट केले होते की, ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा परिचारक या दोघांची भूमिका शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अतिशय महत्वाची आहे. ग्रंथपाल हा फक्त पुस्तकांचा कस्टोडियन नाही तर विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यास प्रेरित करणारा ग्रंथपाल असेल तर तो पूर्ण वेळ असला पाहिजे, त्याची पदे देखील वाढविली पाहिजेत. मुद्दा असा आहे की, या संदर्भात जी समिती नेमलेली आहे त्या समितीमध्ये सभागृहातील काही सदस्य देखील आहेत. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर सन्माननीय सदस्यांना यातील जो अभिप्रेत अर्थ आहे त्याची आपण अंमलबजावणी करु.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर ठेवण्याबाबत**

**(9) * ३२०५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, ॲड रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला असल्याचे व या योजनेत माहिला बचत गटाचा सहभाग करण्याचा शासनाने निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागामधील शाळांमध्ये तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली राबविण्याचा निर्णय शासनाने दि.१८ जून, २००९ रोजी घेतला आहे.
(2) व (३) सदर शासन निर्णयानुसार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागवून संस्थांची निवड करण्यात आली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयामध्ये या विरोधात याचिका दाखल झालेल्या होत्या. सदर याचिकांवर शासनाच्या बाजूने निर्णय झालेला आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाने सदर योजनेमधून शिक्षकांचा सहभाग वगळण्याचे आदेश दिलेले आहे. शालेय पोषण आहार योजनेमध्ये शिक्षकांचा सहभाग आवश्यक आहे. यामुळे शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केलेली आहे.

सभापती महोदय, आपण मघाशी या विषयावरील तारांकित प्रश्नावर चर्चा केलेली आहे. तरी देखील या संदर्भात काही करावयाचे असेल तर तसे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी निदर्शनास आणून द्यावे. त्याबाबत अधिवेशन संपण्यापूर्वी कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मघाशी शालेय पोषण आहाराच्या संदर्भातील तारांकित प्रश्नावर चर्चा झालेली आहे. परंतु, शहरांमध्ये सेंट्रल किचन करणे गरजेचे आहे. कारण, विद्यार्थ्यांची संख्या देखील वाढलेली आहे. म्हणून सेंट्रल किचन करण्याच्या बाबतीत शासनामार्फत ठोस पावले उचलली जातील काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3205......

**सभापती :** आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील चौथ्या क्रमांकाचा प्रश्न पोषण आहाराच्या संदर्भातील आहे. मंत्री महोदयांनी त्या प्रश्नाला सविस्तर उत्तर दिलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मघाशी प्रश्नोत्तराच्या यादीतील चौथ्या क्रमांकाच्या प्रश्नाला जे उत्तर दिले त्याचे कार्यवृत्त मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्याकडे पाठवून देतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "सदर योजनेमधून शिक्षकांचा सहभाग वगळण्याचे आदेश दिलेले आहेत." माझा प्रश्न असा आहे की, आपण यातून शिक्षकांचा सहभाग वगळणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण याच मुद्यावर सुप्रीम कोर्टात गेलेलो आहोत की, शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचे वाटप करावयाचे नाही तर कोणी करावयाचे, मग यासाठी कॅटरर्स लावावयाचे काय ? शेवटी, यामध्ये त्यांचा सहभाग असणारच आहे आणि या सर्व गोष्टीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टात केस सुरु आहे.

------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मौजे वडवली नवापाडा (जि.पालघर) येथे कंपनीच्या सांडपाण्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम**

**(10) * ४०७८ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे वडवली नवापाडा (जि.पालघर) येथील सेटवाला फूडस प्रा.लि.या कंपनीतील सांडपाण्यामुळे तेथील गावपाडयात दुर्गंधी पसरुन महिला, मुले, नागरिकांना त्वचारोग, काविळ इत्यादी रोगांची लागण झाल्याने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला होणारा धोका टाळण्यासाठी शासन सदर कंपनीविरुध्द कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,
(4) अद्यापि,कारवाई वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरली होती हे खरे आहे, परंतु आरोग्य अधिकारी यांच्या अहवालानुसार या कारणास्तव त्वचा रोग, काविळ इत्यादी रुग्णांची नोंद नाही.
(2) होय.

दैनिक सकाळ वृत्तपत्रात दिनांक २/१/२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक ३/१/२०१५ रोजी उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने भेट देऊन पाहणी केली.
(3) उद्योगातून निर्माण होणारे प्रक्रियाकृत सांडपाणी उद्योगाच्या आवारात फवारणी करताना आढळून आले. फवारणी केलेल्या पाण्यामुळे सभोवतालच्या परिसरात वास येत असल्याचे दिनांक ०३/०१/२०१५ रोजीच्या पाहणीत जाणवले. तसेच, उद्योगाच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या एरीएशन टाकीमध्ये बायोमासचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले. सबब, मंडळाने उद्योगास दि. ०७/०१/२०१५ रोजी समज दिली व दिनांक ०५/०३/२०१५ रोजी उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.
(4) उद्योगाची मंडळाने दिनांक ०५/०३/२०१५ रोजी पुन:श्च पाहणी केली असून पाहणी दरम्यान उद्योगाने बायोमास वाढविण्यासाठी कल्चर एरिएशन टैंकमध्ये टाकल्याचे कंपनी प्रतिनिधींनी सांगितले. तसेच उद्योगाने परिसरात प्रक्रियाकृत सांडपाणी फवारणी बंद केली असून वासाचा प्रार्दूभाव टाळण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा परिसरात ब्लीचिंग पावडर टाकली जात असल्याचे आढळून आले.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की, दैनिक सकाळ वृत्तपत्रात हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे. मौजे वडवली नवापाडा हा

..8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4078........

श्री.आनंद ठाकूर........

शंभर टक्के आदिवासी भाग आहे. तेथील लोकांना सांडपाणी आणि दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. तेथील एका नाल्यामध्ये हे सांडपाणी सोडले जाते. ज्यावेळी तेथे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी पाहणी करण्यासाठी गेल्यानंतर तेथे तात्पुरती उपाययोजना करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4078...

श्री.आनंद ठाकूर.....

ही पहिल्यांदा वृत्तपत्रात बातमी आली आणि उपाययोजना झाली असे घडलेले नाही. स्थानिक ग्रामपंचायतीने पंचायत समितीचा आरोग्य विभाग, तहसील कार्यालय या ठिकाणी निवेदन देऊन चर्चा केली आहे. परंतु कारवाई झालेली नव्हती. आता कारवाई झाली, ती सुध्दा तात्पुरत्या स्वरुपात झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अजूनही दुर्गंधीचा त्रास संपलेला नाही. या संदर्भात वारंवार प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून लक्ष दिले जाईल काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यात औद्योगिक क्षेत्र वाढत असताना ज्या उद्योगाकडून असे सांडपाणी निर्माण केले जाते त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाची जी कार्यप्रणाली आहे त्यानुसार अशा उद्योगांवर कारवाई केली जाते. उत्तरामध्ये म्हटले आहे की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने भेट देऊन पाहणी केली. अहवाल आरोग्य विभागाकडून देण्यात आला त्यात म्हटले आहे की, कोणतीही रोगराई झालेली नाही. परंतु विचित्र वास येत होता, त्याची कारणे अहवालामध्ये नमूद केली आहेत. हा सर्व संगनमताचा प्रकार दिसतो. अधिकारी जातात, पाहणी करतात, बायोमासचे प्रमाण कमी आहे ते वाढवा असे सांगतात, वाढविण्यासाठी नोटीस देतात, पुढे काय झाले हे बघत नाही. मात्र तेथे राहणाऱ्या नागरिकांना त्रास होतो त्यात काही फरक पडलेला नाही. अशी घटना घडल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली असली तरी वरिष्ठ स्तरावरुन प्रयोगशाळा तज्ज्ञ यांनी जाऊन त्या भागाची पाहणी करावी आणि दोन-तीन महिने मॉनिटरिंग करुन दुर्गंधी कमी झाली की नाही याचा अहवाल तयार करुन तो आम्हाला दिला जाईल काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, होय.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, प्रश्नाच्या भाग-4 बाबतच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, उद्योगाची मंडळाने दिनांक 5.3.2015 रोजी पुनश्च पाहणी केली असून पाहणी दरम्यान उद्योगाने बायोमास वाढविण्यासाठी कल्चर एरिएशन टँकमध्ये टाकल्याचे कंपनी प्रतिनिधींनी सांगितले. प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाहणी केली आहे की कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितलेल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बाबीवर विश्वास ठेवण्यात आला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी दोन्ही प्रश्नांना "होय" असे उत्तर दिले आहे. माननीय सदस्य सर्वश्री आनंद ठाकूर व हेमंत टकले यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनाशी निगडित असा प्रश्न विचारला होता. प्रदूषण नियंत्रण मंडळाने रासायनिक प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांकडे ज्या पध्दतीने बघितले पाहिजे त्या पध्दतीने लक्ष देत नाही. मात्र राज्यमंत्री महोदय केवळ प्रश्नाला बगल देण्यासाठी होय असे उत्तर देतात, हे गैर आहे. आपण त्यांना समज दिली पाहिजे. कंपनीच्या प्रतिनिधीने सांगितलेल्या गोष्टीवर शासनाचा विश्वास आहे का? या कंपनीची पुन्हा एकदा प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पाहणी केली जाईल काय?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी असा प्रश्न विचारला होता की, चौकशी करणार का, पाहणी करणार का, त्या संदर्भातील अहवाल देणार का, या प्रश्नाबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी 'होय' असे उत्तर दिले. होय म्हणणे चुकीचे असेल तर नाही म्हणायचे का? समज देण्याची गरज नाही. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी मुद्दा मांडला त्याबाबत सांगू इच्छितो की, वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात येऊन तीन महिने सतत त्या कंपनीची पाहणी करुन त्या गावामध्ये प्रदूषण होणार नाही याची दखल मंडळ घेईल. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना पुन्हा प्रश्न विचारण्याची वेळ येणार नाही याची दखल मी स्वत: घेणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, स्वत: मंत्री महोदय त्या ठिकाणी जाऊन पाहणी करतील काय?

श्री.रामदास कदम : नाही. जायचे ठरविले तर माननीय सदस्यांना सोबत घेऊन पाहणी केली जाईल.

**सभापती** : दोघांनी मिळून पाहणी करा, म्हणजे प्रश्न मिटेल.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील दहा प्रश्ने उत्तरित झाल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती :** आज माझ्याकडे माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण व माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. एकंदरीत या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी सर्व गटनेते आणि ज्यांनी सूचना मांडली आहे त्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देत आहे. म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मी माझा निर्णय देतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी म.वि.प.नियम 289 अन्वये एका गंभीर विषयावर या ठिकाणी भाष्य करण्यासाठी उभा आहे. सभापती महोदय, राज्यभरात एकूण 88 हजार अंगणवाडी मदतनीस, 11 हजार मिनी अंगणवाडी सेविका व 28 हजार अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. या सर्व महिला कर्मचाऱ्यांना दरमहा 950 रुपये इतके मानधन मिळते. मिनी अंगणवाडी सेविकांना 500 रुपये वाढीव मानधन 1 एप्रिल, 2014 पासून देण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला होता. त्याचबरोबर अंगणवाडी सेविकांना दरवर्षी दिवाळीच्या सणाला भाऊबीज देण्यात येत होती. यावर्षी सरकारने भाऊबीज दिली नाही. 1 एप्रिल, 2014 पासून जे वाढीव मानधन देण्याचा निर्णय झाला होता त्या तारखेपासून तो लागू न करता 1 एप्रिल, 2015 पासून त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला.

सभापती महोदय, या अंगणवाडी सेविकांच्या अनेक संघटनांपैकी एका संघटनेने 17 मार्चला आंदोलन केले होते. त्यानंतर 25 मार्चला आंदोलन करण्यात आले. मोठया प्रमाणात राज्यातील अंगणवाडी सेविकांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी आझाद मैदान येथे आंदोलन केले. त्या ठिकाणी मंत्री महोदयांनी भेट दिली नाही. राज्यमंत्र्यांनी सायंकाळी उशिरा भेट दिल्याचे पहावयास मिळाले. त्यातून हा प्रश्न सुटू शकत नाही. एका अंगणवाडी सेविकेचे हिंगोली परिसरात दुर्दैवी निधन झाले. शासनाला पूर्वसूचना देऊन मोर्चा येतो त्यावेळी संविधानाच्या दृष्टीने मोर्चाला सामोरे जाण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाते. ती भूमिका युती सरकारकडून घेतली गेली नाही. यामुळे त्या ठिकाणी उष्माघाताचा त्रास होऊन एका महिलेचा मृत्यू झाला. याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालणे आवश्यक आहेच, पण ज्या भगिनीचे निधन झाले तिच्या वारसांना मुख्यमंत्री

26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G.4

SGB/ MMP/ AKN/ KTG/ AKN/ 13:00

श्री.सुनील तटकरे....

निधीतून आर्थिक मदत दिली पाहिजे. 1 एप्रिल, 2014 पासून वाढीव मानधन मिळावे या कारणासाठी मोर्चा काढण्यात आला होता. मागील सरकारने जी मानधनात वाढ केली होती त्या संदर्भात राज्य सरकारने सभागृहात ठामपणे निवेदन करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी म.वि.प.नियम 289 अन्वये एका गंभीर विषयावर भाष्य केले आहे ते अतिशय रास्त आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, पोलीस कस्टडीत एखाद्या आरोपीचा मृत्यू झाला आणि त्यासंबंधी विधानसभेत ज्या ज्यावेळी स्थगन प्रस्तावाची सूचना मांडण्यात येते त्यावेळी ती प्रस्तावाची सूचना मान्य केली जाते. हा 2 लाख अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांचा प्रश्न आहे. या सर्व महिला कर्मचारी मोर्चा घेऊन आझाद मैदानावर आल्या होत्या. शासनाने चुकीचा निर्णय घेतला त्याबद्दल मोर्चा काढण्यात आला होता. म्हणून नियम 289 अन्वये जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे ती मान्य करावी अशी मी विनंती करतो. या प्रश्नावर केव्हा तरी चर्चा घ्यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत 88 हजार अंगणवाडी मदतनीस, 11 हजार मिनी अंगणवाडी सेविका व 28 हजार अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत.

नंतर एच.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

अंगणवाडीसेविका आझाद मैदान येथे मोर्चा घेऊन आल्या होत्या. त्यातील एक अंगणवाडीसेविका मृत्युमुखी पडली आहे. पूर्वी मोर्चा काळा घोडा पर्यंत यायचा, चर्चगेट येथील सम्राट हॉटेलपर्यंत यायाचा. वाहतूक खोळंबू नये, सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सर्व मोर्चे आझाद मैदानापर्यंत अडविण्यात येतात. आज आझाद मैदान येथे कुठल्याही प्रकारची सोय नाही. महिलांसाठी प्रसाधानगृह नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही, सावलीची सोय नाही. आपण अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नावर चर्चा केली पाहिजे. आझाद मैदानावर जे मोर्चे येतात, तेथे जे आंदोलक येतात त्यांची सोय व्यवस्थित केली पाहिजे. यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करावा. त्यासाठी आजचे कामकाज बाजूला ठेवून त्यावर चर्चा करावी अशी मागणी मी करीत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. अंगणवाडी सेविकांचा मोर्चा दरवर्षी येतो. नागपूर अधिवेशनाच्या वेळीसुद्धा अंगणवाडी सेविकांचा मोर्चा आला होता. मागच्या आठवड्यापासून अंगणवाडी सेविका आझाद मैदान येथे आपल्या मागण्यांसाठी बसल्या होत्या. अंगणवाडी सेविकांच्या मागण्यांसंबंधी सह्याद्रीवर बैठक झाली होती. माननीय महिला व बालकल्याण मंत्र्यांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वासन दिले होते की, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना 1 एप्रिल 2014 पासून रूपये 950 इतकी वाढ देण्यात येईल. पण त्याची पूर्तता अजून झालेली नाही. तत्कालीन वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ केली होती. तसा शासन निर्णय देखील निर्गमित झाला आहे. ते मानधन अजून पर्यंत दिलेले नाही. तसेच तत्कालीन वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी तत्कालीन महिला व बालविकास मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांच्या समवेत एक बैठक घेतली होती. त्या बैठकीला मी देखील उपस्थित होते. अंगणवाडीचे प्रश्न काय आहेत हे समजावून घेण्यासाठी काल श्री.अजितदादा पवार यांनी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मोर्चाच्या ठिकाणी पाठविले होते. अंगणवाडी सेविकांना अजून पर्यंत अनुदानात वाढ का मिळाली नाही हे समजून घेण्यासाठी आम्ही काल तेथे गेलो होतो. त्या आधीच आशा नावाच्या अंगणवाडी सेविकेचा दुर्दैवी मृत्यू झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

शासनाने तुमचे आणि आमचे असे करण्यामध्ये वेळ न घालवता यात मार्ग काढला पाहिजे. या महिला आज खरोखरच घराघरामध्ये जाऊन कामे करीत आहेत. शासनाचे जेवढे म्हणून काम असते तेवढे सर्व काम अंगणवाडी सेविका आणि आशा, मदतनीस करीत आहेत. त्यांना रूपये 950 इतकी वाढ देण्याचे कबूल करण्यात आले असून तत्संबंधातील जीआर देखील काढण्यात आला आहे. पण आता ती वाढ आपण देत नाही. त्यांना भेटायला मंत्री महोदया जात नाहीत. त्यांना कोणत्याही प्रकारचे आश्वासन देण्यात येत नाही. ती बाई उन्हामध्ये तडफडून मेली तरी सरकारला काही जाग येत नाही. पूर्वी आम्ही काळाघोडा व चर्चगट येथील सम्राट हॉटेल पर्यंत मोर्चा घेऊन येत होतो. परंतु, उच्च न्यायालयाने बंदी घातल्यामुळे आता सर्व मोर्चे आझाद मैदान पर्यंत अडविण्यात येतात. आझाद मैदान येथे आंदोलनकर्त्यांसाठी कुठल्याही प्रकारची सोय नाही. लोकशाहीमध्ये आम्हाला आमचे प्रश्न मांडण्याचा पूर्ण अधिकार असताना कुठे तरी ठोसून दिले जाते. आझाद मैदानामध्ये खूप धूळ आहे, घाण आहे. तेथे पाण्याची, प्रसाधनगृहाची सोय नाही. अशा ठिकाणी आपण आदोलकर्त्यांना व पोलिसांना बसवता. आंदोलनकर्ते शासनाला भेटू पाहतात पण पोलीस कोणालाही भेटायला देत नाहीत. मग ही कसली लोकशाही म्हणावयाची ? या अंगणवाडी सेविकेला दोन लाख रूपयांची मदत देऊन चालणार नाही. त्या अंगणवाडी सेविकांची मागणी अत्यंत रास्त आहे. त्यांना 1 एप्रिल 2014 पासूनची वाढ तातडीने दिली पाहिजे. आझाद मैदान येथे मांडव घालायचा असेल तर त्यासाठी 50 ते 60 हजार रूपये खर्च येतो. तेथे लाऊड स्पीकर बसविण्यासाठी किंवा बसण्यासाठी बारदान घालायचे तर त्यासाठी मोठा खर्च येतो. आज तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील नाही. तेव्हा आंदोलनकर्त्यांच्या सोयीसाठी सरकारने कायमस्वरूपी उपाययोजना केली पाहिजे. तसेच आंदोलनकर्त्यांशी सरकारने समन्वय साधला पाहिजे. तेथे जाण्यासाठी माननीय मंत्र्यांना वेळ नसेल तर त्यांनी किमान त्यांच्या शिष्टमंडळाला मंत्रालयात भेटीसाठी बोलाविले पाहिजे. तेव्हा अंगणवाडी सेविकांच्या ज्या काही मागण्या आहेत त्या शासनाने तातडीने मान्य कराव्यात व या घटनेवर चर्चा करण्यासाठी आपण आम्हाला वेळ द्यावा अशी विनंती करते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मी आता माझा निर्णय देत आहे. त्याने सदनाचे समाधान होईल याची मला खात्री आहे. हा विषय गंभीर असला तरी येथे उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नसल्याने मी ही सूचना अमान्य करीत आहे. परंतु, गेल्या 10-15 वर्षापासून अंगणवाडी सेविकांसह महिलांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी सभागृहा समोर येत आहेत. यासंबंधी नियम 97 खाली किंवा जो काही योग्य नियम असेल त्या अनुसार सर्वंकष अशी चर्चा आपल्याला सोमवारी किंवा मंगळवारी घेता येईल. शासनाने याची तयारी ठेवावी. त्यावेळी आपणा सर्वांना आपले विचार मुक्तपणाने मांडण्यासाठी निश्चितपणे संधी मिळेल. माझा अजून एक निदेश शासनाला आहे की, ज्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे तिच्या वारसांना आपण मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून किंवा अन्य स्रोतातून अनुदान द्यावे.

श्रीमती विद्या ठाकूर : सभापती महोदय, संबंधित अंगणवाडी सेविकेच्या वारसांना दोन लाख रूपये मदत करण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) (सुधारणा) विनियम, 2015 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मलोआ.1014/प्र.क्र.113/14/आठ, दिनांक 12 जानेवारी, 2015" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) (दुसरी सुधारणा) विनियम, 2015 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मलोआ-1014/प्र.क्र.90/14/आठ, दिनांक 12 जानेवारी, 2015" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) (तिसरी सुधारणा) विनियम, 2015 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मलोआ-1014/प्र.क्र.182/14/आठ, दिनांक 7 मार्च, 2015" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

प्रा.राम शिंदे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा सदतिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

(प्रेस : येथे सोबतचे प्रतिवृत्त छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

----

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**(अशासकीय कामकाजासंबंधी )**

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, गेल्या अनेक महिन्यांपासून सभागृहात अशासकीय कामकाज होत नाही. अशासकीय कामकाजाच्या दिवशी शासकीय बिले आणि चर्चाही ठेवली जाते. या सर्व कामकाजामुळे अशासकीय कामकाज घेतले जात नाही. त्यामुळे अशासकीय कामकाजाला न्याय मिळत नाही. दर शुक्रवारी अशासकीय कामकाज घेतले जावे यासाठी मी सभापती महोदयांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भात सर्व माहिती सांगितली आहे. त्यामुळे उद्याच्या कामकाजामध्ये प्रश्नोत्तरे आणि लक्षवेधी सूचना झाल्यानंतर केवळ अशासकीय कामकाज घेतले जावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती :** यासंदर्भातील निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये घेण्यात येईल.

श्री.जयंत पाटील :सभापती महोदय, अशासकीय कामकाजाच्या संदर्भात मी सभापती महोदयांशी चर्चा केली आहे. अशासकीय कामकाजाच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करण्याची काहीही आवश्यकता नाही. दर शुक्रवारी अशासकीय कामकाज घेतले जाते व तशी नियमामध्ये तरतूद सुध्दा आहे. आपण आदेश दिल्यानंतर आम्ही त्यावर काही बोलत नाही. परंतु गेल्या अनेक अधिवेशनामध्ये अशासकीय कामकाजाला न्याय मिळत नाही. त्यामुळे उद्यापासून अशासकीय कामकाजाला सुरुवात करावी अशी माझी मागणी आहे.

**उप सभापती :** ठीक आहे.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा एकशे सत्त्याऐंशी व एकशे अठ्ठयाऐंशीवा अहवाल सादर सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, आश्वासन समितीचे कामकाज करीत असताना शासनाने 90 दिवसामध्ये कोणत्या आश्वासनावर विभागाने कोणती कार्यवाही केली हे कळविण्याचे बंधन घातलेले असताना सुध्दा दुर्दैवाने 90 दिवसामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती समितीपुढे येत नाही. जोपर्यंत सचिवांची साक्ष घेतली जात नाही, तोपर्यंत कोणत्याही आश्वासनाला गती मिळत नाही ही वस्तुस्थिती असून हे मला याठिकाणी खेदाने नमूद करावे लागत आहे. भविष्यामध्ये शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे 3 महिन्याच्या आत प्रत्येक आश्वासनाच्या संदर्भात विभागाने कोणती कार्यवाही केली यासंदर्भातील माहिती समितीपुढे वेळेवर आली तर समितीला आपले कामकाज योग्य प्रकारे करता येईल. धन्यवाद.

**सभापती** : अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल साम टीव्हीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या मालाला भाव कमी कसा मिळतो यासंदर्भातील बातमी दाखवली गेली. ही बातमी सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्याची असून ही बातमी देणाऱ्या पत्रकाराने शेतकऱ्यांना चांगला न्याय दिल्याबद्दल मी त्या पत्रकाराचे या निमित्ताने अभिनंदन करतो. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 3 टन काकडीला केवळ 38 रुपये भाव मिळाला आहे. या बाजार समितीवर प्रशासक असताना असा प्रकार होत असेल तर या बाजार समितीवर कारवाई केली पाहिजे. शेतकऱ्याला योग्य व किफायतशीर भाव मिळण्यासाठी बाजार समित्यांची स्थापना झालेली आहे. जर बाजार समितीमध्ये 3 टन काकडीला 38 रुपये भाव मिळत असेल तर ते बरोबर नाही. या पत्रकाराने अनेक शेत मालाला काय भाव मिळाले आहेत याची माहिती काल साम टीव्हीवर दाखवली होती. आज महाराष्ट्रातील शेतकरी दुष्काळामुळे, अवकाळी पावसामुळे आणि गारपिटीमुळे हवालदिल झालेला असताना ज्या शेतकऱ्यांसाठी बाजार समित्यांची स्थापना झाली आहे त्या ठिकाणी असे प्रकार होत असतील तर ते बरोबर नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने गंभीर दखल घेऊन शेती उत्पादनाला योग्य भाव कसा मिळेल यासाठी जातीने लक्ष घालावे यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

---------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यातील मराठी चित्रपट निर्मात्यांनी राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळवले असून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, यंदा जाहीर झालेल्या राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पुन्हा एकदा मराठीचा झेंडा फडकला आहे. चैतन्य ताम्हाणे, दिग्दर्शित "कोर्ट" हा सर्वोत्कृष्ट चित्रपट "सुवर्ण कमळाचा" मानकरी ठरला आहे.

सभापती महोदय, चित्रपटाच्या इतिहासात डोकावले तर कै.आचार्य अत्रे यांचा "शामची आई" या मराठी चित्रपटाने हा पहिला पुरस्कार मिळवला होता.

सभापती महोदय, त्याच प्रमाणे "एलिझाबेथ एकादशी" हा सर्वोत्कृष्ट बालचित्रपट, "मित्रा" सर्वोत्कृष्ट लघुपट आणि विशेष ज्युरी पुरस्कार "ख्वाडा" तसेच "किल्ला" या चित्रपटांनी मान मिळविला आहे. दादासाहेब फाळके यांनी महाराष्ट्रात चित्रपटाची मुहूर्तमेढ रोवली आणि गेली काही वर्षे सातत्याने मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ या सगळयानी मराठी चित्रपटसृष्टीची वैभवशाली परंपरा आणखी पुढे नेली त्यामुळे ही सर्व मंडळी अभिनंदनास पात्र आहेत.

सभापती महोदय, राज्य शासनाकडून क्रीडा प्रकारामध्ये राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांसाठी विशेष योजना आणि विशेष बक्षिसे दिली जातात त्याप्रमाणे चांगल्या चित्रपटांना द्यावी अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

"ख्वाडा" चित्रपट हा या निर्मात्याची पहिली चित्रनिर्मिती असून पुणे ते नगर या प्रवासात त्यांना जाणवणारे स्थलांतरितांचे प्रश्न तसेच धनगर समाजाचा जाणीवपूर्वक केलेला अभ्यासावर हा चित्रपट आहे. यासंदर्भात मला असे नमूद करावयाचे आहे की, कोणत्याही समाजाच्या आरक्षणाबाबतीत आपण सभागृहामध्ये भरपूर चर्चा करतो परंतु कलात्मकदृष्टया सामाजिक प्रश्न मांडणारे चित्रपट जेव्हा राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळवतात तेव्हा ही फार आनंदाची गोष्ट होते. हा चित्रपट काढण्यासाठी कोणीही पुढे येत नसताना श्री. भाऊसाहेब कराडे यांनी स्वत:चा जमीन जुमला विकून "ख्वाडा" चित्रपटाची निर्मिती केली. इतक्या मोठया प्रमाणात या लोकांनी कलेचा ध्यास घेतलेला आहे. त्यामुळे राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या सर्वांचे या सभागृहाने अभिनंदन करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

सभापती महोदय, हे अभिनंदन करीत असताना मी मघाशी सन्माननीय सांस्कृतिक कार्यमंत्र्यांना विनंती केली होती की, आपल्याच विभागामार्फत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या द्वारे व्यावसायिक राज्य नाट्य स्पर्धा होत असतात, त्या राज्य नाट्य स्पर्धांच्यासंदर्भात निकष असतांना यंदा अचानक त्यासंदर्भातील जीआर बदलला गेल्यामुळे त्यातील स्पर्धात्मक गुणवत्ता निश्चित होणार नाही. त्यामुळे यासंदर्भात दखल घेऊन ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे अशा नाट्य निर्मात्यांना न्याय द्यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

----

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यातील 7 हजार 768 ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका व 1 हजार 728 ग्रामपंचायतीमधील रिक्त पदांची पोटनिवडणूक दिनांक 22 एप्रिल, 2015 रोजी घेण्यात येईल अशी घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केलेली आहे. दिनांक 31 मार्च ते 7 एप्रिल या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल करावयची आहेत. निवडणूक जाहीर केलेल्या ग्रामपंचायतीपैकी बऱ्याच ग्रामपंचायतीची मुदत जून महिन्यात संपत असताना सुद्धा मुदतपूर्व निवडणूक घेणे हा कायद्यातील एकूण तरतुदींशी विसंगत आहे. घटनेनुसार एखाद्या स्थानिक संस्थेची निवडणूक लोकशाही पद्धतीने झाल्यानंतर तिचा कालावधी पाच वर्षापर्यंत असतो. परंतु पाच वर्षाचा कालावधी संपण्यास अजून पाच महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना निवडणूक घेतली जात आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला आहे. तेव्हा नामनिर्देशन प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी राज्य शासनाने यावर त्वरित निर्णय घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे."

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"बहुचर्चित इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट मधील कलम 66 सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेले आहे. इतर कायदे लागू असले तरी कलम 500, 501, 509, 124 (अ), 506 हे सर्व अदखलपात्र गुन्हे आहेत. सामाजिक अभिव्यक्तीवर कोणतेही निर्बंध आणले नाही तरी जबाबदारीचे योग्य पालन केले जात असेल तर प्रश्न नाही. परंतु काही अपप्रवृत्ती महिलांच्या संदर्भात असत्य माहिती प्रसारित करतात, त्याच बरोबर समाजामध्ये तेढ वाढवितात. आपण पाहिले असेल तर आझाद मैदानावरील दंगल तसेच थोर महात्मांबद्दलचे विकृत छायाचित्र प्रसिद्ध झाल्यामुळे महाराष्ट्रामध्ये दंगली उसळल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कलम 66 (अ) रद्द झाल्यामुळे आता राज्य शासन सायबर क्राईमच्या केसेसना कसा दिलासा देणार आहे, याबाबत मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे."

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"कोकण विभागातील सहा जिल्ह्यांमधील मच्छीमारांची ऑगस्ट 2013 पासून मार्च 2015 पर्यंत सुमारे 100 कोटी रुपयांची डिझेल परताव्याची रक्कम थांबविण्यात येणे. शासनाकडून दोन वर्षापासून परताव्याची थकित रक्कम न मिळाल्याने आधीच विंवचनेत असलेल्या मच्छीमारांवर आर्थिक संकटाची भर पडणे, दरम्यान मत्स्य विभागाने मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांतील मच्छीमारांच्या बोटींना राष्ट्रीय सुरक्षा म्हणून दिनांक 20 फेब्रुवारी, 2015 रोजी एक आदेश जारी केला आहे. मुंबईतील शहरासाठी पिवळा, मुंबई उपनगरासाठी ब्राऊन, ठाणेसाठी निळा, रायगडसाठी लाल, रत्नागिरीसाठी गुलाबी आणि सिंधुदुर्गसाठी ऑरेंज असा सांकेतिक कलर दिल्यानंतर परताव्याची रक्कम देण्यात येईल अशी अट घातल्याने मच्छीमारांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. हे फ्लोरोसंट कलर्स आहेत. बाजारात हे कलर्स उपलब्ध नसल्यामुळे बोटींना सांकेतिक कलर्स देण्यासाठी मच्छीमारांना एक महिन्याची मुदत वाढ दिली पाहिजे. तसेच मच्छीमारांना थकित रकमेचे वाटप केले पाहिजे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

-------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आज अंधेरी येथील आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अचानक पुकारलेल्या संपामुळे काही गडबड झाली. त्यामुळे लोक संतापले, त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी माननीय परिवहन मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी या संदर्भातील माहिती सभागृहाला द्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याच्या मुद्दा मांडला त्याबाबत एक मुद्दा मांडू इच्छितो की,राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये किंवा ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पारितोषिक मिळविणाऱ्या खेळांडूना राज्य शासनामार्फत बक्षिस देण्यात येते. चित्रपटसृष्टीमध्ये "सुवर्ण कमळ"मिळविणे ही काही साधी गोष्ट नाही. असे पारितोषिक मिळविणाऱ्या चित्रपटांना किंवा दिग्दर्शकांना शासनाने किमान 50 लाख रुपयांची आर्थिक मदत दिली पाहिजे, जेणेकरुन त्यातून दर्जेदार मराठी चित्रपट निर्माण होऊ शकतील अशी माझी सूचना आहे.

-----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 26 मार्च, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संच मान्यतेच्या सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक चुका व गफलतीमुळे वैकल्पिक विषय आणि त्यावरील शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी " दिनांक 23 मार्च, 2015 रोजी अमरावती जिल्ह्यात वरुड तालुक्यात लोणी येथील एका युवतीवर करण्यात आलेला सामूहिक बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "वेवजी ग्रामपंचायतीत (ता.तलासरी जि.पालघर) सन 2014-2015 मध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना इंदिरा आवास योजनेंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नाशिक महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही गौण फेरबदल करण्याविषयीचा प्रस्ताव गेल्या अडीच वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पश्चिम घाट माथ्यावरील भूदरगड किल्ल्यावरील वनक्षेत्रात बेकायदेशीररित्या उभा राहत असलेला पवन ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "भिवंडी शहरातील कल्याण रोड येथील शफी कंपाऊंडमध्ये शॉर्ट सर्किटने लागलेल्या आगीत दिनांक 25 मार्च, 2015 रोजी दोन कामगारांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "चिपळूण तालुक्यातील मौजे ओमळी घडशेवाडी, जि.रत्नागिरी येथील दहा वर्षापूर्वी बांधण्यात आलेली सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर पूर्णतः ढासळल्यामुळे गावातील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "महाराष्ट्र शासनाने सन 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना पात्र करुन त्यांना कायम करण्याकरिता फोटो पासेस देऊन एसआरए मार्फत घरे देण्याचा संविधानिक निर्णय घेतला असून या आदेशाची अधिकाऱ्याकडून अंमलबजावणी होत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी काठावरील गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांना शुद्धीकरण यंत्रणा बसविणे याबाबत श्री.अमरसिंह पंडित,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बबनराव लोणीकर ( पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 35 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : महाराष्ट्र राज्य तासिका/मानधन शिक्षक, स्त्री अधीक्षिका वर्ग-4 कर्मचारी संघटना,नंदूरबारच्या वतीने नाशिक आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी दिनांक 25 फेब्रुवारी, 2015 पासून सुरु केलेले उपोषण याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विष्णू सवरा ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 39 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : महा ऑनलाईन कंपनीने संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप करणे

**मु. शी.** : महा ऑनलाईन कंपनीने संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप करणे यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, सतीश चव्हाण, जयवंतराव जाधव, अनिल भोसले, नरेंद्र पाटील, संजय दत्त, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुनील तटकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्राम विकासमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात ग्रामविकास विभागामार्फत संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) हा प्रकल्प चालू असणे, या प्रकल्पांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी महा ऑनलाईन कंपनीतर्फे एका सुशिक्षित बेरोजगाराची संगणक परिचालक म्हणून प्रत्येक ग्रामपंचायतीवर नियुक्ती करणे, या संगणक परिचालकांना द्यावयाचे वेतन व स्टेशनरी खर्च यासाठी रु.8000/- प्रतिमाह इतके मानधन देण्याचे निश्चित असणे, प्रत्यक्षात महा ऑनलाईन कंपनी या संगणक परिचालकांना केवळ रुपये 2500/- ते 3000/- इतकेच मानधन देत असणे, उर्वरीत रक्कम स्टेशनरीच्या नावाखाली वळती करुन घेत असले तरी प्रत्यक्षात प्रती ग्रामपंचायत स्टेशनरीवर केवळ 200/- रु. खर्च करीत असणे, मागील तीन वर्षात महा ऑनलाईन कंपनीने या वेतनापोटी राज्यातील 27 हजार संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप केल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या संघटनेने वेळोवेळी आंदोलन करुनही कंपनीच्या या गैरव्यवहाराची कसलीही चौकशी न करुन कंपनीवर कार्यवाही न करण्यात येणे, वेतनासाठी आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंपनीकडून काढून टाकण्यात येणे, 27 हजार संगणक परिचालकांना पूर्ण वेतन न मिळणे, किमान वेतन कायद्याचा महा ऑनलाईन कंपनीकडून भंग होणे, कंपनीच्या भीतीपोटी काम करीत असल्याने

..10..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

संगणक परिचालक वैफल्यग्रस्त होणे, त्यांच्यात यामुळे संतापाची लाट निर्माण होणे, 27 हजार युवकांच्या दृष्टीने महत्वाच्या या प्रश्नाकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत कंपनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करुन करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

श्री.दीपक केसरकर ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..11..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, शासन निर्णयाप्रमाणे या सुशिक्षित बेजरोजगारांना नेमके किती वेतन देण्यात येते, ज्यांच्यामार्फत हे काम सुरु करण्यात आलेले आहे, ते या तरुणांना प्रत्यक्षात किती वेतन देतात, स्टेशनरी आणि इतर कामांसाठी किती नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, 13 व्या वित्त आयोगाखाली ही योजना सुरु आहे. या योजनेचे नाव "संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र" असे आहे. केंद्र शासनाच्या ई मिशन मोड प्रोजेक्टखाली ही योजना चालविण्यात येते. शासनाची महा ऑनलाईन कंपनी आहे, ज्यामध्ये महाराष्ट्र शासन व टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेसचा समावेश आहे. शासनाची ही संयुक्त कंपनी आहे. सन 2006 मध्ये ही कंपनी स्थापन झाली असून या कंपनीमार्फत हे काम चालविण्यात येते. कंपनीला 8 हजार रुपये पेमेंट करण्यात येते आणि त्याची माहिती निवेदनात दिलेली आहे. या 8 हजार रुपयांमध्ये वेगवेगळे घटक आहेत. त्यातील एक घटक व्हीएलई म्हणजे व्हीलेज लेव्हल इंट्राप्रिन्युअर्स यांच्यासाठी दिला जाणारा पगार, स्टेशनरी, सॉफ्टवेअरसाठी येणारा खर्च या सर्वांचा समावेश त्यामध्ये आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर....

महोदय, या बाबत मी थोडक्यात माहिती देऊ इच्छितो. जिल्हा परिषद स्तरावर 80 हजार रुपये लमसम देण्यात येतात. त्यात 40 हजार रुपये सॉफ्टवेअरचे आणि 5 डाटा एंट्री ऑपरेटरचे प्रत्येकी 8 हजार रुपये प्रमाणे 40 हजार रुपये दिले जातात. पंचायत समिती स्तरावर 26 हजार रुपयांचे पेमेंट दिले जाते. त्यामध्ये 1-डेटा एंट्री ऑपरेटर, 1-मास्टर ट्रेनर ज्याला 6 हजार रुपये आणि 2 डेटा ऑपरेटर्सना प्रत्येकी 8 हजार रुपये दिले जातात. तसेच ग्रामपंचायत स्तरावर 8 हजार रुपये कंपनीला दिले जातात.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाऑनलाईन हे टाटा कन्सल्टन्सी आणि महाराष्ट्र सरकारचे जॉईंट व्हेंचर आहे. राज्य सरकारने संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) या प्रकल्पाचे काम महाऑनलाईन कंपनीला दिले आहे. महाऑनलाईन कंपनीचे अध्यक्ष हे राज्याचे मुख्य सचिव असून, संचालक, माहिती तंत्रज्ञान हे सदस्य आहेत. या कामाच्या बाबतीत 1 हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतीला परिचालकाचे मानधन दरमहा 8 हजार रुपये प्रमाणे द्यावयाचे असून, एकूण 28 हजार डेटा ऑपरेटर नेमायचे आहेत. परंतु महाऑनलाईन कंपनीने ते काम आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून युनिटी-आयटी कंपनीला दिले आहे.

महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, संगणक परिचालकाला दरमहा केवळ 2500 रुपये मानधन मिळते. त्यामध्ये साहित्यासाठी 200 रुपये आणि प्रिंटर, टोनरसाठी 500 रुपये अशाप्रकारे एकूण 3200 रुपये संगणक परिचालकाला मिळतात. उर्वरित 4800 रुपये प्रशिक्षण तसेच देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली युनिटी-आयटी कंपनी स्वतःकडे ठेवते. राज्यामध्ये एकूण ग्रामपंचायती 27,920 आहेत. 27,920 ग्रामपंचायतीचे 4800 रुपये प्रमाणे दरमहा 13 कोटी 40 लाख रुपये निधी अनअकाऊंटेड आहे. 27,920 ग्रामपंचायतीमध्ये 22-23 हजार डेटा एंट्री ऑपरेटर आहेत. आझाद मैदानावर त्यांचे विविध मागण्यांसाठी अनेक दिवस आंदोलन झाले होते. युनिटी-आयटी कंपनी त्या ऑपरेटर्सना कधीही कामावरुन काढून टाकते व कधीही कामावर घेते. महोदय, बीडच्या एका डेटा एंट्री ऑपरेटरला एक वर्षापासून पगार दिला नाही म्हणून त्याने आत्महत्या केली. म्हणून हा विषय गंभीर आहे. महोदय, या बाबत मी स्पेसिफिक विचारतो की, दरमहा जे

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

13 कोटी रुपये अनअकाऊंटेड रहात आहेत त्या बाबत शासन काय कार्यवाही करणार आहे ? महाऑनलाईन ही राज्य सरकारची कंपनी आहे. या कंपनीने युनिटी-आयटी कंपनीला दिलेले काम थांबवून राज्यातील 23 हजार डेटा एंट्री ऑपरेटर्सना राज्य सरकार न्याय देणार काय ?

श्री.दीपक केसरकर : महोदय, मी अगोदरच सांगितले की, कंपनीने डेटा एंट्री ऑपरेटरला 4100 रुपये मानधन द्यावयाचे आहे. जुलै-2014 पासून डेटा एंट्री वेस्ट सिस्टीम सुरु केली होती. त्यानुसार डेटा एंट्री ऑपरेटरने 450 डेटा एंट्री केली तर त्यांना 4100 रुपये मिळणार होते. त्यामुळे 0 ते 20 एंट्री करणाऱ्या ऑपरेटर्सची संख्या 4700-4800 होती. त्यामुळे त्यांना डिॲक्टीवेट करण्यात आले. नंतर त्यातील 3476 ऑपरेटर्सना ॲक्टीव्हेट करण्यात आले. महोदय, ऑपरेटर्सनी ज्यावेळी आंदोलन केले त्यावेळी मी स्वतः तेथे भेट दिली होती. त्यावेळी आम्ही त्यांना आश्वासन दिले होते की, ज्या लोकांचे अर्ज प्राप्त होतील त्यांना पुन्हा ॲक्टीवेट करण्यात येईल तसेच त्यांनी विहित परफॉर्मन्स दाखविल्यानंतर त्यांचे किमान वेतन रिस्टोअर करण्यात येईल. तसेच सध्या स्टेशनरी आणि इतर कामाचे पैसे एकत्रित दाखविले जातात. म्हणून शासनाने 1 जानेवारी पासून सर्व ऑपरेटर्सना 4500 रुपये मानधन ठरवून दिले आहे. टेक्नीकल असिस्टंस्ना 2200 रुपये मानधन देण्याचे ठरविले. तसेच त्याने सी.ई.ओ. यांच्याकडे 1300 रुपये ठेवावयाचे आहेत. महोदय, ही 13 व्या वित्त आयोगाची योजना आहे. मार्च महिन्यात 13 व्या वित्त आयोगाची मुदत संपल्यानंतर 14 वा वित्त आयोग लागू होणार आहे. आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, 14 व्या वित्त आयोगातून स्थानिक स्वराज्य संस्थांना थेट निधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या योजनेसंदर्भातील विचार मार्च महिन्यात होईल. आम्ही असे आश्वासन दिले आहे की, अन्य राज्यात ही योजना कशाप्रकारे राबविण्यात येत आहे याची माहिती मागविण्यात येईल. नवीन योजना सुरु करण्यापूर्वी व्हीएलईच्या संघटनेबरोबर चर्चा करण्याची संधी देण्यात येईल. ज्यावेळी ही योजना 14 व्या वित्त आयोगातून राबविली जाईल त्यावेळी या संदर्भातील चर्चा नक्की करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये दिनांक 27 मे, 2014 रोजी नवीन शासन निर्णय काढून मानधनाबाबतचा निर्णय घेण्यात आल्याचे नमूद केले आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

यापूर्वी दिनांक 30 एप्रिल, 2011 पासून या विषयी 10 शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. परंतु त्यातील एकाही शासन निर्णयामध्ये मानधनाबाबतचा उल्लेख नव्हता. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, 23 हजार डेटा एंट्री ऑपरेटर्सनी संघटना स्थापन केल्यानंतर, राज्य सरकारने दिनांक 27 मे, 2014 रोजी मानधनाबाबत शासन निर्णय निर्गमित केला. महोदय, निवेदनात उल्लेख आहे की, दिनांक 2 मार्च, 2015 च्या शासन निर्णयानुसार संगणक परिचालकांना 4500 रुपये मानधन दिले जाईल. शासन निर्णयानुसार 8000 रुपये देणार आहेत. यातील 4500 रुपये मानधन आणि 500 रुपये टोनर व कागदासाठी जाणार आहेत. मग उर्वरित 3 हजार रुपयांचे काय ? महोदय, राज्य सरकारने महाऑनलाईन कंपनीला डेटा एंट्री ऑपरेटर्सच्या मानधनापोटी 8 हजार रुपये दिले पाहिजेत. परंतु महाऑनलाईन कंपनीने युनिटी-आयटी कंपनीला 7 हजार रुपये प्रमाणे काम दिले आहे. परंतु 3 हजार रुपयांच्या फरकाबाबत निवेदनामध्ये कोठेही उल्लेख नाही. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, 23 हजार ऑपरेटर्सवर युनिटी-आयटी कंपनीने अन्याय केला आहे. या बाबत शासनाने निर्णय घ्यावा. माझी विनंती आहे की, शासनाने युनिटी-आयटी कंपनीला दिलेले काम रद्द करावे. तसेच मागच्या कालावधीत कोणाला किती पगार मिळाला आणि प्रत्यक्षात किती मिळावयास पाहिजे होता याची चौकशी करुन, त्यामध्ये काही बेकायदेशीर झाले असेल तर युनिटी-आयटी कंपनीवर कारवाई करावयास पहिजे. हा विषय अतिशय गंभीर आहे. यामध्ये महिन्याला 13-14 कोटी रुपयांचे बिलिंग होते. पण या कोट्यवधी रकमेचा काहीही हिशेब नाही. माझी मागणी आहे की, युनिटी-आयटी कंपनीची पूर्ण चौकशी करण्यात यावी. महोदय, महाऑनलाईन कंपनीने थेट ऑपरेटर्सच्या मानधनाचे पेमेंट करण्याबाबत काहीच अडचण नाही.कारण जे ऑपरेटर्स काम करीत आहेत ते आयडेंटीफाईड आहेत. याबाबतची माहिती शासनाकडे आहे. मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, 14 व्या वित्त आयोगाच्या बाबतीत वेगळा निर्णय होणार आहे. कारण ग्रामपंचायत यासंदर्भात स्वत: नेमणूक करणार असल्याने 14 व्या वित्त आयोगातून त्यांना थेट निधी मिळणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्वत: नेमणूक करुन पगार देईल, पण तो नंतरचा विषय आहे.या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, युनिटी-आयटी कंपनीच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

एकूण कामकाजाच्या पार्श्वभूमीवर त्यांना देण्यात आलेले काम थांबवून ऑपरेटर्सचे पेमेंट महाऑनलाईन कंपनीच्या माध्यमातून करण्यात येईल काय तसेच युनिटी-आयटी कंपनीच्या अनअकाऊंटेड असलेल्या रकमेची चौकशी राज्य सरकार करेल काय ?

श्री.दीपक केसरकर : महोदय, डेटा एंट्री ऑपरेटर्सच्या मानधनात जी 4500 हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे, त्या बाबतची विगतवारी मी सांगितली आहे. 2200 अधिक 1300 अशी मी विगतवारी सांगितली आहे. वास्तविक पाहता हे काम महाऑनलाईन कंपनीला दिले आहे. महाऑनलाईन ही स्वतंत्र कंपनी आहे. महाऑनलाईन कंपनीमध्ये शासनाचे प्रतिनिधी असले तरी त्या कंपनीला स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यामुळे महाऑनलाईन कंपनीने युनिटी-आयटी कंपनीबरोबर केलेला करार रद्द करावा की नाही, अशी जी आपली भावना आहे .....(अडथळा) आपल्या ज्या भावना आहेत त्या बाबत.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या ठिकाणी विषय करार केल्याबाबतचा नाही. पण जो करार केलेला आहे तो .....(अडथळा)

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती करू इच्छितो की, त्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकल्यास त्यांचे समाधान होईल. शासनाचा महाऑनलाईनशी करार आहे. शासनाचे पेमेंट त्यांना जाते. जिल्हा परिषद महाऑनलाईनला पेमेंट करते, त्यावेळी त्याचे 10 टक्के पैसे कपात करून घेते. रिकन्सिलिएशन झाल्याशिवाय हे 10 टक्के दिले जात नाहीत. अशाप्रकारे वेगवेगळ्या जिल्हा परिषदांकडे असे 74 कोटी रुपये जमा आहेत. (अडथळा) मला उत्तर पूर्ण करू द्यावे. आपले म्हणणे असे आहे की, युनिटी आयटीकडून चांगली सेवा महाऑनलाईनला आणि पर्यायाने या लोकांना दिली जात नाही. शासनाची महाऑनलाईनशी चर्चा होईल तेव्हा निश्चितपणे हा मुद्दा समोर आणला जाईल आणि त्या संदर्भात पुढील निर्णय घेतला जाईल. आम्ही तुमच्या भावनांची दखल घेतली आहे. शासनाचा महाऑनलाईनशी संबंध आहे. शासनाचा युनिटी आयटीशी थेट काहीही संबंध नाही ही वस्तुस्थिती आहे. व्हीएलई यांची नियुक्ती महाऑनलाईनने केली आहे. व्हीएलईचा संबंध शासनाच्या दृष्टीने महाऑनलाईनशी आहे. आपण सांगत आहात त्याप्रमाणे सब कॉन्ट्रॅक्ट दिले असेल तर त्या संदर्भातील नाराजी निश्चितपणे आपली आहे. आम्ही त्या संदर्भात महाऑनलाईनशी बोलतो आणि त्यामध्ये आवश्यक असेल तर कार्यवाही करतो. (गोंधळ) 'नाराजी' हा शब्द कदाचित चुकीचा वाटत असेल तर तो मी मागे घेईन. मला आपल्याला एवढेच आश्वासित करायचे आहे की, महाऑनलाईनशी चर्चा होईल तेव्हा या संदर्भातील आपल्या भावना लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, राज्य शासन भावनांवर चालत नाही. राज्य शासनाला नियमाने चालावे लागते. 13 व्या वित्त आयोगाचे पैसे थेट ग्रामपंचायतीला देण्याचे केंद्र सरकारचे निदेश आहेत. शासनाने त्यावेळी जीआर काढला होता. आपण हे पैसे घेऊन पुन्हा एकत्रित करून त्या कंपनीला देण्यासाठी मागत आहात हाच आमचा आक्षेप आहे. माननीय मंत्री म्हणतात की, 14 व्या वित्त आयोगामध्ये केंद्र शासन निर्देश देणार आहे. मला आपणास विचारावयाचे आहे की, 13 व्या वित्त आयोगामध्ये केंद्र सरकारने अशी कंपनी स्थापन करा आणि या पध्दतीचे वितरण करा असे आदेश दिले होते का ? सन 2011 पासून 4050 कोटी रुपयांची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

अफरातफर झाली आहे. टोनर व बाकीचे साहित्य घेण्यासाठी 3 हजार रूपये देता. आता पानपट्टीवर सुध्दा टोनर मिळत आहेत. मग ही कंपनी कशासाठी पाहिजे ? कॉम्प्युटर पाणीपट्टीवर सुध्दा लावला जातो. आपण एकीकडे केंद्रीकरणाचे विकेंद्रीकरण करीत आहात आणि दुसरीकडे ग्रामपंचायतींचे 13 व्या वित्त आयोगाचे करोडो रूपये कंपनी लाटत आहे. आपण त्या संदर्भातील चौकशी करणार का ? आम्हाला भावना नको. चौकशी झाली पाहिजे. ठेका तावडतोब रद्द झाला पाहिजे आणि हा पैसा थेट ग्रामपंचायतींच्या खात्यात वापरला गेला पाहिजे, असे आदेश ताबडतोब राज्य शासन काढेल का, संपूर्ण कॉंट्रॅक्टची उच्च पातळीवर चौकशी करेल का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, शासन हे नियमावरच चालते. केंद्र शासनाचे या संदर्भात निश्चितपणे निर्देश आहेत. केंद्र शासनाने ई-पंचायत योजनेच्या माध्यमातून वित्त आयोगाचे पैसे ई-गव्हर्नन्ससाठी वापरावेत असे निदेश दिले आहेत आणि त्याप्रमाणे ही योजना केली आहे. (गोंधळ) आपली भावना आहे, हे आम्हाला मान्य आहे. आपल्या भावनेची दखल घेतली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, चुकीचे उत्तर आहे. आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

(गोंधळ)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, अर्ध्या उत्तरामुळे चुकीचा निष्कर्ष निघू शकतो. मला उत्तर पूर्ण करूद्यावे. आपण उत्तर देताना का अडथळा आणत आहात ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना समजून घेण्यात यावी.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा. मी स्पेसिफिक प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर देतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्री म्हणत आहेत की, मी स्पेसिफिक प्रश्नाचे उत्तर देतो. आम्ही प्रश्न विचारला आहे. महाऑनलाईन कंपनीने युनिटी आयटीला आऊटसोर्सींग दिले असेल तर योग्य नाही. ही अनअकाऊंटेबल अमांऊट आहे. माननीय मंत्र्यांनी याबाबत स्पष्ट असे काहीही सांगितले नाही, उत्तर आलेले नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. महिन्याला 5-7 कोटी रूपयांचा घोटाळा होत आहे. युनिटी आयटीला फायदा होतो, ऑपरेटर्सना होत नाही. आमचे म्हणणे असे आहे की, शासनाने महाऑनलाईनशी करार करून याबाबतचे पैसे ऑपरेटर्सना द्यावेत. युनिटी आयटीशी येथे संबंध येत नाही. युनिटीआयटी महिन्याला 5 कोटी रूपये कमवित असेल तर त्या 5 कोटी रूपयांचा पगार ऑपरेटर्सना द्यावा असे आमचे म्हणणे आहे. लक्षवेधी सूचना यासंबंधीची आहे. 27 हजार ऑपरेटर्सशी संघटित कामगार म्हणून करार झाले पाहिजे होते. परंतु ते सुध्दा युनिटी आयटीने केलेले नाही. पीएफचा कायदा असताना त्याची रक्कमही भरण्यात येत नाही. आपले त्या संदर्भातील उत्तर काय आहे ? आम्हाला त्या संदर्भात उत्तर मिळाले पाहिजे. युनिटी आयटीकडून सर्व ऑपरेटर्संना व्यवस्थित पगार होत नाही. युनिटी आयटीला बाजूला काढून महाऑनलाईनकडून पगार करणार का ? युनिटी आयटी महिन्याला 5 कोटी रूपये बाजूला काढते. शासनाने त्याचा हिशेब द्यावा.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, 8 हजार रूपयांची रक्कम ही केवळ ऑपरेटर्संच्या पगारासाठी नाही. त्यातून सॉफ्टवेअरही डेव्हलप करावे लागते. कंपनीने 11 आज्ञावल्या तयार केल्या आहेत. आज्ञावल्या करण्यास खर्च होतो. हा खर्च त्या कंपनीने वसूल करायचा नाही का ? आमचा संबंध टाटा कन्सल्टन्सीशी आहे. त्यांनी 11 आज्ञावल्या तयार करून दिल्या आहेत. आपण त्या वाचून पहा, अत्यंत आदर्श आज्ञावल्या आहेत. भारतात याला पहिले बक्षिस मिळाले आहे. आपण संग्राम बद्दल असे म्हणणार असाल तर ते चुकीचे आहे. (अडथळा) माझ्याकडे सर्व माहिती आहे. आपण उत्तर ऐकून घेणार नसाल तर योग्य नाही. सभापती महोदय, मला संरक्षण दिले पाहिजे. 8 हजार रूपये ही पूर्ण रक्कम ऑपरेटरसाठी आहे का असे विचारले आहे. सॉफ्टवेअर, स्टेशनरीही त्यामध्ये येते. मी संगितले आहे की, युनिटी आयटीशी आमचा संबंध नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर ....

युनिटीआयटीच्या संदर्भात ॲक्शन घेण्याच्या संदर्भात मी सांगितले आहे. मी पुन्हा सांगतो की, शासनाचा संबंध महाऑनलाईनशी आहे. ही कंपनी शासनाची आहे. महाऑनलाईनने केलेल्या कामाला भारतामध्ये पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले आहे. 4100 रूपये ऑपरेटरला गेले पाहिजेत असे ठरले आहे. त्यापेक्षा कमी गेले असतील तर त्या संदर्भात कारवाई करू, 4500 रूपयांपेक्षा कमी गेले असेल तरी कारवाई करू. स्पेसिफिक रक्कम ठरलेली आहे. ऑपरेटरला 4100 रूपये द्यायचे आहेत. आश्वासन दिले आहे की, चौकशी करून कारवाई करू. (गोंधळ)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी माझ्या परळी तालुक्याचे उदाहरण देतो. आपण म्हणता की, पैसे काढून घेतले पाहिजेत. 3 वर्षांत स्टेशनरीसाठी 1 तालुक्याला 1 लाख 11 हजार रूपये खर्च झाले आहेत. आपल्याला पाहिजे असेल तर मी पुरावा देतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

मात्र त्यांना मानधनापोटी राज्य सरकारने 2 कोटी 67 लक्ष 52 हजार रुपये दिलेले आहेत. स्टेशनरीवर 11 लाख 11 हजार रुपये खर्च झाले आहेत तर मानधनासाठी राज्य सरकारने महाऑनलाईनला आणि महाऑनलाईनने युनिटीला 2 कोटी 67 लक्ष रुपये दिलेले आहेत. 3800 रुपये मानधन वजा केल्यास कंपनीला एका महिन्यात, एका तालुक्यामध्ये तब्बल 1 कोटी 40 लक्ष रुपयांचा नफा मिळत आहे. त्यामुळे युनिटीबरोबरचा करार रद्द करुन नियमाप्रमाणे ठरलेले मानधन महाऑनलाईनने ऑपरेटर्सना द्यावे. कारण, युनिटीचा नफा होत असून शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्याबरोबरच राज्यातील सर्व ऑपरेटर्स सरकारवर नाराज आहेत. बीड येथील बाभाडे नावाच्या एका ऑपरेटरने पगार मिळाला नाही म्हणून आत्महत्या केली आहे. मी या ठिकाणी एका तालुक्याची स्पेसिफिक माहिती सभागृहात दिलेली आहे. त्याप्रमाणे राज्य सरकारने संपूर्ण राज्याची माहिती सभागृहाला द्यावी, युनिटीचा करार रद्द करावा आणि महाऑनलाईनने पेमेंट करावे, अशी आमची मागणी आहे. ज्याप्रमाणे मी स्पेसिफिक माहिती दिली आहे, त्याप्रमाणे शासनाने संपूर्ण राज्याची माहिती द्यावी. अशा प्रकारची कार्यवाही शासन करणार आहे का ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी माहिती येथे दिलेली आहे, त्याबाबत चौकशी करु आणि योग्य ती कार्यवाही करु, असे आश्वासन मी मघाशीही दिलेले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ही लक्षवेधी सूचना देऊन अनेक दिवसांचा कालावधी लोटला आहे. महाऑनलाईनने युनिटीला काम दिले आहे किंवा नाही, याची आम्हाला माहिती नाही, असे वारंवार राज्यमंत्री महोदय सांगत आहेत. त्या कंपनीशी आमचा अप्रत्यक्षही संबंध नाही, असे ते म्हणाले. माझे म्हणणे हे आहे की, सरकारचा या कंपनीशी संबंध असलाच पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वारंवार हे निदर्शनास आणले आहे की, ऑपरेटर्सना देण्यात येणाऱ्या मानधनाबाबतच्या प्रस्तावामध्ये त्यांना देण्यात यावयाचे वेतन, स्टेशनरी या संबंधीचा खर्च लक्षात घेऊन एका डेटा ऑपरेटरला 8 हजार रुपये मानधन निश्चित करण्यात आले आहे आणि त्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे........

नेत्यांचा आक्षेप हाच आहे आणि तो त्यांनी लक्षवेधी सूचनेच्या विषयामध्ये देखील नमूद केला आहे की, महाऑनलाईन ही कंपनी राज्य सरकारची आहे. शासनाचा तो अंगिकृत व्यवसाय आहे. त्यामुळे शासन या संदर्भातील आपली जबाबदारी टाळू शकत नाही. त्या कंपनीने दुसऱ्या एखाद्या कंपनीला हे काम दिले असेल आणि त्याबाबतची माहिती राज्यमंत्री महोदयांना नसेल तर या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाकडे त्यांनी लक्ष दिलेले नाही, हे मी या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या माध्यमातून आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. या कंपनीचा आणि आमचा काही संबंध नाही, असे राज्यमंत्री महोदयांनी एकदा नाही तर चार वेळा म्हटले आहे. पाहिजे तर आपण प्रोसिडिंग तपासून पहावे. म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते वारंवार हे सांगत आहेत की, ज्याप्रमाणे या योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते, तेवढ्या प्रमाणात ऑपरेटर्सना मानधन मिळत नाही. प्रस्तावात स्टेशनरीसाठी जेवढा खर्च धरण्यात आला आहे, तेवढा तो होत नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते जबाबदारीने हे सांगत आहेत की, राज्यभरामध्ये दर महिन्याला 13 कोटी रुपये अनअकाऊंटेड रहात आहेत. हे ते वारंवार सांगत आहेत. परंतु, राज्यमंत्री महोदय या संदर्भात एक वाक्य देखील बोलले नाहीत. त्यांना या संदर्भातील उत्तर द्यायचे असेल, नसेल, याची आम्हाला माहिती नाही. ते मघापासून दिशाभूल करीत आहेत. त्यामुळे या लक्षवेधीवरील चर्चा आपण राखून ठेवावी आणि पुढील वेळी सविस्तर उत्तर शासनाकडून आम्हाला मिळावे, अशी आमची ठाम मागणी आहे.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी स्पष्टपणे हे सांगितले आहे की, 8 हजार रुपये रक्कम ही पूर्णपणे मानधनाची नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. सभापती महोदय, आपण मला सुध्दा संरक्षण दिले पाहिजे.

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** या लक्षवेधी सूचनेवरील सन्माननीय सदस्यांनी केलेली चर्चा आणि राज्यमंत्री महोदयांनी दिलेली उत्तरे मी ऐकली आहेत. माझी अशी सूचना आहे की, या लक्षवेधी सूचनेवर पूर्ण तयारी करुन आपण उद्या या लक्षवेधी सूचनेला उत्तर द्यावे. त्यावेळी आपण साधकबाधक चर्चा करु आणि यावर पूर्ण उत्तर येऊ द्यावे, एवढेच सांगतो.

---------------

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : ठाण् महानगरपालिका हद्दीत फोर-जी टेक्नॉलॉजीचे ऑप्टीकल केबल टाकण्याकरिता रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले कंत्राट रद्द करणे

**मु. शी.** : ठाणे महानगरपालिका हद्दीत फोर-जी टेक्नॉलॉजीचे ऑप्टीकल केबल टाकण्याकरिता रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले कंत्राट रद्द करणे यासंबंधी ॲड.निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महानगरपालिका हद्दीत रिलायन्स फोर-जी टेक्नोलॉजीच्या संदर्भात रिलायन्स कंपनीतर्फे ऑप्टीकल केबल टाकण्याकरिता गतवर्षी ठाणे महानगरपालिकेने परवानगी देण्यात येणे, त्यानुसार ठाणे शहरातील रस्त्यांचे भूमिगत खोदकाम करण्यात येऊन विहीत आकाराचे खड्डे खोदण्याचे कंत्राट सदर कंपनीस देण्यात येऊन त्यासाठी रुपये 72 प्रति चौ.मीटर इतका दर आकारण्याचा महानगरपालिकेने निर्णय घेणे, तथापि दिनांक 15 फेब्रुवारी, 2015 रोजी विद्यमान ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी पूर्वीचा रुपये 72 प्रति चौ.मीटर दराचा घेतलेला निर्णय रद्द करून त्याऐवजी रुपये 1500 प्रति चौ.मीटर इतका दर आकारण्याचा निर्णय घेऊन त्यानुसार कंपनीस कळविणे, वास्तविकत: नवीन तंत्रज्ञानावर आधारित उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यांमध्ये उत्सर्जित (रेडीएशन) होणाऱ्या अपायकारक किरणांमुळे/प्रक्रियेमुळे कॅन्सर वा तत्सम जीवघेण्या रोगांचा प्रादुर्भाव होऊन जीवितहानी होण्याचा संभाव्य धोका, परिणामी नागरिकांच्या जीवितहानीस कारणीभूत ठरणाऱ्या रिलायन्स कंपनीच्या मनोऱ्यांना (टॉवर्स) परवानगी देऊ नये अशा आशयाची पत्ररुपी निवेदने ठाणे शहरातील मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक 13 एप्रिल, 2013 रोजी वा त्यासुमारास व त्यानंतरही आजतागायत ठाणे महानगरपालिका आयुक्तांना देण्यात येणे, परंतु रिलायन्स कंपनीला दिलेली परवानगी रद्द करण्याऐवजी रुपये 72 वरून रुपये 1500 इतकी दराची

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे......

रक्कम वाढविण्याचा महापालिकेने निर्णय घेतल्याने कॅन्सर वा तत्सम रोगाचे शिकार होण्याची ठाणेकर नागरिकांवर ओढवणारी आपत्ती तसेच पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची शक्यता, त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास व खड्डेस्थित परिस्थितीमुळे वाहतुकीच्या वाढणाऱ्या समस्या, त्याबाबत ठाणे शहरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, परिणामी रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन आपण वाचले तर आपल्या असे लक्षात येईल की, अधिकारी वर्ग मंत्री महोदयांना सभागृहात कशा प्रकारे तोंडघशी पाडू शकतात.

सभापती महोदय, निवेदनातून शासनाने हे मान्य केले आहे की, सुरुवातीला रुपये 72 प्रति मीटर या दराने परवानगी देण्यात आली आणि आता रुपये 3000/- ते रुपये 9000/- प्रति चौ.मी. या दराने आकारणी करण्यात आली आहे.

सभापती महोदय, टप्पा क्रमांक 1 चे 100 टक्के काम पूर्ण होत आले आहे. टप्पा क्रमांक 2 चे संपूर्ण काम झाले आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. आता या पूर्ण झालेल्या कामासंबंधी महापालिका प्रति चौ.मी.72 रुपयांवरुन 3 ते 9 हजार रुपये प्रमाणे आकारणी करीत आहे. म्हणजे जवळपास 200 कोटी रुपयांचे नुकसान महापालिका सोसणार होती. पण ते आता थांबविण्यात येत आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, ज्यावेळी 72 रुपयांप्रमाणे परवानगी दिली गेली त्यावेळी गैरव्यवहार झालेला आहे. महासभेने यास मंजुरी दिली असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. महासभेची मंजुरी आयत्यावेळी घेण्यात आली होती. अशा प्रकारचे महत्त्वाचे विषय आयत्या वेळी आणता येतात का ? सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, एच.डी.डी.नुसार हे काम होणार होते. महानगरपालिकेचे माजीवडा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिनांक 7/10/2014 रोजी रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि.कंपनीला असे पत्र दिले आहे की, "जवळ जवळ सर्व रस्त्यांचे ओएफसी टाकण्याचे काम ओपन कट पध्दतीने पूर्ण केले आहे." याचा अर्थ कंपनीने मंजुरीपूर्वीच ओएफसी टाकण्यास सुरुवात केली होती. ती देखील एचडीडी अथवा मायक्रोट्रेंचिंग पध्दतीने नव्हे तर ओपन कट पध्दतीने केली आहे. यामध्ये फार मोठा गैरव्यवहार झालेला आहे, हे मंत्री महोदयांच्याच उत्तरातून स्पष्ट दिसून येत आहे. शासन या सर्व प्रकरणाची ॲन्टी करप्शनच्या माध्यमातून चौकशी करणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, रिलायन्स कंपनीने ऑप्टिक फायबर केबल टाकण्यासाठी सवलत करार केला होता. ही केबल टाकण्यासाठी मायक्रोट्रेंचिंगचा दर 72 रुपये प्रति रनिंग मीटर ठरविण्यात आला होता. हा दर महापालिकेच्या महासभेच्या निर्णयास अधीन राहून

...7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील......

निश्चित केला गेला होता. त्यानंतर बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या. रेट कमी होता म्हणून या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. दिनांक 24/2/2015 रोजी 30 ते 40 टक्के काम पूर्ण झाले होते. हे पूर्ण काम मायक्रोट्रेंचिगचे नाही. टप्पा 2 मधील 90 किलोमीटरमधील जवळपास 70 किलोमीटर काम रु.1500/- प्रमाणे एचडीडीने व्हायचे होते. मायक्रोट्रेंचिगने 20 किलोमीटरचे काम 72 रुपये प्रति रनिंग मीटरने दिलेले आहे. याबाबत बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्या दराबाबत विचारणा करण्यात आली. महासभेमध्ये याबाबतचा दर ठरलेला होता. त्यापेक्षा जास्त दर घेतलेला आहे. तो दर ओपन कटचा घेतलेला आहे. संपूर्ण कामाचे 72 प्रति चौ.मी.रुपयांनी नाही तर पूर्वलक्षी प्रभावाने ओपन कटच्या हिशेबाने वसुली करण्यात आली आहे. म्हणून 22 कोटी 47 लाख रुपये महापलिकेने कंपनीकडून जमा करुन घेतले आहेत. म्हणजे 72 रुपयांनी काम झालेलेच नाही. ही गोष्ट खरी आहे की, 72 रुपयांनी काम दिले होते. परंतु, ते महासभेच्या निर्णयाच्या अधीन राहून दिलेले होते. त्यानंतर महासभेमध्ये जो रेट ठरला, त्याप्रमाणे वसुली करण्यात आली आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, टप्पा 2 मध्ये जवळपास 70 रनिंग मीटर ओपन कटने करणार होतो. मात्र या कंपनीने जेसीपी व्दारे खोदाई केली असल्यामुळे त्या ठिकाणी 75 मीटर झाले आहे आणि सरफेसिंग करण्यासाठी पुन्हा 1 किलोमीटर रुंदीकरिता त्यांनी चार्जेस आकारणे आवश्यक होते. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झ ालेले आहे. यामध्ये फार मोठ्या प्रकारचा गैरव्यवहार झालेला आहे. आता मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात असेच म्हटले आहे की,प्रति चौ.मी.साठी 72 रुपयांवरुन आम्ही 3 हजार ते 9 हजार रुपये दराने वसुली केली आहे. पूर्वी 72 रुपयांचा बेस काय होता ? या संदर्भात आपण कोणती कारवाई करणार आहात ?

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, पूर्वी 72 रुपयांचा बेस होता. त्याबाबत दिनांक 20/2/2013 रोजी ठराव क्रमांक 304 करण्यात आला. यामध्ये विविध प्रकारच्या रस्त्यांचे व खोदाई कामाचा बेसिक रेट ठरविण्यात आला होता. यामध्ये गाईडलाईन्स ठरविण्यात आल्या होत्या. सिमेंटचा रस्ता करार करुन फोडायचा आणि तयार करायचा असेल तर अमुक रक्कम भरुन घेण्यात यावी अशा गाइर्डलाईन्स तयार करण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रति चौ.मी.साठी 72 रुपयाप्रमाणे ही कामे करण्यात आली होती. अटींच्या अधीन राहून ही कामे देण्यात आली होती. सन्माननीय सदस्यांनी ज्या पत्राचा उल्लेख केला त्या पत्रात असे नमूद केले आहे की, ऑप्टीकल फायबर केबल बऱ्याच प्रमाणात टाकून झाल्या आहेत, ते त्यांनी मान्य केले आहे. ही कामे ओपन पध्दतीने करण्यात आली आहेत. मायक्रोट्रेंचिग पध्दतीने करण्यात आली नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती सत्य समजण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्याकडे द्यावे, ही बाब सत्य समजून संबंधितावर कारवाई करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे मघापासून प्रश्न विचारीत आहेत की, 72 रुपये दर कशा पध्दतीने प्रस्तावित झाला आहे. मंत्री महोदय उत्तर देताना वारंवार सांगत आहे की, महासभेने दर मंजूर केला आहे. मघापासून चार वेळा उत्तरात महासभेचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे तेथे खोदाई व रि-सर्फिंग करण्यासाठी येणारा खर्च जास्त असताना 72 रुपये दर वसूल करुन यात गैरव्यवहार करण्याचा प्रयत्न झालेला आहे, याबाबत मंत्री महोदय काय कारवाई करणार आहेत.

सभापती महोदय, ठाणे शहरात किती मोबाईल टॉवर्स आहेत, रेडीएशनबाबत खूप तक्रारी आलेल्या आहेत, रेडिएशनचे प्रमाण अतिरिक्त झाल्याबाबत किती तक्रारी आलेल्या आहेत, त्या तक्रारीची दखल घेऊन किती टॉवर्स निष्कासित करण्यात आले आहेत ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, दिनांक 20/02/2013 रोजी ठराव क्रमांक 304 करण्यात आला असून यात विविध सवलत कराराचे दर फिक्स करण्यात आले होते. यात जनरल गाईडलाईन्स देण्यात आल्या होत्या. याच कामासाठी हा ठराव झाला असे नाही. महानगरपालिकेत युटिलिटी शिफ्टींगची अनेक कामे सुरु असतात. या कामाचे वर्षभराचे कंत्राट दिले जाते. या कंत्राटात बरीच कामे असतात, जेथे जेथे रस्ते फोडले जातात, त्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

धर्तीवर गाईडलाईन्स फिक्स करण्यात आल्या होत्या. 72 रुपये दराबाबत निश्चितपणे तक्रारी झालेल्या आहेत. 72 रुपये दर ठरविण्याचा विषय वेळेवर आणला आहे, इतक्या कमी दराने मायक्राट्रेंचिग पध्दतीने सवलतीत करार करण्याबाबत जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर शासनाकडून कारवाई करण्यात येईल. दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला होतk की, किती मोबाईल टॉवर्स तेथे आहेत, याबाबत मी सांगू इच्छितो की, 765 मोबाईल टॉवर्स ठाणे जिल्ह्यात आहेत. यापैकी फक्त 28 प्रपोजल्स सबमिट झाले आहेत, त्यातील फक्त 18 टॉवर्स व्हेरिफाई करण्यात आले आहेत. इतर टॉवर्सचे प्रपोजल डीओटीच्या गाईडलाईन्सप्रमाणे नाहीत. त्या प्रपोजलबाबत चौकशी कोणीही केलेली नसावी. या 765 टॉवर्सबाबत सर्व्हे करुन किती टॉवर्स अधिकृत व अनधिकृत आहेत, परवानग्या कोणी कोणी घेतल्या आहेत, डीओटीच्या गाईडलाईन्सचे पालन केले आहे किंवा नाही. हा प्रश्न आरोग्याशी निगडीत आहे. इलेक्ट्रो मॅग्नॅटिक रेडिएशनबाबत अनेक जागांचा सर्व्हे माझ्याकडे आहे. त्याचा अभ्यास मी केलेला आहे. काही सोसायट्यांमध्ये कॅन्सर पेशंट आढळून आले आहेत. यामध्ये कोणताही समझोता न करता कोणतेही टॉलरन्स न ठेवता सर्व टॉवर्सचा सर्व्हे एक महिन्याच्या आत करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात येतील. याबाबत कॅटेगिरी करण्यात येईल. जे टॉवर्स नियमाप्रमाणे आहेत त्यांना वन विंडो सिस्टीमद्वारे क्लिअरन्स देण्यात येतील. त्यांना आवश्यक ती मदत करण्यात येईल. टॉवर्स प्रमाणित आहेत काय, त्यांच्या ॲन्टिनाचे डायरेक्शन, डिस्टन्स, उंची डीओटीच्या गाईडलाईन्सप्रमाणे आहे किंवा नाहीत याबाबत एक महिन्याच्या आत अहवाल मागवून घेण्यात येईल. ज्यांनी डीओटीच्या गाईडलाईन्स पाळल्या नाहीत ते टॉवर्स बंद करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला, त्याबाबत मंत्री महोदयानी असे सांगितले आहे की, याबाबत चौकशी करण्यात येईल. कोणत्या यंत्रणेकडून चौकशी करण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिकेत रेटच्या संदर्भात ठराव झालेला आहे. हा विषय आयत्यावेळी आलेला असून त्या संदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला आहे व त्यासंदर्भातील दर वाढविण्यात आले आहेत. यामध्ये असे स्पष्ट दिसून येते की, प्रशासनाकडून रिलायन्स कंपनीला मदत करायची असेल, कंत्राटदारांचा काही विषय असेल. माझा

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

प्रश्न असा आहे की, चौकशीची यंत्रणा कोणती असेल, सदर चौकशी कोणत्या यंत्रणेमार्फत व किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या टॉवर्सबाबत चौकशी करण्यात येणार आहे, टॉवर्सचा सर्व्हे करण्यात येणार आहे. उप सचिव किंवा सचिव स्तरावरील उच्चस्तरीय समिती गठीत करुन त्याबाबत चौकशी करण्यात येईल. 72 रुपयांवरुन 1500 रुपये रेट कसा झाला आहे, यामध्ये अंतर खूप आहे, पुढील काळासाठी गाईड लाईन्स व शिफारशी करता याव्यात. हा प्रेसिडंट राहू नये यासाठी एक नियमावली तयार करण्यात येईल. त्या नियमावलीच्या आधारे राज्यासाठी धोरणात्मक निर्णय राबविता येईल अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

**उप सभापती** : मंत्री महोदय, टॉवर्सचा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला आहे. या भागात मी स्वत: राहतो, हे कार्यक्षेत्र माझे आहे. अशा प्रकारच्या टॉवर्सना परवानगी देऊ नये अशी तक्रार मी एक ते दीड वर्षा अगोदर पत्र देऊन केली होती. आता जी तक्रार आली आहे त्यामुळे या कंपनीत फार मोठे गैरव्यवहार झाले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सायंटिफिकरित्या आरोग्याच्या दृष्टीने ज्या गोष्टी करायच्या आहेत, त्या मंत्री महोदयांनी लक्षात घेतल्या आहेत. त्याबाबत मी आपणाला धन्यवाद देतो.

या संदर्भात 72 रुपये प्रती चौ. मीटर या दराने आकारणी करण्यात येत होती. महासभेत दिनांक 20 फेब्रुवारी, 2013 रोजी आयत्यावेळी व अचानक ठराव क्रमांक 304 मांडून घाईघाईने यापूर्वी प्रति चौ.मी. 72 रुपये असलेला दर रुपये 1500 करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या प्रकरणात ठाणे महानगरपालिका यांचे संबंधित अधिकारी तसेच रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनी यांच्या संगनमताने महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे संकृतदर्शनीच दिसून येत आहे. या आर्थिक गैरव्यवहाराची तत्काळ ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत चौकशी करावी व त्याचा अहवाल सहा महिन्यात सादर करावा असे मी आपणास निदेश देत आहे. त्याचप्रमाणे टॉवर्सच्या बाबतीत सांगायचे झाले तर हे निवेदन वाचल्यानंतर रेडिएशन प्रमाणापेक्षा जास्त असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारींची शहानिशा करण्याची जबाबदारी TERM कडे आहे. त्यांच्याकडून ती करण्यात येते. त्यानंतर सदर टॉवर्स बंद करावा किंवा कसे याबाबत

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती...**

निर्णय घेण्यात येतो. याबाबत माझे आपणास निदेश असे आहेत की, तक्रार प्राप्त झाल्याबरोबर सदर टॉवर्स त्वरित बंद करावेत. त्यांची TERM मार्फत चौकशी व्हावी. हे निदेश आपण ताबडतोब अंमलात आणावे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय.

----------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मौजे माळेगाव, ता.बारामती, जि.पुणे येथे दारु विक्रेत्यांनी अंगणवाडी कार्यकर्तीला बेदम मारहाण करुन तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करणे

**मु.शी.** : मौजे माळेगाव, ता.बारामती,जि.पुणे येथे दारु विक्रेत्यांनी अंगणवाडी कार्यकर्तीला बेदम मारहाण करुन तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, व.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मौजे माळेगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथे दारुविक्रेत्यांच्या विरोधात तक्रार दिल्याचा राग धरुन दिनांक 28 जानेवारी, 2015 रोजीच्या सुमारास अंगणवाडी कार्यकर्तीला दारुविक्रेत्यांनी बेदम मारहाण करुन विवस्त्र करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडणे, याप्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यास केलेली टाळाटाळ, माळेगाव तसेच शहापूर तालुक्यातील धसई या गावात महिलांना झालेल्या मारहाणीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गावांमध्ये दारुबंदी करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्र्यांकडे केली असणे, तथापि अजूनही दोन्ही गावांमध्ये कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नसणे, तसेच महाराष्ट्रातील पुणे, ठाणे, बुलढाणा, अहमदनगर, बीड अशा अनेक ठिकाणी दारुबंदीविरोधात महिलांनी आवाज उठविला असणे, परिणामी सर्वसामान्य जनतेचा कायदा व सुव्यवस्थेवरील उडालेला विश्वास, याप्रकरणी शासनाने तातडीने संबधित दारुविक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

प्रा.राम शिंदे (गृह राज्य मंत्री(ग्रामीण)) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 26 जानेवारी रोजी बारामती तालुक्यातील माळेगांव ग्रुप ग्रामपंचायत येथे अंगणवाडी सेविका सकाळी झेंडावंदनासाठी जात असताना तिला मारहाण करण्यात आली आहे. सदर महिलेने दारु धंद्याबाबत तक्रार केली होती. या ग्रामपंचायतीने दारु बंद करावी असा ठराव अनेक दिवसांपासून पोलीस स्टेशन, जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे दिला होता. असे असून दारुबंदी का झाली नाही, म्हणून पोलीस स्टेशनमध्ये पाठपुरावा करीत होती. या महिलेला 26 जानेवारीला मारहाण करण्यात आली आहे. आता 26 मार्च रोजी या घटनेला दोन महिने होऊन गेले आहेत. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मंत्री महोदयांनी असे नमूद केले आहे की, आरोपी येरवडा जेलमध्ये आहेत. माझा मूळ प्रश्न असा आहे की, 26 जानेवारी रोजी या महिलेला मारहाण झाली आहे. तेव्हा गावात 100 अवैध दारुचे धंदे होते. आता मी तेथील ग्रामस्थांकडून माहिती घेतली तेव्हा अवैध दारु धंद्यात वाढ होऊन 100 ची संख्या 140 पर्यंत गेली आहे. ग्रामपंचायतीमध्ये उभी बाटली व आडवी बाटली या प्रकारचे मतदान घेऊन दारुबंदी करण्यासंदर्भात कारवाई करण्यात आली नाही. ही महिला स्वतः जिल्हाधिकारी यांना भेटली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेतो म्हणून सांगितले होते. त्यानंतर असा काय प्रकार झाला की, अजून देखील अवैध दारु धंद्यांच्या विरोधात कारवाई झाली नाही ?

यानंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.........

माळेगाव ग्रामपंचायतीमध्ये दारुबंदीच्या संदर्भात उभी बाटली, आडवी बाटली यासाठी मतदान होऊनही कार्यवाही झालेली नाही. तसेच, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील धसई गावात देखील दारुबंदीची मागणी करणाऱ्या महिलांना मारहाण झालेली आहे. माळेगाव येथील अवैध दारुधंदे रोखण्याच्या संदर्भात तेथील पीआय श्री.गणेश पाटील लोकांना अद्वातद्वा बोलतात. दारुबंदी विरोधात काम करणाऱ्या महिलांनी आम्हाला त्या पोलीस स्टेशनमध्ये भिकाऱ्यासारखी वागणूक दिली जाते, असे सांगितले आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या गावांमध्ये दारुबंदीच्या संदर्भात महिलांनी ठराव केलेले आहेत ते ठराव दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रलंबित राहता कामा नयेत. तसेच, माळेगाव येथे पुढील 15 दिवसाच्या आत दारुबंदीच्या संदर्भात ठरावाची प्रक्रिया पूर्ण होईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मागील दोन महिन्यात अवैध दारु धंद्यांची संख्या वाढलेली आहे. स्थानिक पीआय श्री.गणेश पाटील यांनी त्या संदर्भात कोणती कारवाई केली याची आपण चौकशी करणार आहात काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, संपूर्ण राज्यात महिला दारुबंदीच्या संदर्भात एकाकी लढा लढत आहेत. म्हणून ज्या ग्रामपंचायतीमध्ये ठराव झालेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्याबाबत आपण संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देणार आहात काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, दिनांक 26 जानेवारी, 2015 रोजी सकाळी 7.30 वाजताच्या दरम्यान माळेगाव येथे ही घटना घडलेली आहे. या घटनेच्या संदर्भात जी कार्यवाही करणे अपेक्षित होते त्यामध्ये तीन आरोपी निष्पन्न झालेले आहेत. त्या तिन्ही आरोपींना अटक करण्यात आलेली आहे आणि ते आरोपी आता येरवडा जेलमध्ये आहेत. परंतु, ही घटना घडण्यापूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ठराव दिला होता आणि तो ठराव प्रलंबित होता. त्या ठरावाचा राग मनात ठेऊन संबंधितांनी ती महिला स्कुटरवरुन अंगणवाडीमध्ये जात असताना हल्ला केला. आपण सांगितले की, तेथे 100 अवैध दारुधंदे आहेत आणि आता ती संख्या 140 झालेली आहे. या विषयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असताना

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.......

देखील संबंधित अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष दिले नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल आणि ठरावाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाचे परिपत्रक आहे. शासनाच्या परिपत्रकाचा भंग केला असेल तर त्या संदर्भात कसून चौकशी केली जाईल आणि दारूबंदीच्या संदर्भात 15 दिवसांच्या आत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील.

तसेच, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी शहापूर तालुक्यातील धसई येथील दुसरा प्रश्न उपस्थित केला होता. तेथे देखील अशाच प्रकारची घटना घडली होती. या अनुषंगाने राज्य शासनाच्यावतीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दारूबंदीच्या संदर्भात पुन्हा एकदा प्रचलित परिपत्रक अवलोकनार्थ पाठवून कडक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, शासन स्थानिक पीआय श्री.गणेश पाटील यांच्या संदर्भात कारवाई करणार आहे काय ? माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी 26 जानेवारी रोजीच या घटनेची दखल घेतली होती. आपण देखील या संदर्भात दखल घेतलेली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होण्याच्या संदर्भात ज्या अडचणी आहेत त्या संबंधित पीआय श्री.गणेश पाटील यांच्यामुळे घडत आहेत. म्हणून आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या संदर्भात शासनाचे परिपत्रक आहे. पीआय, एसडीपीओ किंवा एसपी असो. या संदर्भात ठराव देऊन देखील कारवाई झाली नाही आणि कारवाई न करता हा पुढील प्रसंग ओढवलेला आहे. मी मघाशी या संदर्भात उत्तर दिलेले आहे. म्हणून चौकशी अंती 15 दिवसात याची अंमलबजावणी तर करावीच. परंतु ते पीआय पाटील असोत किंवा अन्य अधिकारी असो त्यांच्यावर उचित कारवाई केली जाईल.

---------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पोलीस निरीक्षक, खामगांव यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे भ्रष्टाचार करुन शासनाच्या महसुलाचे नुकसान करणे

**मु.शी.** : पोलीस निरीक्षक, खामगांव यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे भ्रष्टाचार करुन शासनाच्या महसुलाचे नुकसान करणे यासंबंधी श्री.पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव शहर पोलीस स्थानकांतर्गत गत 20 वर्षापासून सन 2014 पर्यंत 65 नग सायकली बेवारस अवस्थेत मिळून आलेल्या असणे, सदर सायकलींच्या मालकाचा शोध न लागल्यामुळे सायकली पाण्यामुळे सडलेल्या व निकामी झाल्याचे कारण दाखविण्यात येणे, खामगांव शहर पोलीस स्थानक येथे सायकली ठेवण्याची जागा नसल्याचे कारण देवून सायकलींच्या लिलावाची परवानगी मिळण्यासाठी पोलीस निरीक्षक, खामगांव शहर यांनी उपविभागीय दंडाधिकारी, खामगांव यांना उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांचेमार्फत दिनांक 28 एप्रिल, 2014 रोजी पत्राद्वारे विनंती करणे, उपविभागीय दंडाधिकारी, खामगांव यांनी सदर बेवारस सायकली लिलाव करण्याआधी लिलावाबाबतचा जाहीरनामा काढून त्यासाठी 1 महिन्याची मुदत देऊन जाहीरनाम्याची पुरेपूर प्रसिध्दी करण्याबाबत दिनांक 29 एप्रिल, 2014 रोजीच्या पत्रान्वये कळविणे, दिनांक 19 मे, 2014 रोजी पोलीस निरीक्षक, शहर पोलीस स्थानक, खामगांव यांनी दिनांक 30 एप्रिल, 2014 रोजी सदर जाहीरनामा काढल्याचे खोटे अहवाल व मूल्यांकन केल्याबाबत उपविभागीय दंडाधिकारी, खामगांव यांना 1 महिन्याच्या मुदतीपूर्वीच अहवाल सादर करणे, सदर अहवाल व मूल्यांकनाची कोणतीही शहानिशा न करता उपविभागीय दंडाधिकारी, खामगांव यांनी दिनांक 21 मे, 2014 रोजी 65 सायकलींचा लिलाव करण्याची परवानगी देणे, दिनांक 27 मे, 2014 रोजी परवानगी न घेता 65 सायकलींसह काही मोटार सायकल, लुना, मोबाईल व इतर साहित्य लिलावात काढणे व त्याचा लिलाव पंचनामा करणे, सदर लिलाव

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर.........

करण्याकरिता अनुक्रमांक 34 वर पुन्हा जाहीर करून पूर्वीच लिलावात विकण्यात आलेल्या वाहनांची प्रसिध्दी लिलावाकरीता देण्यात येणे, जप्त असलेला मुद्देमाल मर्जीतल्या लिलाव धारकाला कमी किंमतीमध्ये देण्याकरिता पोलीस निरीक्षक, खामगांव यांनी लिलावामध्ये बनावट कागदपत्रे बनवून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करुन लिलावाच्या रक्कमेतून शासनाला मिळणाऱ्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करून शासनाची फसवणूक करणे, सदर गंभीर प्रकरणी पोलीस निरीक्षक खामगांव शहर यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री ग्रामीण ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला जे लेखी उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. खामगांव पोलीस स्टेशन अंतर्गत मागील 20 वर्षापासून जप्त केलेल्या सायकल, मोटर सायकल व इतर वस्तू लिलावत काढण्यात याव्यात, अशा प्रकारचे पत्र दिनांक 28.04.2014 रोजी तेथील पोलीस अधीक्षकांनी एसडीओ यांच्याकडे दिले होते. उप विभागीय अधिकाऱ्यांनी दिनांक 29.04.2014 रोजी दिलेल्या पत्रानुसार त्यांनी एका महिन्यात जाहीरनामा काढून प्रसिद्ध करावयास पाहिजे होता. परंतु, पोलीस स्टेशनने दिनांक 29.05.2014 रोजी जाहीरनामा काढल्याचे पत्र एसडीओ यांना दिले आणि दिनांक 27.04.2014 रोजी एक महिना पूर्ण न होता तेथील पीआयने दिनांक 27.05.2014 रोजीच तेथील सर्व मालाचा लिलाव केला. एसडीओ यांच्याकडे 60 सायकलींचा लिलाव करण्याची परवानगी मागण्यात आली होती. परंतु, पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याने विनापरवानगी मोटर सायकल, मोबाईल, पंखे व इतर साहित्याची परवानगी न घेता दिनांक 27.05.2014 रोजी लिलाव केला. एसडीओ यांनी पोलीस स्टेशनला पत्र दिलेले आहे. माझ्याकडे या संदर्भातील सर्व पत्र व्यवहार आहे. एसडीओ यांनी जे पत्र दिले त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, "उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपण मागील 20 वर्षापासून सन 2014 पावेतो बेवारस अवस्थेत मिळून आलेल्या 65 सायकलींचा लिलाव करण्याची मंजुरी मिळण्याबाबत कळविले आहे. तसेच, जाहीरनाम्याद्वारे पुरेपूर प्रसिद्धी देऊन 65 सायकलींची अंदाजे मूल्यांकन रक्कम नमूद केली आहे. सदर बाबतीत उक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे सायकलींचा लिलाव करण्याची कार्यालयाकडून परवानगी देण्यात येत आहे." म्हणजे एसडीओ यांनी सायकलींचा लिलाव करण्याची परवानगी दिली. परंतु पोलीस इन्स्पेक्टरने जाहीरनामा काढला नाही. एसडीओ यांनी जाहीरनाम्याबाबत असे कळविले होते की, एक महिन्याची मुदत देऊन सर्वांना कळवून हरकती मागविण्यात याव्यात. परंतु, पोलीस इन्स्पेक्टरने असे काहीही केले नाही आणि दिनांक 27.05.2014 रोजी लिलाव झाल्याचे कागदोपत्री दाखविले. लिलावातून 76,685 रूपये जमा झाल्याचे त्यांनी दाखविले. लिलावातून जमा होणारी रक्कम त्वरित सरकारी खजिन्यात जमा करण्याबाबत संबंधित एसडीओ यांनी पोलीस इन्स्पेक्टर यांना कळविले होते. परंतु, त्यांनी ते पैसे त्वरित सरकारी खजिन्यात जमा केले नाहीत. त्यांनी अडीच महिन्यानंतर ते पैसे स्टेट बँकेत जमा

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर..........

केले. माझ्याकडे स्टेट बँकेत पैसे जमा केल्याची पावती आहे. विनापरवानगी लिलाव केला, त्यासाठी परवानगी घेतली नाही आणि दिनांक 11.08.2014 रोजी स्टेट बँकेत 2,77,475 रुपये जमा केले. संबंधित इन्स्पेक्टरने ही रक्कम अडीच ते तीन महिने स्वतः जवळ ठेवली. खामगाव पोलीस स्टेशनमध्ये अशा प्रकारे मोठा घोळ झालेला आहे आणि पैशाचा गैरव्यवहार करुन शासनाचे नुकसान झालेले आहे. खोटी कागदपत्रे तयार करुन, कोणतीही प्रसिद्धी न देता लिलाव करण्यात आलेला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, त्यांनी जर म्हटले असेल की जाहीरनामा काढण्यात आलेला आहे तर जाहीरनामा कोणत्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आला होता व त्याची तारीख काय आहे ? तसेच, सायकल व्यतिरिक्त मोबाईल, दुचाकी वाहने व इतर साहित्याचा लिलाव करण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती काय ? मोबाईल व इतर साहित्याचे मूल्यांकन काढून उप विभागीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते काय ? लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांना कोणत्या माध्यमातून सूचना देण्यात आल्या होत्या ? तसेच, यामध्ये एक वाहन असे आहे की, त्या वाहनाची विक्री झाल्याचे दाखविण्यात आले आहे. ते वाहन विकल्याची पावती आहे, त्याचा 17 हजार रुपयांचा भरणा देखील करण्यात आलेला आहे. परंतु, आता जो जाहिरनामा काढलेला आहे त्या जाहीरनाम्यातील अ.क्र.34 वर पुन्हा त्या वाहनाचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर घोळ झालेला आहे आणि पैशांची प्रचंड अफरातफर झालेली आहे. या संदर्भात तक्रारी करुन देखील संबंधित इन्स्पेक्टरवर कारवाई करण्यात आलेली नाही. माहितीच्या अधिकारान्वये या संदर्भात माहिती मागविण्यात आलेली आहे. ती सर्व माहिती माझ्याकडे आहे. मी मागील 12 वर्षापासून या सभागृहात काम करीत आहे. मी कोणताही विषय पुराव्याशिवाय उपस्थित करीत नाही. मी जबाबदारीने सांगतो की, हजारो रुपयांचा अपहार करणाऱ्या पोलीस इन्स्पेक्टरला आपण निलंबित करणार आहात काय ?

प्रा.राम शिंदे :सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी खामगांव पोलीस स्टेशनकडे असलेल्या बेवारस साहित्य लिलावाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे...........

केलेला आहे. 65 नग सायकलींच्या लिलावाच्या मंजुरीसाठी दिनांक 28.04.2014 रोजी पत्र देण्यात आले होते. त्यानंतर एक महिन्याची मुदत देऊन दिनांक 29.04.2014 रोजी एसडीओ यांनी लिलावासाठी मंजुर दिली होती.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

मंजुरी दिल्यानंतर लगेच दिनांक 30 एप्रिल, 2014 रोजी जाहीरनामा प्रसिध्द करुन लिलाव केला. या लिलावामध्ये 65 मोटार सायकलींचा समावेश होता. 22 गुन्हयामध्ये कोर्टाच्या आदेशाने निकाल लागल्यामुळे इतर वस्तूंचाही लिलाव करण्यात आला.

श्री.पांडुरंग फुंडकर : इतर वस्तूंचा लिलाव करण्यासाठी उप विभागीय अधिकाऱ्याची परवानगी घेतली होती काय आणि जाहीरनामा कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्द केला होता?

प्रा.राम शिंदे : कोर्टाच्या आदेशाने निकाल लागल्यामुळे 22 गुन्हयातील इतर वस्तूंचा लिलाव करावा लागला. दिनांक 29.4.2014 रोजी एक महिन्याची मुदत दिली होती. दिनांक 30.4.2014 जाहीरनामा प्रसिध्द न करता महिन्याच्या मुदतीपूर्वीच म्हणजे दिनांक 27.5.2014 रोजी 65 मोटार सायकलींसह 22 गुन्हयातील इतर वस्तूंचा कोर्टाच्या आदेशाने लिलाव केला. मुदतीच्या आत लिलाव केला हे मान्य आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : मोटार सायकलींशिवाय इतर वस्तूंमध्ये मोटार सायकल, पंखे, मोबाईल फोन यांचा समावेश होता, त्यांच्या लिलावासाठी एसडीओची परवानगी घेतली नसेल तर तो लिलाव बेकायदेशीर ठरतो. त्या पोलीस निरीक्षकांनी 76 हजार रुपये अडीच महिने वापरले आणि नंतर शासकीय तिजोरीत भरणा केला आहे. हा गैरव्यवहार नाही का?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, 65 मोटार सायकलींच्या लिलावासाठी एसडीओची अनुमती घेतली होती. 22 गुन्हयातील इतर वस्तूंचा लिलाव कोर्टाच्या आदेशाने केला. एसडीओनी मंजुरी दिलेली नसेल तर त्या संदर्भात चौकशी करु असे सांगितले आहे. 76,685 रुपये अडीच महिने स्वतःच्या कस्टडीत ठेवले, बँकेत भरणा केला नाही. त्यांनी अनिमितता केली असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याला त्या पदावरुन दूर करुन दुसऱ्या ठिकाणी ट्रान्सफर केले आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माहितीच्या अधिकारात माहिती प्राप्त केलेली आहे. त्यांच्याकडे अनियमितता झाल्याबाबत कागदोपत्री पुरावा उपलब्ध आहे. मुदतीच्या आत लिलाव केला, अडीच महिने पैसे स्वतःच्या कस्टडीत ठेवून अनियमितता केली हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. असे असताना आणखी कोणत्या गोष्टीची चौकशी करण्याची आवश्यकता आहे? अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसत असल्यामुळे संबंधित

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

अधिकाऱ्याला निलंबित करुन नंतर चौकशी केली पाहिजे. बदली केल्यामुळे त्यांनी नवीन ठिकाणी पुन्हा घोळ घालावा असे मंत्री महोदयांच्या मनात आहे काय? ज्यांनी अनियमितता केली, भ्रष्टाचार केला आहे त्या पी.आय.ला निलंबित करुन चौकशी करणार आहात काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावरुन असे निदर्शनास येते की, संबंधित अधिकाऱ्याने मुदतीच्या आत लिलाव केला आहे. त्यामुळेच त्यांची बदली करण्यात आली आहे. या व्यवहारात प्रथमदर्शनी दोषी आढळल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

-----

**पृ.शी. :** विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अकोला व यवतमाळ जिल्हयातील विविध सिंचन प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित असणे

**मु.शी. :** विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अकोला व यवतमाळ जिल्हयातील विविध सिंचन प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित असणे याबाबत श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील विद्यापीठांतर्गत चालणाऱ्या बी.सी.ए., बी.बी.ए. व बी.सी.एम. अभ्यासक्रमात शिकणाऱ्या ओबीसी, एसबीसी व एनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दोन वर्षापासून बंद असणे

**मु.शी.** : राज्यातील विद्यापीठांतर्गत चालणाऱ्या बी.सी.ए., बी.बी.ए. व बी.सी.एम. अभ्यासक्रमात शिकणाऱ्या ओबीसी, एसबीसी व एनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दोन वर्षापासून बंद असणे यासंबंधी सर्वश्री रामहरी रुपनवर, धनंजय मुंडे, संजय दत्त, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

*"राज्यातील विद्यापीठांतर्गत चालणाऱ्या बी.सी.ए., बी.बी.ए. व बी.सी.एम. या अभ्यासक्रमात शिकणाऱ्या ओ.बी.सी., एस.बी.सी. व एन.टी. या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती गेल्या दोन वर्षापासून बंद केली असल्याची बाब माहे मार्च, २०१५ रोजी निदर्शनास येणे, शासनाकडून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या यादीत या तिन्ही अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला नसल्यामुळेच केंद्राकडून निधी न मिळणे, तसेच तिन्ही अभ्यासक्रम व्यावसायिक नसल्याचा चुकीचा तर्क लावण्यात येणे, याबाबत शासनाचे कमालीचे दुर्लक्ष असून शासनाच्या चुकीमुळेच केंद्राकडून निधी न मिळाल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणे, या अभ्यासक्रमात लाखो विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले असून व सामाजिक न्याय विभागाने ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात येणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे त्यांना पुढील वर्षात प्रवेश न मिळणे, त्यामुळे मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांपुढे उच्च शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणे, गेल्या अडीच वर्षापासून मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती टप्प्या-टप्प्याने बंद करण्याचे शासनाने धोरण अवलंबविणे, एकीकडे तळागाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यासाठी व त्यांना उच्च शिक्षण घेता यावे याकरिता शासनाचे धोरण असणे व दुसरीकडे त्यांची शिष्यवृत्ती बंद करुन या धोरणाला फाटा देणे, द्वितीय अधिवेशन, २०१२ मध्ये तत्कालीन मा.सामाजिक न्यायमंत्री यांच्याकडून सप्टेंबर, २०१३ पर्यंत शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्याचे*

...४..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ॲड.रामहरी रुपनवर....***

***आश्वासन देण्यात येणे, परंतु आश्वासनाची पूर्तता न करणे, याबाबत विद्यार्थ्यांनी शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही या विद्यार्थ्यांना न्याय न मिळाल्याने त्यांच्यात व जनमानसांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, मी उपस्थित केलेला प्रश्न आणि शासनाकडून आलेले निवेदन यामध्ये विसंगती दिसून येते. शासनाकडून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या यादीमध्ये बीसीए, बीबीए व बीसीएम या तीनही अभ्यासक्रमांचा समावेश नसल्यामुळे केंद्र सरकारकडून निधी दिला गेला नाही. ही शासनाकडून झालेली चूक आहे. तीनही व्यावसायिक अभ्यासक्रमांचा चुकीचा अर्थ लावणे ही शासनाकडून झालेली चूक आहे. केंद्र सरकारकडून निधी न आल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागले. सामाजिक न्याय विभागाने या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे फॉर्म ऑनलाईन भरुन न घेतल्याने त्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही आणि पुढील वर्षासाठी प्रवेश मिळाला नाही. या अभ्यासक्रमांचा राज्य शासनाच्या यादीमध्ये समावेश करण्यात येईल काय आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. दिनांक 31 डिसेंबर, 2010 रोजी केंद्र शासनाने अनुसूचित जातीच्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात सुधारित गाईडलाईन्स दिल्या आहेत. 2011 मध्ये राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी केंद्र सरकारची शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय लागू केला होता. दिनांक 11 ऑगस्ट, 2011 रोजी केंद्र शासनाने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबत सुधारित सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राज्य शासनाने निर्णय घेऊन ओबीसी, एसबीसी व एनटी या ग्रूपसाठी शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय घ्यायचा होता. तो निर्णय लागू झाला नाही. त्यामुळे या प्रवर्गाची शिष्यवृत्ती राहिली होती त्या काळातील हा प्रश्न आहे. आम्ही 15 दिवसापूर्वी वित्त विभागाकडे प्रस्ताव दिला होता. तो मान्य झाल्यानंतर कॅबिनेटपुढे प्रस्ताव आणून बीसीए, बीबीए व बीसीएम अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती लागू करण्यात येईल.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, शिष्यवृत्तीबाबत भटक्या व विमुक्त जातीवर नेहमीच अन्याय होत आला आहे. 1962 पासून भटक्या विमुक्तांना शिष्यवृती मंजूर झाली आहे. शासन भटक्या विमुक्तांना एस.सी.,एस.टी.बरोबर मानत आले आहे. नंतरच्या काळात काय झाले ते मला माहिती नाही. याबाबत शासनाची उदासीनता दिसून येते. स्व.गोपीनाथ मुंडे यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, भटक्या विमुक्त जातीसाठी वेगळे मंत्रालय निर्माण करा. माननीय सामाजिक न्याय मंत्री किंवा सामाजिक न्याय विभाग भटक्या व विमुक्तांना न्याय देऊ शकत नाही. आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.....

महाराष्ट्रामध्ये भटक्या व विमुक्तांची लोकसंख्या 22 टक्के आहे. नेहमीच या समाजावर अन्याय होतो. शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात ओबीसी समाजाबरोबर भटक्या व विमुक्त समाजाची सरमिसळ केली गेली, तेव्हापासून केंद्र सरकार भटक्या व विमुक्त समाजाला ओबीसी समाज असल्याचे मानतो. सामाजिक न्याय विभाग हा ब्रिटिश काळात निर्माण झाला होता. दुर्दैवाने या समाजाकडे शासनाचे लक्ष नाही. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना किती प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती दिली जाते, भटक्या व विमुक्त समाजासाठी किती अभ्यासक्रम चालविले जातात, व त्यासाठी किती शिष्यवृत्ती दिली जाते?

निवेदनामध्ये म्हटले आहे की, अनुसूचित जातीच्या धर्तीबर ओबीसी, एसबीसी व एनटी या जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत सुधारणा करण्यात आलेली नाही.

नंतर क्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड...

आपण असेही नमूद केले आहे की, सदर योजनेत नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश केला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत जुने अभ्यास गट व जुन्या दरानेच निर्वाह भत्ता दिला जात आहे. यामध्ये बीबीए, बीसीए, बीसीएम इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश नाही. शिष्यवृत्ती देण्यासाठी आज आपल्याकडे पैसा नाही. केंद्र शासनाकडून निधी मिळत नाही असे देखील आपण म्हटलेले आहे.

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स प्रमाणे राज्य शासनाने प्रस्ताव तयार करावयाचा असतो. त्यानंतर मग शिष्यवृत्ती लागू केली जाते. अनुसूचित जातीसाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी केंद्र शासनाने सुधारित गाईड लाईन्स दिल्या होत्या. त्या नुसार राज्य शासनाने ऑगस्ट 2011 मध्ये अनुसूचित जातीसाठी शिष्यवृत्ती मंजूर केली होती. त्यानंतर दिनांक 11 ऑगस्ट 2011 रोजी केंद्र शासनाने ओबीसी, व्हेजेएनटीसाठी गाईड लाईन्स दिल्या होत्या त्यासंबंधातील प्रस्ताव कॅबिनेटमध्ये मंजूर झाला नव्हता. त्यामुळे सन 2011 पासून शिष्यवृत्ती देण्याचे प्रलंबित होते. आता आम्ही हा प्रस्ताव लगेच मंत्रिमंडळासमोर आणत आहोत व शिष्यवृत्ती देण्याची कार्यवाही त्वरित करीत आहोत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. अनुसूचित जाती, जमातीसाठी योग्य प्रकारची तरतूद केंद्र व राज्य सरकार करीत आहे. परंतु, ओबीसी, एसबीसी आणि एनटी या संवर्गातील विद्यार्थ्यांना बीबीए, बीसीए, बीसीएम इ.विशिष्ट प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळत नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. मंत्री महोदयांनी आता उत्तर दिले की, मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यांनी अर्थ खात्याकडे देखील मागणी केलेली आहे. एस.सी. एस.टी. आणि एन.टी.मध्ये भेदभाव केला जातो अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्यांमध्ये निर्माण होऊ नये यासाठी शासनातर्फे ओबीसी, एसबीसी, एनटी या संवर्गातील विद्यार्थ्यांना लवकरात लवकर शिष्यवृत्ती देण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत? आपण लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, सन 2012-13 मध्ये इतर मागास वर्ग विद्यार्थ्यांसाठी

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत रूपये 543 कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. मग आपल्याला अडचण कुठे येत आहे. तेव्हा या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.राजकुमार बडोले : होय.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, या सर्व अभ्यासक्रमाची कॅटेगिरी युजीसीने बदलली आहे. हे सर्व अभ्यासक्रम युजीसीने झेड कॅटेगिरीमध्ये समाविष्ट केले आहेत हे खरे आहे काय ? सदर अभ्यासक्रम झेड कॅटेगरीमध्ये गेल्यामुळे शिष्यवृत्ती बंद झाली ही बाब खरी आहे काय, शासन युजीसीशी संपर्क साधून ते अभ्यासक्रम झेड कॅटेगिरीमधून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, केंद्र शासनाने रिव्हाईज गाईड लाईन्स दिल्या होत्या. या शिष्यवृत्त्या बी कॅटेगरीमध्ये येतात. केंद्र शासनाने ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसंबंधात ऑगस्ट 2011 मध्ये गाईड लाईन्स दिल्या आहेत. येथे सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंबधात नक्की कार्यवाही करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना एक प्रश्न विचारणार आहे. मॅट्रीक झाल्यानंतर एका विशिष्ट संवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून एक चांगली योजना आपण सुरू केली आहे. हल्ली शिक्षणात खूप बदल होत चालले आहेत. काळा प्रमाणे नवनवीन अभ्यासक्रम येत आहेत. ते अभ्यासक्रम या मुलांना खुले व्हावेत नवनव्या अभ्यासक्रमात या मुलांना जाता यावे यासाठी आपण ही योजना आणली आहे. नवनवीन अभ्यासक्रम हे शासनाने मान्यता दिल्यानंतरच येत असतात. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या मान्यतेनेच नवीन अभ्यासक्रम येत असतो. त्यामुळे या शिक्षणाचा फायदा मिळावा म्हणून ही शिष्यवृत्तीची योजना आहे. या विद्यार्थ्यांना आपण जुन्या अभ्यासक्रमातच संधी देणार असाल तर त्यांच्या प्रगतीमध्ये नवा अडथळा निर्माण करत आहात अशा प्रकारची भावना निर्माण होईल.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

व्यावसायिक अभ्यासक्रम हा कौशल्य विकास योजनेतील सगळ्यात महत्त्वाचा गाभा आहे. ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्यामुळे राज्य सरकारने वारंवार पाठपुरावा करून यात अधिकाधिक अभ्यासक्रमांचा समावेश कसा करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. सदर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना वेळेवर मिळाली तरच त्यांना त्याचा उपयोग होतो. ती नंतर मान्य झाल्यानंतर त्याचा त्यांना काहीही उपयोग होणार नाही. तेव्हा नवीन येणारे अभ्यासक्रम त्या त्या वेळी यात समाविष्ट करण्यासंबंधी शासन प्रयत्न करणार आहे काय तसेच या विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी वेगळा निधी निर्माण करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो प्रश्न विचारला आहे तो सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. तंत्रशिक्षण विभाग आणि सामाजिक न्याय विभाग मिळून एक धोरण आखण्याचा प्रयत्न करीत आहे. जे अभ्यासक्रम सामान्य विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहेत अशा अभ्यासक्रमांचा देखील यात समावेश करून तशा प्रकारचे धोरण राबविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेतील निधी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला मिळत नाही असे देखील नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आपण केंद्र शासनाकडे एकूण किती निधीची मागणी करतो, त्यापैकी किती निधी केंद्र शासनातर्फे देण्यात येतो ? केंद्र शासनाकडून राज्याला निधी येत नसल्यामुळे राज्य सरकार स्वत: निधीची तरतूद करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा फायदा मिळवून देणार आहे काय ? उत्तरामध्ये नमूद केले आहे की, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करण्यात आलेली नाही. तेव्हा यात सुधारणा करून त्यांना देखील मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करणार आहात काय?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे वारंवार निधीची मागणी केली आहे. सन 2001-2002 ते 2013-2014 पर्यंत केंद्र शासनाकडे राज्य शासनाचे एकूण रूपये 1392 कोटी प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजकुमार बडोले .....
सभापती महोदय, यामध्ये राज्यशासनाने शिष्यवृत्ती दिलेली आहे. अनुसूचित जातीसाठी केंद्रपुरस्कृत योजना असून त्यासंदर्भात केंद्रशासनाने 100 टक्के पैसे दिलेले आहेत. परंतु विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग यासाठी राज्य शासनाने शिष्यवृत्तीचे पैसे दिलेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी युजीसीच्या संदर्भात.....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना एवढाच प्रश्न विचारला होता की, शिष्यवृत्तीसाठी केंद्र सरकारची 100 टक्के पुरस्कृत योजना आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात उल्लेख केला आहे की, यासंदर्भात राज्य सरकार केंद्र सरकारकडे जेवढया निधीची मागणी करते त्यापेक्षा केंद्र सरकार राज्य सरकारला कमी रक्कम उपलब्ध करुन देते. त्यामुळे यासंदर्भात जी तफावत आहे ती नेमकी किती आहे ? शिष्यवृत्तीच्या निकषामध्ये आपल्या राज्यातील विद्यार्थी बसतात, या विद्यार्थ्यांना योजनाही लागू होते परंतु केंद्र सरकार पैसे देत नसल्यामुळे आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. त्यामुळे यासंदर्भातील मॅचिंग अमाऊंटचा बोजा राज्य सरकार उचलून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे काय ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन 2000 पासून केंद्रसरकारने शिष्यवृत्तीच्या संदर्भातील 1392 कोटी रुपये राज्य शासनाला दिलेले नाहीत. केंद्र सरकारने यासंदर्भात जे निर्देश दिले होते त्यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, केंद्रशासनाचे या प्रवर्गाला शिष्यवृत्ती देण्याच्या संदर्भात जे धोरण आहे .....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माजी सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांनी या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत "शिष्यवृत्तीच्या संदर्भात केंद्रसरकारचे सन 2000 पासून 1392 कोटी रुपये बाकी आहेत" असे उत्तर दिले होते. शिष्यवृत्तीचा विषय हा अतिशय गंभीर आहे. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय,विमुक्त जाती-भटक्या जमाती या वर्गाच्या संदर्भातील हा विषय आहे. त्यावेळेस मंत्री महोदयांनी सांगितले होते की, 1392 कोटी रुपये देण्याच्या बाबतीत निर्णय



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ........

घेतला जाईल. टेक्नीकल कोर्सेसचा विषय तर सोडूनच द्या. परंतु दोन्ही प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. शिष्यवृत्तीच्या संदर्भात राज्य सरकारची भूमिका काय आहे आणि कोर्सेसच्या बाबतीत आपण किती पैसे इन्क्ल्यूड करणार आहात ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, केंद्रशासनाने 1392 कोटी रुपये राज्य शासनाला दिलेले नाहीत. दि. 11/8/2011 च्या संदर्भात केंद्र शासनाचे पत्र असून त्या पत्रा प्रमाणे केंद्रशासनाने या योजनेकरिता केलेली देशपातळीवरील तरतूद मर्यादित असल्यामुळे राज्याच्या मागणीप्रमाणे निधी देणे शक्य नसल्याबाबत स्पष्ट केले आहे. त्यामुळे या योजनेतील जो खर्च आहे तो राज्याच्या निधीमधून खर्च करण्यात आला होता. त्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम पूर्ण प्रलंबित नाही परंतु राहिलेल्या शिष्यवृत्तीचे पैसे आम्ही केंद्रसरकारकडून मागवून घेऊ एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

**पृ.शी./मु.शी.** :राज्यात प्रति हेक्टरी 4500 रुपये तसेच फळबागायतदारांना 25000 रुपये प्रति हेक्टरी मदत जाहीर केली असतानाही यवतमाळ जिल्हयातील बागायतदारांना केवळ 4500 रुपये प्रति हेक्टरी मदत दिली जाणे याबाबत श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यात 4500 हजार रुपये प्रति हेक्टरी तसेच बागायतदारांना जे फळ-फळावळे उत्पादन करतात अशांना 25000 हजार रुपये प्रति हेक्टरी मदत शासनाने जाहीर केली होती व तसा शासन आदेश (जी.आर.) सुध्दा शासनाने काढला. परंतु आता अशी माहिती मिळत आहे की, यवतमाळ जिल्हयामध्ये बागायतदारांना सुध्दा फक्त 4500 हजार रुपये प्रति हेक्टरी मदत दिली जात आहे. यामुळे शेतक-यांमध्ये व बागायतदारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत ठोस कारवाई करण्याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे, कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती."

---------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** :पालघर जिल्हयामध्ये शिक्षण विभागासाठी स्वतंत्र इमारत, वेतन पथक विभाग, कोषागार कार्यालय,लेखा-परीक्षक कार्यालय, वेतन पडताळणी विभाग, विस्तार अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालये, प्रशासकीय कार्यालये सुरु करण्यायाबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन पालघर हा स्वतंत्र आदिवासीबहुल जिल्हा अस्तित्वात आला असणे, सदर नवीन जिल्हा अस्तित्वात येऊन 6 महिने होवूनही या जिल्हयातील शिक्षण विभागासाठी इमारत नसणे, तसेच वेतन पथक विभाग, कोषागार कार्यालय, लेखा-परीक्षक कार्यालय, वेतन पडताळणी विभाग, विस्तार अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय यापैकी कोणतेही अद्यापि उभारण्यात आले नसणे, यामुळे पालघर जिल्हयातील असंख्य नागरिक व शिक्षकांना ठाण्यातील कार्यालयात यावे लागत असणे, परिणामी त्याच दिवशी काम न झाल्यास ठाणे येथे मुक्काम करावा लागण्याची पाळी येणे, त्यामुळे पालघर जिल्हयामध्ये शिक्षण विभागासाठी स्वतंत्र इमारत तसेच वेतन पथक विभाग, कोषागार कार्यालय, लेखा-परीक्षक कार्यालय, वेतन पडताळणी विभाग, विस्तार अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालये इत्यादी प्रशासकीय कार्यालये सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्हयात ओबीसीसांठी वर्ग 3 व वर्ग 4 करिता देण्यात येणारे आरक्षण केवळ 11 टक्के असणे याबाबत श्री. मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मितेश भांगडिया ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"चंद्रपूर जिल्हयात ओबीसी बांधवांना वर्ग 3 व वर्ग 4 करिता देण्यात येणारे आरक्षण केवळ 11% असून हे चंद्रपूर जिल्हयातील ओबीसी बांधवांच्या संख्येच्या प्रमाणात अत्यंत कमी आहे. ओबीसी बांधवांना वनपट्टे हक्काकरिता तीन पिढयांच्या कागदपत्रांची अट टाकण्यात आलेली आहे ही अट शिथिल करण्यात यावी. ओबीसी समाजातील भूमिहीन मजूर वर्गाचा स्तर उंचावण्याकरिता सबलीकरण योजनेमध्ये विशेष सवलती देण्यात याव्या. ओबीसी समाजाकरिता विविध योजनेंतर्गत विशेष योजना सुरु करुन या आर्थिकरित्या दुर्बल वर्गाचा सर्वंकष विकास करण्याची नितांत गरज आहे. याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

---------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : गडचिरोली वनवृत्ता अंतर्गत वन खात्याने शासकीय यंत्रणा राबवून रोजगार निर्मितीच्या सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पात वनअधिकाऱ्यांनी लाखो रूपयांचा केलेला अपहार याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"गडचिरोली वनवृत्ता अंतर्गत वन खात्याने शासकीय यंत्रणा राबवून रोजगार निमिर्तीच्या उद्देशाने अगरबत्ती प्रकल्प सुरु करण्याकरिता साहित्य खरेदी करण्यात येणे, तसेच अन्य उपक्रम त्यात रोप खरेदी करण्यात येणे, वन विभागातंर्गत अनेक ठिकाणी अगरबत्ती प्रकल्प सुरु करण्याकरिता त्यात लागणारे साहित्य अवाजवी किंमतीत जादा भावाने आंध्रप्रदेश तसेच मलेशिया व इतर देशातून खरेदी केल्या जाणे, त्यातच फायर लाईच्या कामासाठी कोटयावधी रुपयांचा निधी वन विभागाला प्राप्त होवूनही कोणतेही कामे न करता खोटे देयके व मोजमाप पुस्तक दाखविण्यांत येणे, त्यातच लाख बीज खरेदी न करता खरेदी केल्याचे दाखविण्यात येऊन मोठया प्रमाणात गैरव्यवहार करुन शासनाच्या पैशाचा करीत असलेला अपहार, यात वन अधिका-यांनी केलेला लाखो रुपयांचा अपहार व शासनाने करावयाची कारवाई.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** :राज्यातील 16 पैकी 4 महाविद्यालयांना शासनाने प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती आणि मृत्यु व सेवानिवृत्ती उपदान लागू करण्याचा निर्णय घेणे मात्र डावललेल्या उर्वरित 12 महाविद्यालयांना ही योजना लागू न करणे याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"राज्यातील 16 पैकी 4 महाविद्यालयांना शासनाने प्राध्यापक व कर्मचा-यांना सेवानिवृत्ती (पेन्शन) आणि मृत्यु व सेवानिवृत्ती उपदान कम रिटायर्डमेंट लागू करण्याचा निर्णय घेणे मात्र डावललेल्या उर्वरित 12 महाविद्यालयांना ही पेन्शन योजना लागू न करणे त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेणे, राज्यात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाअंतर्गत अनुदानित खाजगी 16 आर्यवेद 3 युनांनी अशी 19 महाविद्यालये व रुग्णालये आणि एक संलग्नित रुग्णालय अशी एकूण 20 खाजगी अनुदानित रुग्णालये असणे, तसेच बिगर अनुदानित खाजगी 37, शासकीय आर्यवेद महाविद्यालये 4 अशी एकूण 61 महाविद्यालये असणे उच्च न्यायालयाचा आदेश व त्यांची अंमलबजावणी वैद्यकीय शिक्षण विभागाचा 17 जानेवारी 2015 च्या निर्णयाच्या आधारे घेऊन उर्वरित 12 अनुदानित खाजगी महाविद्यालयानी उच्च न्यायालयात धाव घेणे, परंतु त्यांचा अद्याप निर्णय न होणे याबाबत सदर महाविद्यालयात काम करणा-या प्राध्यापक व कर्मचारी वर्गात पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, सेवानिवृत्ती योजना लागू न होण्याच्या भीतीने त्यांच्यात पसरलेले नैराश्य व भीतीचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. सदरील विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडत आहे, परवानगी मिळावी.

---------

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. :शहाजी राजांच्या स्मृती जपण्यासाठी स्मारकाचे काम पूर्ण करुन ते जनतेसाठी खुले करण्याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"शहाजी राजांच्या स्मृती जपाव्यात यासाठी स्मारकाचा प्रस्ताव पुढे येणे, प्रकल्पासाठी मालोजी राजे भोसले यांच्या मालकीची जागा निश्चित होणे, सन 2004-2005 मध्ये स्मारकाच्या कामाला सुरुवात होऊन दिनांक 17 सप्टेंबर 2008 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्रकल्प पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात येणे, मात्र आजतागायत हे स्मारक जनतेसाठी एकदाही खुले झाले नाही, अधिका-यांच्या म्हणण्यानुसार स्मारकाचे काम झाले असले तरी सदर स्मारकाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. याबाबत स्मारकाची सखोल चौकशी करुन सदर काम तातडीने पूर्ण करुन स्मारक जनतेसाठी खुले करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 3.00 ते 3.30 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

श्री. आनंद ठाकूर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मी पावसाळी अधिवेशनापासून दिलेल्या एकाही विशेष उल्लेख सूचनेच्या संदर्भात माझ्याकडे अजूनही उत्तर आलेले नाही, माहिती मिळालेली नाही. आपण या संदर्भात निर्देश द्यावेत अशी माझी आपणाला विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी या संदर्भात माननीय मंत्र्यांना दखल घेण्याबाबत सांगतो. ठीक आहे. सन 2015 चे वि.स.वि क्रमांक 8 महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक आहे. ते माननीय मंत्री आल्यानंतर घेण्यात येईल. आता आपण नियम 260 अन्वये असलेल्या अपूर्ण राहिलेल्या कायदा व सुव्यस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात करू या. सदर प्रस्तावावर कोणीही सन्माननीय सदस्य ऑन लेग नव्हते. आता सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी भाषणाला सुरूवात करावी.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला.)

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. राज्याचे माजी ज्येष्ठ पोलीस अधिकारी ज्यांनी मुंबईचे पोलीस आयुक्त पद भूषविले, त्यानंतर भारत सरकारच्या निमंत्रणावरून पंजाबमधील अतिरेक्यांचा मुकाबला केला, देशाला अतिरेक्यांच्या त्यावेळच्या विळख्यातून वाचविले आणि ज्यांचे आयुष्य राज्यातील गुन्हेगारी व्यवस्था मोडण्यासाठी गेले, संपूर्ण देशाला अतिरेकी विळख्यातून वाचविले असे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त रिबेरो साहेब यांचा लेख प्रसिध्द झाला आहे, त्या लेखात त्यांनी असे म्हटले आहे की, मला कधीही असे वाटले नाही की, मी माझ्या देशात परका ठरेन. महाराष्ट्राच्या एका माजी अधिकाऱ्याला, ज्यांच्याकडे भारतीय जनता आदराने पाहते, अशा रिबेरोंना आपण स्वत: परके आहोत असे वाटू लागणे ही या देशासाठी आणि आपल्या राज्यासाठी अत्यंत क्लेशदायक गोष्ट आहे. रिबेरो यांची शाई वाळत नाही तोच पनवेल येथील चर्चवर 3 तरूणांनी दगडफेक केली. सेंट जॉर्ज यांच्या तसबीरी समोरील काच फोडण्याचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील ....

प्रयत्न केला. शासनाकडून अज्ञात समाजकंटक पकडल्याचे सांगितले जात आहे. अल्पसंख्याक समुदायांच्या प्रार्थनागृहांवर कोणतेही कारण नसताना अचानक हल्ले करण्याचे सामर्थ्य, हिंमत प्रतिक्रियावादी शक्तींकडे आली आहे, ती का आली या प्रश्नाचे उत्तर नव्या सरकारकडून मिळाले पाहिजे. प्रतिक्रियावादी शक्ती, अतिरेकी उजव्या शक्ती वेगाने आणि मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्या शक्तींनी राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेपुढे प्रश्न निर्माण केला आहे. राज्य शासन या संदर्भात उत्तरदायी आहे की नाही या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. हे नवे सरकार आले त्यावेळी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणात अतिरेकी डाव्या शक्तींचा उल्लेख केला होता. परंतु अतिरेकी उजव्या शक्तींबद्दल त्यामध्ये नामोल्लेखसुध्दा नव्हता. आज स्थिती अशी आहे की, अतिरेकी उजव्या शक्तींना राज्य शासन पाठीशी घालत नाही ना असा प्रश्न निर्माण होत आहे. राज्य शासनाची भूमिका स्वच्छ असेल तर टोकाच्या अतिरेकी डाव्या शक्तींबरोबर किंवा अगोदर उजव्या शक्तींचा उल्लेख व्हायला हवा होता. आपल्या समाजातील शोषित, पीडितांबद्दल संघर्ष करणाऱ्यांना आपण डावे अतिरेकी ठरवितो आणि त्यांचा निःपात करण्याची भूमिका माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात घेतली जाते. पण राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेला सरळ आव्हान देणाऱ्या, समाजात तेढ निर्माण करणाऱ्या, द्वेषमूलक भावना निर्माण करणाऱ्या, दोन समाजांमध्ये दुही निर्माण करून भांडण लावणाऱ्या आणि भारतीय संविधानातील एकतेच्या, धर्मनिरपक्षतेच्या मूल्यांना उघड आव्हान देणाऱ्या उजव्या शक्तींच्या बाबत मात्र सरकार मूग गिळून गप्प आहे. मात्र असे का आहे या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे खुनी सापडत नाहीत हे आपण सांगत होता. परंतु अजूनही ते सापडलेले नाहीत. आपल्याला सरकार बदलल्यानंतर खुनी सापडतील असे वाटत होते. परंतु ते सापडण्याची शक्यता नाही. उलट कॉ. पानसरे यांचा खून झाला, त्यांचेही मारेकरी अद्यापि सापडलेले नाहीत. मारेकरी कोण आहेत, त्यांच्या मागे कोणत्या शक्तींच्या प्रेरणा आहेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण देशाला माहीत आहे, राज्याला माहीत आहे. प्रश्न असा आहे की, मारेकऱ्यांपर्यंत कायद्याचे लंबे हात अजून पोहचले कसे नाहीत ? गृह खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. त्यामुळे आमची अपेक्षा अधिक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या प्रामाणिक भूमिकेबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. त्यांनी पहिल्याच अधिवेशनात सांगितले होते की,

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील ....

नथुराम खुनी आहे, त्याचे समर्थन सरकार करीत नाही आणि करण्याची शक्यताही नाही. कोणी करीत असेल तर त्याचाही आम्ही विरोध करू, मोडून काढून. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे स्पष्ट विधान सभागृहात केले होते. मात्र माननीय मुख्यमंत्र्यांचीही ही भूमिका पोलिसांपर्यंत पोहचलेली दिसत नाही. त्यामुळे नथुरामी शक्तींचे जाळे, शक्ती, ताकद राज्यात वाढत आहे हे मला नम्रपणे सांगावेसे वाटते. कॉ. पानसरे यांचे कोणाशी वैर होते ? ते उजव्या शक्तींबद्दल हिंमतीने बोलत होते, ते हेमंत करकरे यांच्या बलिदानाबाबत, शहादत याबद्ल गौरवाने बोलत होते, ते त्यांच्या हत्येबद्दलचे काही प्रश्न उपस्थित करीत होते, कॉ. पानसरे छत्रपती शिवरायांचे चरित्र राज्यभर सांगण्याचा प्रयत्न करीत होते. शिवरायांनी महाराष्ट्र कसा उभा केला, हिंदवी स्वराज्य कसे उभे केले, शिवरांयाची लढाई कोणाविरोधात होती, हे ते सांगत होते. काही जण शिवरायांचे चित्र एका समाजाचे नेते, एका धर्माचे नेते म्हणून दाखविण्याचा प्रयत्न करीत होते आणि दुसऱ्या समाजाबद्दल द्वेषभावना निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवरायांच्या प्रतिकाचा वापर करत होते, तो खोटा इतिहास मोडून काढून, पुसून टाकून शिवरायाचे खरे चरित्र लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न ते करीत होते आणि या शक्तींनाच नेमके ते नको होते. त्यांच्यावरील हल्ला हा डाव्या विचारांवरचा हल्ला नव्हता, मानवतेवरील हल्ला नव्हता तर तो छत्रपती शिवरांयाचा विचारांवरील हल्ला आहे. छत्रपती शिवरायांच्या विचारांवर उघडपणे हल्ला करणाऱ्या शक्तींना आपण अजूनही जेरबंद करू शकलो नाही, पकडू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. राज्य शासनाकडे या प्रश्नाचे उत्तर काय आहे ? घोषणा खूप झाल्या आहेत. विरोधी पक्षात होता, त्यावेळी राजीनामा मागत होता. मी तुमचा राजमीना मागत नाही. कारण मागच्या कृत्यांसाठी तुम्ही जबाबदार नाही. तुम्ही सत्तेवर आल्यानंतर तुम्ही ज्यासाठी राजीनामा मागत होता ते काम पूर्ण का करीत नाही ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.......

पोलीस यंत्रणा आता तुमच्या हातात आहे, हे राज्य तुमच्या हातात आहे. कोणत्या शक्तींनी तुमचे हात बांधून ठेवले आहेत की ज्यामुळे तुम्ही मारेकऱ्यांपर्यंत पोहोचू शकत नाही ? या उजव्या अतिरेकी शक्तींची हिंमत एवढी वाढली आहे, मी जबाबदारीने सांगतो की, शहीद करकरे साहेबांनी या उजव्या शक्तींचा ज्यांना धोका आहे, त्यांची यादी सरकारपुढे दिली होती आणि त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहनराव भागवत यांचाही समावेश होता, त्यांच्याही जीवाला धोका आहे. आपण ज्या शक्ती वाढवतो, त्या एवढ्या टोकाला जातात की, आपल्या नेतृत्त्वाचा बळी घेण्याची त्यांची तयारी असते. त्यांना उदार हिंदुत्त्ववाद सुध्दा मान्य नाही. उदार हिंदू विचारसरणी देखील मान्य नाही. वारकरी संप्रदाय, भागवत संप्रदाय ही तर फार दूरची गोष्ट झाली. काही लोक हिंदुत्त्ववादी विचार मानतात. पण उदारतेची भूमिका घेऊन लोकशाही परंपरेमध्ये, लोकशाही चौकटीत काम करु मागतात पण या लोकांना मात्र ही चौकट मान्य नाही. अशा प्रकारच्या टोकाच्या हिंदुत्त्ववादी शक्ती राज्यामध्ये वाढत आहेत. या शक्तींचा निःपात आपण करणार की नाही ? अन्यथा ते उद्या आपलाही घास घेतल्याशिवाय राहणार नाहीत.

सभापती महोदय, नथुरामी, नथुरामी, असे का म्हटले जाते, असा प्रश्न विचारला जातो. पण नथुरामने या देशाच्या पित्याचा खून केलेला आहे, देशाच्या एकतेवर घाला घातला आहे. हिटलरचे नाव घेण्यास जर्मनीमध्ये परवानगी नाही. त्याचे नाव घेण्याची त्या देशात कोणाची हिंमत नाही. पण नथुरामचा पुतळा बांधण्यापर्यंत या शक्तींची हिंमत गेली आहे, त्यांना महाराष्ट्रातून प्रेरणा मिळते आहे. त्याचे काय ? त्यांच्याबद्दल तुम्हाला काही वाटत नाही का ? त्यांची कार्यालये कुठे आहेत, अड्डे कुठे आहेत, त्यांचा अभिनव भारताच्या नावाने चाललेला कारभार कुठून चालतो, याचा पत्ता तुम्हाला नाही का ? त्यांच्यावर तुम्ही छापे टाकले आहेत का, त्यांच्या साहित्यावर छापे टाकले आहेत का ? लेनिन आणि भगतसिंगाचे पुस्तक हातात ठेवले म्हणून नक्षलवादाचे आरोप करीत तुम्ही तरुणांना तुरुंगात टाकता. पण दुसऱ्या बाजूला नथुरामाचे उघड समर्थन करणाऱ्या, त्यांचे प्रचार साहित्य वापरणाऱ्यांना मात्र तुम्ही पायबंद घालत नाही, याचे उत्तर तुम्ही देणार आहात का ? या शक्तींनी महाराष्ट्रात एवढे मोठे जाळे उभे केले आहे की, पूर्वी

पनवेलला यांचा मुख्य अड्डा होता, नंतर तो सांगलीला होता, तेथून कोल्हापूर, बेळगावला आणि

...2...



श्री.कपिल पाटील.......

आता गोव्याला आहे. गोव्यामध्ये त्यांना कोण सुरक्षा देत आहे, कोणाची राजकीय सुरक्षा त्यांना आहे, हे तुम्ही शोधून काढणार आहात की नाही ? तो गोवा राज्याचा प्रश्न आहे, असे म्हणून तुम्हाला जबाबदारी झटकता येणार नाही. कारण, त्यांनी महाराष्ट्रात दोन बळी घेतले आहेत आणि गोव्यामध्ये लपून बसले आहेत. तुम्ही त्यांना शोधून काढणार की नाही ?

सभापती महोदय, आठवलेंबद्दल आणि त्यांच्या सनातन प्रभातबद्दल या सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या सनातन प्रभातने उघडपणे त्यांच्या मुखपत्रामध्ये नावे घेऊन टार्गेट कोण आहे, हे सांगितले आहे. त्या सनातन प्रभातवर तुम्ही कोणती कारवाई केली आहे ? उघडपणे शिवरायांचा आणि छत्रपती संभाजींचा वापर करीत अल्पसंख्य समुदायाच्या विरोधात आग लावण्याचे काम मनोहर भिडे नावाचा एक अतिरेकी माणूस करतो आणि तुम्ही त्याला डोक्यावर घेता. हे काय चालले आहे ?

सभापती महोदय, हे राज्य सरकार संविधानाची शपथ घेऊन सत्तेवर आले आहे. लोकशाही मार्गाने सत्तेवर आले आहे. त्यामुळे तुम्हाला संविधानाच्या चौकटीमध्येच काम करावे लागेल आणि संविधानाला जे जे आव्हान देतील त्यांच्या विरोधात तुमचा दंडा चालला पाहिजे. परंतु, तो चालत नाही. तुमचे हात कोणी बांधून ठेवले आहेत, या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, घटना खूप आहेत. राजकीय विचारांच्या बाबतीत त्यांची अडचण असेल. पण बाकीचे काय चालले आहे ? गेल्या महिन्यात गोरेगांवला एका मोलकरणीची हत्या झाली. पोलीस स्टेशनच्या मागील बाजूस हाकेच्या अंतरावर त्यांचे घर आहे. त्या तरुण मुलीला जिवंत जाळून मारुन टाकण्यात आले. लहानपणापासून तिला वेठबिगारीसारखे वापरले, मुलगी मोठी झाली, मोठी झाल्यानंतर स्त्रीच्या वाटयाला जे दु:ख, ज्या वेदना येतात, त्या सगळ्या तिच्या वाटेला आल्या आणि बभ्रा होऊ नये म्हणून तिला जिवंतपणी, निर्दयपणे, निर्ममपणे मारुन टाकण्यात आले. कुणालाही अटक झाली नाही. सोसायटीतील सर्व मध्यमवर्गीय महिला खाली उतरल्या. आमच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सोसायटीमधील मोलकरीण मुलगी असली तरी ती मुलगी आहे, स्त्री आहे, तिचा असा मृत्यू होणे,

...3...



श्री.कपिल पाटील.......

तिच्यावर असा अत्याचार होणे, असा खून होणे, आम्हाला मान्य नाही. तिच्यासाठी त्या महिला रस्त्यावर उतरल्या. तरी सुध्दा गुन्हेगारास अटक झाली नाही. महिलांनी आणि नागरिकांनी मोर्चा काढला तेव्हा घरातील कर्त्या माणसाला अटक झाली. लोक महिला आयोगाकडे गेले, पुन्हा मोर्चा काढला तेव्हा मग तांबटच्या पत्नीला अटक झाली. अजूनही मुलगा मोकळा आहे. मी तेथील पोलीस अधिकाऱ्यांना विचारले की, "मुलाला का अटक केली नाही, त्याचा यामध्ये हात नसेल का ? तरुण मुलगा आहे." त्यांनी मला सांगितले की, "तो मेंटल आहे, कामातून गेला आहे, ॲबनॉर्मल आहे." मला वाटले की, खरच तो ॲबनॉर्मल असेल. मी सोसायटीमध्ये चौकशी केली तेव्हा समजले की, तो आयआयटीचा विद्यार्थी आहे. आता जर आयआयटीचा विद्यार्थी ॲबनॉर्मल असेल तर कठीणच आहे. म्हणजे उघडपणे पोलिसांनी हे ठरविले आहे की, त्यांना वाचवायचे. मोलकरीण मेली, कोण बोलणार आहे, कोण बघणार आहे. महिना झाला अजून मुलाला अटक केलेली नाही. नावाला दोन लोकांना अटक केली आहे. त्यांच्याविरुध्द आवश्यक ती कलमे लावलेली नाहीत. एक महिन्यानंतर 302 कलम लावण्यात आले. तुमचे मुंबईचे पोलीस या पध्दतीने जर काम करीत असतील तर सर्वसामान्य जनतेने, सामान्य माणसाने विश्वास कोणावर ठेवायचा, पोलीस कोणाच्या सल्ल्याने काम करीत आहेत, कुणाचे दडपण त्यांच्यावर आहे, कारवाई करु नका म्हणून त्याना कुणाचे फोन येत होते ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी हे प्रकरण सीआयडी कडे दिले पाहिजे. त्याबरोबरच ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाला न्याय दिला नाही, तपास केला नाही, त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. त्या अधिकाऱ्यांचे फोन तपासा आणि त्यांना कोणाकोणाचे फोन येत होते, याची माहिती या सभागृहात ठेवा, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नशेच्या संदर्भातील उल्लेख या प्रस्तावामध्ये आहे. कॉलेज तरुणांमध्ये आणि त्याही पेक्षा वाईट म्हणजे शाळकरी मुलांमध्ये एमडी आणि तत्सम प्रकारचे अमली पावडरीचे व्यसन वेगाने लावले जात आहे. मुंबईमध्ये जोगेश्वरी, अंधेरी, मानखूर्द, गोवंडी, चेंबूर आणि अन्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मध्यमवर्गीय भागांमध्ये मुलांना अमली पदार्थांची सवय लावली जात आहे आणि अत्यंत वाईट हे

...4....



श्री.कपिल पाटील.......

आहे की, तीन-चार वेळा हुंगल्यानंतर मुले त्या अमली पदार्थाच्या अधीन होतात, सवय तोडू शकत नाहीत आणि वर्ष, दोन वर्षात त्यांचा मृत्यू होतो. लहान, लहान वयातील मुले या नशेच्या विळख्यात सापडली आहेत आणि पोलीस खाते ढिम्म आहे. हे नशिले पदार्थ विकणाऱ्या लोकांशी पोलिसांचे साटेलोटे आहे. पोलिसांच्या मदतीशिवाय, संमतीशिवाय, काही दिल्या-घेतल्याशिवाय हे प्रकार वाढू शकत नाही. शाळेच्या बाजूला, विडी, तंबाखू किंवा दारुचे दुकान असता कामा नये, असे आपण मानतो. दुसऱ्या बाजूला तेथील टपऱ्यांमधून मुलांना हे पदार्थ विकले जात आहेत. आपण याबद्दल काय करणार आहात ? उद्याची आपली पिढी अशा प्रकारे व्यसनाधीन होऊन मृत्यूला कवटाळणार असेल तर आपण काय करणार आहात ? आपण काय करीत आहोत, हे लहान मुलांना कळत नाही. अवघ्या 10 ते 11 वर्षाच्या मुलांना हे व्यसन लावले जात आहे. पालकांनी दिलेले पैसे सुरुवातीला खर्च केले जातात आणि मग ते चोऱ्यामाऱ्या करायला लागतात, गुन्हे करायला लागतात. हे प्रकार खूप वाढलेले आहेत. विशेषतः झोपडपट्टी भागातील शाळांमध्ये तर हे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. असेही समजण्याचे कारण नाही की, केवळ गरीब मुलांना हे व्यसन आहे. वरच्या वर्गातील मुलांनाही हे व्यसन लागलेले आहे, हे व्यसन तेथेही चोर पावलाने शिरलेले आहे. एका मोठ्या ख्यातनाम, आंतरराष्ट्रीय शाळेच्या विद्यार्थिनीच्या बॅगेमध्ये हे अंमली पदार्थ सापडले होते. ती मुलगी 7 वी, 8 वी तील होती. श्रीमंत घरातील होती. तिच्या दप्तरात हे पदार्थ सापडले. माझी अशी मागणी आहे की, एका बाजूला या शक्तींवर, या व्यवहारात गुंतलेल्या लोकांवर कारवाई करावी आणि दुस-या बाजूला शाळांमधील मुलांना हे व्यसन लागणार नाही, या दृष्टीने पोलिसांच्या मदतीने शाळा, शाळांमध्ये, पालकांमध्ये जागृतीची मोहीम सुरु करावी.

सभापती महोदय, आपल्या धन्यवाद देतो आणि थांबतो.

---------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात उपस्थित केला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था कशी आहे, याबाबत मी बोलत असताना माझ्या दृष्टीकोनातून कायदा व सुव्यवस्था कशी ढासळली, त्याबाबत मी मनोगत व्यक्त करीत आहे. काही दिवसांपूर्वी कॉ.गोविंद पानसरे यांची हत्या झाली होती. त्या हत्त्येनंतर सर्वपक्षीय बंद पाळण्यात आला होता. त्या बंदच्या दिवशी नाशिक शहरातील उप नगर पोलीस स्टेशनमधून मला नोटीस पाठविण्यात आली होती. सार्वजनिक उत्सव किंवा काही सार्वजनिक बाबी असल्यातर जे हिस्ट्रीसिटर असतात, समाज विघातक कृत्य करीत असतात, अशा लोकांना नोटीस पाठविण्यात येते.

सभापती महोदय, कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या निमित्ताने बंद पाळण्यात आला होता त्या दिवशी मला नोटीस आली होती. त्या नोटीसमध्ये असे नमूद केल होते की, "कॉ.गोविंद पानसरे यांचे निधन झाले आहे, त्याच्या निषेधार्थ सर्व पक्षीय संघटनांच्या वतीने बंदची हाक दिलेली आहे. तरी महाराष्ट्र बंदच्या काळात आपणाकडून अगर पक्षाच्या संघटित कार्यकर्ते यांच्याकडून सरकारी व खाजगी मालमत्तेचे नुकसान होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन शांतता भंग होऊ शकते असे आमचे ठाम मत झाले आहे." मंत्री महोदय आपण या गोष्टींचा विचार करावा. येथील पोलीस अधिकारी सांगत आहेत की, आमच्याकडून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ शकेल असे त्यांचे ठाम मत झाले आहे.

सभापती महोदय, मला मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, माझ्या हातून या अगोदर असे कोणते कृत्य घडले होते, अशा कोणत्या सरकारी मालमत्तेचे मी नुकसान केले होते म्हणून या अधिकाऱ्याला बंदच्या निमित्ताने आमच्या हातून सरकारी मालमत्तेचे नुकसान होणार असे माझ्याविषयी का वाटले ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेचा आदर करून आमच्याकडून एखादे कृत्य घडले तरी सभापती महोदय\ आपल्या परवानगीशिवाय आम्हाला पोलीस अटक करु शकत नाही. घटनेने सदस्यांना संरक्षण देण्यात आले आहे. सदस्यांनी काही गुन्हा केला तर माननीय सभापती यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. सन्माननीय सदस्यांच्या हातून अमुक कृत्य घडले आहे. त्यानंतर सभापती महोदयांच्या परवानगीने आम्हाला अटक होऊ शकते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-2

VVK/ MMP/ AKN/ AKN/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर... 15:50

श्री. जयवंतराव जाधव...

आम्ही हिस्ट्रीसीटर नाहीत, आमच्या हातून या अगोदर असे कोणतेही कृत्य घडले नाही] असे असताना संबंधित उप नगर पोलीस स्टेशनमधून मला अशी नोटीस देण्यात आली होती. त्यांनी असे देखील सांगितले होते की, आपल्या विरुध्द नोटीसचा पुरावा म्हणून कोर्टात सादर करण्यात येईल व आपल्यावर कारवाई करण्यात येईल. यानंतर नोटीसीचा मी गांभीर्याने विचार केला] तेव्हा माझ्या असे निदर्शनास आले की, पोलीस यंत्रणा व शासनाच्या असे लक्षात आले की, कायदा व सुव्यवस्था इतकी बिघडलेली आहे की, पोलीस यंत्रणेवर जनता विश्वास ठेवण्यास तयार नाही. जनता आता कायदा हातात घेऊ लागली आहे. पोलीस यंत्रणेच्या ही बाब लक्षात आली तेव्हा आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना अशा प्रकारे नोटीसा देण्यात येतात. जनता कायदा हातात का घेऊ लागली आहे] याचा विचार मंत्री महोदयांनी करावा. कॉ.पानसरे या विचारवंताची हत्या झाली, त्यांचे खुनी अद्यापही मोकाट आहेत, त्यामुळे या विचारसरणीचे लोक आज सुरक्षित नाहीत, त्याचप्रमाणे सर्वसामान्य लोक देखील सुरक्षित नाहीत.

सभापती महोदय, अजिंक्य घोलप हा युवक नाशिकमध्ये राहत होता. पुणे येथे तो इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होता. सुटीच्या काळात दोन्ही जुळे भाऊ घरी आले होते. घरी आल्यावर दुसऱ्या दिवशी अजिंक्य घोलप घरातून काही तरी किराणा सामान आणण्यासाठी समोरील किराणा दुकानात गेला. 60 ते 70 दिवस झाले तरी तो मुलगा गायब आहे. पालकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली, पोलिसांना विनंती केली. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणारा मुलगा दहा मिनिटांसाठी दुकानात गेला होता, दोन महिने झाले तरी घराकडे परतला नाही. त्या मातेने भयंकर आक्रोश केला. पोलीस कमिशनर यांची भेट घेतली. आमची चौकशी चालू आहे, असे उत्तर त्यांना मिळाले असून यापेक्षा कोणतेही सहकार्य पोलिसांकडून या कुटुंबाला मिळाले नाही. त्या कुटुंबीयांनी पोलिसांना विनंती केली की, जिल्ह्याच्या बाहेरील पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या अधिकाऱ्यांकडे या मुलाचे फोटे द्या. त्यांना सांगा की, हा मुलगा गायब आहे, हा मुलगा कोठे मृतावस्थेत आहे काय ? तो जिवंत आहे काय किंवा त्या मुलाला कोणी डांबून ठेवले आहे, यासाठी त्या मुलाचा फोटो आपण प्रसिध्द करावा. तेथील पोलीस अधिकारी या मुलाच्या पालकांना सांगत होते की, उद्या सकाळी या, तुमच्या स्वतःच्या मालकीची गाडी घेऊन या, 9 वाजता तुम्ही येथे उभे रहा. तुमची गाडी असली तर पोलीस तुमच्या बरोबर जाण्यास तयार आहेत. स्वतःहून पोलीस यंत्रणा हालचाल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव...

करण्यास तयार नाही. पुन्हा असा प्रश्न निर्माण होतो की, एका विचारसरणीच्या माणसाची हत्या होते, एक युवक देखील दोन महिन्यापासून सापडत नाही, पोलीस यंत्रणा अत्यंत ढिम्म झाली आहे.

सभापती महोदय, रविंद्र बोरसे हा मुलगा नाशिक येथे राहत होता. नाशिक मधील एका इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिकत होता. मुलांमुलांचे ट्रेडिशनल डे मधून भांडणे झाली. त्या मुलाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्या मुलाच्या चारही बाजूने रिंगण करण्यात आले होते, त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करण्यात आले. काही मुले मोबाईलमध्ये शुटींग करीत होते. हा मुलगा अशा पध्दतीने तडफडतो हे ते पाहत होते. कॉलेज व्यवस्थापन त्याच्या मदतीला येण्यास तयार नाही. मला अशी माहिती मिळाली की, त्या मुलावरील हल्ला कॉलेजच्या कॅम्पसमध्ये झाला होता. कॉलेजच्या मॅनेजमेंटने त्या मुलाला बाहेर टाकून दिले. रक्ताचे पडलेले डाग पुसून काढले. त्यांनी असे सांगितले की, हा गुन्हा कॉलेज कॅम्पसच्या बाहेर झाला आहे. कॉलेजची यंत्रणा त्या मुलांना वाचविण्यासाठी आली नाही. इंजिनिअर मुले किंवा कॉ.पानसरे यांच्या सारख्या विचारवंतांच्या हत्या होत असल्यामुळे जनता कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, मंत्री महोदय अशा प्रकारांमुळे जनता 100 टक्के कायदा हातात घेऊ शकते. घरातील महिला सुरक्षित नाहीत, विद्यार्थी सुरक्षित नाहीत. स्वतःचे घर सुरक्षित नाही. याबाबत पोलीस यंत्रणा काहीच करण्यास तयार नसेल तर हे राज्य कोणाचे आहे हा प्रश्न आमच्या सारख्या कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण होतो. ज्या उप नगर पोलीस स्टेशनमधून मला नोटीस आली होती. त्या पोलीस स्टेशनमधील काही अधिकाऱ्यांचे आणि मिलिट्रीच्या कॅम्पमधील काही सैनिकांचा वाद झाला होता. त्यानंतर 100 ते 150 सैनिक पोलीस स्टेशनमध्ये घुसून त्यांनी जो समोर दिसेल त्याला बडविले होते. आरोपी, पोलीस कर्मचारी आहे का अधिकारी आहे, असे काहीही न पाहता त्यांनी सर्वांना बडवून काढले होते. मला त्या सैनिकांचा अभिमान वाटतो. पोलीस यंत्रणा अशा प्रकारे ढीम्म असेल, ज्यांनी सर्व सामान्य माणसांचे संरक्षण करायचे ती यंत्रणा चोर भामट्यांचे संरक्षण करीत असेल तर त्या सैनिकांना जे काम केले त्याबाबत मी सलाम करतो. त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये येऊन पोलिसांना चांगलीच सजा दिली आहे.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.जयवंतराव जाधव........

पोलीस यंत्रणेची गुन्हे दाखल करण्याची हिम्मत झाली नाही. मिलिटरीच्या कॅम्पमध्ये घुसण्याची हिम्मत नाही. सिंघम चित्रपटातील नायक अजय देवगण सांगतो की, जर पोलिसांनी ठरविले तर मंदिरातील चप्पल देखील चोरीला जाऊ शकत नाही. मग पोलिसांमध्ये जर एवढी ताकद असेल तर पोलीस यंत्रणा एवढी ढिम्म का झाली ? सत्ता तुमच्या पक्षाची असो किंवा आमच्या पक्षाची असो, तुमचे सरकार सत्तेवर असताना किती गुन्हे झाले, आमचे सरकार सत्तेवर असताना किती गुन्हे झाले, हा भाग वेगळा आहे. मी सांगू इच्छितो की, आपले फक्त मुखवटे बदलले आहेत. अधिकारी मात्र तेच आहेत. आपण जर अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जनतेला विश्वास देऊ शकत नसू तर आज आपल्याला सभागृहात जाहीर करावे लागेल की, तुम्हीच तुमचे संरक्षण करावे. पोलीस स्टेशनची स्वतःची एक यंत्रणा असते. कोठे चोर लपलेला आहे काय, एखादा हिस्ट्रीसीटर येऊन कोठे थांबलेला आहे काय आणि तडीपार गुंडांच्या संदर्भात काही टिप्स असतात.

सभापती महोदय, आमच्या नाशिकमध्ये दोन आर्थिक गुन्हे घडले. नाशिकमध्ये इमू पक्षाच्या नावाने करोडो रुपये जमा करण्यात आले. मी या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केला असता स्व.आर.आर.पाटील साहेबांनी मला आश्वासन दिले की, या प्रकरणाची एसीपी लेव्हलवर चौकशी करुन त्यांची मालमत्ता आम्ही ताबडतोब जमा करु आणि सर्वसामान्य लोकांना न्याय देऊ. मी या संदर्भात चार वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित केला. मला सांगण्यात आले की, तपास सुरु आहे. या प्रकरणाचे काय झाले ? त्याच पद्धतीने नाशिक शहरात केबीसी नावाचा आर्थिक गुन्हा उघडकीस आला. या प्रकरणातील गुन्हेगार सिंगापूर पर्यंत पळून गेले. मराठवाड्यापासून या आर्थिक गुन्ह्याची सुरुवात होते. आता या प्रकरणातील आरोपी सिंगापूर येथे पळून गेलेला आहे. आपल्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत 1 हजार रुपये दिल्यानंतर 8 दिवसात 2 हजार रुपये देणारी योजना सुरु झालेली आहे, हे पोलीस यंत्रणेच्या लक्षात येत नाही ? यामध्ये पोलीस अधिकारी देखील सहभागी आहेत.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव........

ज्यावेळी ही योजना सुरु झाली त्यावेळी सुरुवातीला या योजनेत पोलिसांनीच पैसे गुंतविले होते. त्यांना दुप्पट पैसे मिळाले. त्यानंतर लोकांना कळले की, या योजनेत पैसे गुंतविले तर दुप्पट पैसे मिळतात आणि पोलीसच लोकांना हे सांगत होते. त्यामुळे लोकांनी त्या योजनेत पैसे गुंतविले....

..........

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहाच्या कामकाजाबाबत.**

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, वि.स.वि.क्रमांक 6-नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब सुधारणा विधेयक आज चर्चेला घेण्यात येणार नाही. हे विधेयक नंतर चर्चेला घेण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अशासकीय कामकाज देखील राहिलेले आहे.

**उप सभापती** : अशासकीय कामकाज केव्हा घेण्यात येणार आहे हे मी सभागृहाला नंतर सांगतो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मराठवाड्यातील दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई या विषयावरील म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे ऑन लेग आहेत.

**उप सभापती** : ठीक आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्री सोमवारी सकाळी उत्तर देतील. ज्या सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावरील चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी या प्रस्तावावर बोलावे. माननीय मुख्यमंत्री सोमवारी सकाळी या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 6-नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब सुधारणा विधेयक केव्हा चर्चेला घेण्यात येणार आहे ? हे विधेयक चर्चेला घेण्याबाबत तारीख निश्चित करण्यात आलेली आहे काय ?

**उप सभापती** : हे विधेयक आज चर्चेला घेण्यात येणार नाही. हे विधेयक नंतर चर्चेला घेण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी आपले भाषण सुरु करावे.

--------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु......

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नाशिक शहरात घडलेल्या केबीसी सारख्या आर्थिक गुन्ह्याच्या प्रकरणामध्ये काय प्रगती झाली, कोणावर कारवाई करण्यात आली ? या प्रकरणातील आरोपी सिंगापूर येथे पळून गेलेला आहे, तुम्ही त्याला कशा प्रकारे पकडून आणणार आहात ? त्याच बरोबर, इमू प्रकरणाला आता दोन वर्षे झालेली आहेत. स्व.आर.आर.पाटील साहेबांनी या संदर्भात दिलेल्या आश्वासनाचे पुढे काय झाले ? मी पुन्हा पुन्हा सांगतो की, मुखवटा जरी बदलला असला तरी पोलीस यंत्रणा तीच आहे आणि त्यांनी दिलेल्या एका चिठ्ठीवर, त्यांनी केलेल्या सबमिशनवर सभागृहाला आपण फक्त समाधानी ठेवणार असू तर खालची जी यंत्रणा आहे, ती आहे त्याच पद्धतीने राहणार आहे.

सभापती महोदय, चेन स्नॅचिंगचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. चेन स्नॅचिंग किंवा महिलेचे मंगळसूत्र चोरीला गेले तर महिला तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये जाण्यास तयार नसतात. कारण, पोलीस अधिकारी प्रथम त्या महिलेला सांगतो की, तुमच्याकडे मंगळसूत्र खरेदी केल्याची पावती आहे काय, मंगळसूत्र किती तोळ्याचे होते ? आमच्या सारख्या सर्व सामान्य लोकांमध्ये एवढी जागरूकता नाही. आमच्याकडे मंगळसूत्र खरेदी केल्याची पावती नाही. या तत्सम

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्री.जयवंतराव जाधव........

गोष्टी आमच्याकडे नाहीत. पोलीस अधिकारी त्या महिलेला सांगतो की, तुम्ही प्रथम मंगळसूत्र खरेदी केल्याची पावती आणावी. तुमचे मंगळसूत्र 5 तोळ्याचे असेल तर आम्ही आमची पोलीस यंत्रणा कामाला लावतो आणि मंगळसूत्र सापडले तर आम्ही ऑफ दी रेकॉर्ड ताबडतोब ते तुम्हाला परत देऊ. नाही तर मंगळसूत्र खरेदी केल्याची पावती आणावी. ती भाबडी महिला म्हणते ठीक आहे. मंगळसूत्र सापडले तर द्यावे. माझ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्ह्याचे, चोरीचे प्रमाण कसे कमी आहे या उदात्त हेतूने संबंधित पोलीस अधिकारी गुन्हे दाखल करुन घेण्यास तयार होत नाहीत. आपण अशा अधिकाऱ्यांना विचारले पाहिजे की, चेन स्नॅचिंगच्या गंभीर गुन्ह्याबाबत आपण काही ट्रायल घेतलेल्या आहेत काय ? त्या ट्रायलच्या माध्यमातून एखादी महिला जर गळ्यात खोटे दागिने घालून रस्त्याने जात असेल तर कोणी चेन स्नॅचिंगसाठी पुढे येते काय ? मुंबई पासून औरंगाबाद पर्यंत आणि नागपूर पासून कोल्हापूर पर्यंत ही साखळी आहे आणि ते सर्व आरोपी एकमेकांना संबंधित आहेत. चोरीचा माल घेणारे देखील आपल्याला सापडत नाहीत आणि चोरही सापडत नाहीत. मग राज्यात कशा पद्धतीने कायदा व सुव्यवस्था राखली जाणार आहे ?

सभापती महोदय, शासनाने क्रांतिकारी निर्णय घेतलेले आहेत. शासनाने गुटखा बंदीचा निर्णय घेतलेला आहे. आमच्या भागात अंबड पोलीस स्टेशन आहे. त्या पोलीस स्टेशनच्या मागील बाजूला किराणा दुकान आहे. तो किराणा दुकानदार गुटख्याचा होलसेल व्यापारी आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गुटखा विकला जातो. नाशिकमध्ये भद्रकाली नावाचा परिसर आहे, त्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटख्याची होलसेल स्वरुपात विक्री होते. 2 रुपये, 5 रुपये किंमतीचा गुटखा 50 रुपयाला विकला जातो. तेथील पोलिसांना ही परिस्थिती कळत नाही काय ? म्हणून वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात की, पोलिसांचा दरारा कोठे गेला ? माझ्याकडे या संदर्भातील काही पोलीस अधिकाऱ्यांची नावे आहेत. मी ती नावे घेत नाही. मला यामध्ये कोणत्याही अधिकाऱ्याला टार्गेट करावयाचे नाही. कारण, पोलीस यंत्रणा बुरसटलेली आहे आणि या यंत्रणेवर

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव........

आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही. पोलीस यंत्रणा का ढासळली ? गुन्हेगारांची अशा प्रकारे मनोवृत्ती का वाढली ? कारण, गुन्ह्यांच्या तपासाचा टक्का घसरलेला आहे आणि तशा बातम्या वर्तमानपत्रात छापून येतात.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव.....

कुठलेही वृत्तपत्र घ्या. सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, इंडियन एक्स्प्रेस, टाईम्स ऑफ इंडिया या सर्वच वृत्तपत्रांनी माहिती दिली आहे की, गुन्हे तपासाची टक्केवारी ढासळली आहे. नाशिक शहरामध्ये आजही 2314 गुन्हयातील आरोपी मोकाट फिरत आहेत. यावर कळस म्हणजे 1320 आरोपी फरार आहेत, वॉण्टेड आहेत. या आरोपींचे पत्ते, नावे बोगस असून जामीनदार देखील बोगस आहेत. पोलीस यंत्रणेकडून आरोपींना सक्षम न्यायालयापुढे हजर केले जाते. त्या आरोपीचे नाव पोलीस यंत्रणेला माहीत असू नये? जामीनदार जो असतो त्याच्याकडून ॲफिडेव्हीट घेतले पाहिजे. जामीनदार कोण आहे हे पोलिसांना माहीत नाही. आरोपी फरार का आहे याची त्यांना माहिती नाही. गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिलेला नाही. गुन्हे तपासाची टक्केवारी घटत चालली असून पोलिसांच्या हप्त्याची टक्केवारी वाढली आहे. ती टक्केवारी कमी झाली पाहिजे.

सभापती महोदय, या राज्यात प्रथमच गृह खात्याला दोन तरूण तडफदार व सक्षम राज्यमंत्री लाभले आहेत. माझी गृह राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी आकस्मिकपणे एखाद्या पोलीस ठाण्याला भेट द्यावी. सर्वसामान्यांना त्या ठिकाणी कशा प्रकारची वागणूक दिली जाते याचा त्यांनी अनुभव घ्यावा. रात्रीच्या वेळी राऊंड घेतला तर पोलीस ठाण्यामध्ये सर्रास अधिकारी दारु प्यायलेले आढळून येतील. असे पोलीस अधिकारी हप्ते घेणार नाहीत तर आणखी काय करणार?

सभापती महोदय, नाशिक जिल्हयात दर 12 वर्षांनी कुंभमेळा भरतो. कुंभमेळ्याच्या निमित्ताने माझी शासनाला कळकळीची विनंती आहे. मध्यंतरीच्या काळात ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी नाशिक जिल्हयामध्ये आपल्या कामगिरीने चांगली प्रतिमा निर्माण केली त्यात एसीपी डॉ.स्वामी, श्री.राजपूत व श्री.गणेश शिंदे यांचे प्रामुख्याने नाव घ्यावे लागेल. जर नियम लावायचा असेल तर तो खालपासून वरच्या पदापर्यंत सर्वांना लागू केला पाहिजे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने एक अधिकारी कायमस्वरुपी ठेवत असाल तर ज्यांनी चोख कामगिरी बजावली आहे अशा डॉ.स्वामी, श्री.राजपूत व श्री.गणेश शिंदे यांना कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पूर्वीच्या ठिकाणी नेमणूक दिली जाईल काय? आज पोलीस खात्यात मोठया प्रमाणात अंतर्गत गटबाजी सुरु आहे. युवराज शांताराम पाटील या पोलीस शिपायाला आतापर्यंत 285 पोलीस रिवार्ड मिळाले आहेत. दोन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव.....

पोलीस अधिका-यांचा वाद झाला आणि त्याचे परिणाम युवराज शांताराम पाटील यांना भोगावे लागत आहेत. साधारणपणे पोलीस शिपायाची बदली जिल्हयाबाहेर होत नाही. परंतु पोलीस महासंचालकांनी विशेष आदेश काढून 285 पोलीस रिवार्ड मिळविलेल्या युवराज शांताराम पाटील या पोलीस शिपायाची हिंगोली येथे बदली केली. एका पोलीस शिपायाला त्याचे मत मांडण्याचा अधिकार नाही का? 285 रिवार्ड दिले गेले ते खोटे होते का असा प्रश्न निर्माण होतो. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, युवराज पाटील या पोलीस शिपायाच्या संदर्भात कोणता निर्णय घेणार आहात, डॉ.स्वामी, सर्वश्री राजपूत व गणेश शिंदे यांना पूर्वीच्या ठिकाणी बदली दिली जाईल काय आणि घोलप नावाचा विद्यार्थी आजपर्यंत बेपत्ता आहे, त्याच्या तपासात काय प्रगती झाली याची माहिती सभागृहाला दिली जाईल काय, ज्या पोलीस अधिकाऱ्याने या प्रकरणाचा तपास करण्यामध्ये ढिसाळपणा केला, कार्यतत्परता दाखविली नाही त्याच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहात? एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीची बैठक नुकतीच संपली आहे, त्या समितीचा अहवाल सभागृहापुढे सादर होईल. मी त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती आणि ती विनंती मान्य करण्यात आली. नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेस माननीय मुख्यमंत्री सोमवारी उत्तर देणार आहेत. त्यामुळे ज्यांना या प्रस्तावावर विचार मांडावयाचे असतील त्यांना मुद्देसूद विचार मांडण्याची संधी देण्यात यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** सर्वांना बोलण्याची संधी मिळेल, मात्र माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळावे. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या कायदा व सुव्यस्थेच्या विषयावरील प्रस्तावासंबंधी माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, शक्ती मिल कंपाऊंडमधील घटना आणि दिल्लीतील निर्भया घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि भारतभर महिलांवरील बलात्कार, विनयभंग त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक छेडछाड याबद्दलचे गुन्हे नोंदविण्याचे प्रमाण 25 ते 30 टक्के वाढले आहे. गेल्या वर्षभरात 3 नवीन कायदे संपूर्ण भारताला लागू झाले. त्यामध्ये बलात्कार विरोधी कायद्यात जो बदल झाला त्यानुसार बलात्काराची व्याख्या व्यापक करण्यात आली. प्रत्यक्षात कायदा जरी बदलला गेला तरी त्याची माहिती जेवढ्या प्रमाणात जनतेला मिळाली पाहिजे तेवढी मिळत नाही. स्थानिक पातळीवरील पोलिसांना त्याची माहिती नाही याची अनेक उदाहरणे मी आपल्यासमोर आणू इच्छिते. बलात्कार विरोधी कायद्यात व्याख्या व्यापक झाल्यानतर लहान मुलींवर अत्याचार होतो त्यामध्ये वेगवेगळया प्रकारे इजा करणे याचा व्यापक व्याख्येमध्ये अंतर्भाव केला आहे. परंतु बलात्कार विरोधी कायद्यात बदल झाल्यामुळे लैंगिक शोषणाच्या संदर्भात जामीन मिळत नाही. या पॉस्को कायद्यामुळे लहान मुलावर अत्याचार झाला, अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला तर जी कलमे लागू होतात त्यामुळे जामीन मिळता कामा नये असे त्यात गृहीत आहे. या दोन्ही कायद्यातील बदलाची मी अनेक उदाहरणे देणार आहे.

सभापती महोदय, कामाच्या ठिकाणी होणारे महिलांचे लैंगिक शोषण, या संदर्भात शासनाने महिलांना तक्रारी नोंदविण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती स्थापन करावी आणि या समितीकडून प्रत्येक जिल्हयामध्ये आढावा घेण्यासाठी स्थानिक तक्रार समिती निर्माण करावी असे आदेश मार्च, 2013 मध्ये देऊनही महाराष्ट्राच्या एकाही जिल्हयामध्ये स्थानिक तक्रार समिती स्थापन झालेली नाही. कायद्यात बदल झाले, परंतु त्याची अंमलबजावणी इतक्या संथगतीने करणार असाल तर न्याय कसा मिळणार? त्याचा फटका महिला, मुली आणि पीडितांना बसतो. माझा हेतू पोलीस विभागाचे सक्षमीकरण व्हावे हा आहे.

नंतर वाय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, मी मुंबई उपनगरातील एक घटना सांगणार आहे. इमारतीच्या लिफ्टमधून जात असताना एका 16-17 वर्षाच्या मुलीची लैगिंक छेडछाड केली. सदर घटना मला समजल्यानंतर मुलीच्या नातेवाईकांच्या मार्फत मी तिच्याशी संपर्क साधला. तिची तक्रार पोलिसांनी नोंदवून घेतली नाही म्हणून तिने आमहत्या करण्याचा प्रयत्न केला. तद्नंतर तिला आम्ही रूग्णालयात समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिली. मला एका गोष्टीचा धक्का बसला की, दोन दिवसाच्या आतच आरोपी मुले जामिनावर सुटलेली होती. संबंधित डीसीपींना मी फोन करून विचारले की, आपण संबंधितांविरूद्ध पॉस्को कायदा लागू केला आहे काय ? त्यांनी मला तपासून सांगतो असे सांगून थोड्या वेळाने फोन करून सांगितले की, मी आता पॉस्को कायदा लावलेला आहे. त्यांना पॉस्को कायदा लावला असेल तर मग जामीन कसा काय मिळाला असे देखील विचारले. मी स्वतः त्या डीसीपींना भेटायला गेले होते. त्यानंतर मी श्री.राकेश मारिया यांना देखील भेटले. या घटनेतील माहिती मी श्री.राकेश मारिया यांच्याकडे पोहोचवली. यात जे काही केले आहे ते संबंधित सिनिअर पी.आय.यांनी केले असे डीसीपींनी सांगितले. यात मुद्दा असा आहे की, सगळे काही सिनिअर पी.आय.यांनी केले तरी त्यावर डीसीपींने देखरेख ठेवली होती की नाही ? या मुलीचे वय 18 वर्षाच्या आतील असल्यामुळे पॉस्को लागू शकतो याची त्यांनी माहिती दिली होती काय ? आजही कित्येक प्रकरणात पॉस्को लावला जात नाही असा आमचा आजवरचा अनुभव आहे.

आता मी दुसरे उदाहरण पुण्यातील श्रीमती अश्विनी वरकड यांचे देणार आहे. या मुलीची छेडछाड केल्यानंतर ती पिंपरी-चिंचवड येथील भोसरी पोलीस ठाण्यामध्ये गेली होती. या प्रकरणाचा नंतर स्वतः माननीय मुख्यमंत्र्यांनी पाठपुरावा केला. या प्रकरणी त्यांनी त्या पोलीस स्टेशनमधील दोन पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन केले आहे. किती मुलींचे जीव गेल्यानंतर आमची संवेदनशीलता वाढणार आहे असा आज प्रश्न निर्माण होत आहे. पॉस्को संबंधी मी मुंबईतील अंधेरी येथील घटनेचे उदाहरण दिलेले आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आता सभागृहात माननीय कामगार मंत्री श्री.प्रकाश महेता उपस्थित आहेत. मी त्यांना विचारू इच्छिते की, आज किती आस्थापनांमध्ये लोकल कंप्लेंट कमिट्या झालेल्या आहेत, याचा त्यांनी आढावा घेतला तर त्यांच्या लक्षात येईल की, बहुतेक ठिकाणी कागदोपत्री या समित्या दाखविण्यात आलेल्या आहेत. या समित्यांमध्ये एनजीओंचा समावेश असावा असे गाईड लाईनमध्ये म्हटलेले आहे. पण कुठेही एनजीओंचा समावेश केलेला नाही. शिक्षण विभागाने जी.आर.निर्गमित केल्यामुळे कॉलेज कॅम्पसमध्ये समित्या गठित झालेल्या आहेत. विशाखा गाईड लाईन्स नुसार कामगार विभागाने देखील निरनिराळ्या आस्थापनांमध्ये लोकल कंप्लेन्ट कमिट्या स्थापन करण्याच्या सूचना दिल्या पाहिजेत. औद्योगिक क्षेत्रातील एका महिलेवर अन्याय झाला तर तिला लेबर कमिशनरकडे जाऊन तक्रार करावी लागते.

मी सुरुवातीला पॉस्को कायद्याचा मुद्दा मांडला आहे. बलात्कार विरोधी कायद्यामध्ये आता बदल झालेला आहे. आज कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छेडछाड केली जात आहे. माझी शासनाला सूचना आहे की, सर्व पोलीस ठाण्यांमध्ये, सर्व ग्रामपंचायतीमध्ये, सर्व महानगरपालिकांमध्ये या कायद्याच्या जागृतीसंबंधात मोठ्या प्रमाणात पावले उचलणे आवश्यक आहे.

माझा दुसऱ्या मुद्दा गुंड लोकांना मिळणाऱ्या रसदीसंबंधात आहे. आज गुंडाना वेगवेगळ्या माध्यमातून पैशाची रसद मिळते. पोलिस अधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेच्या अभावामुळे फार टोकाचे निर्णय घेतले जातात. मी येथे आपल्याला ठाणे जिल्ह्यातील कळवा येथील उदाहरण देणार आहे. दिनांक 30 जुलै 2014 रोजी म्हणजे सहा महिन्यापूर्वी कळवा येथील एका 13 वर्षाच्या मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात याला होता. काल "मी मराठी" या वाहिनीवर संबंधित मुलीची मुलाखत देखील दाखविण्यात आली. आरोपी मो.लियाकत अली ऊर्फ बाबू व त्याच्या साथीदाराने या मुलीवर बलात्कार केला होता. या प्रकरणात देखील आरोपीला लगेच जामीन मिळालेला आहे. त्याने जामीन मिळाल्या बरोबर लगेच त्या मुलीला त्रास देण्यास सुरुवात केली. तक्रार मागे घ्या नाही तर बलात्कार करू अशी तो धमकी देत होता. आपली मुलगी दिसायला चांगली आहे म्हणून तो असे करतो आहे असे आईला वाटले म्हणून आईनेच मुलीचे मुंडन केले. हे फार भयंकर आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

पूर्वीच्या काळात महिला जोहार करायच्या. स्वत:ला जाळून घ्ययच्या. तशी परिस्थिती आपण येऊ देणार आहे काय ? या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत याचा आम्हाला आनंद आहे. आता सभागृहात माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. या मुलीला पुन्हा धमक्या आल्यानंतर कळवा पोलीस ठाण्याने अदखलपात्र गुन्हा का दाखल केला ? त्यांनी त्यावेळेलाच प्रतिबंधात्मक कारवाई का केली नाही, याबद्दल हे अधिवेशन संपण्याच्या आधी किंवा तत्पूर्वी कारवाई झाली पाहिजे. डीसीपींनी सूचना करून सुद्धा कळवा पोलिसांनी त्याची देखील घेतली नाही.

लोणावळा येथील बलात्कार प्रकरणात गृह राज्यमंत्री प्रा.राम शिंदे यांनी स्वत: लक्ष घालून बरीच माहिती घेतली आहे. सात वर्षाची मुलगी दिसेनाशी झाली, नातेवाईकांना सापडेनाशी झाली. त्यावेळी तिचा हॉटेलमध्ये शोधच घेतला गेला नाही याचे वाईट वाटते. लोकांनी उद्रेक केला तो बरोबर नाही. ते एक सारखे सांगत होते की, हॉटेलमध्ये चेक करावे. मला तेथील लोकांनी सांगितले की, सोलर एनर्जी युनिटच्या मागे तिचा मृतदेह सापडला. मुलीच्या आईवडिलांचे म्हणणे होते की, ती संध्याकाळी 7.00 नंतर दिसेनाशी झाली. प्रत्येक रूममध्ये जाऊन 3-4 तासात तिचा शोध घेतला असता तर एखादे वेळेस ती जिवंत अवस्थेत सापडली असती. त्या मुलीची संपूर्ण अन्ननलिका तुटलेली होती. एखादी काकडी तोडावी तसा तिचा गळा कापून टाकला होता. काही लोक म्हणत होते की, त्या मुलीला नीट वाचता येत नव्हते. तिच्या वडिलांनी सांगितले की, ती शाळेत जात होती. तिला दिसत नव्हते, ती मतिमंद होती, अशा अफवा पोलिसांपेक्षा आरोपीचे हितचिंतक पसरवत होते असते वाटते. अशाने इन्व्हेस्टीगेशनमध्ये कुठलेही सहकार्य मिळाले नसते. ती मुलगी मिळाली असती तर तो पर्यंत काय वातावरण झाले असते. ती मतिमंद होती, तिला काही दिसत नव्हते. त्यामुळे ती आरोपी कसे काय ओळखणार? लोणावळा केसच्या प्रकरणात स्थानिक पोलीस स्टेशनने त्या हॉटेलमधील सगळ्या रूम्स का तपासल्या नाहीत ? आज शासनात कोण आहे हा प्रश्न नाही. प्रत्येक ठिकाणी आपण असा बेमूर्वतखोरपणा केला तर ते चुकीचे आहे. दिवसेंदिवस अल्पवयीन मुलींना त्रास देण्याची प्रवृत्ती वाढते आहे. एवढेच नव्हे तर त्यांना धमकावून बोलू न देण्याचे देखील प्रकार घडत आहेत. शेवटी मुलीचे चारित्र्य हनन करायचे ही एक अपप्रवृत्ती आहे. या प्रकरणाचे पोलिसांनी इन्व्हेस्टीगेशन का केलेले नाही ? असा माझा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आता जी घटना सांगणार आहे ती अगदी वेगळी आहे. हे प्रकरण आम्ही केंद्र सरकारकडे नेले आहे. श्रीमती सुरेखा गावढे नावाची एक महिला आहे. तिने स्वत: अर्ज दिलेला असल्यामुळे मला नाइलाजाने तिचा उल्लेख करावा लागत आहे. ती एका सीआरपीएफ जवानाची पत्नी आहे. ती सीआरपीएफ कॅम्पस, पुणे येथे राहते. तिच्या घरामध्ये घुसून तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या महिलेने पोलीस उप महानिरीक्षक (सीआरपीएफ), तळेगाव यांच्याकडे तक्रार केली. हे कुटुंब पोलिसांचेच आहे. या महिलेचा नवरा गडचिरोली येथे आहे. त्या महिलने तक्रार केल्यानंतर मी 24 तासाच्या आत कारवाई करतो असे सांगितले. पण तू पोलीस स्टेशनला जाऊ नको असे त्यांनी सांगितले. मार्शल लॉ अशा प्रकरणात लागत नाही. ही घटना 3 जुलै रोजी घडली व त्या महिलेने तळेगाव दाभाडे येथे तक्रार केली. पोलिसांनी आरोपींना अटक न करता कारवाईत चालढकल केली. एवढेच नव्हे तर संबंधिताला अटकपूर्व जामीन देखील मिळाला. राजकारणामध्ये असलेल्या व्यक्तीला अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी काय करावे लागते हे सर्वांना माहीत आहे. इथे मात्र या आरोपीला अटकपूर्व जामीन मिळाला आहे. तक्रार केल्यामुळे त्याने तिला पुन्हा मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिने आय.जी.सीआरपीएफ मुंबई यांना भेटण्याचा प्रयत्न केला. तिला कार्यालयात भेट मिळाली नाही. उलट सीआरपीएफ जवान श्री.राजेश येवले आणि श्री.दिलीप सिंग यांनी सुरेखाला ऑफिसमध्ये बोलावून डीआयजी परमहंस सरांच्या सांगण्यावरून आम्ही तुला पाच लाख रूपये देतो पण तू तक्रार मागे घे, असे सांगितले. आमचे खासदार श्री.शिवाजीराव आढळराव यांनी स्वत: श्री.राजनाथ सिंह यांची भेट घेतली. तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री.बाबर यात चालढकल करीत आहेत. त्यांनी आरोपीला अटकपूर्व जामीन मिळवून देण्यामध्ये संपूर्ण षढयंत्र रचलेले आहे. तेव्हा श्री.बाबर यांच्याविरूद्ध निलंबनाची कारवाई करावी अशी मी मागणी करते. आता कहर म्हणजे सीआरपीएफचे क्वॉर्टर सोडून देण्याची नोटीस तिला पाठविण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे.......

अशा पध्दतीची नोटीस पाठविली तेव्हा आम्ही या महिलेला कोर्टात जाण्यास सांगितले. या केसमध्ये आता कोर्टाने स्टे दिलेला आहे. लोकांनी न्याय कसा मागावयाचा हा प्रश्न आता जनतेसमोर उभा झालेला आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात मी काही उपाय सुचवणार आहे. बलात्कार विरोधी कायद्यानुसार एक वर्षाच्या आत सगळया केसेस निकाली निघाल्या पाहिजेत. या केसेसचा निकाल एक वर्षाच्या आत लागण्याच्या दृष्टिकोनातून संबंधित पोलीस स्टेशनने चार्जशिट वेळेत दाखल केले आहे की, नाही तसेच कोर्टात त्यांना सरकारी वकील मिळाला आहे की, नाही याचा पाठपुरावा करावयास पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा जो संवेदनशीलतेचा मुद्दा आहे त्यामध्ये मला असे वाटते की, महिला स्त्री पुरुष समानतेमध्ये आम्ही पोलिसांबरोबर प्रशिक्षणाचे काम केलेले असून यामध्ये काही सामाजिक संस्था, टाटा इन्स्टिटयूट, स्त्री आधार संस्थांनी काम केलेले आहे. पोलिसांशी बोलून यासंदर्भात आम्ही काही गाईडलाईन्स तयार केलेल्या आहेत. समजा या ठिकाणी मी बोलते आहे, आपण सर्वजण माझ्याकडे बघता परंतु तुमच्यापैकी सर्वांनी ठरवले की, माझ्याकडे न बघता घडयाळाकडे बघावयाचेठरविले तर बोलणाऱ्या माणसाला बोलावे तरी वाटेल काय ? जेव्हा महिला पोलीस स्टेशनमध्ये कौटुंबिक छळासंदर्भात, लैंगिक छळासंदर्भात तक्रार घेऊन जातात तेव्हा या महिलांना 5-5,6-6 तास पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले जाते. ससून हॉस्पिटलमध्ये मी जेव्हा एका छोटया मुलीला भेटले तेव्हा त्या ठिकाणी मुलींला व तिच्या आईला सायंकाळच्या 4 वाजेपर्यंत चहापाणी सुध्दा दिले गेले नसल्याचे आढळून आले. या पीडित मुली उपाशी बसलेल्या असतात. यासंदर्भात मी आरोग्य विभागाला विनंती केली होती की, पेशंटला जेवण करणे शक्य असेल तर ते त्यांना दिले गेले पाहिजे. परंतु ते सांगतात की, तपासण्या व्हावयाच्या शिल्लक आहेत. मेडिकल प्रोटोकॉल बद्दल सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांनी नागपूरच्या अधिवेशनात घोषणा केली होती की, मेडिकल प्रोटोकॉलनुसार मुलींची तपासणी केली जाईल. परंतु पुण्यामधील ससून,मुंबईमधील केईएम हॉस्पिटल, भगवती हॉस्पिटल अशा प्रकारची काही तुरळक हॉस्पिटल्स सोडली तर कोठेही मेडिकल प्रोटोकॉलनुसार मुलींची तपासणी होत नाही. मेडिकल प्रोटोकॉल तपासणी म्हणजे त्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे.......

मुलीला पुन्हा तेच तेच प्रश्न विचारु नये. एका मुलीला तर 20 वेळा बलात्कार कसा झाला हा प्रश्न विचारला गेला होता. त्यामुळे मेडिकल प्रोटोकॉलची अंमलबजावणी होण्यासाठी मंत्री महोदयांनी काटेकोर सूचना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी महिला चळवळीमध्ये बऱ्याच वर्षापासून काम करते याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. ज्यावेळेस पीडित महिलांच्या संदर्भात आम्ही महिला कर्मचाऱ्यांची मागणी केली होती त्यावेळेस आम्ही महिला पोलीस पीडित महिलांशी संवेदनशीलतेने बोलतील अशी अपेक्षा धरली होती परंतु आमची अपेक्षा फोल ठरली. सर्व महिला पोलीस त्या संवेदनशीलतेमध्ये बसत नाहीत हे मला या ठिकाणी नाइलाजाने सांगावे लागत आहे. काही महिला संवेदनशिलतेने चांगले काम करतात परंतु काही महिला वर्चस्ववादी भावनांच्या हस्तक झालेल्या असून त्या अधिक क्रूरतेने, अधिक वेगळया पध्दतीने महिलांचे दमन करतात असे आम्ही काही उदाहरणामध्ये पाहिले आहे. त्यामुळे मुलींशी अधिक संवेदनशीलतेने वागण्याचे जे प्रशिक्षण आहे ते महिलांना आणि कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांना जाणीवपूर्वक देणे गरजेचे आहे असे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मी दौंड पोलीस स्टेशनमधील तसेच नवी मुंबईतील इन्सपेक्टरची कार्यपध्दती पाहिल्या आहेत. एफआयआर लिहून घेतल्यानंतर त्यांनी वरिष्ठांना व्हॉट्स ॲपवरुन तपास पाठविला होता. यामध्ये फायदा असा होतो की, एफआरआय जो लिहिला आहे त्यामध्ये अजून काही लिहायचे शिल्लक राहिले आहे काय यासाठी वरिष्ठ अधिकारी दोन तासामध्ये तो मेल तपासून त्यासंदर्भात गाईडन्स देतात. एफआयआरमध्ये नंतर ज्या त्रुटी राहतात, त्या त्रुटी अशा पध्दतीमध्ये राहत नाहीत. खरे म्हणजे एफआयआर नोंदवितांनाच कायदेशीर सल्ला किंवा वरिष्ठांचा सल्ला मिळाला तर नंतर एफआयआरमध्ये त्रुटी राहात नाहीत.

सभापती महोदय, बलात्काराच्या गुन्हयांमध्ये आरोपी पकडला गेल्यानंतर प्रत्येक केसमध्ये डीएनए टेस्ट केली जाईल असा निर्णय घेतला तर आरोपी पकडल्यावर चार्जशिट दाखल होण्यासाठी 3 महिने थांबण्याची गरज राहात नाही. डीएनए टेस्ट्मुळे एक महिन्यात देखील

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे.......

चार्जशिट दाखल करता येऊ शकते. ज्यावेळेस कोर्टात केस उभी राहते त्यावेळेस जर पोलीस इन्सपेक्टरची बदली झाली असेल तर बऱ्याचशा वेळेस तो इन्स्पेक्टर दुसऱ्या जिल्हयातून येतो आणि त्या मुलीला त्यावेळेला घडलेली घटना आणि आज आपली काय क्रॉस चेक घेतली जाणार आहे याची माहिती नसते. त्यामुळे आम्ही इन्व्हेस्टीगेशन करताना बलात्कार पीडित महिलांना तसेच इन्स्पेक्टर यांना सल्ला देतो की, जी घटना घडलेली असते त्यासंदर्भात एफआयआरच्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी सविस्तर माहिती लिहून ठेवा. जेणेकरुन क्रॉसच्या वेळेस त्याची उत्तरे तुम्हाला व्यवस्थित देता येऊ शकतील.

सभापती महोदय, महिला स्त्री पुरुष समानतेच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय गृह राज्यमत्र्यांना विनंती करते की, पुण्यातील अधिकारी श्री. प्रकाश मुखत्याळ, मनोज पाटील, निवृत्त अधिकारी अशोक देवरे या लोकांनी खूप चांगले काम केले असून ते अजूनही खूप चांगले काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या बरोबर बैठक घेतली तर महिला स्त्री पुरुष समानतेच्या संदर्भात आम्ही आपल्याला ठोस अशा सूचना करु शकू.

सभापती महोदय, धर्माधिकारी समितीच्या संदर्भात नागपूरच्या गेल्या हिवाळी अधिवेशनात आम्हाला असे उत्तर देण्यात आले होते की, 140 पैकी 118 सूचना स्वीकारल्या आहेत. त्यामुळे उरलेल्या 22 सूचनांचे काय झाले ? तसेच कृती अहवालाच्या संदर्भात शासनाने जे सांगितले होते त्याबद्दल शासनाकडून आम्हाला सविस्तर उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, ज्या केसेसमध्ये गुन्हेगारास शिक्षा होते अशा केसेसमध्ये सहा महिन्याच्या आत फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशा प्रकारचे इन्व्हेस्टीगेशन केलेले नवी मुंबईतील पोलीस अधिकारी श्री. भूम यांनी सहा महिन्यात इन्व्हेस्टीगेशन करुन शिक्षा होईल अशा पध्दतीने संपूर्ण पाठपुरावा केला होता. चांगले काम करणारे सुध्दा पोलीस अधिकारी महाराष्ट्रात आहेत व त्यांची आशा पल्लवित करुन चांगली यंत्रणा उभी करण्यासाठी या ठिकाणी सुरु असलेल्या कायदा व सुरक्षेच्या संदर्भातील चर्चेचा उपयोग व्हावा अशी विनंती आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, तळेगाव दाभाडे येथील श्री. बाबर आणि कळवा पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर यांच्यावर निलंबनाची कडक कारवाई झाली पाहिजे अशा मागण्या करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय महाराष्ट्र, जय भीम.

----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गोपीकिसन बाजोरिया)**

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्य वतीने मांडण्यात आलेल्या अतिशय महत्वाच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर संपूर्ण सभागृहाच्या भावना सारख्याच आहेत तरी सुध्दा मी स्व.डॉ. दाभोळकर तसेच कॉ. पानसरे यांचा मी परत परत उल्लेख करणार नाही. हा उल्लेख करुन करुन आम्हाला लाज वाटावयास लागली परंतु तरी सुध्दा या खुन्यांचा अजूनही तपास होत नाही, हे खऱ्या अर्थाने हे या राज्याचे दुर्दैव आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थितीच्या संदर्भात पूर्वी लोक म्हणत असे की, कायद्याचे राज्य नाही तर काय द्यायचे आणि काय घ्यायचे असे हे राज्य आहे. आताच्या घडीला संपूर्ण महाराष्ट्राचीच परिस्थिती अशी आहे. या ठिकाणी मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. माझी विनंती आहे की, राज्य बदलले परंतु माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्या कार्यकर्त्यांना आपले राज्य आले, आपण सत्ताधारी आहोत असे वाटत नाही.

सभापती महोदय, एक दीड महिन्यापूर्वी नंदूरबार येथे दंगल झाली होती. त्यावेळेस मंत्री महोदय नंदूरबार येथे आले नाहीत. नंदूरबारची दंगल का झाली याच्या खोलात आपल्याला जावे लागणार आहे. त्यावेळेस नंदूरबार शहरामध्ये मोबाईलमध्ये व्हॉट्स ॲप वरुन नंदूरबार शहर बंद करण्याची हाक दिली गेली. गोहत्या बंदीचा कायदा हा सर्वात जुना असून त्याचे स्वागत या देशाने केलेले आहे. परंतु गोवंश हत्याबंदीचा कायदा मंजूर झालेला नसताना सुध्दा त्याची अंमलबजावणी करा किंवा तशा प्रकारचा कायदा करा यासाठी नंदूरबार नगरपालिकेच्या समोर विश्व हिंदू परिषदेचे लोक, बजरंग दलाचे लोक तसेच मध्य प्रदेश व युपीमधून साधू-संत आले व ते नंदूरबार नगरपालिकेच्या समोर बसले. त्यांनी त्या ठिकाणी दोन दिवस आंदोलन केले.त्यावेळेस पोलीस प्रशासनाने त्यांना विनंती केली की, हा प्रश्न येथील नाही. गोवंश हत्याबंदीचे कायद्यात रुपांतर होत आहे. या कायद्याला जेव्हा मंजुरी मिळेल त्यानंतरच यातून काही तरी मार्ग निघेल आणि शेवटी जे व्हावयाचे ते घडले गेले व नंदूरबार शहराची शांतता भंग झाली. आमच्या पोलीस अधीक्षकांवर आज तरी कोणताही भ्रष्टाचाराचा आरोप नाही, हे मी या सभागृहात मान्य करेल.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

एक प्रामाणिक अधिकारी असेल तर त्यांनी आपल्या खालील अधिकाऱ्यांना देखील त्या प्रमाणे वागायला लावणे ही त्या अधिकाऱ्याची जबाबदारी असते. पूर्वी गल्लोगल्लीमध्ये पिठाची गिरणी दिसत होती, त्याप्रमाणे आज नंदूरबार शहरामध्ये गल्लोगल्ली पत्त्यांचे क्लब दिसत आहेत. नंदूरबार सारख्या छोट्या शहरामध्ये अशी परिस्थिती असेल तर पोलिसांचा गुन्हेगारांवर काय वचक राहणार आहे ?

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, नंदूरबार जिल्हा गुजरात आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर आहे. आपण राज्यामध्ये गुटख्यावर बंदी आणली. परंतु आपण गुटखा बंदी करुन पोलिसांची सोय केली आहे या मताचा मी आहे. कारण आपण त्यांना आणखी एक कुरण उपलब्ध करुन दिलेले आहे. गुटखेवाल्याला पकडून त्याच्याकडून हप्ते बांधून घ्यायचे. गुजरात राज्यामध्ये गुटख्यावर बंदी नाही. तेथून आपल्या राज्यात गुटखा आणला जातो. नंदूरबार जिल्ह्यापासून 14 कि.मी. अंतरावर गुजरात राज्यातील पहिला तालुका आहे. नंदूरबार जिल्ह्यात गुजरात राज्यातून गुटखा येतो आणि तेथून तो इतर ठिकाणी जातो. राज्याच्या इतर भागातून नंदूरबार जिल्ह्यात दारु येते आणि तेथून ती गुजरात राज्यामध्ये जाते. गुजरात राज्यामध्ये दारु नेण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा गोष्टी होत असतात, त्यावेळी पोलीस प्रशासन कणखर असले पाहिजे.

सभापती महोदय, सर्वसामान्य माणसांच्या घरी चोरी झाली तर त्याचा तपाससुद्धा लागत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे एखादा गुन्हा झाला तर त्याचा गुन्हा दाखल करण्यात येत नाही आणि गुन्हा दाखल झाला तर आरोपीला चहा पाजून आणि तक्रारदाराला चहा पाजून त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. ज्याच्या घरी चोरी होते त्याच्या आयुष्याची ती पुंजी असते, याचा विचार केला जात नाही.

सभापती महोदय, जसे आपले डी.पी.चे पथक असते त्याप्रमाणे घरफोडीवाल्याचे एक पथक आहे. कोण किती दिवस गावी गेला आहे, कोण केव्हा येणार याची माहिती घेऊन घरफोडी करण्यात येते. घरफोडीमध्ये संपूर्ण घरातील ऐवज लुटला जातो आणि अशा गुन्ह्यांचा तपास लागत नाही, ही अतिशय अशी वाईट गोष्ट आहे. आपण गुन्हेगारांवर कठोर कारवाई केल्याशिवाय अशाप्रकारांना आळा बसणार नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

सभापती महोदय, नंदूरबार जिल्ह्यामध्ये सुरु असलेले अवैध धंदे तत्काळ बंद केले पाहिजेत. मी मंत्री महोदयांना नंदूरबार जिल्ह्यात येण्याचे आमंत्रण देतो. त्यांनी नंदूरबार जिल्ह्याची पाहणी करावी. पोलिसांचा गुंडावर वचक असला पाहिजे परंतु पोलीस गुंडासोबत फिरत असतील तर एक चुकीचा संदेश जनतेमध्ये जातो.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, राज्यकर्ते बदलले तरी अधिकारी तेच असतात. परंतु माझे असे म्हणणे आहे की, पोलिसांनी गुंडावर एक प्रकारचा धाक निर्माण केला पाहिजे.

सभापती महोदय, दिल्लीमध्ये निर्भया प्रकरण घडले. या प्रकरणामुळे दिल्लीत सत्ताबदल झाला हे आपणासही मान्य करावे लागेल. आपण वर्तमानपत्र उघडले की, रोज एक निर्भया प्रकरण वाचावयास मिळते. रोज अमुक ठिकाणी लहान मुलीचा विनयभंग झालेला आहे, अमुक एक महिलेवर बलात्कार झाला अशाप्रकारच्या बातम्या वाचावयास मिळतात आणि हे अतिशय वाईट आहे.

सभापती महोदय, नंदूरबार जिल्हा परिषदेच्या आश्रमशाळेमधील 13 वर्षाची मुलगी गरोदर राहिली. त्या प्रकरणात अजून गुन्हा दाखल झालेला नाही. फक्त मुख्याध्यपकांना निलंबित केलेले आहे. या प्रकरणी मुख्याध्यापक आणि रेक्टरची जबाबदारी होती. त्या मुलीचे आईवडील तिला घेऊन घरी गेले. असे चित्र सर्व जिल्ह्यांमध्ये आहे. आज राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती राहिलेली नाही. आपण सत्तेवर आलात म्हणून अशा प्रकरणात वाढ झाली असे मी म्हणणार नाही.

सभापती महोदय, आज सर्वात जास्त चोऱ्या रेल्वेमध्ये होतात. चोरांनी दोन-चार स्टेशनमधील अंतर वाटून घेतलेले आहे. कोणत्या भागात कोणी चोरी करावी हे ठरलेले आहे. कोण चोर आहेत याची पोलिसांना देखील माहिती असते. माझे दोन मोबाईल चोरीला गेले होते. त्यांनी थोडा वेळ नाटक केले आणि भुसावळवरुन माझे मोबाईल परत आणून दिले. रेल्वे प्रवासात बॅगा चोरीला गेल्या तर त्या सापडत नाहीत. आपण अधिकाऱ्यांना दम दिला तरच चोरीचा तपास लागतो, अशी वाईट परिस्थिती आहे.माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्याकडून आमच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

फार अपेक्षा आहेत. आम्ही रोज आपणास टी.व्ही.वर पाहत असतो. राज्याला एवढा रुबाबदार राज्यमंत्री मिळालेला आहे, त्याचा महाराष्ट्राला उपयोग व्हायला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, वित्त मंत्री महोदयांनी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दारु बंदी केली आहे. ज्या जिल्ह्यामध्ये दारु बंदी होते त्या जिल्ह्यात जास्त दारु विकली जाते. गुजरात राज्यात दारु बंदी असली तरी सर्वात जास्त दारु गुजरात राज्यात विकली जाते. नंदूरबार जिल्ह्यातून धान्याच्या पोत्यातून दारु नेली जाते. प्रथम दारु पाठवा नंतर धान्य पाठवा असे गुजरातमधील व्यापारी सांगतात. अश्‍ा प्रकारांना आळा घातला पाहिजे. समाजासमोर असे अत्यंत वाईट चित्र निर्माण झालेले आहे. आपणास हे चित्र बदलायचे असेल तर त्यामध्ये पोलीस प्रशासनाची भूमिका महत्वाची आहे. आमच्या नंदूरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक चांगले असले तरी त्या जिल्ह्याची परिस्थिती वाईट आहे.

सभापती महोदय, नंदूरबार जिल्ह्यामध्ये दंगल झाली होती त्यावेळी आम्ही लोकप्रतिनिधी रस्त्यावर उतरलो म्हणून ती दंगल लवकर शांत झाली. भविष्यात असे प्रकार वाढायला नकोत म्हणून लोकप्रतिनिधींनी देखील काळजी घेणे आता काळाजी गरज आहे. भविष्यात गुंडावर कायद्याचा धाक राहील, पोलिसांचा वचक राहील अशाप्रकारची कारवाई केली पाहिजे आणि कायद्यामुळे महाराष्ट्र एकसंघ राहू शकतो त्यासाठी हे सरकार प्रयत्नशील राहील अशी अपेक्षा व्यक्त करुन एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये विरोधी पक्षाचे नियम 260 अन्वयेचे तीन प्रस्ताव दाखविण्यात आलेले आहेत. त्यातील पहिला प्रस्ताव कायदा व सुव्यवस्थे संदर्भातील आहे. आम्ही हा प्रस्ताव पहिल्या आठवड्यात दिला होता. दुसरा प्रस्ताव कामगारांच्या संदर्भातील आहे आणि या ठिकाणी कामगार मंत्री उपस्थित आहेत. कायदा आणि सुव्यवस्थ्ेवरील चर्चेस माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी आम्ही मागणी केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी ती मागणी मान्य केली असून ते त्यावर सोमवारी उत्तर देतील. कायदा आणि सुव्यवस्थेवरील प्रस्तावावर अजूनही काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

माझी आपणास विनंती आहे की, आपण कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भातील प्रस्तावावर आज चर्चा सुरु करावी. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील प्रस्तावावरील भाषण सुरु करुन ऑन लेग राहतील. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व अन्य सन्माननीय सदस्यांना देखील बोलायचे आहे. आपण त्याप्रमाणे नियोजन करावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.गोपीकिसन बाजोरिया )**: ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी आता भाषणास सुरुवात करावी.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नावर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. आपण मला माझे मत मांडण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हा कोणत्याही पक्षाचा वा गटाचा नाही. हा संपूर्ण समाज मनाचा प्रश्न आहे. तेव्हा या प्रश्नावर मतभेद होण्याचे काही कारण नाही. फक्त या प्रश्नाला राजकीय स्वरुप देण्यात येऊ नये.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये पहिले वाक्य आहे की, "मागील चार महिन्यात ...." अशा वाक्यामुळे प्रस्तावाची गंभीरता बाधित होत आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या प्रस्तावावर बोलताना किंवा आपली मते मांडताना कोणताही पक्षांतरवाद आणण्याचा प्रयत्न करु नये.

सभापती महोदय, कायदा आणि सुव्यवस्था ही आर्थिक व्यवस्था आणि शैक्षणिक व्यवस्थेवर अवलंबून असते. आपल्या देशातील आणि राज्यातील शैक्षणिक धोरण व्यवस्था बदलल्या शिवाय आपण कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाला न्याय देऊ शकणार नाही. सामाजिक मन चांगले बनले पाहिजे. सामाजिक मानसिकता चांगली बनली पाहिजे. चांगला माणूस घडला पाहिजे. मनात वाईट गोष्टी करण्याचे विचार आल्यास त्यास रोख लावण्याची मानसिकता असली पाहिजे. तेव्हा माझी पहिली मागणी आहे की, आर्थिक आणि शैक्षणिक धोरणात मूलभूत बदल करण्याची गरज आहे. आपली पोलीस यंत्रणा ब्रिटिशकालीन आहे. आपल्या देशातील पोलीस यंत्रणा, सर्व प्रशासकीय यंत्रणा स्वतंत्र भारतातील जनतेच्या उद्देशासाठी निर्माण करण्यात आलेली नाही,

यानंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नागो पुंडलिक गाणार ....

आपण ब्रिटिशकालीन व्यवस्थाच, प्रशासकीय यंत्रणाच वापरत आहोत. आपणाला यामध्ये मूलभूत परिवर्तन करण्याची गरज आहे. पोलीस स्टेशनचा धाक, पोलीस यंत्रणेचा धाक प्रामाणिक माणसाला, सज्जन माणसाला आहे, बदमाशांना नाही. ज्यांना धाक वाटला पाहिजे त्यांना तो वाटत नाही आणि ज्यांनी पोलीस यंत्रणेला सहयोग करण्याची गरज आहे त्यांना मात्र त्याची भीती वाटत आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणा या बदमाशांवर आपला वचक बसवू शकत नाही. पोलीस यंत्रणेमध्ये असलेला भ्रष्टाचार, पोलीस यंत्रणेवर असलेले राजकीय प्रभाव यामुळे सुध्दा पोलीस यंत्रणेला योग्य प्रकारे काम करता येत नाही. पोलीस यंत्रणेकडे असलेली यंत्रसामुग्री जुन्या पध्दतीची आहे. आजच्या काळात अद्ययावत यंत्रसामुग्री त्यांना देण्यात आलेली नाही, ती त्यांना दिली गेली पाहिजे आणि पोलीस यंत्रणेमध्ये मूलभूत बदल, परिवर्तन केले गेले पाहिजे. बदमाशी करणारा गुंड पकडला गेला पाहिजे. फक्त तो पकडला जाऊन चालणार नाही तर त्याला योग्य ती कायदेशीर तरतुदीनुसार शिक्षा झाली पाहिजे. शिक्षेचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत. पोलीस यंत्रणेला आरोपपत्र कसे तयार करावे हे सुध्दा योग्यरितीने माहीत नाही किंवा समजत नाही. 90 टक्के प्रकरणांत आरोपपत्र योग्य नाही या आधारे आरोपी मोकळे सुटतात. आरोपपत्र योग्य नसल्याचे न्यायालय सांगते. आरोपी न्यायालयात गेल्यावर आरोपपत्र व्यवस्थितरित्या न केल्यामुळे सुटतो. ज्या आरोपपत्राच्या आधारे शिक्षा दिली जाऊ शकते ते आरोपपत्रच योग्य नसते. शासनाचे वकील हे सुध्दा योग्यप्रकारे बाजू मांडत नाहीत. उलट आरोपीच्या वकिलांसोबत हात मिळवणी करून त्या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करतात. आरोपीला मोकळे सोडण्यासाठी ते लाच घेतात. आपल्याला या सर्व यंत्रणेचा विचार करावा लागेल. माझी विनंती राहील की, धर्माधिकारी समितीने केलेल्या शिफारशी अंमलात आणल्या पाहिजेत. जनसंख्येच्या प्रमाणात पोलीस यंत्रणेमध्ये कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली पाहिजे. पोलीस यंत्रणेला योग्य यंत्रसामुग्री पुरविली पाहिजे. पोलीस स्टेशनमधील वातावरण चांगल्या, प्रामाणिक माणसाला सहयोग करण्यासारखे तयार केले गेले पाहिजे. शैक्षणिक व आर्थिक व्यवस्थेमध्ये मूलभूत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नागो पुंडलिक गाणार ....

परिवर्तन केले पाहिजे. जेणेकरून बदमाश असलेले सरळ झाले पाहिजेत किंवा जेलमध्ये गेले पाहिजे म्हणजे दुसरा नवीन कोणी बदमाश तयार होणार नाही आणि झाला तर समाज त्याचा ठावठिकाणा लावल्याशिवाय राहणार नाही. आपण अशी शैक्षणिक व्यवस्था निर्माण केली पाहिजे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे. महिलांवर, लहान मुलींवर इतक्या मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत याची मला खूप चीड आहे. देशात दरवर्षी 25 लाखांच्या वर स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत. दरवर्षी 3 लाख मुली मरण पावत आहेत. लहान मुलींवर अत्याचार, बलात्कार केला जात आहे, त्यांचा विनयभंग होत आहे. आपला समाज खरोखर सुसंस्कृत झाला आहे का, आपण याला सुसंस्कृतपणा आहे असे म्हणू शकतो का, स्त्रियांवरील वाढत्या अत्याचारांची जबाबदारी फक्त स्त्रियांचीच आहे का की पुरूषांची सुध्दा आहे ? संपूर्ण समाजाने या प्रश्नावर एकत्र येऊन काम केले तर निश्चितच यामध्ये काही फरक पडेल नाही तर हा प्रश्न स्त्रियांपुरता मर्यादित आहे असे समजून आपण फक्त तो स्त्रियांचा प्रश्न आहे असे म्हणत राहिलो तर कोणताही बदल घडणार नाही. मला वाटते की, आपण या संदर्भात सामूहिक प्रयत्न करताना दिसत नसू तर हे अत्याचार असेच वाढत राहणार आहेत.

सभापती महोदय, मुंबईच्या लोकल ट्रेन एकमेकांना पास होताना लेडीजचा डबा पाहिल्यावर दुसऱ्या डब्यातून शिटट्या मारणे किंवा वाईट इशारे करणे असे प्रकार होत असतात. डब्यातील सर्वच पुरूष वाईट नसतात. परंतु 2-3 अप्प्रवृत्तीच्या मवाली मुलांना डब्यातील लोकांनी वेळीच आवर घातला आणि सांगितले की, तुम्ही असे करू नका, आम्ही खपवून घेणार नाही. डब्यातील पुरूषांनी असे धैर्य दाखविले तर त्या मुलांचीही हिंमत होणार नाही. सार्वजनिक ठिकाणी मुली जातात तेव्हा असेच घडते.

महोदय, परवाच एक घटना घडली. एका मुलीच्या पाठीमागे एक गर्दुला लागला. फलाटावरून ती त्याला चुकवत गेली तरी तो तिचा पिच्छा सोडण्यास तयार नव्हता. त्यावेळी तिने त्याच्या केसाला धरून फलाटावरून पोलीस ठाण्यापर्यंत नेले. त्यावेळी लोकांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली, तिला मदत कोणीही केली नाही. मला याचेच नवल वाटते. नागपूरला सुध्दा एका व्यापाऱ्यावर हल्ला झाला. दुकानात अनेक ग्राहक होते, एका मुलाने चाकू काढला. ती मुले भक्कम नव्हती. माझ्यासारख्या बाईने सुध्दा त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता. हल्ली लोकांना काय

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

झाले आहे माहीत नाही. लोक फक्त बध्याची भूमिका घेतात, काहीच करीत नाहीत आपल्याला लागेल, आपला जीव वाचवायचा, आपल्याला कोणी तरी काही करेल असे लोकांना वाटते. आज इतका भित्रेपणा पुरूषांमध्ये आला आहे. समाजातील एखादी स्त्री परिचित, नातेवाईक नाही म्हणून तिच्या मदतीला धाऊन जायचे नाही, अशी वृत्ती समाजात वाढत आहे. माणसांमध्ये पशुची वृत्ती वाढली आहे आणि तो त्या वृत्तीकडे दुर्लक्ष करीत आहे, ही सर्वात खेदाची गोष्ट आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे. कायदे खूप कडक झाले आहेत. दिल्लीच्या निर्भया प्रकरणानंतर वर्मा कमिशनकडे 80 हजार लोकांची सजेशन्स आली आणि त्यानंतर कायद्यामध्ये बदल झाला. 30 दिवसांच्या आत कायदे कडक झाले. परंतु कायदे व न्यायालय या घटना घडल्यानंतरच्या गोष्टी आहेत. अशा घटना घडूच नये म्हणून समाजातील लोकांनी एकत्र आले पाहिजे, लहान मुला-मुलींना संरक्षण दिले पाहिजे, स्त्रियांना संरक्षण दिले पाहिजे. परंतु तसे आपल्याला दिसत नाही.

सभापती महोदय, दुसरी एक खेदाची गोष्ट आहे. समाजात लहान मुलांवर संस्कार होत असतात. परंतु आज आपण पाहतो की, शाळा, कॉलेजात अभ्यास करण्याच्या दिवसांत मुलांकडून मोबाईलवर, टीव्हीवर काही वाईट पाहिले जाते आणि त्याची त्यांना सवय लागते आणि त्यातून विकृती निर्माण होते. त्या विकृतीचे बळी लहान मुले-मुली पडत आहेत. आज घरात मुलांवर संस्कार होताना दिसत नाही. कारण मुलांकडे पाहण्यास कोणाला वेळ नाही. संपूर्ण देशात हिंदी सिनेमांचे, क्रिकेटचे मोठे वेड आहे. हिंदी गाण्यांच्या भेंड्यांची करमणूक आयुष्यातील अविभाज्य अंग झाले आहे. सिनमातील तारे-तारकांवर खूप प्रेम करणे, त्यांचे अनुकरण करणे, त्यांची पूजा करणे, त्यांची मंदिरे बांधणे हे सर्व आपण रोखू शकत नाही. ठीक आहे. थांबवू नका. कोणी कोणासाठी वेडे व्हावे हा प्रश्न वेगळा असला तरी हे अनुकरण केले जात आहे, त्यात सूड भावना आहे, मारामारी आहे, सेक्स आहे आणि या सर्वांचा प्रभाव तरूण पिढीवर मोठ्या प्रमाणात होत आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. अत्याचार, सूड भावना, बेफिकीर वृत्ती, कोणालाही न जुमाणणारी वृत्ती तरूण पिढीमध्ये तयार हात आहे. ती समाजाला घातक ठरत आहे. दारू, ड्रग याकडे लोक ओढले जात आहेत. रत्नागिरीला एका

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

वाहिनीवर तेथे समुद्राच्या किनाऱ्यावर तरूण मुले ड्रग्ज घेताना दाखविले गेले. पोलीस स्टेशन जवळ आहे. पोलिसांना हे सर्व माहीत नाही का ? ड्रग्जचे मोठे रॅकेट आहे. आम्ही सांगलीला पाहिले की, या बाबतीत पोलिसांना सर्व माहीत आहे. अनेक ठिकाणी पोलिसांचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. राज्याचे डीजी काय करीत आहेत, माननीय मुख्यमंत्र्यांकडे कायदा व सुव्यवस्थेचे काम आहे, ते काय करीत आहेत ? लोणावळ्याला एका हॉटेलमध्ये 7 वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. सबंध लोणावळ्यातील लोक जमा झाले आणि त्यांनी हॉटेलला घेरले. सभापती महोदय, त्या हॉटेलला आजपर्यंत संरक्षण दिलेले आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...........

मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, हे आता एक महिन्यापूर्वी झालेले कृत्य आहे. पण अडीच ते तीन वर्षापूर्वी 10-11 वर्षाच्या तीन कचरावेचक मुलींनी एका बिल्डरच्या परिसरातील कचरा उचलला. त्यामुळे त्या बिल्डरने या तिन्ही मुलींना कोंडून ठेवले. त्यामधील एका मुलीवर बलात्कार केला. दोन मुली पळून गेल्या. या प्रकरणाचा मी स्वत: पाठपुरावा केला, पोलीस स्टेशनला गेले. परंतु, आता माझ्या असे लक्षात येते की, त्या मुलींना ससून हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले होते. खास करुन या लोणावळ्याच्या पोलीस स्टेशनच्या बाबतीत मला असे विचारावयाचे आहे की, त्यांची चौकशी तुम्ही करणार आहात का ? त्या कचरा वेचणाऱ्या 3 मुली गरीब होत्या म्हणून तुम्ही लक्ष दिले नाही. आज जैन समाजातील 7 वर्षांच्या मुलीवर बलात्कार होऊन खून झाला आहे. 'मी मराठी' चॅनलने त्याचा खूप चांगल्या प्रकारे पाठपुरावा केला. तिच्या आई-वाडिलांच्या मुलाखती मी बघितल्या आहेत. काल जैन समाजाच्या एका महिलेने सांगितले की, त्या हॉटेलला अजूनही पोलीस प्रोटेक्शन दिलेले आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. अजूनही गुन्हेगारांचा शोध लागलेला नाही. लोणावळ्याचे पोलीस स्टेशन एवढे निर्ढावलेले आहे की, त्यांना माहीत आहे की, थोड्या दिवसांनी लोक विसरुन जातील आणि आपल्याला प्रकरण दडपून टाकता येईल. परंतु, हे प्रकरण असे दडपून टाकता येणार नाही. तीन वर्षापूर्वी त्या तीन कचरावेचक मुलींवर अत्याचार झाले, आता या सात वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाले, हे अधिवेशन संपल्यानंतर 10 दिवसांच्या आत या गुन्ह्यांचा तपास लागला नाही तर मुख्यमंत्री महोदयांनी तरी राजीनामा द्यावा किंवा महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांनी तरी राजीनामा द्यावा.

सभापती महोदय, मुले ड्रग्ज घेत आहेत, दारु पीत आहेत, मुलींचे खून होत आहेत, मुलींवर बलात्कार होत आहेत आणि ही चर्चा आम्ही मजा म्हणून करीत आहोत का ? दरवेळी अधिवेशनात नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आणायचा, कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करायची, पुढे काय होते, ते माहीत नाही. असे बेजबाबदारपणे काम तुम्हाला करता येणार नाही. मुलींवर आणि महिलांवर जर अत्याचार होत असतील तर यापुढे आम्ही ते खपवून घेणार नाही. मंत्रालयाच्या दारामध्ये, मुख्यमंत्र्यांच्या कॅबिनबाहेर आम्ही धरणे धरु. जर या सात वर्षाच्या मुलीच्या खुन्याचा

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...........

तपास लागला नाही, लोणावळा पोलिसांवर कारवाई झाली नाही, त्यांची चौकशी केली नाही, त्यांना निलंबित केले नाही तर आम्हालाही काय करायचे ते चांगल्या प्रकारे माहीत आहे.

सभापती महोदय, यापूर्वीच्या वक्त्यांनी येथे आकडेवारी दिलेली आहे. मी त्या आकडेवारीमध्ये जाणार नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्रीमती मनेका गांधी यांनी असे सांगितले आहे की, महाराष्ट्र आता अत्याचाराच्या बाबतीत क्रमांक 1 वर आला आहे. खरोखर एवढे वाईट वाटले की, हा पुरोगामी महाराष्ट्र, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र, पण आज या महाराष्ट्रातील महिला सुरक्षित नाहीत.

सभापती महोदय, देशात दर अडीच तासाला एका मुलीवर अत्याचार होतो. लहान मुलांवर अत्याचार होतो. 'Save the child', या स्वयंसेवी संस्थेने 'World of indian girls', असा एक अहवाल प्रसिध्द केला आहे. त्यामध्ये त्यांनी मुलींचे शिक्षण, सुरक्षा, बालविवाह असे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. जगात अफगाणिस्तान आणि भारत या दोन देशात बालविवाहाचे प्रमाण सर्वाधिक आहे. या अहवालात त्यांनी काही सूचना सुध्दा केलेल्या आहेत. जात, वर्ण व्यवस्थेमध्ये मुलींवर होणाऱ्या अत्याचाराची सुध्दा दखल घेतली पाहिजे. महिला विकास कक्ष, अत्याचार रोखण्यासाठी कॉलेजमधील एनएसएस संस्था, विद्यार्थ्यांशी सुसंवाद, या गोष्टी झाल्या पाहिजेत. छेडछाडीची प्रकरणे कमी होण्यासाठी आपण काम केले पाहिजे. अशा अनेक गोष्टी आहेत. परंतु, त्यावर अधिक न बोलता मी पुढील मुद्याकडे वळते.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये एक महत्त्वाची घटना घडलेली आहे आणि ती म्हणजे कॉम्रेड पानसरे आणि त्यांच्या पत्नी उमाताई यांच्यावर हल्ला झाला आहे. कॉम्रेड पानसरे सकाळी मॉर्निंग वॉकला गेले असताना दबा धरुन बसलेल्या हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. या पूर्वी डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यावर पाळत ठेऊन हल्ला करण्यात आला. डॉ.नरेंद्र दाभोळकर मुंबईहून पुण्याला गेले, नंतर ते मॉर्निंग वॉकला गेले, त्यांच्यावर पाळत ठेऊन हल्ला करण्यात आला. या सर्व घटनांमध्ये एक सुसूत्रता आहे. गरीब, कष्टकरी, असंघटित मजूर, महिलांसाठी लढणारे, सह्याद्रीसारखे कणखर व पहाडी व्यक्तिमत्त्व म्हणजे कॉम्रेड पानसरे. कॉम्रेड पानसरे हे विज्ञाननिष्ठ, परिवर्तनवादी व पुरोगामी विचारसरणीचे होते आणि त्या उलट डॉ.नरेंद्र दाभोळकर

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...........

अगदी शांत, साने गुरूजींच्या विचारांवर श्रध्दा असणारे, समाजवादी विचारसरणीचे, अत्यंत सौम्य, आणि तरीही निग्रही होते. जादूटोणा, जंतरमंतर यातून समाजातील अशिक्षित लोकांना अंधश्रध्देत गुरफटवून त्यांच्या भोळेभाबडेपणाचा फायदा घेऊन, महिलांवर अत्याचार करणारे, लहान मुलांचा बळी देणारे आणि अशा अघोरी प्रथांमधून धनसंचय करणा-या भोंदूबाबांचे धंदे बंद होणार होते. म्हणून डॉ.नरेंद्र दाभोळकरांची हत्या करण्यात आली. हे हत्यारे कोण आहेत, हे शोधून काढणे निश्चितच कठीण नाही. एखाद्याला मारण्याची सुपारी देणे, एखाद्याचे एन्काऊंटर करणे, पैसे देऊन खून करणे, हत्या करणे, हे प्रकार कोण करतात हे शोधणे पोलिसांसाठी निश्चितच अवघड नाही, अशक्य तर नाहीच नाही. महाराष्ट्र पोलिसांची पातळी एवढी खालावली आहे का ? या खुन्यांचे मारेकरी, त्या मारेकऱ्यांना पाठविणारे मास्टर माईंड कोण आहेत, याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात व देशात खुलेआम होत असताना, अनेक माध्यमातून, चॅनलवरुन डॉ.दाभोळकर व कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या संशयाची सुई ढोंगी हिंदुत्त्ववादी संघटनांकडे जाते. ही चर्चा खुलेआम होत असताना शासनाची यंत्रणा मात्र थिजल्यासारखी झाली आहे, अशी शंका कॉ.पानसरे यांची कन्या स्मिता पानसरे आणि असंख्य कार्यकर्ते यांनी व्यक्त केली आहे आणि त्यामध्ये तथ्यही आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. इतिहासातील सत्य, आजची वस्तुस्थिती, राजकारण, समाजकारण याविषयी प्रबोधनात्मक भाषणे देणे हा कॉ.पानसरेंचा ध्यास होता आणि त्याला लोकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत होता. कॉ.पानसरे यांचा 'शिवाजी कोण होता' हा कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला. खरा इतिहास सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि तो लोकांनी खूप वाखाणलाही. घर्मांध आणि हिंदू दहशतवाद्यांना सातत्याने त्यांनी विरोध केला. मग त्या हिंदुत्त्ववाद्यांना ताब्यात का घेतले जात नाही ? नथुरामाचे उदात्तीकरण करणारे आपल्याला विरोध करीत होते का ?

सभापती महोदय, कोल्हापूरला 'Who killed Mr.Karkare' या शमसुद्दीन मुश्रीफ यांच्या लिखित पुस्तकाला सनातन्यांनी आणि हिंदुत्त्ववाद्यांनी विरोध केला आणि त्यांना धक्काबुक्की केली, त्यांना धमक्या दिल्या. मग पोलीस तपासामध्ये अशा ढोंगी हिंदुत्त्ववाद्यांना, सनातनवाद्यांना, ज्यांनी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...........

धमक्या दिल्या, त्यांना अद्याप अटक का केलेली नाही, त्यांची चौकशी का केली नाही ? खरे मास्टर माईंड हेच लोक आहेत.

सभापती महोदय, सनातन प्रभात मासिकात पानसरेंच्या फोटोवर काट मारण्यात आली आहे. सोशल मीडियातून, फेसबुकवरुन पानसरेंच्या हत्येनंतर सनातन्यांनी आनंदी, उत्साही प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्याची चौकशी आपण का करीत नाही ? "अब खूब जमेगा रंग, जब मिलेंगे तिनो यार, दाभोळकर, पानसरे और खेडेकर," अशा कॉमेंटस् फेसबुकवर फिरल्या. त्याची आपण काय चौकशी केली ? अमोल दांडगे पाटील याची चौकशी करुन त्याला लगेच सोडण्यात आले. खरे मास्टर माईंड येथेच लपलेले आहेत. हे माहीत असताना त्यांची चौकशी होत नाही.

सभापती महोदय, परवा चर्चवर हल्ला झाल्यानंतर त्यांच्या गुन्हेगारांना पकडले गेले. कारण अधिवेशन सुरु होते आणि मग मुख्यमंत्र्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. सुटकेचा निःश्वास इतक्यात टाकू नका, अजून पानसरे, दाभोळकर आणि 7 वर्षाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या खुन्यांना तुम्हाला पकडायचे आहे. त्यानंतरच तुम्ही सुटकेचा निःश्वास टाकू शकता. या सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्रातील पुरोगामी जनता आपल्याला विचारते आहे.

सभापती महोदय, तपास लागेलच कसा ? हत्या करणाऱ्यांपर्यंत पोहोचण्याची आपली इच्छाशक्ती आहे का ? धृतराष्ट्र जसा दुर्योधन आणि दुःशासनाच्या वाईट कर्मांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत होता, त्याप्रमाणे तुम्ही आंधळे झाला आहात.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

हे सरकार दुर्यौधन आणि दु:शासन प्रवृत्तीचे ढोंगी हिंदुत्ववादी आहे, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर ज्यांनी तुम्हाला सत्तेवर बसविले, ते लोक तुम्हाला पायउतार केल्याशिवाय राहणार नाही. या हत्यांमागील मास्टर माईंड कोण आहे ? तो तुम्ही शोधून काढला पाहिजे. तुम्ही आम्हाला गृहीत धरु नका. आम्ही देखील हिंदू आहोत. आज सात वर्षाच्या मुलीपासून 71 वर्षांच्या ननवर बलात्कार होतो. ग्रॅहम स्टॅमच्या सात व अकरा वर्षाच्या मुलांना बजरंग दलाचे लोक जिवंत जाळून टाकतात, त्यांना असे वाटते की, पीएम आणि सीएम दोन्ही आरएसएसचे लोक सत्तेवर बसले आहेत, हिंदुत्ववाद्यांनी वाटेल ते केले आणि त्यांच्या इतर शाखांनी काय केले तर लोक सहन करतील. पण ते आम्ही सहन करणार नाही. मदर तेरेसा, बाबा आमटे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले ही जनसेवा करणारी माणसे होती. मदर तेरेसा बाबत तुम्ही बोलत आहात.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कायदा व सुव्यवस्था या विषयावर बोलावे, कृपया विषयांतर करु नये.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी कायदा व सुव्यवस्था या विषयावरच बोलत आहे. 71 वर्षाच्या ननवर बलात्कार झाला, आमच्या भागात सात वर्षाच्या मुलीवर बलात्कार होतो. ...(अडथळा).... सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आम्हाला जरा बोलू द्यावे. तुम्ही आम्हाला दडपून टाकू शकत नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या हे विषय पश्चिम बंगाल येथील आहेत, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेबाबत आपण बोलावे. आपण खूप चांगले बोलत आहात. आपण फक्त महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था या विषयावर बोलावे. दोन मिनिटात आपले भाषण संपवावे अशी मी आपणाला विनंती करतो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कॉ.पानसरे महाराष्ट्रात राहत होते. सात वर्षाची मुलगी लोणावळा येथे तिच्या आई वडिलांबरोबर लग्नासाठी आली होती. या दोन्ही घटना महाराष्ट्रातील आहेत. डॉ.नरेंद्र दाभोळकर महाराष्ट्रात राहत होते. ते पुरोगामी विचाराचे होते. जादूटोणा व बुवाबाजी करणारे लोक, महिलांवर अत्याचार करणारे ढोंगी, हिंदुत्ववादी आणि बाबा छूमंतर करणाऱ्या लोकांचे धंदे बंद झाले म्हणून डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.पानसरे यांच्यावर

....2...

UNCORRECTED COPY / / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

गोळ्या झाडण्यात आल्या. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, अधिवेशन संपल्यानंतर पुढील 10 दिवसांच्या आत या खुन्यांना पकडले नाही तर माझ्या सोबत जेवढे आमदार येतील त्यांना घेऊन मी माननीय मुख्यमंत्री यांच्या कॅबिनसमोर बसणार आहे. या लोकांना अटक व्हावी आणि याबाबत शासनाकडून आम्हाला ठोस निर्णयाची अपेक्षा आहे. कॉ.पानसरे यांची हत्या दडपून टाकता येणार नाही. आम्ही इतके लेचेपेचे नाहीत, आम्ही देखील हिंदू आहोत, आम्ही सहिष्णूवादी आहोत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, सन्माननीय सदस्यांनी पीएम चा उल्लेख केला आहे. जो विषय पश्चिम बंगालमध्ये झाला. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्या करीत आहेत. महाराष्ट्रातील जनतेने सन्माननीय सदस्यांना खासदार करावे, त्यानंतर त्यांनी इंडिया व इंटरनॅशनल या विषयावर बोलावे. आता बोलताना त्यांनी पीएम चा उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत पीएमचा उल्लेख करु नये.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी एक मिनिटांत माझे भाषण संपविते. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी नाशिक येथील उल्लेख केला आहे. केबीसी या कंपनीने लोकांकडून पैसा गोळा केला, त्यातील गुन्हेगार स्टार माझा यांनी सिंगापूर येथे असल्याचे दाखविले होते. पैसे दुप्पट करुन देऊ असे सांगून त्यांनी गरीब लोकांकडून पैसे गोळा केले होते. या घटनेला एक वर्षे होत आले तरी देखील गुन्हेगार शासनाला पकडता आले नाहीत. आज सकाळी मी टीव्हीवर पाहिले की, चांदवड येथील देवीच्या नावाने पैशांचा पाऊस पाडला जातो. तेथे देखील सामान्य लोकांना फसविले जाते. गोरगरीब लोकांची फसवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. खुले-आम गोळ्या झाडल्या जातात, लहान मुलींवर बलात्कार केले जात आहेत. अशा सर्व गुन्हेगारांना अटक केली पाहिजे. महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक मुख्यमंत्री महोदयांना भेटायला येतात पण त्यांना मुख्यमंत्री महोदय भेट देत नाहीत. या दोघांनी 10 दिवसांच्या आत सर्व खुनांची जबाबदारी घ्यावी व गुन्हेगारांना अटक केली नाही तर आम्ही सर्व लोक मुख्यमंत्री महोदयांच्या कॅबिन बाहेर निदर्शने करु एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांचे भाषण आपण ऐकले आहे. त्यांच्या भाषणाबाबत मला काही बोलायचे नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत आपण आपले विचार येथे मांडू शकता. यामध्ये मुख्यमंत्री महोदयांचा संदर्भ घेऊ शकता. आपल्या भाषणात पीएम, सीएम बसले आहेत, त्यांचा आम्हाला वरदहस्त आहे. याबाबत आपण मागे देखील चर्चा केली होती, हा विषय पंतप्रधान यांच्याशी संबंधित नाही. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात सीएमचा उल्लेख ठेवावा, परंतु पीएमचा उल्लेख कामकाजातून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : तपासून आवश्यक ते शब्द काढून टाकण्यात येतील.

----

**श्रीमती स्मिता वाघ यांचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन**

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिताताई उदय वाघ यांचा आज जन्मदिवस आहे. त्यांना सभागृहाच्या माध्यमातून शुभेच्छा देण्यात याव्यात अशी मी विनंती करतो. मी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता उदय वाघ यांचा आज वाढदिवस असल्यामुळे त्यांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांना लॉबीमध्ये शुभेच्छा देण्यात आल्या होत्या, आता पुन्हा त्यांना सभागृहाच्यावतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.

-------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहात जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्व प्रथम सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांना मी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेबाबत राज्यात अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार असे म्हणाले की, हा प्रश्न कोणत्याही सरकारशी संबंधित नसून राज्याशी आणि समाजाशी संबंधित आहे. माझ्या मित्रांना मी सांगू इच्छितो की, ही नैतिक जबाबदारी सरकारची असते. ज्यांच्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था योग्य प्रकारे राबविली जात नाही तेव्हा ती नैतिक जबाबदारी त्यांना टाळता येणार नाही. प्रश्न आघाडी किंवा युती सरकारचा नाही, येथे प्रश्न प्रवृत्तीचा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी काही भावना व्यक्त केल्या आहेत. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित झाली पाहिजे. केवळ टीका करण्यासाठी नाही, महाराष्ट्रातील परिस्थिती सुधारली पाहिजे. सर्व सामान्य लोकांचा या सरकारवर कायदा व सुव्यवस्थेबाबत विश्वास बसला पाहिजे. या हेतूने सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी अत्यंत दु:खी अंत:करणाने

...5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे..

काही भावना व्यक्त केल्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी असे सांगितले की, सात वर्षाच्या मुलीचे लोणावळा येथील हॉटेलमध्ये दोन दिवसानंतर प्रेत सापडले. त्या मुलीवर बलात्कार करुन तिचा गळा कापला होता. याबाबत पोलीस कारवाई करीत नाहीत, तेव्हा लोणावळा येथील जनता कारवाई करा, अशी मागणी करण्यासाठी हॉटेलवर गेले असता हॉटेलला संरक्षण दिले जाते. लोकांनी मागणी केली तर त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातात, अशी परिस्थिती आपल्या राज्याची आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव म्हणाले की, सरकार बदलले परंतु प्रवृत्ती बदलली नाही. एक शायर असे म्हणतो की, पंछी यह समझता है कि गगन बदला है, इन्सान यह समझता है कि चमन बदला है, लेकिन सच बात तो यह है कि दोस्तो लाश वही है, सिर्फ कफन बदला है. मंत्री महोदय अशी परिस्थिती सरकारची असेल तर सरकार बदलले तरी शासन व प्रशासनाची प्रवृत्ती बदलत नाही. या मध्ये बदल होईल तेव्हाच राज्यातील कायदा व सुव्यवस्था ठीक राहील. कायदा व सुव्यवस्थेबाबत वेगवेगळे कंगोरे आहेत, वेगवेगळे पैलू आहेत, सर्व सामान्य गोरगरीब जनतेला लुटण्याचा प्रकार नाशिक येथील केबीसी कंपनीने केला आहे, ज्यांनी लुटले ते लोक सिंगापूर येथे जाऊन बसले आहेत. अशा प्रकारची आर्थिक गुन्हेगारी आपल्या राज्यात सुरु आहे. सामाजिक क्षेत्रात अनेक प्रकारची गुन्हेगारी सुरु आहे. महिलांवर अन्याय, अत्याचार, बलात्कार असे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

हे बरोबर नाही. आम्ही शाहू, फुले, आंबेडकरांच्या नावाचा सतत उल्लेख करतो. आम्ही शिवाजी महाराजांचे दाखले देतो. आपण थोर पुरुषांची नावे घेऊन राज्याचा कारभार चालवितो आणि आपल्या राज्यात अशा प्रकारे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती डबघाईस यावी, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

सभापती महोदय, जेव्हा रक्षकच भक्षकांची साथ देतात तेव्हा गुन्हेगारीचे प्रमाण वाढते आणि कायदा व सुव्यवस्था धोक्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

**तालिका सभापती** : माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करावाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब आपण दोन मिनिटे थांबावे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक 26 मार्च, 2015 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार, दिनांक 27 मार्च, 2015 ते शुक्रवार, दिनांक 10 एप्रिल, 2015 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढील प्रमाणे ठरविण्यात आला आहे.

**मार्च, 2015**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार, दिनांक 27 | : | (1) शासकीय कामकाज<br>(2) अशासकीय कामकाज (ठराव) |
| **शनिवार, दिनांक 28** | : | **सुट्टी (श्रीरामनवमी )** |
| **रविवार, दिनांक 29** | : | **सुट्टी** |
| सोमवार, दिनांक 30 | : | शासकीय कामकाज. |
| मंगळवार, दिनांक 31 | : | (1) शासकीय कामकाज.<br>(2) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव. |

**एप्रिल, 2015**

| | | |
|---|---|---|
| बुधवार, दिनांक 1 | : | (1) शासकीय कामकाज.<br>(2) विनियोजन विधेयक. |
| गुरुवार, दिनांक 2 | : | **सुट्टी (महावीर जयंती).** |
| शुक्रवार, दिनांक 3 | : | **सुट्टी (गुड फ्रायडे).** |
| शनिवार, दिनांक 4 | : | **बैठक होणार नाही.** |
| रविवार, दिनांक 5 | : | **सुट्टी** |

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट..........

| | | |
|---|---|---|
| सोमवार, दिनांक 6 | : | शासकीय कामकाज. |
| मंगळवार, दिनांक 7 | : | (1) शासकीय कामकाज.<br>(2) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव. (केळकर समितीच्या अहवालावर चर्चा) |
| बुधवार, दिनांक 8 | : | शासकीय कामकाज. |
| गुरुवार, दिनांक 9 | : | (1) शासकीय कामकाज.<br>(2) विरोधी पक्षाचा प्रस्ताव.<br>(3) अंतिम आठवडा प्रस्ताव. |
| शुक्रवार, दिनांक 10 | : | (1) शासकीय कामकाज<br>(2) अशासकीय कामकाज] (विधेयके) |

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, राज्यात वाढत असलेले अवैध धंदे हा देखील गंभीर प्रश्न आहे. सर्वांत चिंतेची बाब अशी आहे की, कै.दाभोळकर, कॉ.पानसरे यांची हत्या करण्यात आली आणि गुन्हेगारांचा अद्याप पत्ता लागत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत सांगितले की, कै.पानसरे यांची हत्या करणारे गुन्हेगार आमच्या आवाक्यामध्ये आहेत, अशी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आणि आम्ही ते टी.व्ही. चॅनलवर देखील बघितले. मग गुन्हेगार आवाक्यात आहेत तर ते सापडत का नाहीत, हा महत्वाचा प्रश्न आहे. ज्या उजव्या शक्ती आहेत, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या प्रकरणी ज्या पद्धतीने आपले मत व्यक्त केले ते अत्यंत गंभीर आहे. डाव्या अतिरेकी शक्तीचे तर आपण कधी नक्षलवाद्यांच्या नावाने तर कधी कोणत्या नावाने हे करतोच. कॉ.पानसरे यांची हत्या झाल्यानंतर नाशिकमधील जनतेने आंदोलन करुन त्यांच्या हत्येचा निषेध करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना पोलिसांनी नोटीस दिली की, असे काही झाले तर आम्ही तुमच्यावर अमुक कारवाई करू म्हणजे अगोदरच सर्व ठरवावयाचे ? न्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध आवाज बुलंद केला जाऊ नये, अशी पोलिसी प्रवृत्ती निर्माण झालेली आहे. आपल्या राज्यात गुन्ह्यांच्या तपासाचा टक्का देखील घसरलेला आहे आणि शासनाने देखील ते मान्य केलेले आहे. आर्थिक गुन्हेगारी बरोबरच सामाजिक, धार्मिक आणि

..5...

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

जातीय गुन्हेगारी देखील वाढत आहे. महिलांवरील अत्याचार, बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. सामाजिक जाती आणि सांप्रदायिक गुन्हेगारीच्या संदर्भात विचार केला तर कोणे एके काळी मुंबईचे पोलीस आयुक्त असलेले, त्यानंतर गुजरातचे पोलीस महासंचालक झालेले, त्यानंतर ज्यांनी पंजाबमध्ये कर्तबगारी गाजविली ते ज्युलियन रिबेरो साहेबांनी महाराष्ट्राच्या संदर्भात जे दु:ख व्यक्त केले ते देखील राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात शोकांतिका व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, पनवेल येथे चर्चवर हल्ला करण्यात आला. कोठे बुद्ध विहारवर हल्ले केले जातात, कोठे पुतळे तोडले जातात, तर कोठे झेंडे तोडले जातात आणि हे सर्व खुलेआम सुरु आहे. त्यांच्यावर पोलीस खात्याचा वचक नाही. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते की, कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व प्रकारच्या गुन्हेगारीबाबत झिरो टॉलरन्स ठेवला जाईल. दलित आणि महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत आणि अत्याचार थांबविण्यासाठी जीपीएस असलेल्या वाहनाद्वारे गस्त वाढविण्यात येईल. नागपूर, अमरावती, पुणे आणि औरंगाबाद शहरात पहिल्या टप्प्यात ही गस्त सुरु करण्यात येईल. ही गस्त सुरु झाली किंवा नाही, हे मला माहीत नाही. जामीन मिळालेले गुन्हेगार वारंवार गुन्हे करीत असलेल्या प्रकरणांमध्ये देखील अशा गुन्हेगारांना जामीन कसा काय मिळतो ? हे मुख्यमंत्री महोदयांचे स्टेटमेंट आहे. ज्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात की, अशा प्रकारची गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही, तर मग जबाबदारी कोणाची आहे ? सर्वच विभागामध्ये काही चांगली माणसे असतात तर काही वाईट माणसे देखील असतात. जसा समाज असतो तसे चित्र दिसते. महात्मा ज्योतिबा फुले यांचा आरशाच्या संदर्भात सिद्धांत आहे. आरशासमोर जसा माणूस उभा असेल तो तसाच आरशात दिसतो. परंतु, समाज जसा आहे तसा आरशामध्ये दिसत नाही. सरकार जसे आहे तसे आरशामध्ये दिसत नाही. आरशासमोर चांगला माणूस उभा आहे, परंतु आरशामध्ये मात्र विद्रुप, विकृत माणूस दिसतो. या मानसिक विकृती बद्दल आमच्या

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

सरकारकडे किंवा आमच्या व्यवस्थेमध्ये काही इलाज आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांच्या सारख्या माणसाला दाखलेबाज गुन्हेगारासारखे वागविले जाते, नोटीस दिली जाते. कानून के हाथ लंबे होते हैं, असे म्हटले जाते. मग कानून के हाथ कै.दाभोळकरांच्या मारेकऱ्यांपर्यंत का पोहोचले नाहीत ? (...अडथळा....) श्री.विनायक मेटे साहेब, ज्यावेळी तुम्ही या प्रस्तावावर बोलाल त्यावेळी हे शासनाला सांगावे. तुमचेच सरकार आहे. म्हणजे आपले सरकार आहे. कानून के हाथ लंबे हैं, मग ते कै.दाभोळकर, कॉ.पानसरे यांच्या मारेकऱ्यांपर्यंत का पोहोचत नाहीत ? ते हात का लुळे पडले, का छोटे झाले ? यांच्या हातांना कोण थांबविते ? ज्यांनी पनवेल येथील चर्चवर हल्ला केला, ज्यांनी गांधीजींचा खून करुन गांधीजींच्या खुनाला, हत्येला गांधी वध नावाचा शब्द दिला ही नथुराम गोडसे सारखी प्रवृत्ती याला जबाबदार आहे आणि हे तुम्हालाही माहीत आहे, सर्व जगाला माहीत आहे. आता सरकार गांधीजींचे नाव घेते. गांधीजींचे नाव राज्य सरकारही घेते आणि केंद्र सरकारही घेते. परवा देशाचे पंतप्रधान ऑस्ट्रेलियामध्ये गांधीजींच्या पुतळ्याचे आनावरण करण्यासाठी गेले होते.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

एकीकडे पंतप्रधान महोदय गांधीजींचा गौरव करतात, उदोउदो करतात, राष्ट्रीय स्तरावर स्वच्छता अभियान राबवितात आणि दुसरीकडे त्याच पक्षाची काही माणसे गांधीजींची हत्या करणाऱ्या खुन्यांना देशभक्तीचे प्रमाणपत्र देतात. केवळ लेनिन, मार्क्स यांची पुस्तके दप्तरात सापडली या कारणास्तव त्यांना नक्षलवादी म्हणून अटक केली जाते. सनातन प्रभात या प्रवृत्तीकडून डॉ.नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे यांच्या हत्येचे स्वागत केले जाते, आनंद साजरा केला जातो. त्यांच्या मानगुटीवर हात टाकण्याचा प्रयत्न पोलीस खाते का करीत नाही? अशा प्रकारे पुरोगामी चळवळीचा मुडदा पाडण्याचा प्रयत्न केला जातो याबद्दल आमच्यासारख्या कार्यकर्त्यांनी प्रश्न विचारला तर सरकारकडे उत्तर आहे काय? कानून के हाथ लंबे नहीं है असे तरी सरकारने जाहीर करावे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये मी नथुराम बोलतोय नावाचे नाटक सुरु आहे. त्या नाटकात नथुरामाची भूमिका शरद पोंक्षे नावाचे नट करीत आहेत. गांधीजींची हत्या करणाऱ्या नथुरामाचा अशा प्रकारे गौरव केला जात असेल तर गारपिटीने, पावसाने झोडपले तर दाद मागायची कुणाकडे? अशा प्रकारची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती असेल तर राज्यातील लोकांना न्याय मिळेल की नाही अशी शंका येते.

सभापती महोदय, पोलीस खात्याचा वचक निर्माण झाला पाहिजे. श्री.रिबेरो हे मुंबईचे पोलीस आयुक्त असताना नामांतराच्या प्रश्नावर आंदोलन सुरु होते. मुंबईच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा अशी घटना घडली. पोलीस आयुक्त म्हणून रिबेरो यांची नेमणूक झाली आणि आम्ही विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना मोर्चा काढला होता. नामांतराच्या आंदोलनामुळे राज्यातील 20 जिल्हयांमध्ये मला प्रवेश करण्यास व भाषण करण्यास बंदी घातली होती. मुंबईच्या विधानभवनावर मोर्चा आणू नये म्हणून तीन महिने माझ्या मुंबई प्रवेशावर रिबेरो साहेबांनी बंदी घातली. स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये इंग्रजांनी सुध्दा स्वातंत्र्य सैनिकांवर बंदी घातली नव्हती. परंतु माझ्यावर मुंबईमध्ये प्रवेश करण्यास तीन महिने बंदी घालण्यात आली. मी रिबेरो साहेबांचा सन्मान केला होता. मुंबई शहरामध्ये जेवढ्या हातभट्टया होत्या त्या सर्व हातभट्टया रिबेरो साहेबांनी उद्ध्वस्त केल्या त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले होते. मुंबईतील हातभट्टया उद्ध्वस्त

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

करण्याची मोहीम राबविल्यानंतर मुंबई शहरातील प्रतिष्ठित राजकारणी लोकांनी रिबेरो साहेबांची बदली झाली पाहिजे म्हणून आग्रह धरला. रिबेरो हटाव आणि हातभट्टी बचाव अशी भूमिका घेण्यात आली. रिबेरो हटाव याकरिता अनेक आमदारांच्या सह्या घेतल्या गेल्या. कारण रिबेरो यांनी मुंबईतील सर्व हातभट्टया उद्ध्वस्त केल्या. त्यांना आयुक्त पदावरुन हटविण्याची मोहीम सुरु झाली. त्यांनी जरी माझ्या मुंबई प्रवेशावर बंदी घातली असली तरी मी ठाण्यात बसून निवेदन काढले. मुंबईला स्वच्छ करण्यासाठी, मुंबईतील जनतेला दारुच्या व्यसनापासून वाचविण्यासाठी त्यांनी जे काम हाती घेतले आहे त्याला आमचा पाठिंबा आहे. त्यांना हटविण्याचा प्रयत्न केला तर आम्ही ते खपवून घेणार नाही अशा प्रकारची धमकी आम्ही त्यांना हटविण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना दिली. आज समाजामध्ये भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, जर्मनी विद्यापीठामध्ये भारतीय विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी प्रवेश नाकारण्यात आला. तू बलात्कारी देशातून आलेला आहेस म्हणून तूला प्रवेश देऊ शकत नाही असे कारण सांगण्यात आले. ही अगदी शरमेची गोष्ट आहे. ही कॉम्प्लिमेंट आमच्या देशासाठी आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्रासाठी अशोभनीय आहे. विदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्याला बलात्कारी देशातून आला आहे म्हणून प्रवेश दिला जात नाही ही अत्यंत लांछनास्पद गोष्ट आहे. मला पोलीस खात्याबद्दल आदर आहे. वेगवेगळया आंदोलनामुळे 150 वेळा मला पोलिसांनी जेलमध्ये टाकले आहे. पोलिसांनी मला किती मारले, हात तोडले, पाय तोडले याचा तपशील मी देत नाही.

सभापती महोदय, मी एक कट आऊट पाहिला. एक शाळकरी मुलगी बगलेत दप्तर घेऊन चालली आहे आणि समोरील ट्रॅफिक हवालदाराला सलाम करते आहे आणि तो पोलीस दादा सुध्दा तिला सलाम करीत आहे. छोट्या शाळकरी मुलीचा पोलीस खात्यावर किती विश्वास आहे. ती शाळकरी मुलगी सलाम करताना तो पोलीस हवालदार देखील तिला सलाम करतो ही प्रतिमा मलिन होता कामा नये. ते दृश्य पाहून आमचा ऊर भरुन येतो. पण आज पोलीस ठाण्याची काय अवस्था आहे? सामान्य माणूस पोलीस ठाण्यामध्ये जायला घाबरतो. चोर, लफंगे, बेटिंग घेणारे, गुंड, मवाली पोलीस ठाण्यात गेले तर त्यांचे स्वागत केले जाते, त्यांना बसायला खुर्ची दिली जाते.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

क्या लोगे, ठण्डा लोगे या गरम लोगे अशी विचारणा केली जाते. परंतु सामान्य माणूस पोलीस ठाण्यात गेला तर बसायला खुर्ची दिली जात नाही, पाण्याचा ग्लास देखील पुढे केला जात नाही. त्यांच्या तक्रारीची दखल सुध्दा घेतली जात नाही. ही परिस्थिती केव्हा बदलणार आहे? पोलीस हा देखील समाजातूनच येतो. आकाशातून टपकत नाही. तो समाजाच्या कुशीतून आलेला माणूस आहे. समाजाची कूस जर विकृत असेल तर समाजाची माणसे कशी असतील याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, अलीकडे दाभोळकर, पानसरे यांच्यानंतर भारत पाटणकर या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला धमकी दिली जाते. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, दाभोळकर झाले, पानसरे झाले यानंतर खेडकर किंवा पाटणकर होणार असतील तर या राज्यातील पुरोगामी शक्ती गप्प बसणार नाही. तुमच्या आदेशाची वाट बघणार नाही. रस्त्यावर उतरुन ईंट का जवाब पत्थर से दिल्याशिवाय राहणार नाही. शासनाने याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. पानसरेंच्या हत्येनंतर तेथील पोलिसांनी सांगितले की, गुन्हेगार कदाचित कर्नाटकात पळाले असावेत. कारण चंद्रभागा नदीच्या पात्रात मोटार सायकल सापडली. आपल्याला कर्नाटकातील मुतालिक यांचे नाव माहिती असावे. या मुतालिक साहेबांनी राम सेना काढली, त्यांनी काय केले? व्हॅलेंटाईन डे साजरा करणाऱ्या तरुण तरुणींवर हल्ले केले, मारहाण केली.

नंतर 2जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, लातूरला देखील कालपरवा असेच झाले. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे तरुण तरुणी साजरे करतात. आमचे तरुण तरुणी चर्चा करतात, गप्पा करतात, प्रेम करतात. प्रेम करणे हे वाईट आहे काय ? सर्व साधु-संतांनी सांगितले आहे की, प्रेम करा. आपणाला जर आवरच घालावयाचा असेल तर ज्या व्यवस्थेने या गोष्टी निर्माण केल्या आहेत त्या व्यवस्थेला आवर घालावा. मुला-मुलींना लाथा-बुक्क्यांनी मारतानाचे शुटींग मोबाईल कॅमेरात बंद करण्यात आले आणि ते व्हॉटस्-ॲपवर पाठविण्यात आले. आपल्या राज्यामध्ये असे आपण कसे काय खपवून घेत आहात ? आपण संबंधितांना पकडले काय ? आपल्या राज्यात असे प्रकार थांबले पाहिजेत.

सभापती महोदय, एसआरएमध्ये बिल्डरांची गुन्हेगारी सुरू आहे. माननीय मुख्यमंत्री स्वत: म्हणाले की, एसआरए योजनेमध्ये अंडरवर्ल्डचा पैसा लागला आहे. त्याची कबुली माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली असल्यामुळे आपणाला आणखी काय पाहिजे आहे ? एसआरए मध्ये कोणकोणत्या अंडरवर्ल्डने पैसा गुंतविला आहे हे सांगितले पाहिजे. बिल्डर लोक झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना फसवत आहेत याचा देखील गंभीरपणाने विचार केला पाहिजे. धर्माधिकारी समितीने उत्कृष्ट शिफारशी केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न शासनाने प्रामाणिकपणे केला पाहिजे. इच्छा शक्ती असली की सर्व काही करता येते. आपल्या पंखा खाली असलेल्या गुन्हेगारांना संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला तर कायदा व सुव्यवस्था धोक्यात आल्या शिवाय राहात नाही. त्यामुळे पोलीस यंत्रणा स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ही यंत्रणा जो पर्यंत स्वच्छ होत नाही तो पर्यंत कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित होणार नाही. त्यामुळे आपण पोलीस खात्याला तंदुरुस्त करण्याचा प्रयत्न करावा. मानसिक, शारीरिक, नैतिकदृष्ट्या पोलीस विभाग ज्या दिवशी सक्षम होईल त्या दिवशी राज्यातील कायदा व सुव्यवस्था निश्चितपणे सुधारल्याशिवाय राहणार नाही. नागपूरच्या कोर्टामध्ये काय घडले हे आपणा सर्वांना माहीत आहे. अक्कू यादव नावाचा बदमाश दिवसाढवळ्या झोपडीत शिरायचा आणि कोणत्याही मुलीला उचलून घेऊन जायचा आणि तिच्यावर बलात्कार करायचा. तक्रारी करून लोक थकलेत. अक्कू यादवला पोलिसांनी पकडून नेले तेव्हा कोर्टाच्या आवारातच लोकांनी त्याला दगडाने ठेचून काढले. त्याला

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

कोर्टाच्या समोरच मारले. कन्व्हीक्शन रेट वाढला पाहिजे. पोलिसांमध्ये प्रचंड इच्छाशक्ती निर्माण झाली पाहिजे. शासनाची भूमिका टाईमपास सारखी असू नये. शासनाने खंबीरपणे ठरविले तर काहीही होऊ शकते. सरकारमध्ये मोठी ताकद असते. चांगल्या चांगल्या लोकांना सरळ करण्याची ताकद सरकारमध्ये असते. सरकारने मनात आणले पाहिजे. सरकारने जर मनात आणले तर राज्यातील गुन्हेगारी 80 टक्के कमी झाल्याशिवाय राहणार नाही. सरकारने मात्र आपली भूमिका टाईमपास सारखी ठेवता कामा नये. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्यासह इतर सन्माननीय सदस्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

प्रस्तावामध्ये सुरुवातीलाच म्हटले आहे की, मागील चार महिन्यांत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली भीषण परिस्थिती. मी येथे राजकीय भाषण करणार नाही. मागील चार महिन्यांमध्येच महाराष्ट्राची अशी परिस्थिती झाली आहे काय ? त्याचे उत्तर नाही असे आहे. महाराष्ट्रामध्ये महिला, मुली यांच्यावर अन्याय करण्याचे प्रमाण वाढले असेल त्याला आता पर्यंत ज्यांनी ज्यांनी राज्य केले ते कारणीभूत आहेत की, अन्य दुसऱ्या काही गोष्टी कारणीभूत आहेत काय यामध्ये देखील मी जाणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी फार चांगले भाषण केले आहे. त्या नेहमी पोटतिडकीनेने बोलत असतात. प्रत्येक अधिवेशनामध्ये आपण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न चर्चेला आणतो. त्या चर्चेनंतर पुढे काय होते ? याबद्दल आपण किती गांभीर्याने विचार करतो ? महिलांवरील, मुलींवरील अत्याचार, बलात्कार, खून यावर चर्चा झालेली आहे. केंद्रीय मंत्री श्रीमती मनेका गांधी यांनी संसदेमध्ये एक अहवाल सादर केला आहे. आपली मान शरमेने खाली जाईल अशी आज आपली परिस्थिती आहे. संपूर्ण देशामध्ये महिलांवरील अत्याचारांच्या प्रकरणामध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला आहे. महाराष्ट्रात एक लाख महिला व मुलींवर अत्याचार झाल्याचे गुन्हे गेल्या एक वर्षात नोंदविण्यात आलेले आहेत. दोन नंबर वर जे राज्य आहे तेथे 12 ते 14 हजार गुन्हेच झालेले आहेत. गुन्ह्यांमध्ये देखील फार मोठा फरक आहे. हे गुन्हे चार महिन्यांतील आहेत काय ? हे एक लाखाच्या वरचे गुन्हे मागच्या वर्षातील आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मागच्या वेळची सन्माननीय सदस्यांची भाषणे आपण काढून पाहिली तर ती थोड्या वेगळ्या विचाराची होती हे आपल्या सहज लक्षात येईल. या प्रस्तावातील मुख्य मुद्दा कॉ.पानसरे यांच्या हत्येसंबंधातील आहे. या घटनेतील आरोपी अजून मिळालेले नाहीत. त्यावर सन्माननीय सदस्य काहीच फोकस करीत नाही.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा फोकस तेच डायव्हर्ट करीत आहेत. ही काय 4 महिन्यातील परिस्थिती नाही. माननीय केंद्रीय मंत्र्यांनी एका वर्षातील परिस्थिती संसदेमध्ये मांडली आहे. मी मध्यंतरी पोलिसांनी आयोजित केलेल्या जनजागृती कार्यक्रमाला गेलो होतो. या कार्यक्रमात भाषण करताना मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी सांगितले की, महिला, मुलींवर 94 टक्के अत्याचार, अन्याय हे ओळखीच्या माणसांकडून किंवा शेजारील माणसांकडून किंवा नातेवाईकांकडून होत आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे...........

यामध्ये मामेभाऊ, दीर, सासरा, भाऊ एवढेच नाही तर यामध्ये वडील सुध्दा असू शकतात. ही जी माहिती आहे ती माझी नसून पोलिसांची आहे. 94 टक्के ओळखीच्या माणसाकडून अत्याचार होत असतात व केवळ 6 टक्के अत्याचार अनोळखी माणसांकडून होत असतात. याला कोण जबाबदार आहे ? आपण सभागृहात भाषणे करीत आहोत परंतु बाहेर जे वासनांध लोक बसलेले आहेत त्यांचे परिवर्तन कोण करणार आहे ? त्यामुळे परिस्थितीचा विचार करुन त्या अनुषंगाने आपण जोपर्यंत उपाययोजना करीत नाही तोपर्यंत ही मानसिकता बदलणार नाही. प्रत्येक घरातील महिला असुरक्षित आहे असे मी म्हणणार नाही. परंतु अनेक ठिकाणच्या महिला, भगिनी किंवा लहान लहान मुली आज सुरक्षित नाहीत त्यामुळे त्यांना तुम्ही कसे संरक्षण देणार आहात ? प्रत्येक वेळेस अशा प्रकारचा प्रस्ताव आणीत असताना समाज प्रबोधन करण्यामध्ये आपण किती सहभाग घेतो याचा देखील विचार केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, माझी आपल्या माध्यमातून शासनाला आणि या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण या ठिकाणी जेवढे पोटतीडकीने भाषण करीत आहोत त्या प्रत्येकाने आपापल्या मतदारसंघामध्ये, आपापल्या भागामध्ये या अनुषंगाने लोकजागृती करणे गरजेचे आहे. आपण जर लोकजागृती करु शकलो तर काही अंशी मुलींच्या आणि महिलांच्या अत्याचारात नक्की फरक पडल्याशिवाय राहणार नाही असे माझे मत आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने कॉ. पानसरे व त्यांच्या पत्नीवर झालेल्या हल्ल्याचा उल्लेख झाला आणि त्यासंदर्भात आपण सर्वांनी त्याचा निषेधच केलेला आहे. हे आरोपी पकडले गेले पाहिजेत असे प्रत्येकालाच वाटते. कॉ.पानसरे तसेच डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या करणारे आरोपी सुध्दा पकडले गेले पाहिजेत. परंतु हे आरोपी पकडण्यामध्ये शासन यशस्वी झालेले नाही. आपल्या पोलिसांची स्कॉटलँडयार्डच्या पोलिसांबरोबर तुलना होत असताना आता आपल्या पोलिसांचे कर्तृत्व कोठे चालले आहे,कशामुळे आपण कमी पडत चाललो आहोत ? याचा विचार आता पोलीस विभागाने करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मागच्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी स्व.गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्याकडे सकाळी गेलो होतो. मी त्या ठिकाणी गेलो असताना त्या ठिकाणी 10-5 पत्रकार आले व

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे...........

त्यांनी सांगितले की, आमच्या सुयोग इमारतीमध्ये चोरी झाली असून तुम्ही आताच भेट देण्यासाठी आले पाहिजे. त्यांनी सर्व कामकाज बाजूला ठेवून पत्रकारांच्या सुयोग इमारतीला भेट दिली. ज्या पत्रकाराच्या रुममध्ये चोरी झाली होती त्या ठिकाणी भेट दिली. भेट दिल्यानंतर चहा पिण्यासाठी बसलो असताना सर्व पोलीस अधिकारी त्या ठिकाणी आले. आबांनी नेहमीच्या शैली प्रमाणे सांगितले की, या चोरीचा ताबडतोब छडा लागला गेला पाहिजे व पत्रकारांना त्यांचे पैसे मिळाले पाहिजेत. आमचा चहा पिऊन होत नाही तोपर्यंत पोलीस अधिकारी पैसे घेऊन आले. पैसे सापडल्यामुळे आबांनी पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. ज्या पत्रकाराचे पैसे चोरीला गेले होते ते पैसे त्या पत्रकाराला दिले. पैसे मिळाल्यानंतर ते पैसे त्या पत्रकाराने मोजले आणि हळूच आबांच्या कानात सांगितले की, आबा,माझे जेवढे पैसे चोरीला गेले होते त्याच्यापेक्षा हे पैसे जास्त आहेत व ज्या नोटा चोरीला गेल्या होत्या त्या या नोटा नाहीत तर या दुसऱ्याच नोटा आहेत. त्यावेळेला इन्सपेक्टर पासून सीपी पर्यंतचे सर्व अधिकारी त्या ठिकाणी होते. पैसे वेगळे, नोटा वेगळया आणि चोर बेपत्ता. आपल्या पोलीस दलातील ही जी मानसिकता आहे ती आपल्याला कमकुवत करीत आहे. सरकारला आणि मंत्री महोदयांना तात्पुरते खूष करण्याची व वेळ मारुन नेण्याची अनेक उदाहरणे आपण बघत असतो.

सभापती महोदय, उद्या काय होईल हे कोणालाही माहिती नसते. परंतु आपल्याला सर्वांना पोलीस स्टेशनचे आणि पोलीस अधिकाऱ्यांचे अनुभव येत असतात. पोलीस विभागात अनेक चांगले लोक आहेत. महाराष्ट्र आणि मुंबई पोलिसांचा नाव लौकिक टिकून असेल तर तो त्यांच्यातील चांगल्या आणि इमानदार पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे. पोलीस विभागाला मान खाली लावणारा एक वर्ग पोलीस विभागामध्ये आहे. या मानसिकतेचा परिणाम म्हणून एका हवालदाराच्या लॉकरमध्ये एमडी पॉवडर सापडते हे कशाचे द्योतक आहे ? आमच्या लहानपणी खेडयामध्ये एक जरी हवालदार आला तर संपूर्ण गाव शांत होत असे, एवढा दरारा त्यावेळी आमच्या हवालदाराचा होता. तालुक्याचा पीएसआय आला तर फार मोठा परिणाम होत होता. परंतु आता ग्रामीण भागात एसपी,सीपी आले तर त्यांना कोणीही घाबरत नाही. आता पोलीस पुढे पळतात आणि त्याच्या मागे चोर पळतात अशीही उदाहरणे आपल्याला दिसून येतात. त्यामुळे जी मानसिकता आहे, त्याला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे...........

कोठे तरी गंज लागलेला आहे. हा गंज काढून मानसिकता बदलण्याची गरज आहे. महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात लोकांच्या मानसिकतेमध्ये बदल करुन जागृती निर्माण करण्याची गरज आहे. पूर्वीचा नाव लौकिक मिळवून देण्यासाठी जे जे अधिकारी कर्मचारी प्राणपणाने झटतात, लढतात त्यांना प्रोत्साहन देऊन जे चांगले काम करीत नाहीत त्यांच्यावर कारवाई करुन त्यांना घरी बसवणे गरजेचे आहे. परंतु अनेक वेळा दोघांनाही सारखाच न्याय दिला जातो. चांगल्या लोकांना शाबासकी दिली जात नाही आणि वाईटाला सजा केली जात नाही. मागच्या काळात देखील अनेक पोलीस अधिकारी गृह मंत्र्यांचे देखील ऐकत नव्हते आणि कामही काही करत नव्हते अशी अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. मला माननीय आबांबरोबर फिरण्याचा अनेक वेळा प्रसंग आला होता.

सभापती महोदय, या ठिकाणी मी सांगू इच्छितो की, राजन माळी म्हणून आग्री समाजाचा एक कार्यकर्ता आहे. घोडबंदर येथे हॉटेल सुरु करण्यासाठी त्याने जागा घेतली, हॉटेल सुरु केले. हॉटेल चालविता येईना म्हणून ते हॉटेल कोरडे नावाच्या माणसाला भाडयाने चालवायला दिले. परंतु कोरडे याने वडवली-कासार पोलीस ठाणे येथील पीआय कलगुटवारांशी संगनमत केले.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते ):** सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ पुढील घोषणा होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, श्री.कोरडे यांनी वडवली कासार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.कलगुटवार यांच्याशी संगनमत करुन हॉटेल मालक राजन माळी यास मारहाण करुन तेथे डान्सबार सुरु केला. त्या ठिकाणी मुलींना आणून मुलींना नाचवले जात आहे. मागील एक दीड वर्षापासून हे प्रकरण सुरु आहे. मी सी.पीं.कडे देखील तक्रार केली होती. आपण कुलगुटवारसारख्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? हा अधिकारी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम न करता स्वत:चे गैरव्यवहार जोपासण्यासाठी काम करीत आहेत. अशा अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित केले पाहिजे. हे कायद्याचे राज्य आहे हे त्यांना दाखवून देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माझ्या बीड जिल्ह्यात नेकलूर पोलीस स्टेशन आहे. त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत वडगाव येथील धाब्यावर राजरोसपणे वेश्याव्यवसाय चालत आहे. आपल्या जिल्ह्यात जसे कलाकेंद्र आहेत, त्याप्रमाणे वेश्याव्यवसाय केंद्र सुरु झाले आहे, ही अतिशय वाईट गोष्ट आहे. अशा कलाकेंद्रावर ट्रकचालक व इतर माणसे येऊन गावातील महिलांवर अत्याचार करीत असतील तर त्याचा दोष कोणाला द्यायचा ? आपणास या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी अत्यंत कडक भूमिका घेणे गरजेचे आहे. कोणी धाबा टाकून तेथे कलाकेंद्र उभारत असेल तर त्यावर बंधन घातले पाहिजे. अशाप्रकारे अनधिकृत वेश्याव्यवसाय करणाऱ्यांवर केस दाखल केली पाहिजे. मी हा विषय अनेक दिवसांपासून मांडत आहे. तरीही त्या संदर्भात केस दाखल करुन घेण्यात येत नाही. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या गोष्टीची दखल घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गृह विभागासाठी स्वतंत्र मंत्री असणे आवश्यक आहे. गृह विभागासाठी स्वतंत्र मंत्री असेल तर काही हरकत नाही. गृह विभागासाठी स्वतंत्र मंत्री असल्याचे फायदे आहेत तसेच त्याचे तोटे देखील आहेत आणि मी ते मागील चार वर्षापासून अनुभवले आहे. मी त्या गोष्टींचा चांगला साक्षीदार आहे. त्याबद्दल मी आता काही बोलत नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, मध्यंतरी एका नेत्याचे वक्तव्य आले. डॉ.दाभोळकरांच्या संदर्भात प्लॅन्चेट केले म्हणून पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. हे खरे कारण होते काय ? खरे कारण काही लोकांना पुण्याच्या आयुक्तपदी पोळ यांची नियुक्ती पाहिजे होती तर काही लोकांचा त्यास विरोध होता. यातून ती बदली झालेली आहे. गृह विभागाचा कारभार मुख्यमंत्र्यांकडे नसल्यामुळे असा प्रकार झालेला आहे. हौसिंग प्रोजेक्ट किंवा सीसीटीव्हीसारख्या प्रोजेक्टची जंत्री माझ्याकडे आहे, मी ती सर्व वाचून दाखवत नाही. मुख्यमंत्र्याकडे गृह विभागाचा कार्यभार नसल्यामुळे हे होऊ शकले नाही. संवेदनशील विषय हाताळण्यासाठी आणि त्यावर त्वरित निर्णय घेण्यासाठी गृह विभाग हा मुख्यमंत्र्यांकडे असल्यास त्याचे चांगले रिझल्ट पहावयास मिळतात. तेव्हा गृह विभाग मुख्यमंत्र्याकडे असणे ही चांगली बाब आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभाग स्वत:कडे ठेवला म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. त्या संदर्भात सदनात आणि सदनाच्या बाहेर कितीही टीका झाली तर त्यांनी त्यामध्ये बदल करु नये. आपणास राज्यातील बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था पूर्ववत आणावयाची असेल तर त्यासाठी कठोर निर्णय घ्यावे लागतील आणि कठोर निर्णय फक्त मुख्यमंत्री घेऊ शकतात. टीका करणाऱ्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. मी जास्त काही बोलत नाही. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

------------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी आपण मला संधी दिली त्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानते.

सभापती महोदय, मागील अडीच तासापासून कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार आणि अनुभव मांडले आहेत.

सभापती महोदय, दर दिवशी गुन्ह्याचे नवनवीन प्रकार उघडकीस येत आहेत. आजच लातूरच्या आश्रमशाळेत एका मुलीची झालेली आत्महत्या आणि त्या आश्रमशाळेतील दोन शिक्षक फरारी असणे अशी माहिती समोर आली आहे. दुर्गम भागात शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्या भागातील मुला-मुलींना शिक्षणासाठी आश्रमशाळांमध्ये पाठविले जाते. परंतु अशा आश्रमशाळांतून मुलींची हत्या आणि मुलींवर लैगिंक अत्याचार झाल्याचे प्रकार घडलेले आहेत.

सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात यवतमाळ जिल्ह्यातील दुर्गम भागात जवळपास 119 मुली कुमारी माता असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले होते आणि त्या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या देखील प्रसिद्ध झाल्या होत्या.

सभापती महोदय, तपोवन, अमरावती येथे बाल लैगिंक अत्याचार मोठ्या प्रमाणात झाले. तेथील अधिकाऱ्यांनी त्या मुलांनी तक्रार करु नये म्हणून त्यांच्यावर दडपण आणले असेही दृष्टीस आले होते.

सभापती महोदय, मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे दुर्गम भागात शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्या भागातील पालक आपल्या मुला-मुलींना शिक्षणासाठी आश्रमशाळेत पाठवितात. त्या मुला-मुलींवर अशाप्रकारे लैगिंक अत्याचार होत असतील तर त्यांना आश्रमशाळेत शिकण्यासाठी पाठवावयाचे किंवा नाही असा प्रश्न आपल्यासमोर आहे. आपण आश्रमशाळांवर इतका खर्च करुन त्याचा उपयोग काय होतो, असाही प्रश्न आपल्यासमोर उभा राहिलेला आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारची राष्ट्रीय बाल धोरण योजना आहे. आपल्या राज्यात ही योजना का राबविली जात नाही असा मला प्रश्न पडतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे....

सभापती महोदय, महत्त्वाचा मुद्दा असा की, राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडत असल्यामुळे पालकांना किंवा आई-वडिलांना असे वाटते की, आपल्या मुलीसाठी शाळा ही सर्वात जास्त सुरक्षित जागा आहे. परंतु आज त्याच शाळांतील शिक्षक किंवा मुलींची ने-आण करणाऱ्या वाहन चालकांपासून मुली सुरक्षित नाहीत, असे दिसून येते. आजच्या काळात असे आढळून येते की, अल्पवयीन मुलींपासून 60-70 वयापर्यंतची महिला असेल, घरकाम करणारी महिला असेल किंवा उच्चपदस्थ महिला अधिकाऱ्यापर्यंत, सर्वांनाच अत्याचाराला बळी पडावे लागत आहे. आपली मुलगी किंवा महिला दिवसा घराबाहेर पडल्यानंतर ती सुरक्षितपणे घरी परत येईल की नाही, याची भीती आई-वडिलांना किंवा महिलेच्या पतीला वाटत असते. महोदय, या पुरोगामी महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी किंवा महिला घरातून बाहेर पडताना आपली अब्रू हातात घेऊन बाहेर पडते. अशाप्रकारचा गंभीर प्रश्न या राज्यात निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पात महिलांच्या पर्सवरील करात कपात करण्यात आली आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देते की, महिला एका वर्षात एखादीच पर्स खरेदी करतात. ती पर्स घेऊन जेव्हा महिला घराबाहेर पडते तेव्हा तिच्या पर्समध्ये पैसे राहण्यासाठी तिची आर्थिक क्षमता वाढण्याबाबत या अर्थसंकल्पामध्ये कसल्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. याउलट पर्स घेऊन बाहेर पडलेल्या महिलेला आपली पर्स चोरीला जाईल याची भीती निश्चितपणे वाटत असते. कारण गेल्या चार महिन्यात मंगळसूत्र चोरीच्या, गळ्यातील चेन चोरीच्या आणि पर्स हिसकविण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडलेल्या आहेत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)**

महोदय, या ठिकाणी महिला अत्याचाराच्या घटनांबाबत बोलताना उल्लेख झाला की, हे प्रकार रोखण्यासाठी समाजातील पुरुष वर्गाने मदत केली पाहिजे. महोदय, महिलांवरील अत्याचाराच्या बहुतेक घटना वर्तमानपत्रातून उघडकीस येतात. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांच्या बाबतीत कोणी तरी तक्रार करेल याची वाट न पाहता, सुमोटो गुन्हा दाखल करून घेता आला पाहिजे, असे मी या निमित्ताने सुचविते.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे....

सभापती महोदय, राज्यात रेती माफियांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट सुरु आहे. कोकणपासून जालना जिल्ह्यापर्यंत किंवा संपूर्ण महाराष्ट्रात रेती माफियांची मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण झाली आहे. परंतु त्यांच्यावर नियंत्रण आणण्यात हे शासन पूर्णतः अपयशी ठरले आहे. त्यामुळे रेती माफियांवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर कारवाई केली पाहिजे, असे मला वाटते.

महोदय, राज्यात गुन्हे घडल्यानंतर, पुढील तपासासाठी काही नमुने फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविले जातात. मग त्यामध्ये हस्ताक्षर असेल, रक्ताचा नमुना असेल किंवा डीएनए ची बाब असेल. परंतु या नमुन्यांचा निकाल येण्यामध्ये दोन-तीन वर्षांचा काळ उलटतो. त्यामुळे गुन्ह्याची गंभीरता संपून जाते आणि पुरावे दुर्बल बनतात. माझी मागणी आहे की, फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविलेल्या नमुन्यांचा निकाल वेळेत आला पाहिजे.

महोदय, अल्पसंख्याकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नुकतीच पनवेलमध्ये एका चर्चवर दगडफेक करण्यात आली. असे प्रकार पूर्वी कमी होत असल्याचे आढळून येते. पण आज हे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरु झालेले आहेत. एका मुस्लीम मुलाला भर रस्त्यावर मारण्यात आले. नागपूरमध्ये सुध्दा अशा अनेक घटना घडल्या आहेत. माननीय गृह मंत्री नागपूरचे असताना सुध्दा त्या घटनांचा पुरेपूर परामर्श करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, शासनाच्या योजनांबाबत सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्रीमती विद्या चव्हाण यांनी आपली मते मांडली. मला वाटते महिलांच्या बाबतीत आपण लोकांची मानसिकता बदलली पाहिजे, किंबहुना समाजाचे प्रबोधन केले पाहिजे. मी निदर्शनास आणून देते की, महिलांवर अत्याचार करणारा पुरूष वर्ग असतो आणि अत्याचार सहन करणाऱ्या मुली-महिला असतात. मला वाटते त्यांचे समुपदेशन करण्यापेक्षा शालेय शिक्षणापासूनच अभ्यासक्रमामध्ये नागरिकशास्त्र विषयात शासनाचे महिला विषयक धोरण, महिला विषयक कायदे समाविष्ट केले तर योग्य होईल. नागरिकशास्त्र विषयाची व्याप्ती वाढवून त्यामध्ये या सर्व बाबींचा समावेश केला तर, विद्यार्थ्यांना आपल्या बहिणीचे, आईचे, बाजूला बसणाऱ्या मुलीचे काय अधिकार आहेत हे शालेय जीवनापासूनच समजेल. त्यामुळे शालेय जीवनापासूनच महिलांकडे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे....

बघण्याबाबत त्याची मानसिकता निर्माण होईल. मी तर म्हणेन की, नागरिकशास्त्र विषयाची व्याप्ती वाढवून हा विषय 100 गुणांचा करावा. जेणेकरुन, मुलांना महिलांप्रती आपले काय कर्तव्य आहे ते कळेल.

सभापती महोदय, महिला विषयक धोरण ठरविण्यासाठी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने महिला विषयक धोरण सरकारकडे सादर केलेले आहे. परंतु त्याचा कोठेही बोलबाला झाला नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, महिला व बालविकास विभागाकडून सदरहू महिला विषयक धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे ? एखाद्या समितीकडून अहवाल घेतल्यानंतर तो स्वत:कडे ठेवणे योग्य नाही. मी पुन्हा एकदा विनंती करते की, तो अहवाल जनतेच्या पुढे आला पाहिजे.

सभापती महोदय, राज्य सरकारकडून वारंवार सांगितले जाते की, राज्यामध्ये कन्व्हीक्शनचा रेट वाढला आहे. वास्तविक पाहता राज्यात कन्व्हीक्शनचा रेट नव्हे तर गुन्ह्यांचा रेट वाढला आहे. खरे म्हणजे राज्यात कन्व्हीक्शनचा रेट वाढला आहे हे जबाबदारीने बोलण्याचे कारण नाही. एखाद्या ठिकाणी आग लागली तर ती विझविण्यापेक्षा आग लावणारी आगपेटी लोकांच्या हाती जाऊ नये, या बाबतची खबरदारी शासनाने घेतली पाहिजे. राज्यात अधिकाधिक गुन्हे घडत असताना, कन्व्हीक्शनचा रेट वाढल्याचे सांगून राज्य सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. आपले राज्य पुरोगामी राज्य असून, या राज्यात गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मी तर म्हणेन की, गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने जागरुकपणे प्रयत्न केला पाहिजे. परंतु गेल्या चार महिन्यात गुन्ह्यांच्या प्रमाणावर नियंत्रण आणण्यात सरकार अपयशी ठरले आहे. त्यामुळे मी या शासनाचा निषेध करते.

महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करण्यापूर्वी एवढेच सांगते की, महिलांवरील, दलितांवरील, अल्पसंख्याकांवरील, शालेय मुलींवरील अत्याचाराच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा. अन्यथा, या सर्वांच्या विरोधात आम्ही निश्चितपणे रस्त्यावर उतरुन या घटनांचा मुकाबला करु.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे....

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानते व माझे भाषण संपविते.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या कायदा व सुव्यवस्थेवरील प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी, हात वर न करता मला संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या ठिकाणी म.वि.प. नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा सुरु आहे. अनेक मान्यवरांच्या भाषणातून राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत चर्चा झाली. महोदय, सभागृहामध्ये बसून राज्यातील संपूर्ण कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती जाणून घेण्यात आलेली आहे. या राज्याला तीन-तीन बलदार गृह मंत्री लाभलेले आहेत.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. प्रकाश गजभिये ....

सभापती महोदय, आपल्या राज्याला 3 बलदंड माननीय गृहमंत्री मिळाले आहेत, ते सक्षम आहेत. माननीय मुख्यमंत्री सुध्दा सक्षम आहेत. ते सक्षम असल्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्था अतिशय चांगली राहील असे वाटले होते. आघाडी सरकारच्या काळात गुन्हेगारी वाढली, तेव्हा त्या संदर्भात माननीय श्री. एकनाथराव खडसे, माननीय श्री. देवेंद्र फडणवीस, माननीय श्री. विनोद तावडे, माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेली भाषणे मी ऐकली. आता मी त्यामध्ये जाणार नाही. राज्यातील 11 कोटी 20 लाख लोकांच्या अपेक्षा होत्या की, आघाडी शासनाने काही केले नाही, आता युतीचे शासन करेल. आम्हाला सुध्दा त्या संदर्भात विश्वास होता. युतीचे शासन सत्तेत आल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेवर बोलण्याची वेळ येणार नाही एवढे सक्षम शासन राज्यात आणल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. गरिबांच्या, शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणारे सरकार आले आहे असे आम्हाला वाटले होते. परंतु आमचा भ्रमनिरास झाला आहे. खून की होली खेलने की तैयारी शुरू हो गयी. प्रत्येक ठिकाणी खून होत आहेत. कुठे ना कुठे काही ना काही घटना घडत आहेत. मनाला अत्यंत वेदना होत आहेत, त्रास होत आहे. आपण राज्य कुठे घेऊ चालला आहात, 31 राज्यांच्या स्पर्धेत राज्य कुठे आहे, 31 राज्यांचे माननीय मुख्यमंत्री कायदा व सुव्यवस्थेचे पालन कसे करतात हे आपण पाहिले पाहिजे. राज्यातील माणूस कोणत्याही परिस्थितीत पोळला, होरपळला, जळला जाऊ नये अशी इच्छा आहे. महिला भगिनींच्या किंकाळण्याचा आवाज मनापर्यंत येऊ नये अशा अपेक्षा तुमच्याकडून होत्या. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. राज्य में लोग खेल रहे हैं खून की होली और आँख मूंदकर देख रही है जनता भोली, क्योंकि सरकार ने अभी तक अपनी आँख नहीं खोली. इसकी वजह से दाभोलकर और पानसरे को देनी पड़ती है अपनी बली. सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून अपेक्षा होत्या, आज सुध्दा आहेत आणि उद्या सुध्दा राहणार आहे. आपण सत्तेत आहात. राज्य गुन्हेगारी मुक्त झाले पाहिजे. राज्य काँग्रेस मुक्त झाले पाहिजे असे आपले स्वप्न होते. मात्र राज्यातील 11 कोटी जनतेचे एकच स्वप्न होते की, प्रत्येक नागरिकाला त्याच्या हाताला काम मिळाले पाहिजे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

महिलांना सुरक्षा मिळाली पाहिजे आणि हे राज्य गुन्हेगारी मुक्त झाले पाहिजे. गरीब जनतेच्या सरकारकडून अपेक्षा होत्या.

सभापती महोदय, आपण राज्याला कोणते विचार देतो, कोणत्या विचारांमुळे राज्यात सुख शांती नांदेल हे पाहिले पाहिजे. राज्याने समृध्दीचा नारा दिला पाहिजे. प्रत्येक माणसाने सत्ताधारी शासनाच्या समर्थनार्थ बोलले पाहिजे असे शासनाने वागले पाहिजे. ज्या व्यक्तीचा संबंध कधीही पैशाशी, संपत्तीशी आला नाही त्याची हत्या होत आहे. मी विचारतो की, हत्या कोणाची होते, जो श्रीमंत, गर्भश्रीमंत, कोट्याधीश असेल अशा व्यक्तीची हत्या केली जाते. कॉ. पानसरे यांच्याकडे किती करोड रूपये होते, दाभोलकर यांच्याकडे किती करोड रूपये होते, ती किती करोडपती माणसे होती, गुन्हेगाराला त्यांना मारून किती करोड रूपये मिळाले असतील. राज्यातील जनतेला समानतेच्या मार्गाकडे नेणारे महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही सर्व माणसे काही खासदार किंवा प्रधानमंत्री नव्हती. त्या थोर व्यक्तींच्या विचारांना काळिमा फासण्याचे काम कोणती गुन्हेगारी यंत्रणा करीत आहे, कोणते गुन्हेगार या माणसांच्या विचारांना मूठमाती देण्याचा प्रयत्न करीत आहेत याचा विचार करणे गरजेचे आहे. आपल्याकडून तसे झाले नाही तर राज्य कोणाच्या हातात दिले आहे असा प्रश्न पडेल. राज्यातील माणूस दररोज जळत आहे, त्याला थांबविणे गरजेचे वाटते.

सभापती महोदय, माझ्या भगिनी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हण भाषण करताना विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य का चिडत होते ते कळत नाही. दिन दहाड़े हो रही हैं चोरी, तो भी सरकार की मुजोरी. सन्माननीय सदस्या त्यांचे विचार मांडत होत्या, माता-भगिनींवर होणारे अत्याचार मांडत होत्या. आपण ते ऐकून घेणे गरजेचे होते. कारण आपल्याला या संदर्भात उत्तर द्यायचे आहे. आपण या ठिकाणी आवाज दाबाल पण राज्यातील 11 कोटी 20 लाख लोकांचा आवाज दाबू शकत नाही. वस्तुस्थिती समोर आहे.

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या करीत आहे. आपण आत्महत्या बऱ्याच पाहिल्या असतील. करंट लागून मरण पावलेले, स्वतःच्या हाताने चिता रचून मरण पावलेले लोक पाहिले असतील. काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीने न्यायालयाच्या समोर आत्महत्या केली. आपण 31

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

राज्यांमध्ये आपले राज्य कुठे नेऊन ठेवत आहोत याचा विचार करणे गरजेचे आहे. संवदेनशील सरकार असले पाहिजे. आपल्या संवेदना मरण पावल्या आहेत का, जिवंत नाहीत का हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सभापती महोदय, इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून खाली फेकून मुलीची हत्या केली जाते. राज्यात 7-8 वर्षे वयाच्या मुलींवर बलात्कार करण्यात येत आहेत. आपण याचे उत्तर दिले पाहिजे. चर्चवर हल्ला झाला. अनेक ठिकाणी हल्ले होत आहे. कोणतेही ठिकाण सुरक्षित नाही. आपण असे कोणतेही ठिकाण दाखवावे जेथे भगिनींची अब्रू लुटली जात नाही. सर्वसाधारण माणसाला न्याय मिळाला पाहिजे. चर्चवर दगड मारून काय मिळणार आहे, आपण कोणते विचार संपवित आहोत ?

सभापती महोदय, मी आर.आर.पाटील यांचे आभार मानेन, त्यांनी अनेक योजना आणून राज्यातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचविल्या. 4 घरांचे खेडे असले तरी तेथे योजना पाोहचविण्याचे काम ज्या थोर महात्म्याने केले त्यांचे नाव आर.आर.पाटील आहे, त्यांनी महात्मा गांधी तंटा मुक्ती योजना आणली. सदर योजनेला गावापासून शहरापर्यंत प्रसिध्दी मिळाली. मी तंटा मुक्ती योजनेचा अध्यक्ष आहे असे म्हणण्याचा सन्मान आर.आर.पाटील साहेबांनी गावातील प्रत्येकाला दिला. एवढा सन्मान दिला की तेथील तंट्याची प्रकरणे कमी करण्याचा प्रयत्न त्या निमित्ताने झाला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

सभापती महोदय, आदरणीय स्व.आर.आर.पाटील यांनी डान्सबार बंदीचा एक क्रांतिकारक निर्णय त्यांच्या कार्यकाळात घेतला. अनेक महिलांचे कुंकू वाचविण्याचे, करोडो रूपये वाचविण्याचे, रात्री, बेरात्री होणारे खून, दरोडे, गुन्हे थांबविण्याचे कामही त्यांनी केले.

सभापती महोदय, हे सरकार स्व.गोपीनाथजी मुंडे साहेबांचे स्मारक उभारणार आहे, निश्चितपणे तसे स्मारक उभारले गेले पाहिजे. स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणार आहात, ते सुध्दा आम्हाला मान्य आहे. परंतु, स्व.आर.आर.पाटील साहेबांसारखे काम, त्यांच्या सारखा गृहमंत्री ना आज पर्यंत झाला आहे, ना आज आहे, ना भविष्यात होणार आहे. त्यामुळे त्यांचे सुध्दा स्मारक या राज्यात उभारले गेले पाहिजे. त्यांचे स्मारक या राज्यात उभारले गेले तर त्यांना खरी मानवंदना दिल्यासारखे होईल. त्यांनी या राज्यासाठी काय केले नाही ? त्यांनी कोणतीही कसर सोडली नाही. त्यांच्या कार्यकाळात खैरलांजी हत्याकांडातील आरोपींना शिक्षा झाली, मुंबईचा डॉन अरूण गवळीला जेरबंद केले गेले. या देशाचे संविधान बलशाली नसते तर संजय दत्त सारखा उच्चभ्रू कलाकार जेलमध्ये गेला नसता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे संविधान आपल्या देशाला दिले आहे. या कायद्यांची जर तुम्ही चांगली अंमलबजावणी केली तर या राज्याला स्थैर्य आणि शांतता प्राप्त होऊ शकते. हा देश एकात्म राहू शकतो.

सभापती महोदय, टोलमुक्त महाराष्ट्राबाबत आपल्या सरकारकडून लोकांच्या खूप अपेक्षा होत्या. पण या सरकारने सामान्य नागरिकांना न्याय मिळेल, अशी एकही योजना आणलेली नाही. राज्यात सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला. पूर्वीच्याच योजना आजही सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब तुम्ही या सरकारला चांगल्या सूचना केलेल्या दिसत नाहीत. मला माहीत आहे की, आपण स्व.आर.आर.पाटील साहेबांबरोबर नेहमी असायचा. त्यांच्या बंगल्यावर आम्ही आपल्याला अनेक वेळा बघितले आहे.

सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे नाही की, या राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि गृहमंत्री, या राज्याचे दोन्ही माननीय गृह राज्यमंत्री सक्षम नाहीत. मी त्यांची सक्षमता बजेटसारखी प्रश्न चिन्हांकित करणार नाही. परंतु, एक मात्र आपल्याला सांगेन की, या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

हत्या होत आहेत, आंतरजातीय विवाहामुळे ऑनर किलिंगसारखे प्रकार घडत आहेत, अनेक ठिकाणी सामाजिक बहिष्काराच्या घटना घडत आहेत, मागासवर्गीय लोकांना विहिरीतून पाणी घेऊ दिले जात नाही, एका आरती ठाकूर नावाच्या मुलीवर ॲसिड फेकले जात आहे. हे सर्व थांबले पाहिजे.

सभापती महोदय, एका गंभीर विषयावर चर्चा करीत असताना सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांना हसू येत आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना भाषण थांबविण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी 'हे सर्व थांबले पाहिजे', असे वक्तव्य केले. त्यामध्ये हसण्यासारखे काही नाही आणि तसे कुणीही हसलेले नाही.

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत ज्यांना बोलावयाचे आहे, त्यांनी बोलावे. त्यानंतर या प्रस्तावावर चर्चा होणार नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली राहिली पाहिजे. हे सरकार मुंबईमध्ये नाईट लाईफ सुरु करण्याविषयी चर्चा करीत आहे. यामुळे गुन्हेगारी वाढणार आहे. ही मुंबई चोवीस तास सुरु ठेवली तर अनेक गैरकृत्ये घडतील. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नगर जिल्ह्यामध्ये सत्तारूढ पक्षाच्या एका नेत्याचा वरदहस्त असलेल्या व्यक्तीने एका पोलिसाला जीवे मारले. लोकांचे रक्षण करणाऱ्यांनाच जर अशा प्रकारे जीवे मारण्यात येत असेल तर या राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली आहे, असे कोण म्हणेल ? महाराष्ट्राचा कारभार चालविणाऱ्या मंत्रालयाच्या नाकाखाली, मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये 12 किलो एमडी हे अमली पदार्थ सापडले, हे कशाचे द्योतक आहे ? निश्चितपणे या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला द्यावी लागणार आहेत.

सभापती महोदय, स्व.आर.आर.पाटील यांनी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले होते. त्यांनी त्या ठिकाणी पोलिसांसाठी 350 इमारती बांधण्याचा निर्णय घेतला. अशा

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिशन बाजोरीया)**

श्री.प्रकाश गजभिये......

काही अभिनव कल्पना या सरकारमधील मंत्र्यांनी आणल्या आहेत का, या बजेटमध्ये अशी कोणती योजना तुम्ही मांडली आहे का ? 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले', असे म्हटले जाते. आपल्याकडून आमची तशीच अपेक्षा आहे.

सभापती महोदय, गुन्हे दाखल झालेल्या अधिकाऱ्यांपैकी 17 अधिकाऱ्यांची प्रकरणे दोषारोप पत्र दाखल करण्याच्या मंजुरीसाठी सरकारकडे प्रलंबित आहेत. त्यांना कोण न्याय देणार आहे ?

सभापती महोदय, मुंबईच्या वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल इनडोअर स्टेडिअममध्ये दिनांक 20 डिसेंबर, 2014 रोजी 'एफ.आय.बी.नॉकआऊट', हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या राज्यामध्ये हे काय सुरु आहे ? तुम्ही या राज्याला विचारांची कोणती संपदा दिली आहे ? त्या ठिकाणी बीभत्स डान्स झाले, आणखीही काय काय झाले. त्यापैकी किती लोकांवर गुन्हे दाखल झाले ? गुन्हेगार कोणत्याही पक्षाचे नसतात. आता आपण सत्तेत आला आहात. आम्ही तुमचे अभिनंदन केले आहे. तुमच्याकडून या जनतेला काही अपेक्षा आहेत. या अपेक्षा पूर्ण झाल्या पाहिजेत, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या राज्यात पोलिसांच्या जागा रिक्त आहेत, त्या कधी पर्यंत भरणार आहात.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये...

सभापती महोदय, या राज्यात हिंदू, मुस्लिम, सिख, बौध्द, ईसाई हम सभी हैं भारतीय भाई-भाई, कोई हिंदू नहीं, कोई मुस्लिम नही, कोई ख्रिश्चन नहीं, कोई पारसी नहीं, हम सब लोग इन्सान है, भाई हैं. असे वातावरण या राज्यात निर्माण करावे. कोणताही गुन्हा घडू नये असे छातीठोकपणे या सरकारने सांगावे. आमचे राज्य आहे, आम्ही महाराष्ट्राला शाबूत ठेऊ, 31 राज्यापेक्षा माझे महाराष्ट्र राज्य चांगले ठेवू. कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवू. असे अभिवचन या सरकारकडून छातीठोकपणे दिले पाहिजे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जयभीम, जय महाराष्ट्र.

------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्था या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. तेच तेच विचार मांडून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. आतापर्यंत कोणीच न मांडलेले मुद्दे मी मांडणार आहे. माझी सरकारला विनंती आहे की, सरकार बदलले आहे. पूर्वीच्या सरकारने काय केले व हे सरकार काय करणार यामध्ये जाण्यात काही अर्थ नाही. प्रशासन तेच आहे, पोलीस तेच आहेत, चार महिन्यापूर्वी जे एसपी होते तेच एसपी आता आहेत. मला असे म्हणायचे आहे की, एखादी मशीन अनेक दिवस चालल्यावर ती नव्या मशीन प्रमाणे चालेल अशी अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. त्या मशीनला काही काळानंतर ओव्हरहॉलिंग करावे लागते. त्याप्रमाणे पोलीस खात्याचे ओव्हरहॉलिंग करायला पाहिजे असे माझे मत आहे. प्रत्येक विभागाच्या कामकाजाबाबत बोलत असताना भारत स्वतंत्र झाल्यानंतर इंग्रजांच्या काही पध्दती होत्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यामध्ये थोडा बदल झाला आहे. स्वातंत्र्यानंतर ज्या पध्दती आहेत, त्या अजून तशाच चालू आहेत. त्यामुळे त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीत बदल करणे आवश्यक आहे. त्या कशा बदलल्या पाहिजेत, त्याबाबत तज्ज्ञांकडून संशोधन करायला पाहिजे. सामान्य नागरिक पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर त्याला ज्या पध्दतीने पोलीस ट्रीटमेंट देतात, त्या पध्दतीत आता दोष दिसून येत आहेत. पोलीस स्टेशनचा फौजदार किंवा हवालदार स्वतःला सम्राट समजतो व मनचाहे कारभार करतो. बाहेरच्या माणसाला किती वेळ बसवावे, त्याची फिर्याद घ्यायची किंवा नाही, कोणाचा फोन आला तर तो घ्यावा किंवा नाही, याबाबत डिस्क्रीशनरी पॉवर असणारा अधिकारी तेथे पाहिजे. कोणाचाही फोन आला तरी ज्याच्यावर अन्याय झाला त्याला न्याय देण्याची प्रवृत्ती पाहिजे. परंतु तो अर्थकारणाशी व राजकारणाशी संबंधित असल्यामुळे त्या माणसाला तो अधिकारी न्याय देत नाही. त्यामुळे एकमेकांवर दोष देऊन ही सिस्टिम दुरूस्त होणार नाही. यामध्ये संशोधन करुन आवश्यक ते बदल करण्यात येणार आहे काय ? असा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस विभागाची इज्जत व दहशत आहे, काही जांबाज अधिकारी आहेत, जांबाज अधिकाऱ्याच्या पाठीवर थाप मिळत नाही. वरिष्ठ अधिकारी चुकीचा मार्ग पत्करीत असेल तर खालील सर्व प्रामाणिक अधिकाऱ्यांना त्याचा त्रास होतो. नाइलाजाने त्या अधिकाऱ्यांना देखील चुकीचे काम

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर...

करावे लागते. सदरक्षणाय व खलनिग्रहणाय हे पोलिसांचे ब्रीद वाक्य आहे. दुष्टाचा नाश करणे व सज्जनांना संरक्षण देणे हे पोलिसांचे काम आहे. हे नीट तपासून पाहून सदरक्षणाय व खलनिग्रहणाय होते काय, जास्त बोलण्यापेक्षा जे अन्याय करतात त्यांना पकडले पाहिजे व त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. आपण असे धोरण ठरविले आहे की, 100 गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये. या त्रुटीचा फायदा घेऊन अनेक लोक सुटून जात आहेत. मी असे का वागतो, मी असे कपडे का घालतो, मला लहानपणी जसे शिकविले, शाळेतील शिक्षकांनी जसे शिकविले, त्या बाबींचा माझ्यावर प्रभाव आहे, ज्या भाषेत शिकविले त्या भाषेचा माझ्यावर प्रभाव आहे. ज्या लोकांमध्ये मी राहिलो त्या लोकांचा माझ्यावर प्रभाव आहे. माझ्या बोलण्यातील व वागण्यातील भाषा व माणुसकी त्या प्रमाणे मी आहे. पोलिसांनी कसे वागावे याबाबत सरकारने प्रबोधन केले पाहिजे. काही पोलीस असे म्हणतात की, कसे वागावे याबाबत आम्हाला माहिती नाही. आम्हाला तसे कोणी शिकविलेच नाही. पोलिसांनी नीट वागावे असे सरकारला वाटत असेल तर सरकारने पोलिसांचे प्रबोधन केले पाहिजे. त्यांना चांगल्या प्रकारे ओव्हर हॉलिंग केले पाहिजे. गाडीला मध्ये मध्ये ओव्हरहॉलिंग केल्याशिवाय ती चांगली चालत नाही. आपण देखील थोडी विश्रांती घेतल्यावर पुन्हा आपणाला ताजेतवाने वाटते, तसा हा प्रकार आहे. असा काही बदल करता येईल काय, असे मी इतरांपेक्षा थोडे वेगळे सांगत आहे.

सभापती महोदय, आता अलीकडील काळात नीती चारित्र्याचे शिक्षण दिले जात नाही. मंत्री बदलले, मंत्र्यांचा मला फोन आला होता, मग आम्ही तरी काय करणार, असे पोलिसांचे बोलणे असते. या बोलण्याला काही अर्थ नसतो. कोणाचाही फोन आला तरी तुझी नीतीमत्ता काय आहे, तुझे चारित्र्य काय आहे, तुझी ड्यूटी काय आहे, आपण कोणाचा पगार घेतो. आपण कोणाचे संरक्षण केले पाहिजे. याबाबत पोलिसांचे प्रबोधन केले पाहिजे. नीती, चारित्र्य याचे देखील प्रशिक्षण दिले पाहिजे. मंत्री महोदय म्हणतील की हे आमचे काम आहे काय ? शासनातील सर्व यंत्रणा दुरूस्त करायची असेल तर ही कामे शासनाला करावी लागतील. मानसिकता हा मोठा भाग आहे. बलात्काराचा गुन्हा घडल्यानंतर जालना येथे लगेच कारवाई होते, पण तोच गुन्हा कोल्हापूर येथे घडला तर लगेच कारवाई होत नाही. गुन्हेगार असे समजतो की, तेथे गुन्हा घडला तर काही होत नाही त्यामुळे येथे गुन्हा केला तर काय होईल. एकाच टाईपचे मनी सर्क्युलेशनच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर...

गुन्ह्याबाबत काही जिल्ह्यात कारवाई होते तर काही जिल्ह्यात कारवाई होत नाही. यापेक्षा देखील मोठ्या गुन्ह्यामध्ये कारवाई होत नाही. गृह मंत्री महोदयांनी याकडे लक्ष द्यावे. एकाच प्रकारच्या गुन्ह्यात एका जिल्ह्यात कारवाई होते व दुसऱ्या जिल्ह्यात कारवाई होत नाही. मग तो गुन्हेगार दुसऱ्या जिल्ह्यात गुन्हा करण्यासाठी जातो. आताच सांगितले की, कॉ.पानसरे यांचे गुन्हेगार कर्नाटक मध्ये गेले असावे कारण मोटरसायकल तेथे सापडली आहे. मंत्री महोदय म्हणतात की, पंतप्रधानांबाबत बोलू नका. देशाचा विषय येथे काढायचा नाही. देशाच्या गृह खात्याचा या बाबीशी संबंध आहे. आपल्या गृह खात्याचा देशाच्या गृह खात्याशी संबंध आहे. महाराष्ट्र हे देशातील संघ राज्य आहे. उपहासाने बोलू नये हे खरे आहे. महाराष्ट्रातील गुन्हेगार कर्नाटकात गेले असतील तर केंद्राच्या गृह खात्याची मदत घ्यावीच लागेल, त्यामध्ये काय गैर आहे ?

सभापती महोदय, एका बाजूला शासन दारुबंदी करते व दारु पिण्याचे लायसन्स देते या दोन्ही गोष्टी कशा काय चालतील. गुटखा बंदीबाबत शासनाचे धोरण चांगले असले पाहिजे. गुटखा मोकळा होता तेव्हा इतका विकला जात नव्हता. गुटखा बंदी केल्यामुळे तो कोठे मिळतो कोणाच्या दुकानात मिळतो हे आमदार, खासदार व सर्व जनतेला यांची चांगली माहिती आहे. 15 रुपयांचा पुडा 95 रुपयांना मिळतो. बंदी घातल्यामुळे त्याचे दर वाढले आहेत, पूर्वी एक पुडी घेणारा आता दहा पुड्या घेऊन ठेवतो, पुन्हा मिळतो किंवा नाही याची शाश्वती नसते. याबाबत देखील संशोधन झाले पाहिजे. गुटखा बंद करुन नेमके काय केले. फक्त वाटा बंद केल्या आहेत. दार मोकळे आणि मोरीला बोळा, असे काम केले आहे, दारातून कितीही पाणी येऊ द्या, असा प्रकार सर्वच क्षेत्रात चालला आहे असे मला वाटते. हे सर्व प्रकार थांबावे यासाठी प्रामाणिकपणे कारवाई केली पाहिजे. जे पोलीस कामात कसूर करतात, पैसे खाऊन चोरांना सोडून देतात, त्यांना कठोर शिक्षा केली पाहिजे, यामध्ये नैतिकता पाहिजे. पोलिसांचे प्रबोधन व प्रशिक्षण झाले पाहिजे. यासाठी वेगळी यंत्रणा उभी करावी लागेल. नैतिकता पाळली पाहिजे, आपणाला घरी शिकविले जाते की, लबाड बोलायचे नाही. मी लबाड बोलणार नाही, मला तसे शिकविले आहे. सर्व लोक सारखे असतील तर यात सुधारणा होणार नाही. पोलीस कॉन्स्टेबलच्या लॉकरमध्ये 12 किलो अंमली पदार्थ सापडला आहे, त्यामध्ये कोणी तरी सामील असेल, आज वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर...

याबाबत आयुक्तांची चौकशी सुरु झालेली आहे. अशा प्रकारे वेगळ्या पध्दतीने या गुन्ह्यांकडे पाहिले पाहिजे, असे माझे प्रामाणिक मत आहे. त्या दृष्टीने मी मांडलेल्या मुद्यांचा विचार शासनाने करावा, त्या प्रमाणे यंत्रणा निर्माण करुन गुन्हेगारांवर आळा घालण्याचा प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. जयहिंद.

-----------

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात निर्माण झालेली भीषण परिस्थिती या विषयावर म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यात कायदा व सुव्यवस्थेची किती दारूण परिस्थिती आहे, या संदर्भात भाष्य केलेले आहे आणि त्या संदर्भात अनेक उदाहरणे देखील दिलेली आहेत. मी सभागृहाला राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात वेगळी माहिती देऊ इच्छितो. या सर्व गोष्टी घडत असल्यामुळे राज्यातील जनतेच्या मनामध्ये उद्रेक निर्माण होत आहे आणि त्याची परिणती आता समोर येत आहे.

सभापती महोदय, दिनांक 9 फेबुवारी, 2015 रोजी विरार (पूर्व) भाटपाडा येथे चोरीच्या आरोपाखाली जमावाने एका माणसाला पकडले आणि त्या जमावाने त्याला एवढी मारहाण केली की, त्या माणसाचा तेथेच मृत्यू झाला. ही एकमेव घटना नसून मागील 2-3 महिन्यात त्या परिसरात अशा 4-5 घटना घडलेल्या आहेत. म्हणजे आता लोकांचा संयम सुटत चालला आहे आणि शासनाला याबाबतीत गंभीर विचार करावा लागणार आहे. शासनाला या संदर्भात योग्य ती पावले उचलावी लागणार आहेत. लोक त्रस्त झालेले आहेत आणि त्याची अनेक उदाहरणे आहेत. मी आपल्याला त्या परिसरातील काही उदाहरणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, विरार, वसई आणि पालघर भागामध्ये जानेवारी महिन्यात चड्डी-बनियान गँग निर्माण झाली आणि त्या गँगने पहिल्या, दुसऱ्या आठवड्यामध्ये धुमाकूळ घातला. त्या गँगने तळ्याचा पाडा, खर्डी कोशिंबी, वैतरणा, फणसपाडा, दहिसर, जांभुळपाडा या परिसरात दरोडे टाकून धुमाकूळ घातला. मध्यंतरी त्या ठिकाणी ज्वेलर्सवर देखील दरोडे पडले. गुढी पाडव्याच्या दिवशी कंचन ज्वेलर्सवर दरोडा पडला. मागील 2-3 महिन्यात त्या भागातील ओंकार ज्वेलर्स, मंगलमूर्ती ज्वेलर्स, ओमसाई ज्वेलर्सवर दरोडे पडले, दुकाने लुटली गेली. ज्वेलर्सच्या दुकानांवर दरोडा टाकून लाखो रूपयांचा माल लुटला जात आहे.

सभापती महोदय, पालघरच्या मासवंड भागामध्ये एकाच दिवशी 9 घरांवर दरोडा टाकला जातो. तेथील मंदिर देखील लुटले जाते. दरोडा टाकून लाखो रूपयांचा ऐवज चोरीला जातो,

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर........

लोकांना मारहाण केली जाते. या सर्व प्रकारांमुळे आता लोकांचा संयम सुटत चालला आहे. आता पोलीस कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सांभाळू शकत नाहीत. त्यामुळे आम्हालाच कायदा हातात घ्यावा लागेल, असे लोकांना वाटते. त्याचा परिणाम असा होतो की, त्यांच्याकडून इतर लोकांवर देखील हल्ले होत आहेत. कोण त्यांच्या तावडीत सापडेल आणि त्यांच्यावर केव्हा हल्ला होईल, हे सांगता येत नाही. दुसऱ्या बाजूला पोलीस आम्ही काही तरी कारवाई करीत आहोत, असे दाखविण्याचा प्रयत्न करतात.

सभापती महोदय, जव्हार तालुक्यातील विनवळ गावातील नवसू खुताडे नावाच्या आदिवासी माणसाला पोलिसांनी पकडले. त्याच्यावर चोरीचा आळ होता, म्हणून त्याला पकडून बेदम मारहाण करण्यात आली. त्याची धिंड काढण्यात आली. त्या मारहाणीमुळे, धिंड काढल्यामुळे त्याला मानसिक दु:ख झाले आणि त्या आदिवासी माणसाने आत्महत्या केली. असे प्रकार सर्रासपणे त्या भागात होत आहेत. आता त्या भागातील लोकांचा संयम सुटत चालला आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य वाळू माफियांच्या संदर्भात बोलले. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सिळसाट फाटा आहे. तेथून ठाणे, भिवंडी, कल्याण, मुंबई आणि उपनगरामध्ये वाळूच्या गाड्या जातात. तहसील विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी तेथे हप्ते घेतात आणि तेथून मोठ्या प्रमाणावर चोरीच्या वाळूची वाहतूक होते. दिनांक 20 मार्च, 2015 रोजी घडलेली घटना मी सांगू इच्छितो. श्री.माणिक महाले व श्री.हेमंत ठाकरेकर हे तलाठी आणि त्यांच्या बरोबर असलेले मंडल अधिकारी यांच्या अंगावर रेती माफियांनी अक्षरश: त्यांची गाडी चढविली. त्या घटनेतून ते कसेबसे वाचले, त्यांना मारहाण करण्यात आली. आज पर्यंत त्या वाळू माफियांना पकडण्यात आलेले नाही. म्हणजे एवढे देखील संरक्षण महसूल विभागाच्या वरिष्ठांकडून किंवा पोलिसांकडून त्यांना दिले जात नाही. मग अशा पद्धतीने जर त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी हातात हात घालून काम करीत असतील तर तेथील वाळू माफियांवर कारवाई कोण करणार आहे ? वरिष्ठ अधिकाऱ्यांची, गृह विभागाची मानसिकता असेल तर स्थानिक

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर........

पातळीवरील सर्व गोष्टी सुरळीत होऊ शकतात. मी ठाणे जिल्ह्यात फिरतो. मला तेथील परिस्थितीची माहिती आहे. काही वर्षापूर्वी स्थानिक पातळीवरील एपीआय लेव्हलच्या अधिकाऱ्याच्या हातामध्ये सर्व सूत्रे होती. जिल्ह्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना कोणती क्रिम पोस्टिंग द्यावयाची आणि कोणती पनिशमेंट पोस्टिंग द्यावयाची, हे तो ठरवित होता. आज असे होते असे मी म्हणत नाही. मी कोणावर आरोप करीत नाही. तेथील वरिष्ठ अधिकारी पालघर जिल्ह्यात आहेत. त्या अधिकाऱ्यांना असे वाटत असेल की, आम्ही पूर्वी आदिवासी भागामध्ये अतिशय चांगले काम केलेले आहे आणि आता आम्हाला पनिशमेंट पोस्टिंग मिळालेली आहे. असे असेल तर मग आपण त्यांच्याकडून कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत कोणती अपेक्षा ठेवू शकतो. मी सांगू इच्छितो की, ज्या काही घटना घडत आहेत त्यावर शासनाने वरिष्ठ पातळीवरुन नियंत्रण ठेवले पाहिजे. या सर्व गोष्टी ॲक्सेप्टेड नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, ते कोणाच्याही जवळचे असले तरी त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे जर आपण करु शकतो तर यामध्ये सुधारणा होऊ शकेल. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आता तरी शासनाने डोळे उघडावेत आणि राज्यातील जी कायदा व सुव्यवस्था बिघडत चालली आहे त्याकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, आता आपण सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-15 मांडणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, काल हे विधेयक सभागृहात मांडण्यात आलेले आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे. त्यामुळे हे विधेयक उद्या घेण्यात यावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता माननीय विरोधी पक्षनेते देखील सभागृहात उपस्थित नाहीत. हे विधेयक उद्या घेण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हे विधेयक मंजूर करण्याबाबतचा विषय नाही. आम्हाला या विधेयकावर बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांना उद्या या विधेयकावर बोलण्यासाठी वेळ द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : हे विधेयक उद्या घेण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर दोन-तीन सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे सभागृहाची वेळ अर्ध्या तासाने वाढविण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ रात्री 7.00 वाजेपर्यंत आहे. आपण 15 मिनिटे सभागृहाची वेळ वाढवू या.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, नियमानुसार म.वि.प. नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चा अडीच तासाची असते. अडीच तासाच्या चर्चेतील निम्मा वेळ विरोधी पक्षाला आणि निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाला दिला जातो. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3.30 वाजता सुरु झालेली आहे. या प्रस्तावावर आज साडेतीन तास चर्चा झालेली आहे आणि अगोदर जवळपास साडेतीन ते चार तास चर्चा झालेली आहे. आपल्याला आणखी 2-3 प्रस्तावांवर चर्चा करावयाची आहे. या प्रस्तावावरील चर्चेसाठी किती

.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर........

वेळ द्यावा, हे आपण ठरविले पाहिजे. मला माहिती आहे की, सभागृहात विरोधी पक्षाची सदस्य संख्या जास्त आहे. माननीय विरोधी पक्षनेते या प्रस्तावावर 1 तास बोलले. या प्रस्तावावर सहा ते साडेसहा तास चर्चा झालेली आहे. आपण चर्चेसाठी वेळ ठरवून द्यावी. परंतु अगोदर बोलणारे सदस्य जर एक-एक तास बोलले तर इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो. त्या त्या पक्षाच्या गट नेत्यांनी आपल्या पक्षाचे किती सदस्य बोलणार आहेत, किती वेळ बोलणार आहेत, हे ठरवून दिले पाहिजे. या प्रस्तावावर 7 तास चर्चा झालेली आहे आणि आता आपण पुन्हा वेळ वाढविण्याची मागणी करीत आहात. ही चर्चा संपल्यानंतर मुख्यमंत्री महोदय या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देणार आहेत. त्यांच्या उत्तरासाठी जवळपास 1 तास लागेल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाची वेळ अर्ध्या तासाने वाढविण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर बोलण्यासासाठी आता माझ्याकडे सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे आणि अनंत गाडगीळ यांची नावे आहेत. श्री.माणिकराव ठाकरे साहेब, आपण या प्रस्तावावर बोलणार आहात काय ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांना बोलण्याची परवानगी द्यावी. मी या प्रस्तावावर शेवटी बोलणार आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी आपले भाषण सुरु करावे.

-------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावरील प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याला वैचारिक परंपरा आहे. कै.यशवंतराव चव्हाण यांच्या काळात नाशिक येथे काँग्रेसचे ऐतिहासिक शिबिर झाले होते. त्या शिबिरात कै.वि.स.पागे यांची रोजगार हमी योजना मांडली गेली.

**तालिका सभापती :** अजून चार सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलायचे असल्यामुळे सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 7.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.अनंत गाडगीळ : ही महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना संपूर्ण देशाने स्वीकारली. महाराष्ट्राची वैचारिक परंपरा संपूर्ण देश स्वीकारतो हा इतिहास आहे. महाराष्ट्रात मतभेद झाले. टिळक व आगरकरांपासून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील आचार्य अत्रे, स.का.पाटील यांच्यातही मतभेद झाले होते. आज या महाराष्ट्रामध्ये विरोधकांना विरोधी व्यासपीठावरुन उत्तर देण्याऐवजी बंदुकीच्या गोळीने उत्तर दिले जाते. महाराष्ट्राच्या परंपरेला काळिमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. गेल्या आठवड्यात हा प्रस्ताव चर्चेला आला त्यावेळी मी इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्रातील रिबेरो यांचे आर्टिकल वाचत होतो. स्वतःच्या राज्यात एका निवृत्त पोलीस महासंचालकाला असुरक्षितता वाटते. पंजाबमध्ये त्यांनी अतिरेक्यांना कंठस्नान घातले. महाराष्ट्रात अत्यंत चांगली कामगिरी केली, असे निवृत्त पोलीस प्रमुख म्हणतात, माझ्याच देशात मला असुरक्षितता वाटते.

सभापती महोदय, मुंबईपासून सुरुवात करु. पनवेल येथे चर्चवर हल्ला करण्यात आला. लोणावळयाला मुलीवर बलात्कार झाला. पुण्यामध्ये सरस्वती मंदिर नावाच्या संस्थेमध्ये एका महिला शिक्षिकेने प्राचार्याविरुध्द नको अशा भाषेत तक्रार दिली. त्याचे उत्तर असे देण्यात आले की, कार्यकारी मंडळाच्या बैठकीत प्राचार्याची या प्रकाराबद्दल कानउघाडणी करण्याचा निर्णय घेतला आणि त्या शिक्षिकेला नुकसान भरपाई देण्याचा ठराव झाला. कारण ते प्राचार्य सत्तेवर असलेल्या व्यक्तीच्या वैचारिक पठडीतील असून त्यांची विचारसरणी आताच्या सत्ताधाऱ्यांप्रमाणेच आहे, म्हणून तसा निर्णय घेण्यात आला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO.2

SGB/ 19:00

श्री.अनंत गाडगीळ.....

सभापती महोदय, नालासोपारा येथे काय झाले? या ठिकाणी अनेक माननीय महिला सदस्यांनी बलात्काराचा विषय मांडला मी एक सर्वे वाचत होतो. मला वाचून धक्का बसला. त्या सर्वेमध्ये या देशात सगळ्यात जास्त महिलांवर अत्याचार होणाऱ्या राज्याची क्रमवारी दिली होती. पहिल्या क्रमांकावर मध्य प्रदेश, दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र आणि तिसऱ्या क्रमांकावर राजस्थान राज्य आहे. या राज्यांमध्ये कोणाची राजवट आहे? राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या तीनही राज्यांमध्ये आमच्या पक्षाची राजवट नाही. या राज्यामधील महिलांवरील अत्याचाराची संख्या सर्वाधिक आहे. आम्ही सत्ताधारी पक्षात असताना आमच्यावर टीका केली जात होती. कल्याणच्या घटनेबद्दल कोणीच बोलले नाही. कल्याणमधील तरुण आयएसआयला सामील होतात आणि राज्याला कळत नाही. राज्याच्या गृह खात्याकडे त्याबद्दल काहीच अहवाल नाही. आपली मुले कुठे गेली याची त्यांच्या आई वडिलांना माहिती नाही. तेव्हा शासनाच्या ही गोष्ट लक्षात येते. मुले कुठे आहेत याचा शोधाशोध केल्यानंतर कळले की, ही मुले इराकमध्ये गेली आहेत.

सभापती महोदय, मी दोन दिवसापूर्वी एका मुद्यावर बोललो होतो. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पोलीस प्रमुख दररोज सकाळी राज्याच्या परिस्थितीबद्दल ब्रिफिंग देत असतात. राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुख्यमंत्री यांची महिनाभरात भेट झालेली नाही. जॉईंट कमिशनर ऑफ पोलीस (क्राईम) हे पद भरण्यास दीड ते दोन महिन्याचा कालावधी लागला. मी समजू शकतो की, मुख्यमंत्र्यांना बऱ्याच अडचणी आहेत. कोणता बंगला कोणत्या मंत्र्यांना द्यायचा यामध्ये एक महिना गेला. अनेक गोष्टी समोर आल्या म्हणून कदाचित निर्णय घेता आला नसावा.

सभापती महोदय, मी तीन महत्वाच्या प्रश्नांबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. सायबर क्राईमच्या विषयावर मी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली होती. टोलच्या प्रश्नावर पत्र लिहूनही मला उत्तर आले नाही. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात पाठविलेली पत्रे त्यांच्यापर्यंत पोहोचतात की नाही अशी शंका यायला लागली आहे. माननीय महसूल मंत्री या ठिकाणी उपस्थित असते तर मी विचारणा केली असती की, आमच्या पत्रावर उत्तर यायला ते पत्र सहाव्या मजल्यावर जाईपर्यंत आम्हाला वाट बघावी लागेल का?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, अँटी करप्शन विभागाकडून शासनाला अहवाल देण्यात आला. 150 अधिकाऱ्यांवर आरोप सिध्द झालेले आहेत, असे असूनही हे अधिकारी अद्याप शासनाच्या सेवेत आहेत. त्यांच्यावर कारवाई का झाली नाही, हा सुध्दा कायदा व सुव्यवस्थेचाच एक भाग आहे.

...3...

26-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO.3

SGB/ 19:00

श्री.अनंत गाडगीळ.....

ज्यावेळी आम्ही सत्तेवर होतो त्यावेळी सातत्याने तत्कालीन विरोधी पक्षाकडून समुद्र किनाऱ्यावरील सुरक्षेचा विषय उपस्थित केला जात होता. गिरगाव चौपाटीवर बंद पडलेल्या बोटींचे चित्र दाखविले जायचे. दूरदर्शनवर पक्षाचा प्रवक्ता म्हणून बाजू घेताना तत्कालीन विरोधी पक्षातील लोक माझ्यावर अटॅक करायचे. आज काय परिस्थिती आहे? या बोटीमध्ये भरायला डिझेल नाही म्हणून बोटी उभ्या करुन ठेवल्या आहेत. वृत्तपत्रात देखील बातमी आली आहे. महाराष्ट्राला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी फक्त 40 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 720 कि.मी.च्या सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी जेमतेम 40 कोटी रुपये मंजूर करीत आहात. आज अनेक गुन्हयांचा शोध लागत नाही अशी स्थिती आहे. न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेतील 80 पदे अद्याप भरली गेलेली नाहीत. पोलीस विभागातील 2.11 लाख मंजूर पदांपैकी 2.07 लाख पदे भरली गेली आहेत. 9600 पोलीस उप निरीक्षकांच्या मंजूर पदांपैकी 7000 पदे भरली गेली आहेत. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या 47 मंजूर पदांपैकी 7 ते 8 पदे भरावयाची आहेत. 2300 पोलीस हवालदारांची पदे रिक्त आहेत. पोलीस विभागात एवढ्या मोठया प्रमाणात पदे रिक्त असतील, न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेतील पदे रिक्त असतील तर गुन्हयांचा शोध कसा लागेल?

सभापती महोदय, पुण्यामध्ये माजी गृहराज्यमंत्र्यांनी मोर्चा काढण्यासाठी पोलीस खात्याकडे परवानगी मागितली. त्यांना केंद्र शासनाच्या भूमी अधिग्रहण कायद्याविरुध्द आंदोलन करावयाचे होते. त्यांना ज्या अटीवर मोर्चा काढण्यास परवानगी देण्यात आली त्यातील एक अट अत्यंत महत्वाची आहे. मोर्चामध्ये जनावरे असता कामा नये, ही अट होती. आम्ही कॉंग्रेस पक्षाचे लोक मोर्चामध्ये जनावरे आणतो का? केंद्र सरकारच्या लॅण्ड रिफॉर्म्स धोरणाच्या विरोधात मोर्चा काढत आहोत. पोलीस खात्यामध्ये काय चालले आहे हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. काल त्यांचे आई वडील सभागृहाच्या गॅलरीत कामकाज पाहण्यासाठी उपस्थित राहिले होते. त्यांच्याबद्दलची बातमी वाचल्यानंतर मला समाधान वाटले. मंत्री महोदयांनी चांगले काम केले, त्यांना काल बोलावले. आज बोलावले असते आणि गॅलरीत बसून त्यांनी आजची या प्रस्तावावरील चर्चा ऐकली असती तर घरी गेल्यानंतर ते म्हणाले असते, लेकरा कुठे रे नेऊन ठेवला महाराष्ट्र! एवढे बोलून मी माझे भाषण वेळेअभावी पूर्ण करतो.

-------------

नंतर 2पी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये सोनसाखळी चोरण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यासंबंधी मी आवाज उठविला होता. याबाबत एका वाहिनीवर माझी मुलाखत घेत असताना पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, गुन्ह्याची उकल न होण्याचे मुख्य कारण कर्मचारी नसणे व अपुरा निधी असणे हे आहे. पोलिसांकडे पुरसे मनुष्यबळ नसेल तर ते गुन्ह्यांची उकल करू शकणार नाहीत. त्यामुळे आज पोलिसांची दहशत राहिलेली नाही. मी सर्वच पोलिसांना दोष देत नाही. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मी येथे काही सूचना करणार आहे. डोंबिवली येथे एका महिलेवर वर्षभर बलात्कार करण्यात आला व तिला ब्लॅकमेलिंग करण्यात आले. ही तक्रार एका महिला पोलिसांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्या विरूद्ध केलेली आहे. पोलीस हे समाजाचे रक्षण करण्यासाठी आहेत. त्यांच्यावर महिलांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे. तेव्हा असे जे अधिकारी डिपार्टमेंटमध्ये नेमले आहेत त्यांचा शासनाने विचार केला पाहिजे. महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यात आपल्या राज्याचा देशात प्रथम क्रमांक आला आहे. तेव्हा पोलीस डिपार्टमेंटमध्ये आवश्यक तो बदल करणे आवश्यक आहे. मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यामध्ये 12 किलो एमडी ड्रग्ज सापडले आहे. आपल्याकडे सीआयडी खाते आहे, आयबी आहे. पोलीस स्टेशनमध्ये 12 किलो एमडी ड्रग्ज ठेवले आहे हे मला पटत नाही. यात इतर काही अधिकाऱ्यांचा समावेश आहे काय हे देखील पाहिले पाहिजे. पोलीस विभागामध्ये अशा प्रकारचे जे काही वेगळ्या वृत्तीचे अधिकारी कर्मचारी असतील त्यांची सीआयडी मार्फत पुन्हा चौकशी करायला पाहिजे. तसेच आज पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये आजाराचे प्रमाण देखील वाढत आहे. तेव्हा त्यांना काही तरी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. आज पोलीस विभागामध्ये मनोविकृत्तीचे लोक शिरले आहेत काय हे देखील पाहिले पाहिजे. भ्रष्टाचार हा देखील एक भाग आहे. त्यातून देखील त्यांना मुक्त करणे गरजेचे आहे. आज त्यांचे मनोबल वाढविणे हे देखील गरजेचे आहे. पोलीस आज समाजाचे रक्षण करीत आहे त्यांना जे जे पाहिजे ते ते दिले पाहिजे. त्यांना घर, भत्ता, पगार हे सर्व काही दिले पाहिजे. आपण पोलिसांच्या कामाच्या वेळा पहाव्यात. 24 तास कोणीच काम करू शकत नाही. मनुष्य हा 8 तास, 10 तास, 12 तास काम करूशकतो. पण पोलीस आज 24-24 तास काम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे...

करीत आहेत. त्यामुळे आज त्यांच्या मानसिकतेकडे पाहणे आवश्यक आहे. असे असताना आज आपण त्यांच्याकडून रिझल्टची अपेक्षा करणे हे काही सयुक्तिक नाही. त्यांच्या कामाच्या वेळा आपण ठरविल्या पाहिजेत. त्यांना व्यवस्थित सुट्टया द्याव्यात. पोलिसांची अनेक मुले आज गुन्हेगारीमध्ये शिरलेली आहेत हे उघड सत्य आहे. पोलीस आपल्या घराकडे व्यवस्थित लक्ष देत नाही म्हणून त्यांची मुले गुन्हेगारी जगताकडे वळलेली आहेत. काही पोलिसांनी एन्काऊंटर केले म्हणून त्यांची चौकशी झाली. त्यांचे मनोबल तोडण्यात आले. पोलिसांचा दरारा वाढवायचा असेल तर त्यांना पाठिंबा देणे गरजेचे आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांच्या मागे शासन खंबीरपणे उभे राहिले तर पुन्हा एकदा त्यांची शान आणि मान वाढल्याचे दिसून येईल. संपूर्ण् देशात आपल्या पोलिसांचा प्रथम क्रमांक लागतो. आपण पोलिसांना पाठबळ दिले तर राज्यात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल एवढे मी या प्रस्तावाच्या निमित्ताने सांगून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हा प्रत्येक अधिवेशनामध्ये चर्चेला येतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी कायदा व सुव्यवस्थेवर आपल्या व्यथा मांडल्या आहेत. त्यांनी अतिशय सुरेख असे विषय येथे मांडलेले आहेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आम्ही तर बोलतोच आहोत पण राज्याचे निवृत्त पोलीस महासंचालक श्री.रिबेरो साहेब पण बोलतात की, महाराष्ट्रातील आणि देशातील सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था बिघडलेली आहे. आम्ही आमच्या व्यथा व्यक्त करणे वेगळे आहे. पण ज्यांनी या राज्याचे पोलीस महासंचालक पद भूषविले आहे त्यांनीच असे वक्तव्य केले असेल तर त्याची दखल शासनाने घ्यावी हे बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 3-4 दिवसापूर्वी एबीपी माझा या दूरचित्रवाहिनीवर एक न्यूज मोठ्या प्रमाणावर दाखविण्यात आली होती. महात्मा गांधीजींच्या हत्येचे उदात्तीकरण हा त्या बातमीचा विषय होता. त्यावेळी एका व्यक्तीने असे वक्तव्य केले की, महात्मा गांधी हे ब्रिटिशांचे हस्तक होते. ती व्यक्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडित होती. तेव्हा या शक्ती पुन्हा पुन्हा अशा का वागतात याचा सरकारने कुठे तरी गांभीर्याने विचार केला पाहिजे.

केंद्र सकारने 26 जानेवारी रोजी एक जाहिरात सर्व वृत्तपत्रातून दिली होती. हा विषय आपला नसून तो केंद्र शासनाचा आहे. ही जाहिरात राज्यभर गेली. राज्य घटनेच्या प्रास्ताविकेत लोकशाही,समाजवाद, धर्मनिरपेक्षता हे शब्द आहेत. तेच शब्द या जाहिरातीतून वगळले आहेत. आपण घटना मानणार नाहीत काय ? या जाहिरातीबद्दल किंवा महात्मा गांधी हे ब्रिटिश सरकारचे हस्तक होते या वाक्याबद्दल महाराष्ट्र शासनाने एक चकार शब्द देखील काढलेला नाही. आपण कशी काय सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था ठेवणार आहात ते मला सांगावे.

मी कुठल्या तरी केंद्रीय नेत्याबद्दल बोलणे योग्य नाही. रामजादे आणि हरामजादे ही बातमी देशभर गेली. हे बरोबर नाही. उच्चपदस्थ व्यक्तींनी असे बोलून सामाजिक शांतता बिघडवू नये हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 11 नोव्हेंबर 2014 रोजी एक जी.आर. काढला आहे. मंत्र्यांनी, न्यायाधीशांनी, उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ कशी घ्यावी याचा नमुना त्यात दिला आहे. कोणी ईश्वराला साक्ष ठेवून, कोणी स्वतःच्या सद्‌सदविवेकबुद्धीला साक्ष ठेवून शपथ घेतो. पण या जी.आर.मध्ये दृढकथन, निष्ठेची शपथ आहेच पण त्यात घटनेमध्ये नमूद नाही ते वाक्य समाविष्ट करण्यात आलेले आहे. ते वाक्य असे आहे की, "यासाठी मला ईश्वर सहाय्य करो" आपण धर्मनिरपेक्षता स्वीकारली आहे. घटनेनुसार ते मान्य केले आहे. असे असताना ईश्वर मला सहाय्य करो हे वाक्य का समाविष्ट करण्यात आले आहे याचा खुलासा राज्य सरकारने केलेला नाही हे ही मी येथे नमूद करू इच्छितो. मला यावर अधिक काही बोलावयाचे नाही.

सभापती महोदय, या राज्यात सामाजिक शांतता, सुव्यवस्था ही राहिली पाहिजे. श्री.दाभोळकर असतील, कॉ.पानसरे असतील यांच्या हत्येचे आरोपी मिळाले पाहिजेत. आता आमच्या पुण्यातील लोक म्हणतात की, दाभोळकर हम शर्मिंदा है, तेरे कातिल अभी भी जिंदा है. एवढी वाईट परिस्थिती आज आहे.

मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना विनंती करणार आहे. त्यांनी आपली संस्कृती बिघडवता कामा नये. महाराष्ट्र हा आर्थिक व विकासाच्या तसेच राजकीय क्षेत्रात पुढे आहे. सगळ्याच बाबतीत महाराष्ट्र पुढारलेला आहे. मेहरबानी करून मुंबईचे आपण पॅरिस करू नका.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ......

नाईट लाइफच्या संदर्भात माननीय रावते साहेबांना थोडी अडचण होईल असे वाटते. परंतु आता महाराष्ट्राचे पॅरिस किंवा मुंबईचे पॅरिस करण्याच्या बाबतीत शासनाने खंबीर भूमिका घ्यावी अशी विनंती आहे. तुम्ही नाईट लाईफ संस्कृती करुन पब, डान्सबारची संस्कृती आणू नका. हायकोर्टाने तुम्हाला विचारले आहे की, नाईट लाईफ सुरु करताना तुम्ही महिलांची सुरक्षा करु शकता काय ? जोपर्यंत तुम्ही महिलांची सुरक्षा करु शकत नाही तोपर्यंत तुम्हाला नाईट लाईफच्या बाबतीत विचार सुध्दा करता येणार नाही. मी या ठिकाणी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सोमवारी भूमिका मांडावी, एवढे या प्रसंगी सांगून, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेच्या महत्वाच्या विषयावरील चर्चेत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी या विधिमंडळाचा सदस्य झाल्यापासून माझे हे तिसरे अधिवेशन आहे. या तीनही अधिवेशनामध्ये आपण कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा केली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हा सहा महिन्यापूर्वीही होता आणि आजही आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेच्या विषयावर कोणीही राजकारण करु इच्छित नाही व ते कोणीही करु शकत नाही. परंतु निवडणुकांपूर्वी ज्या प्रमाणे जाहिराती आल्या व एकूणच असे वातावरण निर्माण केले गेले की, लवकरच या राज्यातून आणि या देशातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सुटणार आणि भारताचे व महाराष्ट्रातील नागरिक एक सुरक्षित जीवन जगू शकतील. परंतु अशा प्रकारचा भास निर्माण केल्यामुळे मोठया प्रमाणात आपल्या समाजात नाराजी निर्माण झाली आहे. आज मी वैयक्तिक उदाहरण देऊन या सभागृहाचा वेळ घेणार नाही. माझ्या आधी बोलणाऱ्या अनेक वक्त्यांनी या ठिकाणी बऱ्याचशा घटनांचा उल्लेख केला आहे. त्यामुळे या राज्यात कायदा व सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून तो गंभीर प्रश्न आहे याबाबत दुमत नाही. मी आज या चर्चेच्या आधारे आपण काय करु शकतो आणि कायदा व सुव्यवस्थेवर आपण चार्ज कसा घेऊ शकतो यासंदर्भात विचार मांडू इच्छितो.

सभापती महोदय, या राज्यात कायद्याच्या संदर्भात कोणालाही भीती राहिली नसल्यामुळे कायदा व सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कायद्या विषयी भीती यासाठी राहिली नाही की, आपली जी न्याय प्रणाली आहे त्यामध्ये अनेक गंभीर प्रश्न असून ते आपल्याला सोडवावे लागणार आहेत. इंग्रजीत एक म्हण आहे "Justice delayed is Justice denied" व हेच आपल्या राज्यात होत आहे. आज वर्षानुवर्षे न्यायालयात खटले सुरु आहेत. ज्यांच्यावर आरोप आहेत ते आज बेलवर बाहेर फिरत आहे. त्यामुळे अशी परिस्थिती असताना कायद्याची भीती कोणाला राहणार आहे ?

सभापती महोदय, ज्या पध्दतीने इव्हेस्टीगेशन व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने आपल्या राज्यात इन्व्हेस्टीगेशन होत नाही. गेल्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु होती त्यावेळेस मी माननीय गृहमंत्र्यांना सांगितले होते की, महाराष्ट्रात एक डेडीकेटेड फॉरेन्सिक लॅबोरेटरी

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहूल नार्वेकर .......

असणे आवश्यक आहे. आज आपल्याकडे डेडीकेटेड फॉरेन्सिक लॅबोरेटरी नसेल तर अतिशय महत्वाचा असलेला फॉरेन्सिक एव्हिडन्स गहाळ होऊ शकतात. आज आपल्याला फॉरेन्सिक एव्हिडन्स मिळवायचा असेल तर बेंगलोर, अहमदाबाद पर्यंत आपल्याला आपले सॅम्पल्स पाठवावे लागतात. यासंदर्भातील सॅम्पलचा रिपोर्ट येईपर्यंत त्याचे काय होते हे मला तरी सांगण्याची गरज नाही.

सभापती महोदय, केंद्रशासनाने दोन वर्षापूर्वी प्रत्येक जिल्हयामध्ये संपूर्ण महिलांचे पोलीस स्टेशन असणे अनिवार्य केले होते. परंतु आजपर्यंत आपण महाराष्ट्रात संपूर्ण महिलांचे पोलीस स्टेशन करु शकलो नाही. त्याच प्रमाणे फास्ट ट्रॅक कोर्ट, ज्युडिशिअल इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रश्न आपल्या राज्यात खूप मोठा आहे. आपण जर फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केले आणि जर आपण ट्रायलला स्पीड देऊ शकलो तर निश्चितपणे कन्व्हीक्शन्स लवकर होऊ शकतील. कन्व्हीक्शन्स लवकर झाले तर कायद्याच्या संदर्भातील भीती लोकांमध्ये पसरु शकेल.

सभापती महोदय, कोर्ट रुम्स आहेत परंतु त्या ठिकाणी आवश्यक असलेला ज्युडिशिअल स्टाफ, जज्जेस आपण अपॉईंट करु शकलो नाही. त्यामुळे या गोष्टीकडे सुध्दा शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये "Low Conviction Rate" बद्दल खंत व्यक्त केली आहे. परंतु खंत व्यक्त करुन "Low Conviction Rate" चा प्रश्न सॉल्व्ह होणार नाही. हा प्रश्न आपल्याला सोडवायचा असेल तर आपल्याला सरकारच्या बाजूने चांगल्या वकिलांची नेमणूक करावयास पाहिजे.

सभापती महोदय, सायबर क्राईमचा विषय आता महत्वाचा झाला आहे. सायबर क्राईमच्या संदर्भात संपूर्ण जगात संशोधन सुरु आहे. जगात या विषयाबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. परंतु मी गेल्या तीन अधिवेशनात सायबर क्राईम बद्दल शासनाने ठोस भूमिका घेतल्याचे मी पाहिले नाही.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहूल नार्वेकर .......

सभापती महोदय, पोलिसांचे मनोबल खालावले असून मनोबल खालावण्याची अनेक कारणे आहेत. आपण जर पाश्चिमात्य जगात गेला मग ते इंग्लंड असो, स्वित्झर्लंड असो,स्पेन असो, जर्मनी असो किंवा फ्रान्स असो या कोणत्याही देशात गेलात तर आपल्याला दिसून येईल की, त्या ठिकाणी पोलिसांना मान असतो, त्यांचे पगार हे नोकरी करणाऱ्या इतर लोकांपेक्षा किती तरी जास्त असतात. आपल्याला जर पोलीस विभागाकडून चांगले काम करून घ्यावयाचे असेल तर पाश्चिमात्य देशातील पोलीस रिफॉर्म्स रेप्लीकेट करावे लागतील आणि ते आपल्या राज्यात आणावे लागतील.

सभापती महोदय, शासनाने व्हाईट कॉलर क्राईममध्ये लक्ष देण्याची आवश्यकता आहे. व्हाईट कॉलर क्राईममध्ये बँकींग फ्रॉड, क्रेडीट कार्ड फ्रॉडच्या संदर्भात सुध्दा आपल्याला दखल घ्यावी लागणार आहे.

सभापती महोदय, मुंबई सारख्या शहरामध्ये "Illegal Immigration" चा विषय अत्यंत मोठा आहे. मी सुध्दा एकेकाळी आज जे सत्तेमध्ये आहेत त्यांच्या पक्षात होतो. स्व.बाळासाहेब ठाकरे नेहमी अशी भूमिका मांडायचे की, मुंबईमध्ये जे बांगलादेशी घुसखोर आहेत त्यांचा बंदोबस्त केलाच पाहिजे व त्यांना आपल्या देशातून हद्दपार केलेच पाहिजे. माझा शासनाला सवाल आहे की, आपण सातत्याने जो प्रश्न उपस्थित करीत होता तो प्रश्न आज तुम्ही का विसरलात ? सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही नेत्याकडून इल्लीगल इमिग्रेशनचा विषय घेतला जात नाही.

सभापती महोदय, आपल्या संविधानामध्ये आर्टीकल 14 अंतर्गत आपल्याला "Equality before the law" आणि "Equal Protection of the law" चा अधिकार दिलेला आहे. या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी फिल्म ॲक्टर संजय दत्तच्या पॅरोलचा विषय उपस्थित करून सर्वांसाठी कायदा समान राहील असे सांगितल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. हेच उदाहरण समोर ठेवून आपण पुढील काळात जस्टीस डिस्पेंसेशनमध्ये इक्वॅलीटी आणली तर निश्चितपणे लोकांचा कायद्यावरील विश्वास ठाम राहील.

सभापती महोदय, आपल्याकडे आयपीसी, सीआरपीसी, बॉम्बे पोलीस ॲक्ट सारखे कायदे आहेत. परंतु हे कायदे 100 वर्षापूर्वीचे आहेत. मला कल्पना आहे की, आयपीसी, सीआरपीसीचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल नार्वेकर......

लेजिस्लेशन करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे. यासंदर्भात मला वाटते की, आपण एक "Judicial Reform Panel" लेजिस्लेचरमध्ये फॉर्म करावयास पाहिजे व त्या "Judicial Reform Panel" च्या मार्फत पिनल सिस्टममध्ये अमेंडमेंट करावयास पाहिजे व त्यासंदर्भात आपण पुढाकार घेणे आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ सायंकाळी 7.30 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ सायंकाळी 7.40 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते मांडलेली आहेत. वेळ कमी असल्यामुळे मी फक्त महत्वाच्या मुद्यांवर बोलणार आहे.

सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये ज्या काही घटना घडत आहेत मग त्यामध्ये स्त्रीवरील अत्याचार असेल, लहान मुलांचे अपहरण असेल, लहान मुलांची झालेली हत्या असेल या सर्व घटना मनाला वेदना देणाऱ्या आहेत. अशीच मनाला वेदना देणारी घटना राज्यात घडली आणि त्याचे कोडे अद्याप उलगडलेले नाही. या घटनेची चर्चा राज्यात नाही तर देशात होऊ लागली आहे. पुरोगामी चळवळीचे अग्रणी नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येमुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली होती. त्यांच्या मारेकऱ्यांना अजूनपर्यंत का पकडण्यात आलेले नाही याबाबत संशय बळावत आहे. त्यामुळे राज्य शासनाने या घटनेकडे अत्यंत गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे असे मला वाटते. दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी कॉम्रेड पानसरे आणि त्यांच्या पत्नीवर प्राणघातक हल्ला झाला. दिनांक 20 फेब्रुवारी रोजी मुंबईतील रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. आपण पूर्वीच्या काही घटना पाहिल्या तर त्याबाबत काही संशय व्यक्त केला जात आहे. कॉम्रेड पानसरे यांची कोल्हापूरमध्ये एक सभा झाली होती. त्या सभेमध्ये त्यांनी देशामध्ये आणि राज्यामध्ये गांधीजींच्या हत्यारांचा उदो उदो होत आहे, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या कोणत्या विचाराने झ ाली आहे,असे विचार त्यांनी व्यक्त केले होते. त्यानंतर ही घटना घडलेली आहे. कॉम्रेड पानसरे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्यानंतर त्यातील आरोपी अजून सापडले नाहीत, तेव्हा राज्यातील जनतेला अधिक संशय येऊ लागला आहे.

सभापती महोदय, कॉम्रेड पानसरे यांच्या मुलींना प्रेसने काही प्रश्न विचारले त्यावेळी तिने सांगितले की, ही घटना घडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी आरोपींना तत्काळ पकडण्यात येईल., आरोपी आमच्या नजरेच्या टप्प्यामध्ये आहेत, आम्ही सर्वत्र नाकाबंदी केलेली आहे असे रोज काही ना काही बोलत होते. परंतु अलीकडे त्यांचे या संदर्भातील कोणतेही वक्तव्य का येत नाही असा

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

संशय त्यांनी व्यक्त केलेला आहे. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, मारेकऱ्यांना पकडण्याची शासनाची इच्छाशक्ती आहे की नाही ? याचा अर्थ आपणा सर्वांना समजण्यासारखा आहे. या प्रकरणामध्ये एक प्रकारचे वलय तयार होऊन त्या संदर्भात संशय वाढत आहे.

सभापती महोदय, या प्रकरणा संदर्भात शिवसेना पक्षाचे प्रमुख श्री.उद्धव ठाकरे यांनी "हे व्यवस्थेचे अपयश आहे" अशी प्रतिक्रिया दिली होती. दैनिक सामनाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले होते की, आपणास व्यवस्थेवर जबाबदारी टाकून चालणार नाही. महाराष्ट्रातील सरकार बदलले पण महाराष्ट्र बदललेला नाही. सत्तेमध्ये सहभागी असलेल्या पक्षाचे प्रमुख असे वक्तव्य करीत असतील तर सरकारने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे असे मला वाटते आणि तशाप्रकारचा विचार व्हावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी टीकाटिप्पणी करण्याकरिता उभा नाही. नवीन सरकार आले. आता कायदा आणि सुव्यवस्थे्बाबत कुठेतरी सुधारणा झाली पाहिजे. या सुधारणा करीत असताना शासन म्हणून काही गोष्टींची जबाबदारी घेण्याची आवश्यकता असते. पोलीस विभागामध्ये ज्या काही उणिवा असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला पाहिजे.

सभापती महोदय, सुरुवातीच्या काळात पोलीस भरती कशी होत होती हे आपणा सर्वांना माहीत आहे. आपण पोलिसांना किती महिने प्रशिक्षण देतो ? पूर्वी पोलीस भरतीसाठी इयत्ता सातवी पास ही अट होती आणि वयाच्या 35 वर्षापर्यंत पोलीस कॉन्स्टेबल होता येत होते. पोलीस सेवेत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबलची मुले देखील पोलीस भरतीमध्ये भाग घेत होती. सातवी पास झाल्यानंतर आणि वयाच्या 35 वर्षापर्यंत पोलीसमध्ये भरती होता येत असल्यामुळे तो 14 वर्षे वयाचा मुलगा म्हणून शिक्षण सोडून द्यायचा. पोलीस 24 तास डयुटीवर असल्यामुळे त्यांना घराकडे लक्ष देता येत नव्हते, मग त्यांचे मुलांकडे कसे लक्ष राहणार ? आपण पोलिसांना फक्त सहा महिने प्रशिक्षण देऊन कोणत्या तऱ्हेचा पोलीस तयार करणार आहोत ? आपण नंतर शिक्षणाच्या अटीमध्ये बदल करुन ती दहावी पर्यंत केली आणि वयाची मर्यादा 30 वर्षापर्यंत केली.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यानंतर शिक्षणाची अट बारावी पर्यंत केली. आपण अशाप्रकारे सुधारणा केल्या. परंतु पोलिसांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. पोलीस विभागात चांगल्या प्रकारचे पोलीस तयार झाले पाहिजेत. आपण पोलिसांना जे प्रशिक्षण देतो त्यातून चांगल्या प्रकारचा पोलीस तयार होऊ शकतो काय, याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज पोलिसांच्या बदल्यांबाबत कोणती व्यवस्था आहे ? एका पोलीस स्टेशनमध्ये किती कर्मचारी असले पाहिजेत, तेथील सर्व पदे भरलेली आहेत काय ? कोणत्या कॅटेगरीचा पोलीस कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये दिला पाहिजे याची चौकट ठरविण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी त्या संदर्भात केलेला उल्लेख महत्वाचा आहे.

सभापती महोदय, आपण पोलिसांचा सन्मान केला पाहिजे. पोलिसांच्या शौर्याबद्दल त्यांना शौर्य पुरस्कार देण्यात येतो. त्यांना राष्ट्रपती पदक सुद्धा देण्यात येते. परंतु आपण जिल्हा स्तरावर अशाप्रकारची व्यवस्था केली तर पोलिसांना काम करताना उत्साह येईल. त्यांना सार्वजनिक ठिकाणी मोठ्या व्यक्तींच्या हस्ते पुरस्कार दिल्यास ते अधिक जोमाने काम करतील आणि त्यांच्या कामात ते अधिक सुधारणा करतील.

सभापती महोदय, पोलिसांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांच्या घरांचा प्रश्न आहे. गुन्हा अन्वेषण विभागामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. पोलीस भरती प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. होमगार्डमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, आपण या सर्व सुधारणा केल्या तर निश्चितपणे कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये सुधारणा होऊ शकेल.

सभापती महोदय, मागील चार महिन्यांपासून कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली आहे. वरिष्ठ पातळीवरील पोलीस अधिकारी खंबीर असेल तर त्या भागातील कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहू शकते. मुख्यमंत्री महोदयांनी गृहमंत्री म्हणून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कडक पावले टाकावीत, अशी त्यांना विनंती करून वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावरील चर्चा आता संपलेली आहे. या प्रस्तावावर माननीय गृह मंत्र्यांचे उत्तर सोमवार, दिनांक 30 मार्च, 2015 रोजी होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दि□ां□ 27 मार्च, 2015 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ा भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ रात्री 7 वाजू□ 40 मि□िटां□ी, शुक्रवार, दि□ां□ 27 मार्च, 2015 च्या स□ाळी 11.00 वाजेपर्यंत स्थ□ि□ झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION